म. ग्र. सं. ठाणें.
विषय कं : प्रवास
सं. क्र ६११

# चषक आणि गुलाब

सुभाष भेण्डे.

REFBK-0023201

REFBK-0023201

# चषक आणि गुलाब

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

म्युनिचच्या उत्सवात तरुणतरुणी बीअरची पिपं पोटात रिचवतात, आणि दिवसरात्र मन:पूत धुमाकूळ घालतात ! म्युनिच फेस्टिव्हलनंतर आठनऊ महिन्यांनी जर्मनीतलं जननप्रमाण एकदम वर जातं !

पण त्यामुळं जर्मनीचं काही बिघडत नाही ! लोकसंख्यावाढीचा मंद वेग ही जर्मनीसारख्या पुढारलेल्या देशांची डोकेदुखी आहे म्युनिचप्रमाणं गावगन्ना अशा प्रकारचे 'बीअरोत्सव' साजरे झाले तर सरकारला ते हवेच आहेत ! जर्मनीसारख्या कल्याणकारी देशात मुलं कुटुंबावर आर्थिक भार होऊन बसत नाहीत. मुलाचं प्राथमिक शाळेपासून महाविद्यालयापर्यंतचं सर्व शिक्षण मोफत आणि सक्तीचं पाळण्यापासून दफनापर्यंत माणसाच्या आरोग्याची काळजी सरकार घेतं. एवढी प्रोत्साहनं दिली तरी मानवी श्रम गरजेच्या मानानं अपुरे पडतात. श्रमिकांची कमतरता भासते. दुर्मिळ मानवी श्रमांचा कमीत कमी वापर सर्व प्रकारच्या उत्पादनांत करणं भाग पडतं.

बसमधल्या मित्राना ' टा—टा ' करून मी
स्टेशनसमोरच्या वृत्तपत्राच्या स्टॉलवर गेलो.
बरेच दिवस इंग्रजी वर्तमानपत्र वाचलं नव्हतं.
' डेली अमेरिकन ' हे रोमहून प्रसिद्ध होणार
इंग्रजी पत्र पाहून मी त्यावर झडप घातली.
स्टॉलवर नग्न स्त्रियांची मुखपृष्ठं असलेली
अनेक मासिक दृश्यभागी ठेवलेली होती
अनेक आवटर्षोकी म्हातारे इटालियन्स
उभ्याउभ्या ती चाळत स्त्रीसौंदर्याचा
( डोळ्यांनी ) आस्वाद घेत होते ! मी
' डेली अमेरिकन ' उघडला. भारतातल्या
बातम्या दिसतात का ते पाहिलं पश्चिम—
बंगालमधे महापुरामुळे झालेल्या हानीची वार्ता
ठळक अक्षरात होती. अग्रलेखाजवळ
ग्रेनव्हिल वॅट्स नामक वार्ताहराने घेतलेली
इंदिरा गांधींची मुलाखत, आणि उजवीकडे
भांगाजवळचा पांढऱ्या केसांचा झुबका
स्पष्टपण दाखवणारा त्यांचा मोठा फोटो
' आणीबाणी आवश्यक होती, भारताच्या
प्रगतीसाठी व स्थैर्यासाठी तोच एक
मार्ग होता ' असं इंदिराबाईंचं
नेहेमीप्रमाणे निर्लज्ज समर्थन !

विश्वमोहिनी पुस्तक ६१

# चषक आणि गुलाब

## सुभाष भेण्डे

आता अभिनव वाग्विलासिनी । जे चातुर्यार्थकलाकामिनी ।
ते शारदा विश्वमोहिनी । नमस्कारिलि मियां ।।

प्रकाशक :
आनद अनंत अतरकर
विश्वमोहिनी प्रकाशन,
६२/१२, कर्वे रोड,
पुणे ४

वेष्टण
आणि
आलील चित्रे
रमेश तळेगावकर

मुद्रक
आ. अ. अतरकर
हस प्रिंटिंग प्रेस,
४७४/१, सदाशिव पेठ,
टिळक रोड, पुणे ३०

© सौ. पुष्पा भेण्डे

मूल्य २५ रु

प्रथमावृत्ती
२१ डिसेंबर, १९८०

श्री. बशी आरोरा

सौ नीला आरोरा

अमित आरोरा

यांना —

# झेपावे पश्चिमेकडे

प्रा. सुभाष भेण्डे यूरपचा प्रवास करून परत आले त्यानंतर 'मोहिनी' मासिकातून त्यांचे त्या प्रवासासंबंधीचे लेख प्रसिद्ध होऊ लागले त्यांतले आरंभीचे काही लेख मी वाचले तेवढ्यात एक दिवस भेण्डे मला म्हणाले, "ह्या लेखांचा संग्रह प्रकाशित होणार आहे त्याला तुमची प्रस्तावना पाहिजे" मी म्हटले, "ठीक आहे"

'ठीक आहे' म्हटले खरे. पण मग मी विचार करू लागलो मी होकार का दिला? हे काही भेण्ड्यांचे पहिले पुस्तक नाही. कथा, विनोदी स्फुटलेख ह्यांचे नऊ संग्रह, चार कादंबऱ्या, दोन संपादित ग्रंथ असे त्यांचे साहित्य प्रकाशित झाले आहे आणखी दोन कादंबऱ्या आणि एक कथासंग्रह प्रकाशनाच्या मार्गावर आहे. समाजातल्या सर्व थरांतल्या — विशेषत मध्यम वर्गातल्या — स्त्री-पुरुषांच्या ढोंगा-सोंगांचे बुरखे हसतखेळत टरकावणारे, अलंकाराचे लफ्फे-लपेटे नसलेल्या, रोजच्या साध्या भाषेत, पण खुमासदार खुसखुशीत, दिलखुलास, निर्मळ, विनोदी लेखन करणारे (त्यात स्वत:ला आणि स्वत:च्या बायकोलाही गोवणारे) म्हणून त्यांनी मराठी साहित्याच्या क्षेत्रात नाव मिळवले आहे त्याबरोबरच गंभीर स्वरूपाचे कादंबरीलेखनही त्यांनी केले आहे त्यात समाजाच्या वेगवेगळ्या थरात किंवा गटात निर्माण होणाऱ्या समस्यांचे त्यांनी प्रभावीपणे चित्रण केले आहे माणसाच्या मनोव्यापाराचा मागोवा घेतला आहे स्फुट आणि दीर्घ, विनोदी आणि गंभीर असे विविध प्रकारचे लेखन सारख्याच समर्थपणे करणारे लेखक विरळा त्यापैकी भेण्डे आहेत

असे असताना भेण्ड्यांनी आपल्या चौदाव्या किंवा पंधराव्या पुस्तकाला माझी प्रस्तावना का मागावी आणि मी होकार का द्यावा?

मला ह्या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर सापडेना बरी आपली सहजासहजी एक प्रस्तावना लिहायला मिळते आहे म्हणून मी होकार दिला असेही नाही ह्या प्रस्तावनेत मी प्रवासलेखन ह्या

23209

वाङ्मयप्रकाराची चर्चा करावी आणि त्या क्षेत्रातले त्याचे स्थान निश्चित करावे अशी भेण्ड्यांची अपेक्षा असेल असे मला वाटून मी होकार दिला असेही नाही मी प्रस्तावना लिहायला होकार दिला त्याचे कारण वेगळेच असावे असे मला वाटते

गोव्याहून निघून सांगली–पुणे मार्गाने प्रवास करीत भेण्डे आता मुंबईत स्थायिक झाले आहेत. तरी पण त्यांचा एक पाय अजून गोव्यात आहे.

गिरगाव–ठाकुरद्वारासारख्या भागात, बिळासारख्या चिचोळ्या आणि अंधाऱ्या खोल्यांत, राहणाऱ्या आणि कष्ट करून जेमतेम पोट भरू शकणाऱ्या ‘ सुखी ’ कुटुंबांपासून तो समुद्रकिनाऱ्यावर किंवा टेकड्यांच्या माथ्यावर प्रशस्त राजेशाही बंगल्यात रहाणाऱ्या श्रीमंत, नवश्रीमंत आणि अतिनवश्रीमंत ‘ सुखी ’ माणसापर्यंत भेण्ड्यांचा संचार आहे त्यांच्या जीवनातली वळणे–वाकणे त्यांना चांगली माहीत आहेत (‘ अंधारवाटा ’ ह्या त्यांच्या कादंबरीत समाजाची ही दोन्ही टोके एकत्र आली आहेत.) अशाच एका श्रीमंत चित्रपट–निर्मा–त्याच्या ‘ बायॉलॉजिकल ईकनॉमिक्स ’ ह्या ग्रंथाला अर्थशास्त्राचे प्राध्यापक भेण्डे ह्यांनी प्रस्तावना लिहिली आहे हा त्यांच्या लेखनाचा एक पैलू

अर्थशास्त्र हा भेण्ड्यांच्या अध्यापनाचा विषय आहे आपला समाज हा त्यांच्या अवलोकनाचा, चिंतनाचा विषय आहे जीवनातल्या दुःखांची त्यांना जाणीव आहे पण जीवनातले विविध आनंद आणि सुखे निकोपपणे आणि मनापासून उपभोगण्याची त्यांची वृत्ती आहे ते विरक्त मुळीच नाहीत. पण लोलुपही नाहीत भेण्ड्यांच्या व्यक्तिमत्त्वात आणि लेखनात हे जे वेगवेगळे पैलू मला दिसतात आणि जाणवतात त्यामुळेच, मला वाटते, मी प्रस्तावना लिहायला होकार दिला

यूरपच्या प्रवासाला निघाल्यावर भेण्डयांनी पहिली खरेदी केली ती दुबईच्या विमानतळावर 'शिवास रीगल'च्या एका बाटलीची पुढे यूरपमध्ये गेल्यावर त्यांनी व्हिस्की, बिअर, रम, रेड वाइन, व्हाइट वाइन, शांपेन अशा त्यांना मिळू शकलेल्या सर्व प्रकारच्या मद्यांचे सेवन केले. हे त्यांनी चोरून केले नाही केलेले चोरून ठेवले नाही आणि सांगताना फुशारकीने सांगितले नाही

यूरपमधल्या सर्व देशातल्या प्रमुख शहरात भेण्डयांना 'सेक्स शॉप्स' दिसली तिथे पुस्तके, मासिके, चित्रे, आणि स्त्री–पुरुषांच्या जननेंद्रियाची मॉडेल्स दिसली मिनी–थिएटर्स तिथे होती आणि कामक्रीडाचे चित्रपट दाखवले जात होते. ह्यातले जे जे त्यांनी पाहिले त्याचा त्यांनी उल्लेख केला आहे

रोममध्ये त्यांच्या हॉटेलात काही अमेरिकन तरुणतरुणी त्यांच्यातल्या एका मुलीचा वाढदिवस साजरा करीत होते, "तुम्ही भारतीय लाजरे–बुजरे. तुम्ही चुबन कसलं घेता !" असे म्हणून त्यानी भेण्डयांना त्या तरुणीचे चुंबन घेण्याचे आव्हान दिले आणि भेण्डयानी तिचे चुबन घेतले प्रश्न त्यांचा नव्हता, तर सबध भारतीयांच्या अस्मितेचा होता म्हणून

भेण्डयांच्या आई–वडलाना आपला मुलगा माहीत आहे आणि भेण्डयांच्या बायकोला आपला नवरा माहीत आहे म्हणूनच हे सगळे ते इतक्या मोकळेपणाने लिहू शकले

पण भेण्डयानी यूरपच्या प्रवासात नुसतीच चैन केली नाही किंवा नुसत्या बघ्यासारखे देश पाहिले नाहीत त्यांच्यातला अर्थ–शास्त्रज्ञ, ललित लेखक आणि चौकस सुशिक्षित महाराष्ट्रीय माणूस सतत आणि सर्वत्र जागरूक होता शक्यतोवर त्यानी तिथले लोक पाहिले त्यांच्याशी गप्पागोष्टी केल्या त्यांच्या देशांची स्थिती, त्यांची सुखदुःखे जाणून घेतली पुष्कळ ठिकाणी ते प्रवासी बस सोडून एकटेच स्वतंत्रपणे हिंडले त्यामुळे 'कंडक्टेड' प्रवासी सामान्यत. जे पाहत नाहीत ते भेण्डे पाहू शकले

इंग्लंडचा आर्थिक मागासलेपणा, तिथल्या भारतीयाचे दुय्यम नागरिकत्व आणि काहींचा खोटा डौल, स्कॉटिश माणसाचा स्वाभिमान आणि स्वत वरच विनोद करण्याची त्यांची प्रवृत्ती, यूरपमधल्या प्रवासाच्या सोयी, बेल्जममधले फ्लेमिश बोलणारे फ्लेमिंग आणि फ्रेंच बोलणारे वॉलन्स ह्यांचे ताणलेले संबध, युद्धानतर नव्या जोमाने वर आलेला पश्चिम जर्मनी, संगीताने भारलेले आणि एकेकाळी अनेक प्रतिभावतांचे निवासस्थान असलेले व्हिएना, अत्यत निसर्गसुदर, निरोगी, उद्योगी, सपन्न, पण सास्कृतिक परपरारहित स्वित्सलंड;

इटली-रोम आणि फ्रान्स-पॅरिस, ह्या सर्वांची त्यांनी नोंद घेतली आहे.

इटली देश त्यांना भारतासारखाच वाटला. ते म्हणतात, " स्वच्छ नितळ सूर्यप्रकाश, नांगर ओढणारा बैल, कपडे धुणाऱ्या बायका, खिडकीबाहेर लोंबकळणारे कपडे, वाहतुकीचे नियम न पाळणारा नागरिक, ' सुशेगाद ' काम करणारे कामकरी, सार्वजनिक ठिकाणी खो-खो हसणारे आणि अस्खलित बडबडणारे इटालियन हे सर्व पाहून युरोपात भारताशी सर्वाधिक साम्य असलेला देश म्हणजे इटली याची खात्री पटते " ह्याच्या भरीला असंख्य राजकीय पक्ष आणि राज्यकारभारातला गोंधळ हे आणखी साम्य.

यूरपियन संस्कृतीचे एक मूळ प्राचीन ग्रीसमध्ये आहे, तर दुसरे प्राचीन रोममध्ये आणि ह्या प्राचीन रोमचीही दोन रूपे आहेत. एक विलासी, क्रूर आणि अमानुष, तर दुसरे शिस्तबद्ध आणि लोकशाही-निष्ठ कॉलसीयम आणि फोरम ही त्याची दोन प्रतीके

पूर्वीच्या काळी यूरपिअन संस्कृतीत जे स्थान रोमला होते ते आधुनिक काळात फ्रान्सला — विशेषतः पॅरिसला — आहे पॅरिसला जायचे म्हणजे तिथले ' नाइट लाइफ ' पाहायला, अशीच सर्व साधारण समजूत ते तर तिथे आहेच पण आधुनिक काळातल्या यूरपचेच नव्हे, तर सगळ्या जगाचेच विज्ञान, तत्त्वज्ञान, राजकीय तत्त्वज्ञान, साहित्य, ललितकला, विशेषतः चित्र आणि शिल्प, ह्या बाबतीत पॅरिस हे स्फूर्तिस्थान आहे फ्रेंच राज्यक्रांतीने आणि त्यामागच्या तत्त्वज्ञानाने तर जगातल्या अनेक परतंत्र देशांना स्फूर्ती दिली आहे

स्वित्सर्लंडमध्ये सुबत्ता आणि भरपूर ऐहिक सुखे आहेत पण तिथे आत्महत्येचे प्रमाणही फार मोठे आहे स्वित्सर्लंडची आणि फ्रान्सची तुलना करताना भेण्डे म्हणतात, " स्वित्सर्लंडप्रमाणे केवळ ऐहिक सुखात धन्यता मानण्यात फ्रान्सला कमीपणा वाटतो डेकार्ट, रूसो, व्हॉल्तेअर, फ्लॉबेर आणि प्रूस्ट ह्यांचे विचार फ्रान्सची सीमा ओलांडून जगभर पसरले. लुई पास्तर आणि मादाम क्यूरी यांनी विज्ञानाच्या जगात अलौकिक यश संपादन केलं, तर व्हिक्टर ह्यूगो, मोलिएर ह्यांच्यासारख्यांनी साहित्यक्षेत्र गाजवून सोडलं. "

भेण्डे यूरपच्या प्रवासाला निघाले तेव्हा त्यांच्या एका मित्राने त्यांना सल्ला दिला होता, " प्रोफेसरसाब, यूरोप जाके सिर्फ एन्जॉय करना. बस्स ! "

भेण्डयांनी एन्जॉय केले पण ' सिर्फ ' एन्जॉय केले नाही एका डोळस, चौकस, सुशिक्षित, संवेदनशील माणसाप्रमाणे त्यांनी यूरपचा प्रवास केला त्याचे ठसे म्हणजे हे लेख.

हे लेख कोणत्याही साच्यात बसणारे नाहीत. किंबहुना सगळे लेख एकाच साच्याचे आहेत असेही नाही. कुठे इतिहास सांगितला आहे, तर कुठे सद्य:स्थिती, कुठे जे पाहिले त्याचे वर्णन आहे, तर कुठे त्याबरोबरच अभिप्राय आणि टीका-टिप्पणी, कुठे स्थानिक लोकाशी संवाद, तर कुठे चिंतन. अशी त्यात विविधता आहे खरे म्हणजे प्रवासलेखन हा वाङ्मयप्रकारच असा आहे की त्याचा साचा बनवता येत नाही. एखादे स्थळ पाहत असताना लेखकाची त्याच्यासंबधी कशी प्रतिक्रिया होईल हे त्याच्या मानसिक घडणीवर, संस्कारांवर, त्याच्या जिज्ञासेच्या जातीवर आणि प्रतीवर अवलंबून राहील कदाचित त्या वेळच्या त्याच्या मन:स्थितीवर आणि प्रवासाच्या उद्देशावरही अवलबून राहील लिहिताना लेखक कोणती मानसिक बैठक घेतो त्यावरही राहील. कोणत्याही प्रकारचे प्रवासलेखन असले तरी ते मुख्य म्हणजे वाचनीय, वेधक झाले पाहिजे लेखक वाचकाला आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकला पाहिजे त्याला आपल्या भाव-भावना प्रतिक्रिया समर्थपणे व्यक्त करता आल्या पाहिजेत ते स्थळ, तो प्रसंग जिवंत उभा करता आला पाहिजे. त्यातून लेखक आणि स्थळ ही दोन्ही दिसली पाहिजेत खरे म्हणजे स्थळ दिसले पाहिजे. त्याबरोबर लेखक आपोआपच दिसतो. भेण्ड्यांच्या प्रवासलेखात हे साधले आहे त्यात भेण्डे आणि त्यांनी पाहिलेला यूरप हे दोन्ही दिसतात. तर आता मी बाजूला व्हावे आणि वाचकांना भेण्ड्यांच्या हवाली करावे हे बरे ! त्यांचा वेळ मजेत जाईल ह्याची मला खात्री आहे.

२४।४।८० — रा. भि. जोशी

१
मुंबई ते लंडन व्हाया बगदाद
११
युरोपमधला सर्वांत मागासलेला देश
२३
दोरी तुटलेले असंख्य पतंग
३६
राकट, कणखर, कोमल देश
४९
लेक्सचं चिमुकलं पण प्रभावी साम्राज्य
६१
राखेतून जन्मलेला फीनिक्स पक्षी
७३
युरोपच्या मागील दारी पहुडलेला हत्ती
८४
पाण्यावर हिंदकळणारी अद्‌भुत नगरी
९९
'रोम कोसळेल तेव्हा सगळं जग कोसळेल !'
१११
बी अ रोमन व्हेन यू आर इन रोम
१२४
शांतता ! हे स्वित्झलँड आहे !
१३८
सेनच्या काठावरची रम्य नगरी

## दोन शब्द

ह्या प्रवासकथा ' मोहिनी ' मासिकात जानेवारी १९७९ ते मार्च १९८० या काळात ' फेसाळते चषक — उमलते गुलाब ' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झाल्या. शीर्षकातील विशेषण काढून ते सुटसुटीत करण्याची सूचना माझे मित्र श्री. उमाकांत ठोमरे यांची

प्रा. रा. भि. जोशी यांनी ह्या प्रवासकथांसाठी वेळात वेळ काढून प्रस्तावना लिहिली त्यांनी व सौ. सुधाबाई जोशी यांनी पहिल्या लेखापासून ह्या प्रवासकथांत रस घेतला होता.

श्री आनंद अंतरकर यांनी नेहेमीच्या उत्साहानं, मन:पूर्वकतेनं हे पुस्तक अंतर्बाह्य सजवलं आहे.

श्री. उमाकांत ठोमरे, प्रा रा. भि जोशी, सौ. सुधाबाई जोशी आणि श्री. आनंद अंतरकर यांचे मनापासून आभार.

— सुभाष भेण्डे

१

# मुंबई ते लंडन व्हाया बगदाद

तसं परदेशी प्रस्थान ठेवायला विशेष कारण घडलं असं नाही. कुठल्याही फाउंडेशनची शिष्यवृत्ती मिळाली नव्हती किंवा सरकारतर्फे जाणाऱ्या एखाद्या शिष्टमंडळात समावेशही झालेला नव्हता (समावेश कसा करून घ्यायचा असतो याचही एक तंत्र असतं म्हणे ! पण त्या तंत्राविषयी अस्मादिक अनभिज्ञ !) कन्याराशीला साडेसाती असली तरी या वर्षी परदेशगमनाचा योग आहे अशी गतवर्षीच्या दिवाळी-अंकात यच्चयावत् भविष्यवेत्त्यांनी एकमतानं ग्वाही दिली होती. तेव्हा त्याचं भविष्य खरं व्हावं, आणि आपल्याही अनुभूतीच्या कक्षा विशाल वगैरे होतात का पहाव्यात, अशा दुहेरी हेतूनं परदेशगमनाचा बेत निश्चित केला.

परदेशी जायचं तर ठरलं. पण जायचं कुठं ? कुणी जपानला जायची सूचना केली, तर कुणी अमेरिका हा जगातला एकमेव प्रेक्षणीय देश असल्याचं निक्षून सांगितलं. मला स्वतःला युरोपीय देशाविषयी जितकं कुतूहल आहे तितकं दुसऱ्या कोणत्याही देशाविषयी नाही ! अमेरिकेला तर कधीतरी जायचं आहेच, पण थेट आकाशाला भिडणारे अमानुष, अजस्र स्कायस्क्रेपर्स पहाण्यापूर्वी मला ग्रीक, रोमन संस्कृतीचे भग्न अवशेष न्याहाळायचे आहेत. 'डिस्नेलँड'ला भेट देण्यापूर्वी गॉथिक शैलीतली कॅथेड्रल्स पहायची आहेत.

आफ्रिकेतल्या एका निग्रो माणसाला गोरा माणूस भीक कशी मागतो, ओझी कशी उचलतो हे पहाण्याची जबरदस्त इच्छा होती म्हणे ! जिथं विमानानं पोचायला दहाबारा तास लागतात इतक्या दूर अंतरावरून हिंदुस्थानसारख्या खंडप्राय देशावर दीडशे वर्षं गुण्यागोविंदानं राज्य करणारा तो इंग्रज माणूस आपल्या मायदेशी रहातो कसा, वागतो कसा हे मला जवळून पहायचं होतं. दुसऱ्या महायुद्धाच्या वडवानलात होरपळून निघाल्यावरही राखेतून जन्म घेणाऱ्या फीनिक्स पक्ष्याप्रमाणं जे देश पुन्हा ताठ मानेनं उभे राहिले त्या देशाची ओळख मला करून घ्यायची होती. उंबरठ्यापाशी लक्षावधी माणसांचा संहार होत असताना नीरो-प्रमाणं फिड्ल वाजवत बसणाऱ्या विल्यम टेलचा स्वित्झर्लंड न्याहाळायचा होता. 'उन्मत्त रोमच्या गढूळ बेहोषीचं सार्वजनिक वीर्यपतन जिथं होत असे ते कॉलसियम

नामक योनिस्थल' पहायच होत झालच तर शेक्सपिअरची जन्मभूमी, नेपोलियनची कर्मभूमी, मायकेल एंजेलोच फ्लोरेन्स न् सिस्टीन चॅपेल, सतत सव्वीस वर्षं लंडनच्या रंगभूमीवर चालू असलेल अॅगाथा ख्रिस्तीचं 'माउस ट्रॅप', वेगळ्या कारणासाठी गाजलेल 'ओ कलकत्ता', पॅरिस आणि सोहोमधल नाइट-लाइफ जवळची पुंजी संपेपर्यंत जमेल तितक पाहून घ्यायच

माझ्यापुरती मी युरोप-प्रवासाची 'ब्ल्यू प्रिंट' तयार केली

लंडनला पोचण्यापूर्वी बरेच अडथळे पार करावे लागतील याची कल्पना नव्हती पासपोर्ट हातात आल्यावर संकल्प आणि सिद्धी यामध्ये कुणी उभ असेल अशी सुतराम अपेक्षा नव्हती फ्लोरा फाउंटनजवळच्या ब्रिटिश वकिलातीच्या कचेरीत जाऊन व्हिसा पदरी पाडण म्हणजे गुलबकावलीच फूल मिळवण आहे ! सकाळी नऊला ऑफिस उघडत म्हणून साडेआठला गेलो, तर बंद कचेरीला फुटलेल क्यूच शेपूट जिन्याच्या पायऱ्यांना वळसा घालून हायकोर्ट आणि 'मर्कंटाइल बँक' यामधल्या दुबेळक्यात वळवळत असलेल दिसल ! मारुतीच्या पुच्छाप्रमाण क्षणाक्षणाला ते लांबत होत एवढे लोक इंग्लंडला जात असतील याची कल्पना नव्हती मुकाट्यान घरी परतलो दुसऱ्या दिवशी पहाटे गजर लावून उठलो आणि तांबड फुटण्यापूर्वीच फाउंटनपाशी डेरेदाखल झालो (तरी माझ्यापुढ रांगेत वीसपंचवीस लोक ! )

एका गोऱ्या माणसान दहा वाजता माझ्या नावाचा पुकारा केला तेव्हा मी आत शिरलो इमिग्रेशन ऑफिसरच्या केबिनमध जाऊन खुर्चीवर बसून ऑफिसरची वाट पाहू लागलो कुठ चहा घ्यायला गेला असेल असा माझा अंदाज होता पण माझ नाव पुकारणारा ठेंगणा, टक्कल पडलेला गोरा माणूस माझ्यासमोर येऊन बसला तेव्हा मी दचकलोच ! आम्हा भारतीयांना ही सवय नाही ऑफिसर पंख्याखाली पाय ताणून बसणार आणि पट्टेवाला बाहेर येऊन 'हजर आहेत काय ?'च्या चालीवर पुकारा करणार ! इथ पट्टेवाल्याच्या भूमिकेत दस्तुरखुद्द ऑफिसर !

मग या ऑफिसरन माझी अर्धा तास अशी उलटतपासणी घेतली की ज्याच नाव ते ! मी मुंबईहून पळून त्याच्या देशात आसरा मागतोय याबद्दल त्याची बालबाल खात्री झाली असावी ! तो प्रश्नावर प्रश्न विचारीत होता, आणि त्याचे ते बोबडे, ओठातून कष्टान बाहेर येणारे उच्चार समजून घेऊन समाधानकारक उत्तर देताना माझी त्रेधा उडत होती ! त्याचे उच्चार समजले नाहीत म्हणून मी उत्तर देताना चाचरलो की मी इंग्लंडहून काही परत येत नाही याबद्दल त्याला सुरुवातीपासून वाटणारी शंका दृढमूल होत होती !

"बायको कुठं आहे ?"

"मुलं काय करतात ?"

"बायकोला का नाही नेत ? घटस्फोट वगैरे ?"

"कॉलेजला सुट्टी नसताना कसे निघालात ?"

"स्वखर्चानं ? इंडियातले प्रोफेसर स्वखर्चानं युरोपला जाऊ शकतात ?"

"सहा महिन्यांत परत आला नाहीत तर ?"

मनात आलं त्याच्या पुढचा माझा अर्ज ओढून घ्यावा आणि म्हणावं, 'नाही बाबा तुझ्या देशाला जात पण ती प्रश्नांची सरबत्ती तेवढी आवर !' माझं काही इंग्लंडला जाणं होत नाही अशी माझी जवळजवळ खात्री झाली आता माझ्या अनुभूतीच्या कक्षाच करायच तरी काय ?

तेवढ्यात तो म्हणाला, "ओके ! संध्याकाळी चारला येऊन व्हिसा घेऊन जा !"

त्याचं एकाएकी मतपरिवर्तन व्हायला काय निमित्त घडलं असावं हे कोडं मला आजपर्यंत उलगडलेलं नाही !

स्वखर्चानं जायचं म्हणजे सर्वांत स्वस्त दराचं परतीचं तिकिट मला हवं होतं इंग्लंडहून मला तिकिट आलं ते 'इराकी एअरवेज'चं होतं माझं विमान अन्य सर्व राजमार्ग सोडून बगदादमार्गे जाणार होतं लंडनला पोचायला चारपाच तास जादा लागणार होते पण त्यामुळं अडीचतीन हजार वाचणार होते ! माझी तर खुष्कीच्या मार्गानं जायची तयारी होती !

"इराकी एअरवेज ? म्हणजे आता तुम्ही काही परत येत नाही !" एका लेखक-मित्रानं चिंतातुर चेहेरा करून सांगितलं

"तसं कसं ? मला परत आलंच पाहिजे ! त्या ब्रिटिश इमिग्रेशन ऑफिसरला मी तसं वचन दिलं आहे" मी म्हटलं

"अहो, कुवेत-इराकी विमानं सतत हायजॅक होत असतात !"

"चांगलंच आहे ! नाहीतरी आमच्यासारख्यांना काहीतरी एक्सायटिंग पहायला कधी मिळणार ?"

उमाकांत ठोमरेंचा फोन आला "'इराकी एअरवेज'मधे माणसं ठेचून भरतात म्हणे ! सीटस्पेक्षा दुपटीनं माणसं घेतात आत !"

"विमान म्हणजे तुम्ही नगर-पुणतांबे यष्टी समजलात ?" मी मर्मावर बोट ठेवलं, तेव्हा ठोमऱ्यांनी विषय बदलून 'नवनीत' दिवाळी-अंकाची चर्चा सुरू केली !

पंधरा ऑगस्टला लाल किल्ल्यावर मोरारजींचं भाषण सुरू व्हायच्या आत मुंबई सोडायची, असा माझा बेत होता तशी सगळी तयारी केली रजा मंजूर करून घेतली सौ नं 'नवरा फॉरिनला चाललाय'ची शक्य तितकी जाहिरात केली मुलांनी युरोपहून कायकाय आणायचं याच्या याद्या व दोनदोन तासांनी निघणाऱ्या याद्यांच्या पुरवण्या माझ्या खिशात कोंबायला केव्हाच सुरुवात केली होती 'बॉं व्हॉयेज' करण्यासाठी पुण्याचा भाऊ सहकुटुंब धडकणार होता

एकच किरकोळ गोष्ट राहिली होती –– सीट ओके करणं, ही

त्यासाठी मी चर्चगेटसमोरच्या 'इराकी एअरवेज'च्या ऑफिसात गेलो. ऑफिस सुबक व ठेंगणं होतं आणि एअरवेज कचेरीत नेहेमी असतात तशा सुबक ठेंगण्या चकाटचा पिटीत बसल्या होत्या शर्मा नामक चाळिशीतला एक रुबाबदार माणूस त्यांचं 'एक्झॉर्सिस्ट', 'ओमेन' आणि अन्य हॉरर फिल्म्स यांवर बौद्धिक घेत होता माझं तिकिट शभराची फाटकी नोट उलटसुलट पहातात तसं पाहून त्यानं थंडपणे विचारलं, "केव्हा जाणार आहात लंडनला ?"

"पुढल्या आठवड्यात कधीही "

"आमची लंडन फ्लाइट आठवड्याला एकदाच असते दर मंगळवारी "

मी कॅलेंडरकडे पाहिलं "पंधरा ऑगस्ट मंगळवारी आहे. त्या दिवशीच चालेल."

त्यानं ड्रॉवरमधून एक फाइल काढली कागदपत्रांची चाळवाचाळव केली आणि थंडपणे सांगितलं, "ऑक्टोबरपर्यंत एकही सीट मिळणार नाही नोव्हेंबरच्या पहिल्या मंगळवारी रिझर्वेशन मिळेल " आणि शेजारच्या सुबक ठेंगणीकडे वळून त्यानं आपलं बौद्धिक पुढं चालू केलं कधी नव्हे तो मी इंग्लंडला निघालो होतो. पण त्याचं त्या पाषाणहृदयी शर्माला काय ? लंडनगमन हे त्याच्या दृष्टीनं थोडंच अप्रूप होतं ?

मी हताशपणे घरी परतलो सौ ला सांगितलं, "माझं काही इंग्लंडला जाणं होत नाही ! शर्माच्या रूपानं साडेसाती आडवी येत्येय. रजा कॅन्सल करून पुन्हा कामावर रुजू होतो ! "

"म्हणजे पप्पा, मला तुम्ही टीशर्ट आणि बायनॉक्युलर आणणार नाही ?" –– चिरंजीव

"आणि माझ्या जीन्स ?" –– कन्यारत्न

बायकोनं शांतपणे माझं चडफडणं ऐकून घेतलं डिरेक्टरीतून 'इराकी एअरवेज'चा फोननंबर काढला आणि शर्माला फोनवर बोलावलं.

" देखिये, मेरे हजबंड लंडन जानेवाले है पधरा ऑगस्टकी एक सीट मिलनी ही चाहिये ! हां ! "

यावर शर्मा काय म्हणाला कोण जाणे !

" नहीं ? कैसी नहीं ? इतना बडा विमान --- एक सीट मिलती नहीं ? कंपनी क्यू खोली है ? अच्छा ! बावीसको चलेगा लेकिन नक्की चाहिये ! मै खुद आती हूँ अभी ! " (सौ राष्ट्रभाषाकोविद तेव्हा हिंदी भाषेवर विलक्षण प्रभुत्व !)

" तुम्ही हे असेच ! तुमचं सगळं ज्ञान, शहाणपण बायकोमुलापाशी ! ऑक्टोबरपर्यंत सीट नाही म्हटल्यावर तुम्ही हातपाय गाळलेत ! खडसावल्यावर सुतासारखा सरळ आला तुमचा शर्मा की वर्मा ! "

यानंतर सौ नं सर्व सूत्र आपल्या हाती घेतली टोचून घेतल्याचं सर्टिफिकेट (अर्थात टोचून मात्र मला घ्यायला लागलं !), रिझर्व बँकेकडून मिळणारे पाचशे डॉलर, लग्नानंतर प्रथमच शिवायला टाकलेला नवा सूट . विमान सुटेपर्यंत जिवात जीव नव्हता ! आजकालच्या तरुण मुलींचे कपडे पाहिले की त्या एखादा



सिक्युरिटी–ऑफिसरकृत हँडबॅग–परीक्षा

वस्त्रविशेष घालायच्या विसरल्या असाव्यात असं ज्याप्रमाणं एकसारखं वाटत रहात, त्याप्रमाणं सातासमुद्रापलीकडे निघताना काही महत्त्वाचे कागदपत्र विसरले तर नाहीत ना अशी धाकधूक एकसारखी वाटत रहाते। आणखी एक तुमचा प्राण गेला तरी चालेल, पण पासपोर्ट जाता कामा नये। परदेशात तुमचा पासपोर्ट हरवला तर तुमचं अस्तित्व मानायलाच कुणी तयार होत नाही।

आमचं विमान कुआलालुपूरहून येणार होतं आणि दुबईमार्गे बगदादला जाणार होतं. बगदाद जंक्शनवर गाडी बदलायची होती. विमानतळावर दुबईला जाणारे अनेक मल्याळी मजूर वाटीभर खोबरेलतेल ओतून चपचपीत केलेले केस, बिनइस्त्रीचा पांढरा हाफशर्ट आणि कमरेभोवती गुडाळलेली लुंगी (काहीजणानी झोपताना घालतात तसला चट्टेरीपट्टेरी पायजमा घातला होता!) दादरला आमच्या 'कीर्ती कॉलेज'जवळच्या कॅडेल रोड बसस्टॉपवर मला एक वेंगुर्लेकर भेटला होता बंदुकीतून निघणाऱ्या गोळ्याप्रमाणं सटासट एकापाठोपाठ एक जाणाऱ्या गाड्याकडे तो आ वासून पहात होता मधेच तो माझ्याकडे वळून बोलला, "काय हो या मोटारी। आमच्या वेंगुर्ल्याला एवढ्या मोटारी नाहीत हा।" त्या वेंगुर्लेकराच्या मुद्रेवरला भयचकित भाव कानशिलावरच्या तेलाच्या जोडीनं त्या मल्याळी मजुराच्या चेहेऱ्यावरून ओघळत होता सारांश, सांताक्रूझ विमानतळाला तिरुचिरापल्ली या तत्सम स्टेशनावरच्या सेकंड क्लास वेटिंग रूमची कळा आली होती। वास्तविक विमानतळाचं हे बदलतं स्वरूप एका अर्थी स्वागतार्ह म्हटलं पाहिजे पण ज्या कारणासाठी केरळीयांचे जथेच्या जथे दुबईला चालले होते, ते कारण भारतीयांना अभिमान वाटावा असं मुळीच नव्हतं।

माझी हँडबॅग सांताक्रूझ विमानतळावरल्या सिक्युरिटी ऑफिसरनं पुन्हापुन्हा तपासली होती आणि खाली बसून त्यानं माझे पायमोजे प्रेमानं कुरवाळले होते माझ्याकडे कोणत्याही प्रकारचं तीक्ष्ण शस्त्रास्त्र नाही याची त्यानं खातरजमा करून घेतल्यावर 'सुटलो एकदाचा' म्हणून मी हँडबॅगमधे सामान शक्य तितक्या व्यवस्थितपणं कोंबलं इराकी लोकाचा सांताक्रूझ विमानतळावरल्या सुरक्षा-व्यवस्थेवर फारसा विश्वास नसावा हिरव्याकंच इराकी विमानात शिरताना दाराशी उभ्या असलेल्या एका धटिंगणानं हँडबॅग पुन्हा निर्दयपणं उपसली आणि दुसऱ्या धटिंगणानं माझी पुन्हा आपादमस्तक झडती घेतली एवढी कडेकोट सुरक्षा-व्यवस्था असल्यावर कुणाची माय व्यायली आहे विमान हायजॅक करण्याची।

दुबईला विमान अर्धअधिक रिकामं झालं दुबई विमानतळावर विमान दीड तास थांबणार होतं आणि आम्हाला बाहेर जाऊन फेरफटका मारण्याची परवानगी होती डोळे चोळत मी व माझ्याबरोबर असलेले 'सोमैया पब्लिकेशन'चे श्री. वर्टी खाली उतरलो पहाटे चारचा सुमार दुबईचा आंतरराष्ट्रीय विमानतळ छोटा पण

सुबक आहे वरच्या लाउंजकडे जाण्याचा वर्तुळाकार जिना, लाउंजमधे प्रवाशासाठी ठेवलेले आकर्षक डिझाइनचे सोफा व कोच, फिकट पिवळा प्रकाश हळुवारपणे सांडणारे विनम्र दिवे एकूणच प्रकाशयोजना व नेपथ्य 'पडद्याला टाळ्या' थाटाचं

विमानतळावर चहाचं हॉटेल दिसलं नोकरचाकर केरळीय रमझानचे दिवस होते सूर्योदयापूर्वीचा खाना पोटात रिचवण्यासाठी इस्लामधर्मीयांची एकच झुंबड उडाली होती पावडरीचं दूध व भुकटीची बॅग टाकलेला बेचव, कोमट चहा मी व वर्टी यांनी कसाबसा संपवला

" किती पैसे ? "

" सत्तर पेन्स ! "

सत्तर पेन्स ? म्हणजे जवळजवळ अकरा रुपये ! मुंबईला पंचतारांकित हॉटेलातसुद्धा चहा अधिक स्वस्त मिळतो !

हा पहिला वार वर्मी बसला निरिच्छपणे मी ड्यूटी फ्री शॉप्स दुरून पहात फिरू लागलो कॅमेरे, रेडिओ, घड्याळ, परफ्युम्स ! पुष्पा बरोबर असती तर पाचशे डॉलर्स इथेच संपवून परतीच्या विमानानं मुंबईला जावं लागलं असतं !

रमतगमत 'वाइन शॉप'पाशी आलो स्कॉच व्हिस्कीच्या बाटलीची किंमत भीतभीत विचारली

" एक पौंड " दुकानातला केरळीय म्हणाला

" पार्डन ? "

" वन्ली वन् पौंड, सर ! "

स्कॉच व्हिस्कीला अवघे सोळा रुपये ? (बाय द वे, भारताला परतेपर्यंत माझा सोळाचा पाढा पाठ झाला होता ! )

" आणि ती मार्टिनी वाइन ? "

" वन् पौंड "

त्याची बुद्धी चळण्यापूर्वी मी 'शिवास रीगल' आणि वर्टींनी 'मार्टिनी' खरेदी केली मचूळ चहाचा कप साडेपाच रुपये, आणि व्हिस्कीची अख्खी बाटली सोळा रुपये ! निदान दुबईत तरी दारूबंदी यशस्वी होणं शक्य नाही !

विमानात चढण्यापूर्वी पुन्हा एकदा झडतीचा सोहळा साग्रसंगीत पार पडला !

विमानात माझ्या जवळ चौधरी आडनावाचा बांगलादेशीय मुस्लिम तरुण बसला होता व्यवसायानं इंजिनिअर. नोकरीसाठी तो वर्षभर बगदादला होता

आणि महिन्याची रजा काढून बायकोमुलांना भेटण्यासाठी डाक्क्याला गेला होता बगदादहून काही दिवसांनी तो बसऱ्याला जाणार होता (लहानपणी 'अरबी भाषेतील सुरस कथा'मधे भेटलेली ही शहर !) त्याला तीनशे दिनार पगार होता. (एक दिनार म्हणजे सव्वीस रुपये ) एकूण सव्वा कोटी लोकवस्ती असलेल्या इराक देशात स्वस्ताई बरीच आहे तेल, खजूर, सुकी फळ, खनिज उत्पादन करणाऱ्या समाजवादी इराक देशात 'कन्स्ट्रक्शन वर्क' मोठ्या प्रमाणावर चाललेलं आहे अन्नासाठी दाही दिशा जाण्याची तयारी असलेल्या भारतीयांचे लोंढे आज गल्फ देशाकडे सतत निघाले आहेत त्यांतील एक मोठा ओहळ इराकमधे स्थिरावला आहे विमानातल्या हवाईसुंदरी व अन्य नोकरवर्ग अर्थातच इराकी होता गव्हाळ वर्ण, सरळ धारदार नाक आणि अगान गुबगुबीत असे हे इराकी लोक. इराकी पुरुषांना ओठावर भरघोस मिशा ठेवण्याची आवड हवाई-सुंदरी प्रथम इराकी भाषेत घोषणा देई आणि मग इंग्रजीत 'शुक्रिया'ला जवळचा असलेला 'शुकुर' आणि 'थँक्स' या दोन शब्दाव्यतिरिक्त मला त्या घोषणातल एक अक्षर कळल नाही ! (अनाउन्सर या संस्थेशी तसं माझ कधीच सख्य जमल नाही लोकल गाडी उशीरा येणार की पाच नंबरच्या प्लॅटफॉर्मवर येणार की चक्क रद्द झाली हे आसपासच्या पब्लिकच्या हालचालीवरून मी ताडत असतो ! )

हवाईसुंदरीकडे मी वृत्तपत्र मागितल मनात आलं, बघू या तरी 'बगदाद टाइम्स' कसा असतो तो तिनं दिलेल वर्तमानपत्र 'टाइम्स ऑफ इंडिया' जसा धरतात तस मी हातात धरल ते पाहून ती इतक्या मोठ्यांदा हसली की, खजील होऊन मी ते पर्शियन वृत्तपत्र समोरच्या सीटमागं असलेल्या खोवणीत खोवल !

विमानाचा अंतर्भाग खूप प्रशस्त आहे एखाद्या मिनीथिएटरएवढा

दिव्यांच्या मंद प्रकाशात डोळ्याची उघडझाप करीत अस्ताव्यस्त पडलेली असंख्य माणसं जगाच्या कानाकोपऱ्यातून आलेली. काही तासासाठी एकत्र जमलेली

कुरळ्या केसांचा, जाड ओठांचा निग्रो तरुण. सुरकुत्यांच जाळं असलेल्या चेहेऱ्यावर भडक लिपस्टिकच, रूजच रोगण फासणारी अमेरिकन म्हातारी पिवळट रंगाची, बसक्या नाकाची हाँगकाँग-सिंगापूरकडली चिनी मुलगी धारदार नाकाचा, आडमाप देहाचा उर्मट दिसणारा अरब पुरुषी उंचीची कुर्रेबाज मुस्लिम तरुणी, नाजुक चष्मा घातलेल्या, टक्कल पडलेल्या तरुणाच्या खांद्यावर रेलली आहे गरगरीत पोटऱ्यांची गलेलठ्ठ ऑस्ट्रियन मुलगी ठेंगण्या वयस्क दिसणाऱ्या पुरुषाच्या मांडीवर कोसळली आहे विमानाच्या मागल्या कोपऱ्यात एका प्रणयी युगुलाचा शृंगार ऐन भरात आला आहे दीर्घ चुंबन आणि गच्च आलिंगन त्याचा



विमानातल्या युगुलाचा बहरलेला शृंगार

चेहेरा दिसत नाही  ती 'कारमेन'मधल्या रिटा हेवर्थसारखी दिसत्येय. स्पॅनिश किंवा पोर्तुगीज असावी

चेहेऱ्यावरले, शरीरावरले अवयव तेच  पण प्रत्येकाच वेगळ वैशिष्टय ! एक माणूस दुसऱ्या माणसासारखा नाही ! रगरूप घडवणारे कोटयवधी साचे एक साचा एकदा वापरला की मोडून टाकला पाहिजे. पुन्हा म्हणून वापरायचा नाही  चुकून वापरला गेला तर केवढया गुंतागुंती

विमान बगदाद सोडून लडनकडे झेपावत आहे  पाढऱ्या रेतीत उगवलेल्या खजुराच्या झाडाचे असख्य पुजके हळूहळू दिसेनासे होतात  पांढऱ्या-निळया ढगांच्या पायघडयावरून विमान सथगतीन पुढ सरकत आहे.

घडयाळ पुढमाग करण्याच मी कधीच सोडून दिलं आहे. एअर होस्टेसला मी 'इडियन स्टँडर्ड टाइम' विचारतो आणि काटयांची फिरवाफिरव करतो आता मुबईला परतेपर्यंत हीच वेळ ठेवायची अस ठरवतो

वेळेच गणित चुकल्यान झोप उडाली आहे माग रेलून मी डोळे मिटतो

'इग्लंडला गेल्यावर मराठी माणसाची घर उगाच शोधत बसू नका तिकडे जाऊन पुन्हा मराठी माणसाना भेटण्यात काय अर्थ आहे ? इग्रज माणूस जवळून पहा त्याला भेटा '

'पोपचं सिस्टिन चॅपेल पहाच आणि सेंट पीटर्स स्क्वेअरमधले भव्य पुतळे '

'पॅरिसची म्युझियम पहायला विसरू नका मोना लिसा तिथच आहे '

'प्रोफेसरसाव, युरोप जाके सिर्फ एजॉय करना बस्स ! शेक्सपिअरका गाँव, जॉन्सनका घर, नेपोलियनकी टुब देखनेमें टाइम मत खराब करना ! '

'ब्लडीमेरी घ्यायला विसरू नका व्होडका, जीन आणि टोमॅटो ज्युस एक घोट घेतला की ब्रह्मांड तुच्छ वाटायला लागत ! '

'शँपेन घ्या शँपेन ! आणि ऱ्हाइन नदीवरली व्हाइट वाइन इटालियन रेड वाइन

कुणीतरी माझ्या खाद्यावर हात ठेवला आहे इराकी एअरहोस्टेसचा नाजुक हात ! तिच्या गालावरच्या खळीकडे माझ लक्षच नाही अस मी दाखवतो !

"लच सर " ती मृदू स्वगत कुजबुजते

खेकड्याच्या आकाराचे दोन ब्रेड, उकडलेले बटाटे, लालसर रगाची वर्तुळाकार चकती, वाफारलेला मांसाचा तुकडा, फ्रूट सॅलड, चीज न् बटर

'युरोपमधे खाताना, जेवताना फार चिकित्सा करू नका ! समोर डिशमधे पडत ते मुकाट्यान खायच व्हेजिटेरियन व्हायच ठरवाल तर उपाशी रहाल ! उकडलेले बटाटे आणि फार फार तर वाटाणे ---'

डोळे मिटून मी कुलदेवाच स्मरण करतो आणि प्लॅस्टिकच्या काट्याची तीक्ष्ण टोक वर्तुळाकार चकतीत खुपसतो जिवाचा धडा करून घास जिभेकडून पडजिभेकडे ढकलतो काही का असेना, प्रकार चविष्ट आहे

लच सपत आणि विमानाची गती एकाएकी बदलते कमरेभोवती पट्टा आवळून मी खाली नजर फेकतो

लडन ! तमसा नदीच्या काठावर वसलेली, इग्लडची पुरातन राजधानी ! ब्रिटिश साम्राज्यावरला सूर्य मावळला असेल, पण लडनवर माध्यान्हीचा सूर्य तळपतो आहे शुभ्र प्रकाशात बुटक्या इमारती, चिमुकले रस्ते आणि नागमोडी नदी न्हाऊन निघाली आहे

# २

## युरोपमधला सर्वांत मागासलेला देश

दुसरं महायुद्ध सुरू असताना, १४ नोव्हेंबर १९४२ रोजी 'मॅन्शन हाउस'मधे, आपलं ते गाजलेलं भाषण करताना विन्स्टन चर्चिलनं गर्जना केली होती, "ब्रिटिश साम्राज्य मोडीत काढायला मी पंतप्रधान झालेलो नाही !" दैवदुर्विलास असा की, डोळ्यांदेखत ब्रिटिश साम्राज्य कोसळत असलेलं त्याला पहावं लागलं. वीस वर्षांच्या आत ब्रिटनच्या गुलामगिरीत खितपत पडलेले साठ कोटींहून अधिक लोक आणि ब्रिटनच्या अमलाखालील पंचावन्न लाख चौरस मैलांहून अधिक भूप्रदेश मुक्त झाला. आशिया, आफ्रिका खंडातील अनेक वसाहती स्वतंत्र झाल्या. ताठ मान करून अनेक वर्षं मोठ्या दिमाखानं उभी असलेली ब्रिटिश साम्राज्यशाही हळूहळू पण निश्चितपणे खचत चालली.

पडझड झालेल्या इमारतीसारखा केविलवाणा दिसणारा इंग्लंड मला जवळून पहाता आला. आज इंग्लंडची अर्थव्यवस्था मोठ्या नाजुक अवस्थेत आहे. बेकारी आहे आणि नित्यावश्यक वस्तूंच्या किंमती सतत वाढत आहेत. कामगार अधिकाधिक वेतनाची, बोनसची मागणी करीत आहे. मी इंग्लंडला होतो तेव्हा मजूरपक्षीय पंतप्रधान जेम्स कॅलॅहन यांनी पाच टक्क्यांहून अधिक वेतनवाढ देण्यावर निर्बंध घातल्यामुळे 'फोर्ड मोटार कंपनी' व अन्य बड्या उद्योगसमूहांतील लक्षावधी मजूर संपावर गेले होते, आणि हुजूरपक्ष आगामी निवडणुकीवर डोळा ठेवून आपणच मजुरांचे कैवारी हे बिरुद मिरवू लागला होता.

'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'च्या एका तरुण प्राध्यापकाशी बोलताना मी सहज म्हटलं, "जगात अमेरिका, कॅनडा, इंग्लंड यांसारखे पुढारलेले देश असताना —"

मला मधेच अडवून तो म्हणाला, "इंग्लंड ? आणि पुढारलेला देश ? अहो, युरोपमधला सर्वांत मागासलेला देश म्हणजे इंग्लंड !"

सुंभ जळलेला असला तरी इंग्रज माणसाचा पीळ कायम आहे ! सर्वसामान्य माणसाचं जीवन पूर्वी होतं तसं अतिशय शिस्तबद्ध, टापटिपीचं. शिष्टाचार, रीतिरिवाज तो प्राणपणानं जपत असतो. प्रत्येक इंग्रज माणसाचं घर म्हणजे एक

बंदिस्त किल्ला हे खरंच आहे ! त्याच्या घरी सहजासहजी कुणाला प्रवेश मिळत नाही ! "काय आहेस का घरात ?" अशी हाळी देऊन अनाहूतपणे त्याच्या घरात घुसून, तास-दोन तास गप्पा मारत बसणं ही अशक्य कोटीतील गोष्ट. संध्याकाळी सहा वाजता त्याच्याकडे जायचं असेल तर तुम्हाला दोन फोन करावे लागतात. एक सकाळी, संध्याकाळची 'अपॉइंटमेंट' घेण्यासाठी, आणि दुसरा फोन पावणेसहाला, 'आत्ता निघतोय घरातून' हे सांगण्यासाठी. मुंबईला अनेक सद्गृहस्थ रविवारी सकाळी फोन करतात. 'मी 'साहित्यसहवास'च्या बाजूला हिच्यासह येणार आहे. जमलं तर तुझ्याकडे चक्कर टाकीन म्हणतो !' म्हणजे रविवारची सबंध संध्याकाळ त्या दोघांची वाट पहात फुकट घालवली तरी हे गृहस्थ पुन्हा कधी भेटले की सांगायला मोकळे. "त्या दिवशी वेळ मिळाला नाही बुवा ! आणि मी नक्की येतो असं तुला सांगितलं नव्हतंच म्हणा !" अशा तऱ्हेची 'अपॉइंटमेंट' इंग्रज माणूस या जन्मीच काय, बापजन्मी घेणार नाही !


सठीसामासी मित्रानं, शेजाऱ्यानं डिनरला बोलवलं म्हणजे इंग्रज माणूस मोठ्या अदबीनं वागतो, हसत, मृदू आवाजात बोलतो, आवडोत, न आवडोत -- पदार्थांची मुक्त कंठानं स्तुती करतो, आणि दुसऱ्या दिवशी न विसरता फोन करून कालची संध्याकाळ किती 'एक्सायटिंग' आणि 'फॅंटॅस्टिक' होती हे पुन्हा-पुन्हा सांगतो. 'कॉक्टेलपार्टी'ला जाताना वाइनची वा व्हिस्कीची एक बाटली काखोटीला मारून न्यायला तो विसरत नाही !

कॅंटरबरीचं चर्च पहायला मी गेलो होतो त्या वेळचा एक गमतीदार प्रसंग आठवतो. त्या इतिहासप्रसिद्ध वास्तूचं दर्शन घेतल्यावर आम्ही बाहेर आलो आणि प्रवेशद्वारासमोरच्या हॉटेलात कॉफी घ्यायला गेलो. माझे मित्र श्री. वर्टी, त्यांची मुलगी व जावई माझ्याबरोबर होते. आम्ही कॉफी घेत बसलो असताना एका वृद्ध गृहस्थाच्या हातातली केकची बशी माझ्या कोटावर पडली आणि कोट मागच्या बाजूला थोडा खराब झाला. तो वृद्ध गृहस्थ आणि त्याची पत्नी -- दोघं इतकी ओशाळवाणी झाली ! जणू काही आपल्या हातून फारच मोठा अपराध घडला असं त्या इंग्रज माणसाला प्रामाणिकपणं वाटू लागलं. एक पौंडाची नोट माझ्यापुढं करून तो म्हणाला, "तुमच्या कोटाच्या धुलाईचा खर्च देणं माझं कर्तव्य आहे !"

मी म्हटलं, "डोण्ट वरी ! फारसं काही झालेलं नाही."

मग त्याची बायको म्हणाली, "तुमच्या कॉफीचं बिल द्यायची संधी तरी आम्हाला द्या !"

आम्ही तोही प्रस्ताव नामंजूर केला.



लंडनमधील घरांची मांडणी

आम्ही कॉफी पिऊन हॉटेलबाहेर पडलो तेव्हा ती वृद्ध पती-पत्नी आम्हाला पोचवायला आमच्या कारपर्यंत आली ! पुन्हापुन्हा "आय ॲम एक्स्ट्रीमली सॉरी, सर ! "

शिष्टाचार पाळण्याचं इंग्रज माणसाचं वेड इतकं जबरदस्त, की ते नीट पाळण्याइतकी त्याला सवय मिळेनाशी झाली आहे. लंडनमधे छापील कार्डस्‌ची अनेक दुकानं मी पाहिली शंभराव्या वर्षापर्यंतची 'बर्थ डे ग्रीटिंग्ज' तिथं मिळतात मुलगा-मुलगी-जुळी मुलं झाल्याबद्दलची, अभिनंदनाची, सांत्वनाची, 'नापास झालास म्हणून खट्टू होऊ नकोस, पुन्हा प्रयत्न कर'ची, 'आजारातून बरा झालास म्हणून आनंद झाला'ची -- अशी विविध प्रकारची, तऱ्हेतऱ्हेची कार्डस् मिळतात मायना लिहून, खाली सही करून पोस्टात टाकायची ! नाताळ येण्या-पूर्वी दोन महिने इंग्रज माणसाची खरेदी सुरू होते ग्रीटिंग कार्डस्, गिफ्टस् आणि रेडिमेड ड्रेस ! ऑक्टोबर ते एक जानेवारी इंग्लंडमधे कोटयवधी पौंडांची उलाढाल होते.

रस्त्यावरल्या दुकानाचं नूतनीकरण किंवा डागडुजी चालू असताना फूटपाथ-वरून जाणाऱ्या पादचाऱ्याची थोडी गैरसोय होते तशी ती कुठंही होतेच, पण इंग्रज दुकानदार दोन्ही बाजूंना एक विनम्र पाटी लावतो. 'दुकानाची दुरुस्ती चालू असल्याने आपल्याला खूपच गैरसोय सोसावी लागते याबद्दल आम्हाला

अतिशय खेद होतो ' 'क्रॉसिंग'ची खूण नसूनही एखादा माणूस चुकून रस्ता ओलांडू लागला तर कारमधे बसणारा कार थांबवतो, पादचाऱ्याला पूर्णपणे रस्ता ओलांडू देतो 'काय हो, मरायचय का ?' अशी प्रेमळ विचारणा तो कधीच करणार नाही ! गोष्ट किरकोळ आहे, पण त्यातून इंग्रज माणसाच्या स्वभावाच दर्शन घडत

लंडनला पोचलो तेव्हा दुसऱ्या दिवशी मी नाइट-सूट घालून बागेतली फुल पहायला जाऊ लागलो तेव्हा आमच्या यजमानबाईंनी मला अडवलं. " नाइट-सूट घालून घराबाहेर नका जाऊ " तिन सांगितल

" का ? " मी आश्चर्यान प्रश्न केला

" इथ तशी पद्धत नाही ! पँट घातल्याशिवाय कुणी घराबाहेर पडत नाहीत इथ ! "

इंग्रज माणूस शांतताप्रिय रात्री शेजारच्या घरात पार्टीच्या निमित्तान हलकल्लोळ चालू असला तर दहा-साडेदहापर्यंत तो गडबड मुकाट्यान खपवून घेईल. अकरा वाजता सरळ पोलिसांकडे फोन ! शेजाऱ्याच्या घरात बराच वेळ पोर केकाटत राहिल तरी पोलिसाला आमंत्रण ! (सत्यनारायणाच्या वेळी आपल्याकडे लावण्यात येणारा लाउडस्पीकर आणि त्यावर मध्यरात्रीपर्यंत सुरू असलेली 'झूट बोले कौवा काटे' यासारखी गाणी ! बाप रे ! इंग्रज उगाच नाही गेला भारत सोडून !)

'हीथ्रो' विमानतळावरून लंडनमधे शिरताना इंग्रजाच्या शिस्तप्रियतेचा, नीटनेटकेपणाचा, बारीकसारीक गोष्टीतून प्रत्यय येऊ लागतो खुद्द लंडनमधे उंच टोलेजंग इमारती दिसतात, पण कोणत्याही उपनगरात शिरलात तर रहायची घर सुबक, एका साच्यातून काढल्यासारखी दिसतात एकमेकांना चिकटून असलेली दुमजली घर समोर व मागच्या बाजूला बागेसाठी मोकळी जागा दर्शनी भागाला पारदर्शक काचा त्यामागं बहुतेक पांढऱ्या रंगाचा, सुरेख डिझाइनचा पडदा धूर जाण्यासाठी छपरावर दोनचार चिमण्या खर म्हणता आज प्रत्येक घरात विजेवर चालणार सेंट्रल हीटिंग वापरल जात कोळसा, लाकूड कुणीच उपयोगात आणत नाही तरी पण नव्यान बांधण्यात येणाऱ्या घरावरसुद्धा कौतुकान धुराडी बसवली जातात घराच्या अंतर्भागी सर्व जमिनी कार्पेटनी आच्छादलेल्या दोन्ही बाजूना एकसारख्या दिसणाऱ्या घराच्या रांगा एका बाजूच्या घरांना सम क्रमांक, दुसऱ्या बाजूच्या घरांना विषम क्रमांक घराचा क्रमांक नीट माहीत नसेल तर पत्ता शोधून काढण मुष्किलीच दारावर नावाची पाटी लावण्याची पद्धत नाही मी रहात होतो त्या इल्फर्ड उपनगरात दारावर एकच पाटी पाहिली —— भल्यामोठ्या अक्षरातली 'एन् एस् गिल' नावाच्या सरदारजीची !

मी रहात होतो, माझे मित्र श्री वर्टी यांचे जावई श्री चंद्रकुमार उर्फ चन्नी आरोरा याच्याकडे वर्टीची मुलगी नीला सिडनहॅम कॉलेजात शिकत असताना हॉकी टीमची कॅप्टन होती आणि चन्नी आरोरा कॉलेजचा हॉकी कोच प्रेमात पडायला आणखी काय निमित्त हव ? चन्नी 'फोर्ड मोटार कंपनी'त मोठ्या हुद्द्यावर आहे, आणि नीला सरकारी वीजखात्यात अमित हा त्यांचा एकुलता एक बारा-तेरा वर्षांचा मुलगा पाचसहा वर्षांपूर्वी अमित मुंबईला आला होता, तेव्हा त्याच आणि वर्टींच चांगलच जुळायच त्या वेळी भिंतीवरली पाल पाहून 'नाना --- लुक ॲट दॅड स्मॉल क्रोकोडाइल !' हे तो कस म्हणायचा ( बाय द वे, 'पाल' ही संस्था इंग्लंडमधे नाही ! ), रोज तो सहा ते सात कोकाकोला कसा प्यायचा, त्याच्यासाठी 'सीता और गीता' सिनेमा पाच वेळा कसा पहावा लागला, या गोष्टी वर्टी रंगवून सांगायचे पण तेरा वर्षाच्या नातवाची आजोबाशी असलेली 'भावनात्मक समतानता' आता संपुष्टात आली आहे कारण अमितचे इंग्रजी उच्चार इंडियन उच्चारात रूपांतर केल्याशिवाय वर्टींना कळत नाहीत ! 'अमित,



हसऱ्या गुलाबाच्या पार्श्वभूमीवर लेखक

व्हॉट डू यू वॉंट ?' असं विचारल्यावर अमितन उत्तर दिल, "आय् वॉण्ट अ कॅन ऑफ कोक !" वर्टीना काहीही समजल नाही ! 'कॅन ऑफ कोक' म्हणजे 'कॅन ऑफ कोक' अस उच्चारान्तर केल्यावर नातवाची मागणी वर्टीना पुरी करता आली! माझ्या महिन्याभराच्या मुक्कामात आजोबा-नातू यांच्यामधले राजनैतिक संबध पूर्वीसारखे सुरळीत झाले नाहीत ! अमितन वर्टीना लाडात येऊन काही सांगितल आणि वर्टीनी 'पार्डन-पार्डन' म्हटल की अमित त्रासून सांगायचा, "मम्मी, टेल हिम इन इंडियन इग्लिश !"


चन्नी आणि नीला मोठ उमद आणि हसतमुख जोडप लग्नानतर नीलान हॉकी सोडून दिल, पण चन्नी आजही शनिवार-रविवार हॉकी खेळत असतो आणि वेळ मिळेल तेव्हा त्यावर बोलत असतो मला स्वत ला 'सेंटर फॉरवर्ड', 'पेनल्टी कॉर्नर' हे शब्द ऐकून माहीत आहेत एवढच ! पण माझ्या तिथल्या मुक्कामात, हॉकीमधे आपली पीछेहाट का झाली व भारतात क्रिकेटपेक्षा फुटबॉलचा खेळ लोकप्रिय असण का आवश्यक आहे यांवर चन्नीन इतकी बौद्धिक घेतली, की त्या दोन्ही खेळातले बारकावे मला कळू लागले (अस वाटत !)

गमत म्हणजे इग्लड ही क्रिकेटची गंगोत्री असली तरी क्रिकेट खेळणारी मुल मला कुठ दिसलीच नाहीत ! मुबईत ओव्हल, शिवाजी पार्क आदी मैदान दिवसभर, क्रिकेट खेळणाऱ्या मुलांनी ओसडून वहात असतात इग्लडमधे (व एकूणच युरोपमधे) पोरासोरांना फुटबॉलच भारी वेड पावसाळी हवा नसली म्हणजे फुटबॉलप्रेमींच्या उल्हासाला उधाण येत शेकडो सघाच्या दरम्यान अटीतटीचे सामने चालू असतात रोज टेलिव्हिजनवर सामन्याचे निकाल दिले जातात आणि एखादा महत्त्वाचा सामना दाखवला जातो शनिवारी-रविवारी लडनमधले सर्व रस्ते फुटबॉल क्रीडांगणांकडे जात असतात ! कलकत्त्याला 'मोहन बगान', तसा लडनला 'वेस्ट हॅम' या सघातले खेळाडू टोनी ग्रेग आणि बॉयकॉट यांच्याहून अधिक लोकप्रिय आहेत ! मादाम टच्युसांच्या म्युझियममधे टोनी ग्रेगच्या मेणाच्या पुतळ्याजवळ तीन नामवत फुटबॉलपटूचे पुतळे मी पाहिले आपल्याकडे क्रिकेट कसोटी-सामन्यांत आपण सतत मार खात असतो, पण क्रिकेटपटू हिंदी सिनेमातल्या नटाइतके लोकप्रिय !

लडन व उपनगरात ठिकठिकाणी क्रीडागण आहेत, पोहण्याचे तलाव आहेत. कुणाही मुलाला मैदान शोधण्यासाठी अर्ध्या किलोमीटरहून अधिक अतर जायला नको ! आपल्याकडे लोकाना मोकळी जागा पहावत नाही परिषदा भरवतील, प्रदर्शन उभारतील किंवा देवळ तरी बांधतील ! इंग्लडमधे ठिकठिकाणी प्रशस्त मोकळी जागा पाहून मन हरखून जात 'हाइड पार्क' हा प्रचड लाबीरुदीचा पार्क लडन शहराच्या अगदी मध्यभागी आहे मुलामुलींनी, तरुणानी खूप खेळाव,

बागडाव, मोकळ्या हवेत श्वास घ्यावा, असं प्रत्येक इंग्रज माणसाला मनापासून वाटत असतं

इंग्रज माणसालाच नव्हे, तर साऱ्या युरोपीय लोकांना फुलांचं अतिशय वेड लंडनपासून जिनेव्हापर्यंत आणि ब्रुसेल्सपासून पॅरिसपर्यंत मी फुलांचे असंख्य ताटवे पाहिले. ट्यूलिप, डेलिया, मॅग्नेलिया आणि मुख्यत गुलाब विविध रंगांचे, विविध आकाराचे, तऱ्हेतऱ्हेचे गुलाब. बागेत, खिडक्यात, रस्त्याच्या मध्यभागी उमललेले



..२ 'चेंजिंग द गार्डस्'चा शाही सोहळा

टपोरे, हसरे गुलाब फुल तोडण्यासाठी नसतात, झाडावर ती अधिक शोभतात यावर युरोपियनाचा दृढ विश्वास

शनिवारी सारा युरोप बागेमध्ये काम करीत असतो ! सोमवार ते शुक्रवार -- कामाचे दिवस पाच शनिवार बागकामासाठी, घर शाकारण्यासाठी, मोटार-दुरुस्ती-साठी हवा उत्तम असेल तर गोरा माणूस रविवारी घरी बसत नाही लडन शहराभोवती असख्य पिकनिक स्पॉट्स आहेत. विडसर पॅलेस, सफारी पार्क, कॅंटर-बरी, स्कॉटलड, हेस्टिंग्ज असे अनेक कारमाग कॅरव्हान जोडून हजारो कुटुब हमरस्त्यावरून प्रवास करीत असतात कॅरव्हानमधे सर्व सोय असते. किचन, फ्रीझ, बेड -- सर्व काही हे कॅरव्हान भाडयान मिळतात प्रवासाचा कटाळा आला की गाडी रस्त्याच्या एका बाजूला थांबवावी, कॅरव्हानमधे जाऊन रांधावं, मद्य घेत, मुलाशी गप्पा मारत मस्त जेवण कराव, मोकळया हवेत ताणून द्यावी, असा नामी कार्यक्रम कस जगाव, कशी चैन करावी हे गोऱ्या माणसाकडून शिकाव ! प्रश्न केवळ पैशाचा नाही -- वृत्तीचा आहे ! आपल्याकडे पैसेवाले लोक जन्मभर पैसे मिळवत रहातात आणि खऱ्या अर्थान जगायचंच विसरतात ! लोणावळयाला, महाबळेश्वरला विश्रांतीसाठी बगले बाधायचे आणि 'काय करायचं हो ? जाऊ जाऊ म्हणतो, पण गेली पाच वर्षं तिकडे जायला सवडच मिळाली नाही' अस अभिमानान सागायच, पैशामाग ऊर फुटेपर्यंत धावायच आणि एक दिवस हार्टफेलनं मरून जायच ! इंग्रज माणूस प्राण गेला तरी रविवारी काम करणार नाही ! कचेऱ्या पाच दिवस उघडया, आणि दुकान सहा दिवस रविवारी सर्व व्यवहार वद त्या दिवशी तिथं काही मोजकी दुकान उघडी दिसतील -- इग्लंडमधे स्थायिक झालेल्या इडियन्सची !

इग्रज लोकाच्या स्वभावातला विरोधाभास गमतीदार आहे लोकशाही खऱ्या अर्थान इग्लडमधे रुजली, फुलाफळाला आली लोकशाहीचे हक्क मिळावेत म्हणून अनेकानी राजघराण्याशी, चर्चशी प्राणप्रणानं लढा दिला या लोकशाहीन निवडून दिलेल्या पतप्रधानाच निवासस्थान ('टेन, डाउनिंग स्ट्रीट') पहाण्याची मला फार उत्सुकता होती. पार्लमेंट हाउसजवळची एक छोटीशी गल्ली म्हणजे 'डाउनिंग स्ट्रीट' समोरून येणाऱ्या दोन मोटारी एकमेकींना ओलांडून जाऊ शकणार नाहीत एवढी चिचोळी गल्ली या स्ट्रीटवर मोजकी घर, आणि त्यापैकी घर नबर दहा म्हणजे इग्लडच्या पतप्रधानाच रहात घर. इथून तो देशाचा कारभार चालवतो घरासमोर एकच सेंट्री सुरक्षा-व्यवस्थेसाठी मोठा लवाजमा नाही घराच वैशिष्ट्य इतकंच की ते बाहेरून बद करता येत नाही ! मुख्य प्रवेशद्वाराला कडीकोयडा नाही ! दार बाहेरून बद करायची गरज भासणार नाही, कुणी ना कुणी आत असणारच, असा हिशेब त्यामाग असावा !

टपोरे, हसरे गुलाब फुल तोडण्यासाठी नसतात, झाडावर ती अधिक शोभतात यावर युरोपियनांचा दृढ विश्वास

शनिवारी सारा युरोप बागेमधे काम करीत असतो। सोमवार ते शुक्रवार -- कामाचे दिवस पाच शनिवार बागकामासाठी, घर शाकारण्यासाठी, मोटार-दुरुस्ती-साठी हवा उत्तम असेल तर गोरा माणूस रविवारी घरी बसत नाही लंडन शहराभोवती असंख्य पिकनिक स्पॉट्स आहेत विंडसर पॅलेस, सफारी पार्क, कँटर-बरी, स्कॉटलंड, हेस्टिंग्ज असे अनेक कारमार्ग कॅरव्हान जोडून हजारो कुटुंब हमरस्त्यावरून प्रवास करीत असतात कॅरव्हानमधे सर्व सोय असते. किचन, फ्रीझ, बेड -- सर्व काही हे कॅरव्हान भाड्यान मिळतात प्रवासाचा कंटाळा आला की गाडी रस्त्याच्या एका बाजूला थांबवावी, कॅरव्हानमधे जाऊन रांधाव, मद्य घेत, मुलांशी गप्पा मारत मस्त जेवण कराव, मोकळ्या हवेत ताणून द्यावी, असा नामी कार्यक्रम कस जगाव, कशी चैन करावी हे गोऱ्या माणसाकडून शिकाव। प्रश्न केवळ पैशाचा नाही -- वृत्तीचा आहे। आपल्याकडे पैसेवाले लोक जन्मभर पैसे मिळवत रहातात आणि खऱ्या अर्थान जगायचच विसरतात। लोणावळ्याला, महाबळेश्वरला विश्रांतीसाठी बंगले बांधायचे आणि 'काय करायचं हो? जाऊ जाऊ म्हणतो, पण गेली पाच वर्षं तिकडे जायला सवडच मिळाली नाही' अस अभिमानान सांगायच, पैशामाग ऊर फुटेपर्यंत धावायच आणि एक दिवस हार्टफेलन मरून जायच। इंग्रज माणूस प्राण गेला तरी रविवारी काम करणार नाही। कचेऱ्या पाच दिवस उघड्या, आणि दुकान सहा दिवस रविवारी सर्व व्यवहार बंद त्या दिवशी तिथं काही मोजकी दुकानं उघडी दिसतील -- इंग्लंडमधे स्थायिक झालेल्या इंडियन्सची।

इंग्रज लोकांच्या स्वभावातला विरोधाभास गमतीदार आहे लोकशाही खऱ्या अर्थान इंग्लंडमधे रुजली, फुलाफळाला आली लोकशाहीचे हक्क मिळावेत म्हणून अनेकानी राजघराण्याशी, चर्चशी प्राणप्रणान लढा दिला या लोकशाहीनं निवडून दिलेल्या पंतप्रधानाच निवासस्थान ('टेन, डाउनिंग स्ट्रीट') पहाण्याची मला फार उत्सुकता होती पार्लमेंट हाउसजवळची एक छोटीशी गल्ली म्हणजे 'डाउनिंग स्ट्रीट.' समोरून येणाऱ्या दोन मोटारी एकमेकींना ओलांडून जाऊ शकणार नाहीत एवढी चिंचोळी गल्ली या स्ट्रीटवर मोजकी घर, आणि त्यांपैकी घर नंबर दहा म्हणजे इंग्लंडच्या पंतप्रधानाच रहात घर. इथून तो देशाचा कारभार चालवतो घरासमोर एकच सेंट्री सुरक्षा-व्यवस्थेसाठी मोठा लवाजमा नाही घराच वैशिष्ट्य इतकच की ते बाहेरून बंद करता येत नाही। मुख्य प्रवेशद्वाराला कडीकोयंडा नाही। दार बाहेरून बंद करायची गरज भासणार नाही, कुणी ना कुणी आत असणारच, असा हिशेब त्यामाग असावा।

या लोकशाही देशाचा पतप्रधान कामाच्या वेळी सरकारी कार वापरतो सरकारी शोफर त्या वेळी त्याच्या दिमतीला असतो पण जेम्स कॅलॅहन सध्याकाळी सपत्नीक जेव्हा फिरायला जातात तेव्हा स्वत कार चालवतात एका 'पिकनिक स्पॉट' जवळ मी त्यांना पाहिल पुढमाग पोलिसकार नाही की इतर कसलाही गोतावळा नाही लोकानी त्यांना पाहिल आणि काहीनी हात वर करून 'हॅलो जिम' अस त्याना अभिवादन केल ! पतप्रधानांनी हसत, हात उचावत अभिवादनाचा स्वीकार केला

ब्रिटनचे सरक्षणमत्री युनोत भाषण करून लडनला परतले तेव्हा काहीतरी घोटाळा झाला आणि त्याची कार त्याच्या स्वागतासाठी 'हीथ्रो' विमानतळावर येऊ शकली नाही सरक्षणमत्र्यांनी काही खळबळ केली नाही घोटाळ्याला जबाबदार असणाऱ्याला 'डिसमिस'ही केल नाही ! ते शांतपण अन्य उतारूबरोबर 'कोच'न व्हिक्टोरिया स्टेशनपर्यंत आले आणि टॅक्सीन घरी गेले

आमच्या गरीब देशातल्या पतप्रधानाचा थाटमाट, पतप्रधान मुबईत आले की सर्वत्र होणारा 'ट्रॅफिक जॅम' यासबधी मी एका इग्रज अधिकाऱ्याशी चर्चा करीत होतो. आपल्या देशातल्या पतप्रधानाच कौतुक शांतपण ऐकून घेऊन तो म्हणाला, "त्यात काय मोठस ? पतप्रधानाला आम्ही निवडून दिल आहे आम्हाला जेव्हा तो नकोसा होईल तेव्हा आम्ही त्याला काढून टाकू ! अहो, दुसऱ्या महायुद्धातून आमच्या देशाला वाचवणाऱ्या विन्स्टन चर्चिलना युद्ध सपल्यावर आम्ही बाजूला सारल आणि अॅटलींना निवडून दिल ! "

अशा ह्या जागरूक इग्रजाला राजघराण्याविषयी कोण अभिमान ! 'टेन डाउनिग स्ट्रीट'कडून 'बकिंगहॅम पॅलेस'कडे आल्यावर एकदम 'ट्रान्सफर सीन' होतो कपाळ पूर्णपण झाकून टाकणारी पिसांची उच काळीभोर कॅप, लालभडक रगाचा, पितळी बटनांचा अगरखा, त्याखाली काळीभोर पॅंट — अशा वेषभूषेतील गार्डस् पॅलेसभोवती रात्रदिवस पहारा करीत असतात प्रायोगिक नाटकातील 'फ्रीझ शॉट' असावा त्याप्रमाण हे रुबाबदार गार्डस् तासन् तास एका जागी खिळून असतात सकाळी साडेअकरा वाजता दुसऱ्या पाळीचे गार्डस् कामावर येतात पण ते मुकाटचान येत नाहीत, वाजतगाजत, मिरवत येतात हा 'चेंजिग द गार्डस्' कार्यक्रम पहाण्यासाठी 'बकिंगहॅम पॅलेस'समोरील प्रशस्त चौकात टुरिस्टांची प्रचड गर्दी होते

इग्रज लोकाना एकूणच राजघराण्याच कौतुक फार. गतवर्षी एलिझाबेथ राणीच्या राज्याभिषेकाला पचवीस वर्षं पूर्ण झाली तो सोहळा साजरा करण्यासाठी सारा इग्लड देश वर्षभर खपत होता पॅलेसपुढील चौकात लक्षावधी नागरिकांची गर्दी झाली होती आपल्या भावी राजाला पहाण्यासाठी प्रत्येक इग्रज उतावीळ

झाला होता 'बुई वॉंट प्रिन्स चार्ल्स' असा घोष लक्षावधी लोकानी केला आणि चार्ल्सन पॅलेसच्या बाल्कनीत येऊन मिनिटभर दर्शन दिल, तेव्हा किती लोकांना हर्षोन्माद झाला याचा निश्चित आकडा मिळत नाही ! राणीची बहीण प्रिन्सेस मार्गारेट हिच मागे लग्न झाल तेव्हा लडनमधील रस्ते सुशोभित करण्यासाठी चारपाच लक्ष रुपये खर्च करण्यात आले. नवदांपत्याच्या मधुचद्रासाठी सात लाख रुपये खर्च आला परतु सर्वसामान्य माणसाची त्याबद्दल तक्रार नाही राणीच्या कुटुबाला जनतेच्या पैशातून एक कोटी रुपयाहून अधिक तनखा मिळतो. एवढी मोठी रक्कम दिल्यानतर त्या मोबदल्यात या ना त्या निमित्तान सोहळे व उत्सव झाले पाहिजेत अशी सर्वसामान्य माणसाची अपेक्षा असते !

'टॉवर ऑफ लडन'मध्ये राणीच जडजवाहीर पहाण्यासाठी प्रवाशाची प्रचड गर्दी होते ते पहाण्याआधी भरपूर प्रवेश फी. कोहिनूर हिरा तिथच पहायला मिळाला. ('हा हिरा आमचा आहे बर का !' अस मी आजूबाजूच्या लोकांना त्यानी विचारल नसतानाही सागून टाकल !) राणीच उन्हाळयातील निवासस्थान 'विंडसर पॅलेस.' तिथ राणीच्या बाहुल्याच प्रदर्शन आहे. राणी लहान असताना त्या बाहुल्यांशी खेळायची. दहा रुपये प्रवेश फी देऊन एका छोटया खोलीतल ते प्रदर्शन पहायला गेलो बाहुल्यासारख्या बाहुल्या, पण राणीच्या बाहुल्या म्हणून त्यांच कौतुक किती !

लोकशाहीवर दृढ श्रद्धा ठेवणारा इग्रज माणूस राजघराण्याला किती मान देतो हे पावलोपावली प्रत्ययाला येत मार्गारेट ऑस्ट्रेलियाला गेली होती तेव्हा तिला थोडा ताप आला त्या दिवशीच्या बहुतेक सर्व वृत्तपत्रांत या बातमीला हेडलाइन ! जोमो केन्याटाच्या अत्यविधीसाठी प्रिन्स चार्ल्स गेला असता तिथ त्याला इडी अमीन भेटला इडी अमीनन हस्तादोलन करण्यासाठी आपला हात त्याच्यापुढ केला पण प्रिन्सन त्याकडे दुर्लक्ष केल ब्रिटनमधे या प्रसगाला प्रचड प्रसिद्धी मिळाली बिचारे पतप्रधान भाववाढीला तोंड देतादेता मेटाकुटीला आलेले. वेतनवाढीच्या मागणीला विरोध करताकरता आपल डळमळणार आसन स्थिर करण्याच्या प्रयत्नात गढलेले पण मार्गारेटच्या थडीतापाला हेडलाइन्स आणि प्रिन्स चार्ल्सच्या बाणेदार वर्तनावर ठळक अग्रलेख !

इग्रज माणसाच्या स्वभावातील विरोधाभास तो हाच ! परपरेचा त्याला केवढा अभिमान ! अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राकडे जे नाही ते इग्लडकडे आहे अमेरिकेला इतिहास नाही आणि त्या इतिहासाला खोलवर पाळमुळ असलेली परपरा नाही जुन्या परपरा, जुनी श्रद्धास्थान इग्लड प्राणपणान जपत असतो दुसऱ्या महायुद्धात बॉंबच्या वर्षावान उद्ध्वस्त झालेल्या, थोडयाबहुत ढासळलेल्या इमारती आजही लडनमधे होत्या त्या अवस्थेत दिसतात बँक स्ट्रीटच्या मागील

बाजूला, मासळीबाजारजवळच्या ह्या काळवंडलेल्या इमारती रंगरंगोटीविना कळाहीन दिसतात, पण जुन्या स्मृती जागवतात. ही तर तीसपस्तीस वर्षांपूर्वीची गोष्ट पण शेक्सपियरच्या गावी गेल्यावर त्याच रहात घर, ॲनी हॅथवेची झोपडी अजून होती तशीच आहे डॉक्टर जॉन्सनच घर, तो ज्या पबमधे रोज बीअर प्यायला जाई त्या पबसकट इंग्लडन जपून ठेवल आहे हेस्टिंग्ज या समुद्रकिनाऱ्या-जवळ असलेल्या गावी मी गेलो होतो तिथून जवळच इंग्लंडच्या गादीसाठी इ स १०६६ साली विल्यम द कॉंकरर आणि किंग हॅरल्ड यांच्यामधे निर्णायक लढाई झाली त्या गावाला 'बॅटल' हेच नाव देण्यात आल आहे हॅरल्डचा कुठ शिरच्छेद झाला, विल्यम कोणत्या बाजून आला, लढाई कोणत्या जागी झाली, हे सर्व इंग्लडन तपशीलवार त्या त्या जागी नमूद केल आहे लढाईचा प्रसंग सर्व बारकाव्यांनिशी मॉडेलच्या स्वरूपात उभा केला आहे

'एलिफट अँड कासल' या एका बाजूला असलेल्या उपनगरात 'इंपिरियल वॉर म्युझियम' मुद्दाम पहायला गेलो होतो राजघराण्यातील सर्व राजांची तिथ मोठमोठी तैलचित्र आहेत इंग्लडचा सगळा इतिहास त्या म्युझियममधे जिवत होतो प्रारभापासून आतापर्यंतची सर्व राजचिन्ह, शस्त्रास्त्र, सैन्याचे बदलते व्यूह, राजघराण्यातील व्यक्तीच्या पोषाखात झालेला बदल —— या गोष्टींच यथातथ्य दर्शन तिथ घडत लडनच्या रस्त्यावर फिरणारी पहिली बस तिथ आहे आणि दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी ब्रिटनन वापरलेल बॉबर विमानही तिथ आहे एका खलित्याखाली हिटलरची सही तिथ पहायला मिळाली

जुन्या गोष्टी सभाळून ठेवाव्यात इंग्रज माणसानच पहिल्या एलिझाबेथन मेरी द स्कॉट्सचा शिरच्छेद करण्याचा हुकूम दिला ज्या पात्यान तिच शिर उडवण्यात आल ते पात मादाम टचूसॉंच्या म्युझियममधे, 'हाउस ऑफ हॉरर भागात ठेवण्यात आल आहे 'एच एम एस बेलफास्ट' या युद्धकाळात प्रसिद्धीस आलेल्या बोटीवर नेल्सनच्या अनेक वस्तू जपून ठेवलेल्या पहायला मिळतात लडनहून साठसत्तर मैलावर असलेल्या बेडफर्ड गावी माझी मेहुणी डॉ सौ उषा पै हिच्याकडे गेलो होतो तिथ एक छोटस म्युझियम आहे त्या म्युझियममधे लेडी हॅमिल्टनन नेल्सनसाठी विणलेला रुमाल फ्रेम करून ठेवला आहे बेडफर्ड हे 'द पिलग्रिम्स प्रोग्रेस' या १६७८ साली प्रसिद्ध झालेल्या ग्रथाचा लेखक जॉन बनियन याच गाव त्याच पुस्तक बायबलपाठोपाठ जगात लोकप्रिय आहे जॉन बनियनवर पाखडी असल्याचा आरोप करण्यात आला व त्याला बारा वर्षं तुरुगात रहाव लागल. या काळात तो ज्या भाड्यातून सूप् पीत असे ते भाड आणि त्यान खुर्चीच्या पायापासून तयार केलेली बासरी म्युझियममधे पहायला मिळते लडनमधे फिरताना 'या घरात बेंजामिन फ्रँकलीन रहात होता अशा प्रकारच्या अनेक

सोनेरी पाट्या दिसतात 'वेस्टमिन्स्टर ॲबे'मधला 'द पोएटस कॉर्नर' पहाताना आणि 'या ठिकाणी डार्विनला पुरलं आहे' यासारखे शिलालेख वाचताना अंग थरारून जातं

लोकशाहीचा उद्‌घोष करताना राजघराण्याबद्दल अपार आदर बाळगणारी, आज झपाट्यानं प्रगत होत असलेल्या तंत्रज्ञानाला सामोर जाताना शेकडो वर्षां-पूर्वीच्या श्रद्धास्थानाची, स्मृतिचिन्हांची जपणूक करणारी ही संस्कृती वरवर पहाता परस्परविरोधी भासली, तरी तिला सुसंस्कृतपणाचं, राष्ट्रीयत्वाचं एक कोमल पण चिवट अस्तर आहे, हे लक्षात येतं!

3

# दोरी तुटलेले असंख्य पतंग

आपल्या देशात माणसापेक्षा जनावरांना अधिक किंमत आहे हे सांगताना माझा एक प्राध्यापक मित्र गमतीदार उदाहरण देतो जाफराबादहून काही म्हशी रेल्वे वॅगनन मुंबईला आणायच्या असतील तर रेल्वेचे कडक नियम आहेत एका वॅगनमधे एका म्हशीसाठी विशिष्ट स्क्वेअर मीटर्स जागा मोकळी ठेवावी लागते त्या हिशेबान एका वॅगनमधे चार ते पाच म्हशी घालून न्यायला क्लार्क परवानगी देतो. गुरासाठी, घोड्यांसाठी हे नियम आहेत आणि माणसांसाठी ?

—— आपल्याकडे माणसासाठी काहीही नियम नाहीत ! मुंबईच्या लोकलमधे डब्यात माणस अशी ठेचून भरलेली असतात की मुंगीला आत शिरायला वाव नसतो ( मात्र दर स्टेशनवर माणस शिरतच असतात ! ) 'फक्त वीस लोकानी बसावे' या हास्यास्पद पाटीच्या नाकावर टिच्चून पाचपट लोक डब्यात लोंबकळत असतात !

तात्पर्य माणसापेक्षा भारतात जनावराची अधिक कदर केली जाते !

इग्लडमधे वेगळी परिस्थिती आहे तिथली माणस जनावराना माणसासारख वागवतात, आणि कल्याणकारी राज्याकडून नागरिकांना लाडावलेल्या जनावरा-प्रमाण वागणूक मिळते कुत्र्या-मांजरासारख्या पेट्सच इग्रज माणसाला भारी कौतुक ! 'डॉगफूड' आणि 'कॅटफूड'च्या जाहिराती टी व्ही वर बटर-चीजच्या जाहि-रातीच्या बरोबरीन मिरवत असतात ऐटबाज लोकरी स्वेटर घालून फूटपाथवरून दुडूदुडू धावणारा कुत्रा आणि सकाळच कोवळ उन्ह खात बसलेली निळ्या डोळ्याची गुबगुबीत माजरी ही दृश्य नेहमीचीच (हे माजरही शिस्तप्रिय मालकाच्या तालमीत तयार झालेल शेजारपाजारी बाहेरच्या बाजूला दुधाच्या भरलेल्या बाटल्या तिष्ठत उभ्या असतात, पण गोरी माजरी तिकडे ढुकून पहात नाही ) इग्रज बाई पोर एक वर्षाच झाल म्हणजे रात्री 'गुड नाईट' करून त्याला वेगळ्या खोलीत झोपवते आणि कुत्रा पोटाशी घेऊन स्वत च्या बेडरूमकडे वळते !

इग्लडमधे जेव्हा हमरस्ते बांधायच काम सुरू झाल, तेव्हा काही रस्ते जगलातून, वन्य प्राण्याच्या राज्यातून जात होते अस आढळून आल अनेक वन्य प्राणी नेहेमीप्रमाण रस्त्याच्या एका भागाकडून दुसऱ्या भागाकडे जाणार आणि

हमरस्त्यावरून ताशी शे-दीडशे किलोमीटर वेगान धावणाऱ्या मोटारीखाली सापडून नाहक प्राणाला मुकणार हे लक्षात येताच इंग्रज माणूस काळजीत पडला मग त्यान वन्य प्राण्याची वस्ती कुठ असते याचा शोध केला त्या ठिकाणी आसपास हम-रस्त्याखालून बोगदे काढले आणि जनावराना एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे निर्वेध जाता येईल अशी सोय केली पावसाळा सुरू झाला की बेडकांचा अडी घालण्याचा सीझन सुरू होतो या वेळी अनेक विद्यार्थी हातात बादली घेऊन फिरत असतात. बेडकांना बादलीत घालून हे विद्यार्थी त्याना नदीकाठी सुरक्षित आणून सोडतात हा सगळाच प्रकार मोठा गमतीदार आहे!

इग्लड हे खऱ्या अर्थान कल्याणकारी राज्य आहे तिथल्या नागरिकाना 'सामाजिक सुरक्षा योजने'खाली ज्या सुविधा मिळतात त्या युरोपमधील कोणत्याही अन्य देशातील नागरिकांना क्वचितच मिळत असतील! बेकारांना त्यांच्या उपजीविकेपुरता भत्ता सरकारकडून मिळतो एवढच नव्हे तर मुलांच शिक्षण सपेपर्यंत प्रत्येक मुलाला आठवड्याला चार पौंड या दरान (महिन्याला अडीचशे रुपये) नियमित भत्ता मिळत असतो वृद्ध स्त्रीपुरुषावर सवलतींचा वर्षाव होत असतो नियमित पेन्शन तर मिळतच, पण साठ वर्षं उलटून गेलेल्यासाठी बस-रेल्वे निम्म्या दरान, सिनेमा-नाटक निम्म्या दरात, इतकच नव्हे तर केशकर्तनालयात वृद्धांसाठी सवलतीचे दर असतात आजारी माणसाना स्वच्छ, नितळ हॉस्पिटलात मोफत पण अत्यत नम्र सेवा मिळते प्रत्येक आजारी माणसाच पथ्यपाणी जमेस धरून त्याला हॉटेलमधे देतात तस 'मेनूकार्ड' दिल जात आणि रुग्णाच्या आवडीनिवडीप्रमाण त्याला लच-डिनर मिळत प्रसूतीसाठी हॉस्पिटलात आलेल्या स्त्रिया दोनतीन दिवसात घरी परततात बाळतपणासाठी सासूबाईंना आणण्याची पद्धत नसल्यामुळे बाळबाळतिणीची देखभाल करण्यासाठी जरूरीप्रमाण हॉस्पिटलतर्फे खास दाईची नेमणूक केली जाते कामगार सपावर गेले की त्यांच्या बायकामुलाच्या पालन-पोषणाच दायित्व सरकारवर असत. कामगार-सघटना कुटुबियाना भत्ता देतातच, पण कामगाराच्या पत्नीन मागणी केल्यास सप मिटेपर्यंत सरकार तिला भत्ता देत रहात बायकामुल उपाशी मरतात म्हणून अगतिक होऊन सप फोडण्याची पाळी कामगारावर कधी येत नाही!

मी इग्लडमधे असताना वर्तमानपत्रात एक घटना गाजत होती आपल्या बाळाच्या प्रकृतीविषयी बिनाकारण काळजी करण्याची काही आयाना सवय असते मूल नुसत किरकिरल की अशा आया डॉक्टरकडे धाव घेतात अशीच एक इंग्रज आई आपल्या दीड वर्षाच्या मुलाला घेऊन पुन्हापुन्हा हॉस्पिटलात जात होती. त्यामुळे त्या मुलाच्या वाढीवर वाईट परिणाम होईल म्हणून सरकारच्या 'सामाजिक सुरक्षा खात्या'न एकदोनदा सूचना दिल्यानतर शेवटी चक्क त्या मुलाला ताब्यात

घेतलं त्या अति हळव्या आईची मुलाखत, डॉक्टरची मुलाखत, बालमानसशास्त्रज्ञाचे लेख, वाचकाची पत्र -- अशा प्रकारे बरेच दिवस ह्या घटनेन वृत्तपत्रांना खाद्य पुरवल !

केवळ शासन नागरिकाची सर्वतोपरी काळजी वहात अस नाही, एक नागरिक दुसऱ्या नागरिकाची अशीच काळजी घेतो जेनेट टेट नावाची एक तेरा वर्षाची मुलगी शाळेत जाताना अचानक नाहीशी झाली तिच्या शोधासाठी वृत्तपत्र, टी व्ही सर्वसामान्य नागरिक यानी जे रान उठवल ते सहजासहजी विसरता येण्या-सारख नाही ! 'स्कॉटलड यार्ड'पासून शाळाकॉलेजमधले विद्यार्थी जेनेटचा शोध घेत होते तिचा पत्ता लागत नाही म्हणजे काय ? लागलाच पाहिजे ! आपल्याला जणू हे आव्हानच आहे अशा जाणिवेन ब्रिटनमधील प्रत्येक माणूस तिचा शोध करण्याचा आपल्या परीन प्रयत्न करत होता टी व्ही वर तिचे फोटो काय, अनेक नागरिकानी तिचा पत्ता लावणा-ऱ्यासाठी जाहीर केलेली मोठमोठी बक्षिस काय एका बेपत्ता मुलीसाठी अवघ राष्ट्र व्याकुळ झालेल !




लोकरी स्वेटरधारी कुत्र आणि त्याची मालकीण

माणसाच्या जीविताची इग्रज माणसाला इतकी मातब्बरी वाटते म्हणूनच पादचारी रस्ता ओलांडताना मोटारवाले शातपणे थांबून असतात कर्कश हॉर्न वाजवत नाहीत की 'मरायचय काय ?' असा उर्मट प्रश्न करत नाहीत ! सरकार काय, माणस काय, माणसाना माणसांमारख वागवतात, एवढाच त्याचा अर्थ !

मात्र इग्रज समाजातले माणमा-माणसामधले सबध व्यापारी पद्धतीचे, तुटक असे असतात नात्यागोत्याचे रेशमी बध त्यांना जखडून टाकत नाहीत भारतीय सस्कृतीत मुरलेल्या मनाला हे खटकल्याशिवाय रहात नाही तीर्थरूपांच्या पायातले शूज मुलाच्या पायांत चपखल बसू लागले की मुलगा स्वतत्र जीवन जगू लागतो. मुलगा पोटापाण्याला घालत नाही म्हणून उपाशी वा अर्धपोटी रहाण्याची पाळी वृद्ध आई-वडिलावर येत नाही सरकार वृद्धांची सर्वतोपरी काळजी घेत हे खर. परतु दोन्ही वेळच जेवण आणि सध्याकाळी बीअरचे चार घोट मिळाले म्हणजे माणमाच्या सर्व भुका भागत नाहीत !

मी हेस्टिंग्जला गेलो होतो तेव्हाचा तेथील प्रसग आठवतो हेस्टिंग्ज हे समुद्र-काठच रमणीय ठिकाण गावाची रचना चमत्कारिक आहे. डोंगरमाथ्यावर-छोटी घर आहेत आणि तिथ पोचायला 'ट्रॉली ट्रेन' आहे शहरापासून एका बाजूला असलेल्या या गावाच्या लोकसख्येत मुख्यत' वृद्धाचा भरणा आहे नव्वद टक्क्यांहून अधिक लोक वृद्ध असावेत ! दुपारी तीन वाजता कोवळ उन्ह पडल होत आणि लच आटपून शेकडो वृद्धमडळी समुद्रकिनाऱ्यावरल्या बाकावर तासन् तास बसून होती त्यांच्या नजरेतला भकास शून्यपणा पहावत नव्हता


मी कशीबशी एका बाकावर जागा मिळवली आणि पलिकडे बसलेल्या एका वृद्धाला म्हटल, काय रमणीय दृश्य आहे ! "

खादे उडवून तो हसला आणि म्हणाला, "हे सुख दोनचार महिने ! एकदा पाऊस सुरू झाला किंवा बर्फ पडू लागला की महिनेन् महिने घराबाहेर पाऊल टाकता येत नाही ! ' विल्यम माउटन हे त्याच नाव लडनला तो बँकेत काम करीत होता आणि त्याची बायको एका हॉटेलात नोकरीला होती एक मुलगा बर्मिगहॅमला होता, व दुसरा मुलगा लडनच्या एका उपनगरात गेल्या वर्षी बायको गेल्यापासून तो एकटाच हेस्टिंगला रहात होता एकाकी, भकास आयुष्य जगत होता

मुलाकडे कधी जात नाही ? मी विचारल

छे ! मुलच ख्रिसमसला येऊन भेटतात एकदोन दिवस बायकामुलांना घेऊन राहून जातात वेळ मिळाला आणि आठवण झाली तर माझ्या बर्थडेला कार्ड पाठवतात बस्स ! "

भारताविषयी, भारतीय समाजजीवनाविषयी त्यान अनेक प्रश्न विचारले समोरच्या 'ऑटोमॅटिक मशिन'मधे वीस पेन्सची नाणी टाकून त्यान वेफर्सचा पुडा




हेस्टिंग्जमधला एक शापित म्हातारा

आणून मला दिला मी त्याचा निरोप घेताना म्हटल, माउटनसाहेव, तुम्ही आमच्या इंडियाला आल पाहिजे "

आता कमला येतोय ? इथ होती तेव्हा कदाचित मिळून प्रवास केला असता ती गेली —— मी अगदी एकाकी झालोय ! अशी छान हवा पडली की बर वाटत पण घरी बसून रहाव लागल की भयकर कटाळा येतो ' पट्दिशी मेलोबिलो तर मुलांना किती दिवसानी बातमी कळेल कोण जाणे ! '

म्हातारपण म्हणजे शापच वाटत असेल त्याला

एकदा मी, वर्टी, त्यांची दुबईहून आलेली मुलगी व चार वर्षांची नात आरोही अशी बार्किंग स्टेशनवरुन बसन इलफर्डला निघालो होतो आरोही आजोबांच्या माडीवर उड्या मारत होती त्याच्या गळ्यात हात घालून काहीबाही बडबडत होती. पलिकडे बसलेली एक जख्ख म्हातारी कौतुकान आरोहीची दगामस्ती पहात होती वर्टींना तिन विचारल, " तुमची नात वाटत ? '

हो. माझी एकुलती एक नात " वर्टी उत्तरले

' माझी नात अगदी हिच्या वयाची आहे. " तिन न विचारता सांगितल हे सागताना मानवी जीवनातल सार वात्सल्य तिच्या सुरकुतलेल्या चेहेऱ्यावर गोळा झालं होत, आणि डोळ्यात मात्र होत अपार कारुण्य ! कातडीचा रग काळा किंवा गोरा, नातवडाना खेळवत म्हातारपण सुखात घालवायची इच्छा सगळ्याच

आजोबा-आज्याना असणार या सामान्य आनंदाला ती पारखी झाली होती हे तिच्या पारदर्शी चेहेऱ्यावर प्रतिबिंबित झाल होत.

सोमैया प्रकाशन'च्या डॉ कोर्शेंनी मला पुन्हापुन्हा सागितल होत 'ससेक्स परगण्यात 'पेस्टॅलॉत्सी व्हिलेज'मधे मुलांच्या शिक्षणाचा एक विशेष प्रयोग चालला आहे. तो पहायला विसरू नका " पेस्टॅलॉत्सी नावाचा एक शिक्षण-तज्ज्ञ स्वित्झर्लंडमधे होऊन गेला विविध देशांतील मुलाना एकत्र आणून त्यांना व्यवसायविषयक शिक्षण द्यायच, विशेषत अविकसित देशांतील मुलाना तंत्रशिक्षण द्यायच, त्याना स्वावलबी करायच, अशी त्याची कल्पना होती त्यापासून स्फूर्ती घेऊन बॅटल' गावापासून जवळच १९६० मधे एक खेड वसवण्यात आल नायजिरिया, जॉर्डन, थायलड, तिबेट, व्हिएटनाम आणि भारत या सहा देशांतील मुल इथ एकत्र रहात असतात प्रत्येक देशातील मुलासाठी वेगळ 'हाउस' आहे 'इडिया हाउस'मधे सगळी मुल मराठी त्यांच्या हाउसकीपर सौ पारखी या मुबईत एका शाळेत शिक्षिका होत्या वेगवेगळ्या घरात राहून ही मुलं आपल्या देशाच्या सस्कृतीची जपणूक करतात आणि त्याचबरोबर दिवसातला बराच वेळ एकत्र खेळण्यात, गप्पा मारण्यात घालवतात मी 'इडिया हाउस'मधे गेलो आणि तिथल्या मुलांनी माझ्या हातात मोदक ठेवले गणेशचतुर्थी नुकतीच पार पडली होती आणि मला तर त्याचा पत्तासुद्धा नव्हता ! 'इडिया हाउस'मधल्या मराठी मुलांनी गणपती बसवला होता रात्री सर्व देशांची मुल आरत्यासाठी यायची वॉर्डन गेल हे सुद्धा सपत्नीक येऊन टाळ वाजवायचे आतापर्यंत शेकडो मुलानी इथ राहून शिक्षण घेतल आहे, आणि मायदेशी परत जाऊन थायलड विद्यापीठात रसायनशास्त्र शिकवण्यापासून भारतात 'कॉम्प्युटर प्रोग्रॅमर' म्हणून काम करण्या-पर्यंत विविध प्रकारची सेवा चालू ठेवली आहे 'इडिया हाउस'मधली चार मुल सानेगुरुजींच्या दापोलीची होती आठदहा वर्षांची, गरीब घरातली ही मुल शिक्षण सपल्यावर मायदेशी परत येऊन आपल्या ज्ञानाचा लाभ देशाला देणार होती बाळपणापासून जगातल्या अन्य देशातील मुलाबरोबर राहिल्यामुळे त्यांच्या मनाची मशागत उत्तम प्रकारे होणार होती अशी अनेक मन अनुभवसमृद्ध करायच काम त्या छोट्याशा खेड्यात शातपणे, फारसा गाजावाजा न करता चालल होत

वॉर्डन गेल यांनी आपुलकीन आम्हाला आपल्या घरी बोलावल पासष्टएक वर्षांचे गेल आपल्या पत्नीबरोबर गेली दहाबारा वर्षं 'पेस्टॅलॉत्सी'मधे रहात आहेत. मुल आपापल्या ससारात रमलेली मी दोन आठवड्यात लडनचा कोपरान् कोपरा पायाखाली घातल्याच सागितल तेव्हा ते कौतुकान हसले "तुम्हाला आश्चर्य वाटेल," ते म्हणाले, "मी लडन शहरात बावीस वर्षं रहात होतो पण 'टॉवर ऑफ लडन' कधी आत जाऊन पाहिल नाही ! "

मी म्हटल, "तुम्हाला तो पहायची गरजच काय ? तुम्ही टुरिस्ट थोडेच आहात माझ्यासारखे ?"

ते मोठ्यादा हसले मधेच थाबून बायकोला म्हणाले, "तुझा लाडका आला बर का ! तो पहा -- खिडकीबाहेर बसला आहे !"

मी गोंधळलो मिसेस गेलनी नाकावर बोट ठेवल, 'काही बोलू नका'ची खूण केली व आम्हाला डायनिंग रूममधे नेल तिथ एक मुठीएवढ निळंभोर, पिवळचा चोचीच पाखरू मान वेडीवाकडी करून इकडेतिकडे पहात डायनिंग टेबलावर बशीत ठेवलेले दाणे टिपत होत !

लिव्हिंग रूममधे आल्यावर मिसेस गेल म्हणाल्या, 'हे आमच लाडकं पाखरू ! न चुकता दोनदा येत -- सकाळी आणि सध्याकाळी ! वर्षभर त्याची खेप कधी चुकली नाही. त्याच्या येण्याच्या वेळी आमच्यापैकी कुणीतरी एक घरी रहात. आमची चाहूल लागल्याखेरीज आत येत नाही ते "

"तो पक्षी म्हणजे आमच नातवडच आहे म्हणा ना !" गेल उद्गारले

आपल हरपलेलं सुख कोण कशात शोधतो हे सांगता यायच नाही !

इग्लंडमधे आमचे भारतीय रहातात तरी कसे हे पहायची उत्सुकता होती 'मराठी माणसाना भेटण्यात वेळ फुकट दवडू नका' अशी प्रेमळ सूचना अरविंद गोखले यानी केली होती पण मुबईहून मी इग्लंडला निघालो तेव्हा अनेकांनी आपल्या सख्ख्या, मावस-चुलतभावांचे पत्ते दिले होते, फोन-नबर दिले होते. "तुम्ही त्याला भेटायला गेलात तर त्याला फार आनंद होईल" अशी ग्वाही दिली होती तेव्हा 'टेस्टकेस' म्हणून मी एका गृहस्थांना फोन केला तो त्यांच्या सौ नी घेतला

"तुमच्या ह्याचे मावसभाऊ मुबईला आहेत. त्यानी तुम्हाला भेटायला सागितलय म्हणून --"

"अस होय ? त्याच काय आहे, हे आणि मी दोघही नोकरी करतो वीकएडला फार बिझी असतो कुठ पार्ट्या, पिकनिक " तिच्या आवाजातली पुणेरी झाक मी ओळखली, आणि इग्लडमधे बरीच वर्षं राहून आपला 'पुणेरी'पणा शाबूत ठेवल्याबद्दल मी तिच मनातल्या मनात कौतुक केलं

मी म्हटल, "ठीक आहे पुन्हा कधीतरी "

"नाहीतर तुम्ही अस करता का ? येत्या शनिवारी इथ महाराष्ट्रीय मडळात मुलांचे कार्यक्रम आहेत नानासाहेब गोरे येणार आहेत प्रमुख पाहुणे म्हणून आमचा चार वर्षांचा रॉबिन फॅन्सी ड्रेस स्पर्धेत भाग घेणार आहे तुम्ही याल का ? बघा तरी तो इथ राहिल्यान किती चुणचुणीत झाला आहे ! इग्लिश

फाडफाड बोलतो ! त्याचा इन्स्टंट फोटो काढून ह्याच्या मावसभावाकडे एक नेऊन द्या मग याल ना ? "

मी नानासाहेब गोरेना 'इंडिया हाउस'मधे दोनदा भेटलो होतो रॉबिनच कौतुक करायला महाराष्ट्रीय मंडळात जाण्यात मला रस नव्हता ! मी रॉबिनच्या वडिलाचा आणि महाराष्ट्रीयाचा नाद सोडून दिला !

मात्र चन्नी आरोरांबरोबर उत्तर-भारतीय, बंगाली, पंजाबी मंडळीच्या घरी मुद्दाम जाऊन आलो. लंडनमधे भारतीय लोक खूपच आहेत. 'चेरिंग क्रॉस', 'व्हाइट हॉल', 'व्हिक्टोरिया' या भागांत हिंडताना साड्या नेसणाऱ्या स्त्रिया व धोतर नेसणारे पुरुष सर्रास दिसतात पटका घालणारे सरदारजी तर असंख्य ! तंदुरी चिकन, कबाब, भेळपुरी, बटाटेवडे विकणारी अनेक हॉटेल आहेत (एका साडीच्या दुकानातून मी एक साडी सौ साठी घेतली मुंबईला आल्यावर ती मुंबईच्याच एका मिलची असल्याच आढळून आल ! तरी पण सौ. ती इंपोर्टेड साडी म्हणून मिरवीत असते ! )

इंग्लंडमधे स्थायिक झालेल्या भारतीयांची स्थिती मोठी चमत्कारिक आहे भारतात शिकून इंग्लंडला आलेले व तिथं चांगल्या पगारावर नोकरीवर असणारे लोक मोठ्या ऐषआरामात रहातात सर्वसामान्य माणसाकडे तिथं गाडी असते. सर्व प्रकारच्या सुखसोयी घरात असतात मी काहींच्या घरी डिनरला गेलो, काहींच्या घरी कॉकटेल पार्टीजना त्यांच्याशी गप्पा मारताना आढळून आलं की, बरेच लोक अनेक वर्षं मायदेशी गेलेले नव्हते भारताची हवा त्यांना मानवत नाही म्हणे ! उकाड्यामुळे त्यांच्या अंगावर रॅश उठतो, धुळीमुळे त्यांचा जीव कासावीस होतो.

"तुमच्या इंडियामधे काय गर्दी हो ! पॉप्युलेशनवर कंट्रोल घाला बुवा तुम्ही ! " एका बंगाली माणसानं मला बजावलं जणू काही वाढत्या लोकसंख्येला मीच जबाबदार होतो !

"तुमची मुलं रमतात का तिथं ? " मी एका लखनौवाल्याला प्रश्न केला

"छे हो ! मुलं दोन दिवसांत बोअर होतात ! मागं मी मुलाना घेऊन महिना-दीड महिना आमच्या घरी गेलो लखनौपासून चाळीस मैलावरल्या खेडे-गावात परत आल्यावर त्याचं इंग्रजी इतकं बिघडलेलं होतं ! इंग्रजी बोलताना गावढळ हिंदी हेल ! "

"मग मी ह्यांना सांगितलं, मुलाचं शिक्षण होईपर्यंत त्याना इंडियात न्यायचच नाही ! " सौ. म्हणाली आपलं उत्तराग जीनमधे कसबसं कोंबून लखनौ-वाल्याची घरवाली माझ्यासमोर बसली होती

मी आलो म्हणून त्यानं सैगलची एल. पी ' काढली. 'जब दिल ही टूट गया' सुरू झाली लखनौवाल्याच्या मुलांनी ती मधेच बदलून 'सॅटरडे नाइट फीव्हर'मधली 'एल पी.' सुरू केली

"पाहिलत ? इंडियातलं त्यांना काहीच आवडत नाही !" घरवाली अभिमानवजा कौतुकानं म्हणाली

एकदा एका उत्तर-भारतीयाकडे मी बर्थडे-पार्टीला गेलो होतो त्याच्या सोळा वर्षांच्या मुलीचा बर्थडे होता नाव सॅण्ड्रा पॉप म्युझिक सुरू होतं आणि कॉकटेलचे ग्लास रिकामे करीत इंग्लंडला स्थायिक झालेल्या भारतीय कुटुंबातले तिचे बॉयफ्रेंडस् आणि गर्लफ्रेंडस् अंगात हिव भरल्यासारखं नाचत होते. दोन्ही हात मागं फेकून छात्या पुढं काढून छोट्या खोलीत मंडळी बेभान होऊन नाचत होती

मी ते दृश्य एका कोपऱ्यात उभा राहून विमनस्कपणे पहात होतो. दोरी तुटल्यामुळे केविलवाणे दिसणारे ते पतंग !

'इंडिया'बद्दलची लाज मनात बाळगणाऱ्या या मंडळींचं भवितव्य काय ? —— कोण जाणे ! आज तरी इंग्लंडमधे 'इंडियन्स'कडे तुच्छतेनं पाहिलं जातं असा अनुभव येतो शिष्टाचार गोऱ्या माणसाच्या रोमारोमात भिनलेला त्यामुळे वरून तो इंडियन्सशी अदबीनं वागतो इतकंच ! आज भारतीय लोक वेगवेगळ्या फर्ममधे वरच्या पदावर आहेत खरे, पण एका विशिष्ट हुद्द्यानंतर त्यांना बढती दिली जात नाही त्यांची प्रमोशन्स थांबवण्यात येतात हॉस्पिटलमधे अनेक भारतीय डॉक्टर्स भरपूर पैशाच्या आशेनं काम करतात पण तिथं ऑपरेशन करण्याची, मोठमोठी जबाबदारीची कामं पेलण्याची त्यांना संधी दिली जात नाही कोणत्याही डिपार्टमेंटची हेडशिप इंडियन डॉक्टर्सना मिळत नाही !

मी तिथं असताना एक मनोरंजक घटना घडली एका 'डिपार्टमेंटल स्टोअर्स'मधे सेल्सगर्लच्या दोन जागा भरायच्या होत्या दोन भारतीय मुली मॅनेजरला जाऊन भेटल्या, तेव्हा 'त्या जागा आत्ताच भरल्या' असं त्यानं निक्षून सांगितलं त्या भारतीय मुलींना शंका आली त्यांनी आपल्या दोन ब्रिटिश मैत्रिणींना अर्ज घेऊन मॅनेजरकडे पाठवलं मॅनेजरनं त्या गोऱ्या मुलींना तत्काळ कामावर घेण्याची तयारी दर्शवली त्या गोऱ्या मुलींनी भारतीय मैत्रिणींना ते सांगितलं प्रकरण सरकारपर्यंत गेलं 'सेग्रेगेशन'बद्दल डिपार्टमेंटल स्टोअर्सला दंड झाला व त्या दोन भारतीय मुलींना कामावर घेण्याची स्टोअर्सच्या मॅनेजरवर सक्ती करण्यात आली. (अर्थात सगळ्याच कथांचे शेवट असे गोड होतात असं नाही !)

एकूणच तिथं भारतीयांना दुय्यम दर्जाचे नागरिक म्हणून वागवलं जातं इंग्लंडमधली अनेक वृत्तपत्रं मी कुतूहलानं रोज वाचत असे. त्या पत्रांत भारता-

विषयीची बातमी नसायचीच. दोन महिन्याच्या काळात भारताविषयी एकुलती एक वार्ता प्रसिद्ध झाली उत्तरप्रदेश व बंगालमधे आलेल्या प्रचंड पुराविषयी क्वचित इंदिरा गांधींची मुलाखत भारत ब्रिटिश वृत्तपत्रांच्या खिजगणतीत नाही ! ज्या देशावर आपण दीडशे वर्षं राज्य केलं, ज्या देशात दर वर्षी पूर-अवर्षण येत असतात, ज्या देशातील लोक नोकऱ्यांसाठी जगभर वणवण फिरत असतात असा एक प्रचंड लोकसंख्येचा दरिद्री देश, ही ब्रिटनमधली भारताची 'इमेज' !

लंडनमधे 'शॉपिंग' करणं हा एक मोठाच आनंद असतो तिथली प्रचंड डिपार्टमेंटल स्टोअर्स पाहूनच डोळे निवतात पाचपाच मजली स्टोअर्स, प्रत्येक मजल्यावर जाण्यासाठी 'एस्केलेटर', अंतर्भागात कमालीची स्वच्छता, शिस्तीनं उघडयावर ठेवलेल्या 'पिन'पासून 'पियानो'पर्यंतच्या विविध वस्तू, प्रत्येक वस्तूवर किमतीची चिठ्ठी डकवलेली 'नाइट्स गार्डन'जवळच्या 'हॅरड' ह्या प्रचंड महागडया स्टोअर्समधे गेलो "आम्ही बै ही वस्तू हॅरडमधून घेतली" अशी लंडनच्या 'वनितामंडळा'त या स्टोअर्सची तारीफ केली जाते ! एक हजार रुपयाची पर्स, साठ हजाराचा पलंग अशा तिथल्या किमती. तिथं किमती वाचा-यच्या नाहीत, वस्तू नुसत्या पहायच्या ! ऑक्सफर्ड स्ट्रीटवरली दुकानं प्रेक्षणीय 'मार्क अँड स्पेन्सर', 'लिटल् वुड्स', 'बूट्स' यासारख्या स्टोअर्सच्या शाखा सर्व इंग्लंडभर पसरलेल्या 'मार्क अँड स्पेन्सर'चे मालक ज्यू. अरब लोकांचं ज्यूशी हाडवैर पण या फर्ममधे वस्तूंच्या दर्जाची हमी. त्यामुळे बाहेरून येणारे अरब



दोन व्हिएटनामी तरुण पेस्टॅलॉत्सीमध्ये गवंडीकामाचे प्रात्यक्षिक करीत आहेत.

तिथला माल खरेदी करतात आणि ' मार्क अँड स्पेन्सर 'च्या पिशव्या, बिल फाडून टाकतात !

या दुकानात प्रवेश करताना माझ्यासारख्याला एकच भय वाटत असतं इथं 'शॉपलिफ्टिंग 'बद्दल आपल्याला कुणी पकडणार तर नाही ? वस्तू उघड्यावर ठेवलेल्या त्यामुळे कुणी मुद्दाम, कुणी नकळत त्या खिशात वा पर्समध्ये टाकतो पण दुकानाच्या कोपऱ्या-कोपऱ्यातून तुमच्यावर पाळत असते तुमच्या मागोमाग डिटेक्टिव्ह फिरत असतात एखादी वस्तू तुम्ही आपल्यापाशी ठेवून, बिल न देता दुकानाबाहेर पाऊल टाकलंत की तुम्हाला तत्काळ पकडण्यात येतं मग प्रचंड दंड, वृत्तपत्रात पहिल्या पानावर नावनिशीवार बातमी रोज अशा वार्ता छापून येत असतात एकदा एका अरब स्त्रीला शर्ट चोरल्याबद्दल पाचशे पौंड दंड झाला एका सुप्रसिद्ध हिंदी सिनेनटीवर 'शॉपलिफ्टिंग 'बद्दल खटला भरण्यात आला रिचर्ड जेंकिन्स नावाच्या एका गृहस्थानं शॉपलिफ्टिंग करून आपल्या रहात्या घराचं 'डिपार्टमेंटल स्टोअर्स' करून टाकलं त्याच्या घरी नव्वद हजार पौंड किमतीच्या अकराशेहून अधिक वस्तू सापडल्या ! रंगीत टी. व्ही -सेट्सपासून स्वेटर्सपर्यंत सर्व प्रकारच्या वस्तू ! 'फॉइल्स 'च्या दारात एका संभावित र्‍हविलकाला पकडण्यात आलं त्याच्याजवळ काय मिळालं ? 'शॉपलिफ्टिंग हाऊ टु प्रिव्हेंट इट' या पुस्तकाच्या सहा प्रती ! त्या बातम्या वाचून आपण उगाचच धावरून जातो ! मी तर अशा दुकानात गेलो की वस्तू घ्यावीशी वाटली म्हणजे ती हातात घेऊन तत्काळ पैसे देऊन मोकळा व्हायचा ! एकदा मी अजयसाठी छोटा 'मॅग्निफाइंग ग्लास' घेतला आणि तो हातात ठेवून एस्केलेटरनं तिसऱ्या मजल्यावर आलो पण मग एकदम ध्यानात आलं की 'ग्लास 'चे पैसे आपण तळमजल्यावर दिलेच नाहीत ! माझ्या डोळ्यापुढं काजवे चमकले. थंडी असून मला घाम फुटला ! 'मुंबईच्या प्राध्यापकाला शॉपलिफ्टिंगबद्दल अटक' अशा बातम्या डोळ्यापुढं नाचू लागल्या ! मी खाली धावत आलो माझी धावपळ बिल करणाऱ्या 'सुबक



पेस्टॅलॉत्सीमध्ये व्यवसाय शिक्षणात रमलेली एक भारतीय मुलगी

ठेगणी 'च्या ध्यानी आली. ती हसून म्हणाली, "डोण्ट वरी ! जोपर्यंत तुम्ही आमच्या स्टोअर्सच्या बाहेर पाऊल टाकलेलं नाही तोपर्यंत तुम्हाला वस्तू हाताळण्याचा, ती एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर नेण्याचा, पुन्हा जागेवर ठेवण्याचा पूर्ण हक्क आहे ! "

परंतु हा हक्क उपभोगण्याची मला कधी हिंमत झाली नाही !

'डिपार्टमेंटल स्टोअर्स 'मधे नेहेमीच गिऱ्हाइकाची प्रचंड गर्दी उसळलेली असते आणि लक्षावधी पौंडांची खरेदीविक्री रोज होत असते हे एका अर्थी इंग्लंडच्या अर्थकारणाच्या दृष्टीनं हितावह असतं लोक कमी खर्च करू लागले तर इंग्लंडची अर्थव्यवस्था ढासळून पडेल ! आपल्याकडे रद्दीचे, रिकाम्या बाटल्यांचे पैसे मिळतात. (अनेकांच्या घरी महिन्याच्या शेवटी भाजीपाल्याचा खर्च रद्दी विकून मिळालेल्या पैशातून होत असतो ! ) इंग्लंडमधे रद्दी सभाळून ठेवण्याची पद्धत नाही रोजचं वर्तमानपत्र वाचून झालं की केराच्या टोपलीत टाकायचं. रिकाम्या बाटल्यांचीही तीच गत अनेक हॉटेलात चहा-कॉफी प्यायला प्लॅस्टिकचे सुबक पेले मिळतात चहा पिऊन झाला की हे कप फेकून द्यायचे मोटारगाड्या जुन्या झाल्या की त्यांचे हाल कुत्रा खात नाही ! बऱ्या अवस्थेत असलेल्या शेकडो गाड्या एकमेकींच्या अंगावर हताशपणे विसावलेल्या जागोजागी दिसतात ! लोक वर्षानुवर्षं एकच गाडी वापरीत राहिले तर मोटार-धंदे फटाफट बंद पडू लागतील ! 'सेकंड हँड' गाडी दोनशे पौंडाला मिळते (म्हणजे फक्त तीन हजार रुपये ! ) चांगली 'फोर्ड'ची 'कॉर्टिना' गाडी थोडीशी डागडुजी करून सगळ्या युरोपभर प्रवास करावा अशा अवस्थेतली गाडी फार जुनी झाली की ती कुणी घेत नाहीच पण मोडक्या गाड्यांच्या ढिगाऱ्याकडे ती ओढून न्यायला तीसचाळीस पौंड मालकालाच खर्चावे लागतात !

जगातल्या सगळ्या देशांतील माल इंग्लंडच्या बाजारात मिळतो फ्रान्स, जर्मनी यांसारख्या पुढारलेल्या देशातून आयात होणाऱ्या विविध वस्तूंशी स्पर्धा करायला ब्रिटिश उत्पादकांना भीती वाटत नाही पण तैवानसारख्या छोट्या देशातून येणारा माल (तिथं मजुरी व एकूणच उत्पादनखर्च फार कमी असल्यानं) इंग्लंडमधे स्वस्त मिळतो. तैवानहून आयात होणारे तयार कपडे इतके स्वस्त, की इंग्लंडमधे तयार होणाऱ्या कपड्यांना फारसं गिऱ्हाईक मिळेना ! मग तिथल्या कारखानदारांनी व व्यापाऱ्यांनी मोठी मोहीमच सुरू केली 'वुइ वॉंट ब्रिटिश गुड्स' अशा जाहिराती सर्वत्र फडकू लागल्या टी-शर्टस्वरही ही घोषणा ! यात गमतीचा भाग असा की, 'वुइ वॉंट ब्रिटिश गुड्स' अशी जाहिरात असलेली टी-शर्टस् 'मेड इन तैवान' होते !

तर असा हा इंग्लंड ! परंपरेची प्रामाणिकपणानं जपणूक करणारा, माणसाला माणसासारखी वागणूक मिळावी म्हणून खऱ्या अर्थानं कल्याणकारी राज्य राबवणारा, न पेलणारी गोळी चढवल्यामुळे अडखळणारा, चाचपडणारा एक महान देश !

सूर्य पश्चिमेकडे कलला आहे, आणि शेकडो वर्षांच्या इतिहासाला साक्षी असलेली तमसा नदी मावळत्या सूर्यकिरणांकडे भयचकित मुद्रेनं पहात संथपणानं वहाते आहे .

# राकट, कणखर, कोमल देश

स्कॉटलंड म्हटलं की आठवतं ते स्कॉटलंड यार्ड, बॅगपायपर, वॉल्टर स्कॉट आणि अर्थातच स्कॉच व्हिस्की !

लंडनमध्ये स्थायिक झालेला अरुण मुजुमदार नामक एक बंगाली माणूस फावल्या वेळात भारतीयांसाठी छोट्या सहली आयोजित करतो असं कानी आलं. एडिंबराला वार्षिक महोत्सव चालू आहे. तिथला 'मिलिटरी टॅटू' प्रेक्षणीय असतो त्या निमित्तानं मुजुमदारनं चार दिवसांची स्कॉटलंड-सहल आयोजित केली आहे, अशी माहिती मिळाली तेव्हा मुजुमदारला फोन करून कोचमधली सीट रिझर्व करून टाकली.

हा वातानुकूलित कोच रात्री दहा वाजता व्हिक्टोरिया स्टेशनसमोरून निघाला. रात्रभरचा प्रवास. लंडन-एडिंबरा हमरस्ता इतका नितळ, की पोटातलं पाणी हलायचं नाही ! बसमध्ये सर्वजण भारतीय. त्यातली दोन जोडपी मराठी बोलणारी. 'पेस्टॅलॉत्सी व्हिलेज'मधल्या 'इंडिया हाउस'च्या सुपरवायझर श्रीमती पारखीही बसमध्ये होत्या. काही प्रवासी उत्तर-प्रदेशीय, काही पंजाबी, उरलेले बंगाली. ड्रायव्हर रोझी टेल्स हा अतिशय देखणा. पिंगट केस, चमकदार डोळे, सरळ नाक, चेहेरा सदा हसतमुख. रॉबर्ट टेलरची डमी म्हणून सहज खपला असता. आम्हा 'इंडियन्स'ची गडबड आणि बडबड दुरून मिस्किलपणे न्याहाळत तो उभा असायचा. रात्रभर चक्र हातात होतं, पण सकाळी सहा वाजता एडिंबराला पोचलो तेव्हा तो आम्हा सर्वांपेक्षा अधिक ताजातवाना !

एडिंबरा हे जगातील अनेक सुरेख शहरांपैकी एक आहे असं समस्त स्कॉटिश लोकांचं मत आहे, आणि ते शंभर टक्के खरं आहे. प्रिन्सेस स्ट्रीट या शहराच्या मध्यवर्ती रस्त्यावर उभं राहून चोहो बाजूंनी नजर टाकली की प्राचीन न् अर्वाचीन काळ कसा एकमेकांना बिलगून बसल्यासारखा दिसतो ! तीनशे फूट उंचीच्या प्रचंड खडकावर उगवलेला एडिंबरा कासल, त्याभोवतीच्या चारपाचशे वर्षांपूर्वीच्या इमारती, अरुंद गल्ल्या, गॉथिक वास्तुशिल्पाचं निमुळतं लावण्य दाखवणारं सर

वॉल्टर स्कॉटच ऐटबाज स्मारक हे एका बाजूला प्रशस्त बागा आणि गोल्फ-कोर्टस्‌भोवती उभारलेल्या फॅशनेबल इमारती, गजबजलेली प्रचंड दुकानं, अद्ययावत हॉटेल हे दुसऱ्या बाजूला जुन्या-नव्याचा हा मनोहारी संगम एवढ्यान संपत नाही शाळकरी मुलीच्या स्कर्टएवढ्या लांबीचा, चौकड्याचा टार्टन पेहरणारा तरुण सुटाबुटातल्या आधुनिक तरुणाशी गप्पा मारत प्रिन्सेस स्ट्रीटवरून जाताना दिसतो वर टाय, शर्ट, कोट आणि खाली टार्टन हा अस्सल स्कॉटिश पेहराव पाहून मला आमच्या जुन्या पठडीतल्या गोंयकाराची आठवण झाली. टाय, कोट, डोक्यावर काळी टोपी आणि शर्ट धोतरात खोचलेला असा गंगाजमनी पोषाख करणारा गोंयकार गमतीदार दिसायचा ! गोंयकाराचा हा नमुना आता दुर्मिळ झालाय मात्र जुन्या परंपरा प्राणपणानं जपणारा स्कॉटिश आपला टार्टन आणि बॅगपाइप जगबूड होईपर्यंत सोडून देईल असं वाटत नाही ! एलिझाबेथ राणीचे 'हे' स्कॉटलंड-मध्ये आले की स्कॉटिश युनिफॉर्म घालून वावरतात आणि आपलं 'ड्यूक ऑफ एडिंबरा' अभिधान सार्थ करतात

चौदाव्या शतकात ऐतिहासिक अपघातानं स्कॉटलंड हा 'ग्रेट ब्रिटन'चा एक भाग बनला, पण स्कॉटिश माणूस सर्वार्थानं इंग्रजाहून वेगळा आहे त्याची संस्कृती वेगळी, त्याची परंपरा निराळी आपल्या गेलिक भाषेचा त्याला कोण अभिमान ! स्कॉटलंड हा दऱ्याखोऱ्यांचा, डोंगरकड्यांचा, पारदर्शी सरोवरांचा देश आहे इथला 'हायलँडर' मुखदुर्बल इंग्रज माणसापेक्षा प्रकृतीनं न् प्रवृत्तीनं कितीतरी वेगळा आहे हिरव्यागार कुरणात दिवसभर हुंदडून तुस्त झालेल्या गाईचं दूध पिऊन आणि डोंगरदऱ्या तुडवून तो टणक न् तगडा झाला आहे स्कॉटलंडची गादी आपल्याला मिळावी म्हणून पुन्हापुन्हा प्रयत्न करून अखेर निराश झालेल्या रॉबर्ट ब्रूसनं पुन्हापुन्हा अपयशी होणाऱ्या पण शेवटी चिकाटीनं जाळं बांधणाऱ्या भिंतीवरल्या कोळ्यापासून स्फूर्ती घेतली नव्या जोमानं तो कामाला लागला आणि आयुष्याच्या अखेरीस राजपदावर आरूढ झाला चिकाटीनं प्रयत्न करून यशस्वी होणारा रॉबर्ट ब्रूस हा स्कॉटिश माणसाचा आदर्श ब्रूसचे अनेक पुतळे मी स्कॉटलंडमध्ये पाहिले स्टर्लिंगशायर कासलसमोरचा त्याचा पूर्णाकृती पुतळा पहाण्यासारखा आहे

सोळाव्या शतकातल्या मेरी स्टुअर्ट या स्कॉटिश राणीबद्दल प्रत्येक स्कॉटिश माणसाला अपरंपार अभिमान आहे इंग्लंडच्या गादीवर तिचाच अधिकार होता पहिल्या एलिझाबेथ राणीनं कपटानं तिचा काटा काढला, असं आजही सर्वसामान्य स्कॉटिश माणूस तावातावानं सांगतो स्वत 'मेरी द स्कॉट्स' कमी कारस्थानी नव्हती ! वयाच्या अवघ्या ४५ व्या वर्षी तिचा शिरच्छेद करण्यात आला. त्यापूर्वी १९ वर्षं ती नजरकैदेत होती म्हणजे खरं आयुष्य केवळ पचवीस वर्षं एवढ्या

छोटया काळात तिन तीन लग्न केली, दुसऱ्या नवऱ्यावर मारेकरी घातले व मारेकऱ्याशी तिसर लग्न केल ! ऐषआरामात रहाणं हा तिचा मुख्य उद्योग, आणि कटकारस्थानं शिजवण हा तिचा फावल्या वेळचा उद्योग ! अशा या विलक्षण 'कर्तबगार' राणीवर इंग्लडन अन्याय केला, असं प्रत्येक स्कॉटिश माणसाला प्रामाणिकपणान वाटत

सर्वसाधारण स्कॉटिश माणूस इंग्लडबद्दल कडवटपणानं बोलत असतो. एडिंबराला अनेक घरांसमोर 'बेड ॲंड ब्रेकफास्ट'च्या पाटया होत्या एका बगल्यात मी आणि स्कॉटलंड ट्रिपचे आयोजक मुजुमदार राहिलो होतो खोलीत फ्रीज, टी. व्ही , सेंट्रल हीटिंग —— सर्व काही सुखसोयी होत्या सकाळी जवळजवळ लचइतका भरपूर ब्रेकफास्ट ! आमची चार दिवसाची घरमालकीण मोठी बहुश्रुत दिसली ब्रेकफास्ट झाल्यावर गप्पा मारताना ती म्हणाली, "खर म्हणता स्कॉट-लडन इंग्लडपासून वेगळ झाल पाहिजे ! आम्हाला इंग्लडची सत्ता नकोच आहे मुळी ! "



स्कॉटलडचे दोन 'हायलँडर'

" पण तुमची तशी मागणी क्वीनच्या आणि पतप्रधानांच्या कानावर कधी
घातलीत तुम्ही ? त्या मागणीसाठी तुम्ही चळवळ करता कधी ? " मी विचारल

" तशी चळवळ वगैरे आम्ही करत नाही. पण आम्ही ब्रिटिश लोकांपेक्षा
पूर्णपणे वेगळे आहोत. सत्ता आमच्या हाती असती तर आम्ही आमच्या स्कॉटलंडचा



स्कॉटलंडची आणखी एक पुरातन परंपरा : बॅगपाइप-वादन

चांगलाच आर्थिक विकास करून दाखवला असता, हे वेळ मिळेल तेव्हा आम्ही राज्यकर्त्यांच्या मनावर ठसवीत असतो -- वर्तमानपत्र, भाषण या माध्यमातून " आमची घरमालकीण म्हणाली.

" पण तुमची वेगळं राज्य बनवायची इच्छा राष्ट्रविरोधी नाही काय ? " मुजुमदारांनी विचारलं

" का म्हणून ? " ती उसळली, " तुमच्या देशातले लोक वेगळा द्रविडीस्तान नाही का मागत ? तुम्ही ग्लासगोला जा ! आमच्या त्या वड्या शहराची ब्रिटिशांनी काय दशा केली आहे ते पहा ! "

ग्लासगोला जाण्याचा आमचा बेत असल्याचं तिला सांगून आम्ही चर्चा थांबवली

अशीच एक म्हातारी मला 'मिलिटरी टॅटू' पाहून झाल्यावर भेटली



'एडिंबरा कासल'जवळ होणारा 'मिलिटरी टॅटू'चा कार्यक्रम 'एडिंबरा आंतरराष्ट्रीय महोत्सवा'चा एक महत्त्वाचा भाग हा कार्यक्रम पहाण्यासाठी अमेरिका, कॅनडा, हाँगकाँग, जपान आदी विविध देशातील लोक मुद्दाम येतात (टॅटूचं तिकिट मला मिळालं हा एक चमत्कारच !) दीडदोन तासांचा हा कार्यक्रम सध्याकाळ झाली, दिवस कलला की मैदानात खेळणाऱ्या, कुठतरी गप्पा मारीत बसलेल्या सैनिकांना राहुटयाकडे बोलवण्यासाठी विशिष्ट प्रकारचा बिगुल वाजवला जातो बिगुलाचा आवाज ऐकला की सैनिक एकत्र जमून, शिस्तीत पावलं टाकीत राहुटयांकडे परततात 'मिलिटरी टॅटू' समारंभाचा उगम तो हाच.

'एडिंबरा कासल'-प्रवेशद्वारासमोरचा भाग उजळलेला असतो तिन्ही बाजूनी हजारो प्रेक्षक बसलेले कासलच्या प्रवेशद्वारातून व समोरच्या पॅव्हिलियन-खालून रंगीबेरंगी, ऐटबाज पेहरावातले सैनिक शिस्तबद्ध संचलन करीत मधल्या प्रांगणात येतात जोडीला ड्रम आणि बॅगपाइप्स वाजवणाऱ्यांचा बॅंड संचलनाच



स्कॉटलंड - सहलीतले एक रम्य स्थळ

व बँडच नेतृत्व करणाऱ्यांवर स्पॉटलाइट्स. रणगाडे, तोफा याचही प्रात्यक्षिक अधूनमधून जमेल तितका विनोद. वेगानं सायकल चालवून विविध कसरती करणारा धाडदिशी खाली कोसळतो चार सैनिक धावत स्ट्रेचर घेऊन जातात, आणि जमिनीवर पडलेली जखमी सायकल स्ट्रेचरवर घालून धावत परत येतात !

रंगीबेरंगी पोषाख, आकर्षक प्रकाशयोजना, कर्णमधुर बँड डोळे व कान निववणारा हा कार्यक्रम

चारी बाजूनी एकाएकी अंधार होतो फक्त एकच स्पॉटलाइट. कासलच्या टोकावर उभा राहून बिगुल वाजवणारा एकुलता एक सैनिक. दोन तासांच्या कार्यक्रमावर कळस चढवणारा नेत्रसुखद 'रीट्रीट' !

प्रेक्षकांच्या प्रचंड घोळक्यातून मी चाललो होतो अविस्मरणीय अनुभव घेतल्यामुळे मनाची झालेली धुंद, बेभान अवस्था

माझ्या खांद्यावर कुणीतरी हात ठेवला मी दचकून मागे पाहिलं

चेहऱ्यावर सुरकुत्यांच जाळं असलेली सत्तरीतली एक म्हातारी

"तू टूरिस्ट आहेस ना ?"

"हो" मी उत्तरलो

"इंडियन ?"

"हो"

"आमचा मिलिटरी टॅटू आवडला तुला ?"

"फार फार आवडला असं कधी आजवर पाहिलं नव्हतं"

"हो ना ? तू तुझ्या देशाला परतलास की तुझ्या देशबांधवांना सांग आमच्या देशाचं वैभव आहे हे आमच्या स्कॉटलंडचं वैभव ! आय ॲम प्राउड ऑफ इट ! दर वर्षी मी हा कार्यक्रम पहाते मी आता बहात्तर वर्षांची आहे बहात्तर वेळा हा कार्यक्रम मी पाहिला असेन ! इट्स् एक्सायटिंग इट्स् फॅंटॅस्टिक !"

माझ्या खांद्यावर हलकेच थोपटून ती गर्दीत मिसळून दिसेनाशी झाली

इंग्रज माणूस मोजकं बोलतो प्रत्येक शब्द तोलूनमापून वापरतो 'ट्रॅफलगार स्क्वेअर'जवळ मी 'वेस्ट मिन्स्टर ॲबी' कुठं आहे अशी इंग्रज माणसाकडे चौकशी केली, तर संपूर्ण पत्ता न सांगता "त्या ट्रॅफिक सिग्नलपर्यंत चालत रहा, मग तिथं कुणाला तरी विचारा," एवढं उत्तर देऊन तो चालायला लागला. ट्रॅफिक सिग्नल-पाशी कुणाकडे चौकशी केली तर "या गल्लीत जाऊन 'वेस्टएंड हॉटेल'पर्यंत चालत रहा, मग तिथं कुणाला तरी विचारा," असा सल्ला ! स्कॉटिश माणूस तसा नाही "सरळ जाऊन उजव्या गल्लीत वळा, तिथून वेस्टएंड हॉटेलपर्यंत जाऊन डावीकडे जा," वगैरे तपशीलवार पत्ता देईल. एखाद्या (सज्जन) भारतीया-



स्कॉच व्हिस्कीची अगडबंब पिंपे सीलबंद होत आहेत.

सारखा ! इंग्रज पबमध्ये तेवढा खुलतो बिअर ढोसताना त्याच्या जड जिभेवर सरस्वती (किंवा ग्रीक पुराणात सरस्वतीची जी कुणी 'काउंटरपार्ट' असेल ती !) थुईथुई नाचत असते ! स्कॉटिश माणूस सतत खुललेला डबल डेकर बसच्या वरच्या उघड्या डेकवर बसून मी 'लंडन साइट-सीइंग' केलं होतं तेव्हा गाइडचीही भूमिका बजावणारा बसड्रायव्हर मोठ्या कष्टानं बोलायचा एरवी बहुतेक वेळा घुमा असायचा एडिंबरा शहराचं दर्शन घेण्यासाठी टूरिस्ट बसमध्ये मी बसलो तेव्हा ड्रायव्हर-कम्-गाइड मोठा मिस्किल आणि बहुश्रुत वाटला त्याचं नाव जे मार्टिन पंचावन्न-साठ वर्षांचा, गरगरीत वाटोळ्या शरीराचा 'ड्यूक ऑफ वेलिंग्टन'चा पुतळा दाखवताना 'आयर्न मॅन ऑफ स्कॉटलंड स्टॅच्यू मेड ऑफ ब्रॉंझ मेड बाय ॲन इंजिनियर नेम्ड स्टील ' अशी त्याची गमतीदार टकळी चालू होती 'फ्लाइंग स्कॉट्समन' नावाची एक्स्प्रेस ट्रेन गेली एकशेपंधरा वर्षं लंडन स्टेशनवरून सकाळी बरोबर दहा वाजता एडिंबराला जाण्यासाठी निघते (फक्त युद्धकाळात दहाऐवजी ती साडेनऊ वाजता सुटायची.) "लंडन-एडिंबरा ३९३ मैलांचं अंतर कापायला १८६२ मध्ये त्या एक्स्प्रेसला साडेदहा तास लागत, आता तिला साडेपाच तास लागतात," अशा प्रकारची माहिती मार्टिन आम्हाला पुरवीत होता "सर्व मानवजातीचा बाप ॲडॅम — अर्थशास्त्राचा बाप ॲडॅम स्मिथ — त्याचं हे घर." अशी कॉमेंट करून त्यानं 'वेल्थ ऑफ नेशन्स' लिहिणाऱ्या ॲडॅम स्मिथचं घर दाखवलं (अर्थशास्त्र हा माझा पोटापाण्याचा उद्योग. मनोमन मी

नम्रपणे त्या वास्तूला नमस्कार केला !) " 'डॉ. जीकल अँड मिस्टर हाइड' लिहिणारा आर एल स्टीव्हन्सन आमच्या एडिंबराचा हे समोरच हॉटेल दिसतय ना, तिथला हॉटेलमालक दिवसा सज्जनपणानं वागायचा, रात्री त्याच्या अंगात भूत संचारायचं त्या हॉटेलमालकावरून स्टीव्हनसनला डॉक्टर जीकल अँड मिस्टर हाइड ही कॅरेक्टर सुचली " मार्टिन सांगत होता

'होलीरूड पॅलेस' हे एलिझाबेथ राणीचं स्कॉटलंडमधलं निवासस्थान राणीचा मुक्काम इग्लडला होता त्यामुळे राजवाड्यातली सर्व दालनं प्रवाशासाठी खुली होती. आम्ही आत शिरताना दुपारचा एक वाजला आणि तोफेचा आवाज झाला मार्टिन मिष्किलपणे म्हणाला, "तुम्हाला ठाऊकच आहे, आम्ही स्कॉटिश लोक कजूष असतो ! आम्ही बारा वाजता तोफेचा आवाज देत नाही, कारण तोफेचे बारा गोळे फुकट गेले असते ! आम्ही एक वाजता तोफ वाजवतो एकच गोळा फुकट जातो !"

'हायलँडर' अंगात चढवतात ते किल्ट दाखवीत तो म्हणाला, "दिवसा हे किल्ट पोषाख म्हणून वापरायचं रात्री ब्लँकेट म्हणून पांघरायचं ! पुन्हा वॉर्ड-रोबचा खर्च नाही ! आहे की नाही काटकसर ?"

ठिकठिकाणी त्याला त्याचे स्कॉटिश मित्र भेटत होते त्यांच्याशी तो गेलिक भाषेत गप्पा मारीत होता मी जवळ जाऊन त्या ऐकण्याचा प्रयत्न केला काय बोलतात, एक अक्षर कळत नव्हतं ! गेलिक इंग्रजीची बोली की वेगळी भाषा हे एडिंबरातला एखादा रवींद्र केळेकर मला सांगू शकला असता ! जे मार्टिनच्या भाषाशास्त्राच्या ज्ञानाबद्दल मला शंका असल्यानं तो विषय मी काढला नाही विचारलं असतं तर ती वेगळी भाषा कशी आहे, त्यामुळे स्कॉटलड वेगळं राज्य (की देश ?) असणं कसं आवश्यक आहे हे त्यानं तावातावानं मला पटवून दिलं असतं ! (अधूनमधून 'हाव सांगता, तू आयक' असं गेलिकमध्ये बजावीत !)

एडिंबरा शहराचा फेरफटका आटोपून आम्ही बस-स्टँडकडे परतलो स्टँड-समोर एक म्हातारा माउथऑर्गन वाजवीत उभा होता त्याच्या समोर हॅट होती येणाराजाणारा क्षणभर थबकून त्याचा माउथऑर्गन ऐकत असे आणि पाचदहा पेन्सची नाणी हॅटमधे टाकत असे

मी बसमधून खाली उतरलो मार्टिन विमनस्कपणे उभा होता त्याला मी विचारलं, "तुमच्याकडे भिकारी कसे काय बुवा ?"

"तो नुसताच भिकारी नाही तो कलावंत आहे ! आमच्याकडे नुसताच कुणी हात नाही पसरत ! गिटार वाजवेल, गाणी म्हणून दाखवील, माउथऑर्गन, व्हायोलिन. . काहीही "

"पण सरकार सगळ्यांची काळजी वहातय ना ? या माउथऑर्गन वाजव-णाऱ्याला भत्ता मिळत असेल की !"

"त्याचं काय आहे, सरकारचा भत्ता दारूला पुरत नाही! खाण्याचे वांधे नाहीत, पण पिण्याचे." तो अंग घुसळीत मोठमोठ्यानं हसू लागला.

स्कॉच व्हिस्कीच्या माहेरघरी आलो होतो, तेव्हा पबमध्ये जाऊन स्कॉच घेणं क्रमप्राप्त होतं.

मी एका पबमध्ये शिरलो. बारपेक्षा पब छान असतात. मोकळं, अनौपचारिक वातावरण. टेबल एटिकेटस्‌ची बंधनं नाहीत. टेबल सर्व्हिस नसते. सेल्फ सर्व्हिस. चटपटीत, हसतमुख मुलीकडून ग्लास भरून घ्यायचे आणि जागा मिळेल तिथं कितीही वेळ बसायचं! चोहो बाजूंनी गोंगाट घोंगावत असतो. त्या गोंगाटाचीच एक लय साधायची अन् सथपणं मद्याचे घुटके घ्यायचे.

पबमध्ये मी चोहो बाजूंना नजर टाकली. सर्वजण बिअर पीत होते. एकाही माणसाच्या पुढ्यात स्कॉच व्हिस्कीचं फिकट पिवळं द्रव नव्हतं!

मी व्हिस्की मागवली. छोट्याशा ग्लासात एक पेग व बर्फाचा तुकडा.

"सोडा?" मी विचारलं.



स्कॉटलंडमधील एक सुंदर गोल्फ क्लब

" सोडा ? " त्या मुलीन आश्चर्यांन विचारल. जणू काही मी लस्सी अगर रबडी मागत होतो !

" सॉरी सोडा नाही "

मी व्हिस्की 'ऑन द रॉक्स' घेऊ लागलो

माझ्यासमोर एक पन्नाशीतला माणूस बसला होता मार्टिनचा भाऊ शोभेल असा गरगरीत न् वाटोळा चेहेरा मात्र लालभडक झालेला

" आज शनिवार " मी न विचारता तो म्हणाला

" हो ना ! " मी ते लगेच मान्य केल.

' दुपारपासून इथच आहे मी ! हा माझा पाचवा-सहावा ग्लास असेल ! " समोरच्या उभट ग्लासाकडे पहात तो म्हणाला एखाद्या लहानग्याच जावळ कुरवाळाव तसा तो समोरचा पेला कुरवाळीत होता " पब बद होईपर्यंत इथच ! घरी कुणी नाही आय अॅम अ डायव्होर्सी नो चाइल्ड ! बिटर हेच माझ सर्वस्व ! " युरोपमधे कडूशार बिअर मिळते, तिला 'बिटर' म्हणतात मला गमत वाटली वाटयाला आलेला कडवट प्याला तो गोड मानून घेत होता !

" तुम्ही स्कॉटिश लोक स्कॉच नाही पीत ? "

" नेव्हर ! एक तर ती महाग असते यू नो स्कॉचमन ! ही इज अ मायझर आम्ही स्कॉच व्हिस्की बनवतो ती साऱ्या जगासाठी ! आमच्यासाठी नव्हे ! बिटर हे आमच सर्वस्व ! " तो आताच टॉमॅटोसारखा लालबुद झालेला होता माझ्या मनात आल मध्यरात्रीपर्यंत हा तग धरील की नाही कोण जाणे ! मधेच कधी-तरी टच्‌दिशी फुटून जायचा !

'आम्ही स्कॉच व्हिस्की बनवतो ती साऱ्या जगासाठी, आमच्यासाठी नव्हे !' मला दिल्लीचा एक प्रसग आठवला दिल्लीला सायकलवरून तीनचार लोक जातात, मोटारींना कधी दिवे नसतात, सिग्नलची कधी कुणी पर्वा करत नाहीत ! बसमधे माझ्या जवळ बसलेल्या एका पोलिसाला मी म्हटल होत, " तुम्हा दिल्लीकरांना कायदेबियदे काही ठाऊक दिसत नाहीत ! "

" छे ! आम्ही कायदे करतो ते आमच्यासाठी नसतात, साऱ्या देशासाठी असतात ! दिल्लीबाहेरच्या देशासाठी ! "

तो पोलिसही असाच होता — गरगरीत न् वाटोळा !

आमची बस स्कॉटलडमधले 'लेक डिस्ट्रिक्ट्स' पहाण्यासाठी एडिंबराबाहेर निघाली आहे

" हे स्मारक आहे ना, ते रॉबर्ट बर्न्स या कवीच " मुजुमदार मला सागतो आहे " हे स्मारक फार जुन झाल, तेव्हा ते पुन्हा ठाकठीक करण्यासाठी तुमच्या मुबईतले स्कॉटिश लोक पुढ झाले आणि त्यांनी पैसा गोळा करून स्मारकाची नव्यान उभारणी केली "



**सरोवराभोवतीच्या हिरवळीवरील एक प्रणयदृश्य**

मला बरं वाटलं मुंबईच्या लोकांनी केलं म्हणून नव्हे, आपल्या एका महान कवीसाठी स्कॉटिश लोक आपण होऊन एकत्र आले म्हणून !

'स्टर्लिंगशायर कासल'जवळ 'वॉर मेमोरियल' आहे १८५८ मधे भारतात झालेल्या लढाईत लखनौ, कानपूर, झाशी, श्रीरंगपट्टम येथे पराक्रम गाजवून धारातीर्थी पतन पावलेल्या स्कॉटलंड रेजिमेंटच्या स्मरणार्थ बांधलेलं ते स्मारक

लोमिंड, टमेल, नेस सरोवर 'लॉक कॅट्राइन' नावाचं छोटं पण सुरेख सरोवर —— मुंबईच्या 'विहार लेक'ची आठवण करून देणारं सरोवराजवळ टुमदार हॉटेल आहे तिथं 'रॉबर्ट बर्न्स' बिअर मी घेतो सँडविचेस लेटिसनं वेष्टिलेला हॉटडॉग मंडळी विसावली आहेत

ड्रायव्हर रोझी टेल्स (ऊर्फ रॉबर्ट टेलर) मोठा रसिक आहे 'लेक डिस्ट्रिक्ट' सहलीवर निघताना त्यानं एडिंबराहून आपली 'गर्लफ्रेंड' बरोबर घेतली आहे तिचा चेहेरा निष्पाप आहे सारखी हसत असते. आणि खुदकन हसली की तिच्या दोन्ही गालावर सुरेख खळ्या पडतात तिच्या कमरेभोवती हात घालून आमचा रॉबर्ट टेलर तिला दूर घेऊन गेला आहे खलाशी प्रत्येक बंदरावर एक बायको ठेवत असतो, तसा हा आमचा ड्रायव्हर दिसतोय ! प्रत्येक शहरात एक गर्लफ्रेंड !

सरोवराभोवतीच्या हिरवळीवर अनेक मुलमुली पहुडली आहेत काही जोडपी एकमेकाच्या मिठीत तरुण उताणा व त्याचं सर्वांग झाकून त्याच्यावर पालथी पडलेली तरुणी —— अशी अनेक दृश्यं

एक दाढीवाला तरुण धावत येतो पालथ्या तरुणीच्या अंगाखाली मजेत पहुडलेल्या तरुणाला त्याला काही निरोप सांगायचा आहे ! तो दाढीवाला खाली बसून त्या तरुणाशी काहीतरी बोलतो. हिरवळीवरल्या तरुणतरुणीचे ओठ तेवढ्या-पुरते विलग होतात तरुण त्या दाढीवाल्याला काहीतरी उत्तर देतो. दाढीवाला उठून उभा रहातो क्षणभराच्या विरहामुळे व्याकुळलेले दोन ओठ अधिकच आवेगानं एकमेकांना बिलगतात

दूरवरची छोटी पर्वतराजी नितळ पाण्याचं पारदर्शी सरोवर हळदुव्या हिरव्या रंगाची हिरवळ तीवर पहुडलेली असंख्य जोडपी

काळ थांबून राहिलाय

'रॉबर्ट बर्न्स'मुळं जडावलेल्या माझ्या डोळ्यासमोर एक मनोहारी शिल्प आकार घेत आहे

कधीतरी काळ पुढं सरकतो सर्व उतारू एकत्र जमतात बसपाशी ताटकळत उभे रहातात

रॉबर्ट टेलरचा अजून पत्ता नाही !

पंचवीस मिनिटानी तो धावत येतो त्याची प्रेयसी धापा टाकीत त्याच्या-बरोबर येत आहे आम्ही ताटकळलेले पाहून तो पुन्हापुन्हा क्षमा मागतो त्याची गर्लफ्रेंड लाजून कधीच बसमधे बसली आहे

आमची 'बेड अँड ब्रेकफास्ट'वाली घरमालकीण सांगते ते शंभर टक्के सत्य आहे. ग्लासगो हे प्रचंड शहर धुरकटलेलं आहे कळकट इमारती, उखणलेले रस्ते शहरातलं वातावरण कसं अगदी गढुळल्यासारखं वाटतंय 'कॅप्स्टन', 'विल्स्' सिगारेटचे कारखाने दिसतात आणि त्याबरोबरच व्हिस्की-बिअरच्या ब्रुअरीज क्लाइड नदीच्या काठावर जहाजं बांधण्याचे कारखाने दिसताहेत तसेच लोकरी-पासून गालिचे तयार करण्याचे कारखाने स्कॉटलंडचे अर्धअधिक उद्योगधंदे ग्लासगोला एकवटलेले आहेत पण मँचेस्टर-बर्मिंगहॅमप्रमाणं ग्लासगो नीटनेटकं नाही. शहरावर अवकळा आलेली आहे

ग्लासगोला मुक्काम करण्याचा बेत आम्ही बदलला आहे. बस एडिंबराच्या दिशेनं धावते आहे. . . .

मनात येतं स्कॉटलंड ग्रेट ब्रिटनचा भाग रहावा की वेगळा व्हावा यावर 'ओपिनियन पोल' झाला व स्कॉटलंडचा एक हितचिंतक (आणि स्कॉच व्हिस्कीचा एक आस्वादक) म्हणून मला मतदान करण्याची परवानगी मिळाली, तर मी 'वेगळा व्हावा'च्या बाजूनं मत टाकीन !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६११
२७००१
१६।६।०९
भू-प्रवास

## ५

# सेवसचं चिमुकलं पण प्रभावी साम्राज्य

युरोपमधील बहुतेक देश आकारान चिमुकले आहेत रत्नागिरीसारख्या एका जिल्ह्याएवढे मोटारीन वा बसन एखाद्या देशात शिरलो तर सरळ उभा छेद घेऊन त्याच दिवशी सध्याकाळपर्यंत देशाची सीमा ओलांडता येते स्वित्सर्लंड-सारख्या देशातील वस्ती साठ-सत्तर लाख, म्हणजे मुबई शहरातल्या वस्तीइतकी। बेल्जम तर अवघ्या दहा लाख लोकवस्तीचा छोटा देश अस असल तरी हे देश आपापल्या परीन समृद्ध आहेत पुढारलेले आहेत आपली स्वतत्र व्यक्तिमत्त्व जपून आहेत.

बेल्जम लडनपासून जवळ डोव्हरला बोटीत चढून ब्रिटिश चॅनेल चार तासात पार केला की, ऑस्टेंड या बेल्जमच्या सरहद्दीवरल्या शहरात प्रवेश करता येतो. ऑस्टेंड इग्लडच्या सीमेला भिडलेल टुमदार सी-साइड रेझॉर्ट हवामानात फारसा फरक नसला तरी इग्लडवासीय कुटुबकबिला घेऊन हवापालटासाठी ऑस्टेडला येऊन रहातो ऑस्टेंडपासून बेल्जमची राजधानी ब्रुसेल्स बसन प्रवास केला तर तासभर अतरावर आहे.

साऱ्या युरोपभर रुद हमरस्त्यांच जाळ पसरल आहे पोटातल पाणी हलणार नाही असे हे गुळगुळीत हमरस्ते त्यावरला प्रवास मोठा सुखद असतो हमरस्त्यावर एकेक किलोमीटर अतरावर 'एस् ओ एस्' टेलिफोन असतात त्या फोनची किल्ली कार चालवणाऱ्या प्रत्येक ड्रायव्हरकडे असते अपघात झाला किंवा प्रवासात अनपेक्षित अडचण उद्भवली की फोन करायचा — काही क्षणांत हवी ती मदत मिळते हमरस्त्यांवर मोठे फलक आणि त्यावर मॉटेल, लॉजिग, टॉयलेट किती अतरावर राहिल आहे याची ठळक माहिती दिलेली असते काटेसुऱ्या, बेड, कमोद यांची चित्र व त्याखाली किलोमीटरचा आकडा हमरस्त्यावर कमीअधिक वेगाच्या लेन्स असतात एका लेनकडून दुसऱ्या लेनवर येण जेवढ अवघड, तेवढच धोका-दायक जर्मनी, इटाली या देशांत अशा तऱ्हेचे रुद, विस्तृत 'ऑटोबान्स' प्रथम बांधून


काढले हिटलर व मुसोलिनी यानी या युद्धपिपासू हुकूमशहानी सैन्याच्या हालचाली चपळगतीन व्हाव्यात म्हणून हमरस्ते बांधण निकडीच वाटल युद्ध सपली, हुकूमशहा नामशेष झाले पण युरोपभरच्या वाहतुकीला शिस्तबद्ध वळण देणारे अवाढव्य हमरस्ते वारा खात, गारा खात अजगरासारखे सुस्तपणे पसरलेले आहेत !

बेल्जम हा पश्चिम युरोपमधला एक महत्त्वाचा उद्योगप्रधान देश आहे खनिज सपत्तीन समृद्ध असलेला कॉंगो ही बेल्जमची वसाहत असताना साहजिकच बेल्जम सपन्न होता, श्रीमत होता दिमाखान मान वर करून जगाकडे पहाव अशी प्रतिष्ठा बेल्जमपाशी होती वीस वर्षांपूर्वी म्हणजे जानेवारी १९५९ मध्ये कॉंगोची राजधानी लिओपोल्डव्हिल येथे दगली झाल्या त्यांचा धसका घेऊन बेल्जमन घाईघाईन कॉंगोवरला आपला हक्क सोडून दिला ( इतक्या सहजपणे एखादी वसाहत क्वचितच मुक्त झाली असेल ! ) दोन वर्षानतर रुआडा-उरुडा या चमत्कारिक नावाच्या वसाहतीला बेल्जमन स्वातत्र्य बहाल केल ही दोन्ही प्रकरण बेल्जमन गुण्यागोविंदान निकालात काढली याच एकमेव कारण दोन्ही महायुद्धात बेल्जमच तोंड चांगलच पोळून निघाल होत हे असाव !

महायुद्धाची झळ या छोट्या देशाला फार जवळून लागली ब्रुसेल्स शहरात एक फेरफटका मारला तरी युद्धाचे अवशेष जागोजाग दिसतात चौकाचौकात युद्धविषयक स्मारक आहेत बेल्जन आणि इग्रज सैनिकांचे गळ्यात गळा घातलेले पूर्णाकृती पुतळे हातात राष्ट्रीय निशाण घेऊन राष्ट्रगीत गाणाऱ्या बेल्जन तरुणीचा पुतळा. युद्ध उबरठ्यापर्यंत आल होत तरी बेल्जमन तग धरला आणि आपले उद्योगधदे, व्यापारउदीम शाबूत ठेवले हिरे, बदुका, कोळसा, लोहखनिज आणि ज्यामुळे सर्वसामान्य भारतीय बेल्जमचं नाव घेतो ती काच बेल्जम मुबलक प्रमाणात उत्पादन करतो आणि जगाला विकतो

या चिमुकल्या देशाचे सारे व्यवहार दोन भाषात चालतात डच भाषेशी जवळीक साधणारी फ्लेमिश आणि फ्रेंच उत्तरेकडचे फ्लेमिंग फ्लेमिश बोलतात, तर दक्षिणेकडले वॅलून्स फ्रेंच दोघांची सख्या पन्नास-पन्नास टक्के आहे. त्यामुळे कुणाचा कुणावर वरचष्मा नाही ! फ्लेमिंग वॅलून्सच्या तुलनेन आर्थिकदृष्ट्या मागासलेले उत्तरेकडे फारसे उद्योगधदे नाहीत त्या मानान फ्रेंच वॅलून्स संपन्न आहेत सरकारी नोकऱ्यात बड्या हुद्यावर आहेत सरकारची सर्व पत्रकं, रस्त्यावरचे फलक दोन्ही भाषात पहायला मिळतात. प्राथमिक व माध्यमिक शाळांत विद्यार्थ्यांना दोन्ही भाषा शिकाव्या लागतात वॅलून्सना फ्लेमिश शिकण निरर्थक वाटत, तर फ्लेमिंगना फ्रेंच सस्कृतीबद्दल घृणा आहे चडफडत, एकमेकांच्या भाषेला शिव्या देत दोन्ही गट दोन्ही भाषा शिकत असतात !

ब्रुसेल्सला मी आमच्या मार्गदर्शकाला विचारल, " दोन्ही गटातल्या लोकांचे परस्परसबध कसे आहेत ? "



ब्रुसेल्स येथील कलात्मक चिनी पॅव्हिलियन

"दे डू नॉट लाइक इच अदर, बट दे टॉलरेट इच अदर!" तो खादे उडवीत म्हणाला

ब्रुसेल्समध्ये सपन्नता आहे याचा पुरावा म्हणजे तिथली महागाई! शोकेस-मधे ठेवलेल्या वस्तूंच्या किंमती न्याहाळल्या तर डोळे पाढरे होतात! साधा शर्ट पाचशे रुपये, ब्रेसियर दोनशे रुपये भारतात रुपया-दोन रुपयांना मिळणारी मातीची भांडी तीसचाळीस रुपयांना! सर्वांत स्वस्त वाटली ती शहराच्या मधोमध जाणारी ट्राम आणि 'स्टेला आर्टोइस' नावाची बेल्जन बीअर

ब्रुसेल्स शहराच्या मधल्या चौकात टोस्टॅन हे छत्तीस मजली आधुनिक हॉटेल आहे आणि जवळच 'युरोपियन कॉमन मार्केट'ची क्रुसाकार भव्य, शोभिवत इमारत आहे जुनी बाजारपेठ पहाताना दिल्लीतल्या चादणी चौकाची आठवण झाली त्या भागात सतराव्या शतकात बांधलेली घर आहेत घराचा काही भाग कोसळला तरी डागडुजी करताना त्या घराची सतराव्या शतकातली कळा शाबूत राखण्यात येते आधुनिक पद्धतीच्या इमारती त्या भागात बाधण्याची मनाई आहे त्यामुळे हा भाग म्हणजे एक प्रचड 'म्युझियम पीस' झाला आहे. पधराव्या

शतकातल भव्य चर्च, सतराव्या शतकातल्या इमारती आणि मधले ओबडधोबड रस्ते यामुळ जुन ब्रुसेल्स मोठ प्रेक्षणीय स्थळ झालं आहे

बेल्जममध्ये इंग्लडमध्ये आहे तशी मर्यादित राजेशाही आहे. बेल्जन लोकांना आपल्या राजाबद्दल खूप आदर आहे खर म्हणता दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी जर्मन आक्रमणाला शरण जाण्याच पाप केल तिसऱ्या लिओपोल्डन त्या वेळी देशाबाहेर गेलेल्या त्याच्या मंत्रिमडळानं पॅरिसला बैठक घेऊन राजाच कृत्य 'बेकायदेशीर व घटनाविरोधी' असल्याची घोषणा केली होती बेल्जन जनता राजाच्या भेकड-पणामुळ चिडली होती पण युद्ध सपताच लोकाचा सताप निवळला. जनतेन राजाला क्षमा केली राजघराण्याविषयी इतकी अपार निष्ठा की पार्लमेंट विसर्जित करून राजान 'रॉयल डिक्टेटर' व्हावं अशी मागणी करण्यासाठी अधूनमधून ब्रुसेलसला जनतेची उत्स्फूर्त निदर्शन होत असतात !

राजा फिलिपच निवासस्थान ब्रुसेल्सला आहे हा 'रॉयल पॅलेस' प्रचड आहे शेकडो खोल्याच्या या प्रासादाचा अतर्भाग पहायला मिळत नाही बाहेरच्या बाजूला भरजरी पोषाखात उभ्या असलेल्या गार्ड्स्कडे कौतुकान पहायचं आणि दुरूनच अर्धवर्तुळाकार प्रासादाकडे पाहून समाधान मानायच १८११ मध्ये नेपोलियन या राजवाड्यात मुक्कामाला होता जग जिंकू पहाणाऱ्या त्या फ्रेंच बादशहान आपल्या पुढील चढाईच्या योजना या राजवाड्याच्या दिवाणखान्यात आखल्या

बेल्जन लोकाना लोकनृत्याच अतिशय वेड प्रत्येक गावाला, प्रत्येक छोट्या खेड्याला स्वत ची परपरा आहे स्वत चं लोकनृत्य आहे, लोकगीत आहे उत्सव, समारभ, मिरवणुका यांचं सर्वसामान्य बेल्जन माणसाला जबरदस्त आकर्षण आहे वसतऋतू आला की त्याच स्वागत करायला फ्लेमिश आणि वॅलून्स गळ्यात गळे घालून मिरवणुका काढतात दिवसरात्र जल्लोष सुरू असतो. आबालवृद्ध आपलं वय विसरून कार्निव्हलमधे सामील होतात. बिअरची पिंप रिकामी होतात प्रत्येक आठवड्याला बेल्जममधे कुठ ना कुठ उत्सव सुरू असतो धार्मिक, ऐतिहासिक, लष्करी, घोड्यांपासून जेट विमानापर्यंत आणि सतांपासून सैतानापर्यंत हरतऱ्हेची दृश्य उत्सवात समाविष्ट असतात सर्वसाधारण बेल्जन माणसाला राजकारणाच, समाजकारणाच वावड असत नृत्यगाण्यात, उत्सवात तो अधिक रमतो

बेल्जमचा राजा वा ब्रुसेल्सचा नगराध्यक्ष यांच्यापेक्षा ब्रुसेल्सचे लोक कुणाला अधिक महत्त्व देत असतील तर ते डाव्या हातात आपली इवली 'नुनी' धरून 'मुती' करणाऱ्या चार वर्षांच्या त्या नागड्या, गोजिरवाण्या छोकऱ्याला 'मॅनिकिन पीस' म्हणून सबोधल्या जाणाऱ्या या छोट्या मुलाच 'मुती' करण्याच कृत्य गेली तीनशेसाठ वर्षं अव्याहत चालू आहे ! जुन्या बाजारपेठेकडे जाताना वाटेत एका

छोटचा गल्लीत बाळाचा हा पुतळा आहे. ब्रुसेलसला जाणाऱ्या प्रत्येकाला शहरातल्या या प्रथम क्रमांकाच्या नागरिकाचं दर्शन घ्यावच लागत ! पुतळ्याजवळ एक नख-शिखान्त नटलेली, त्या छोटचा मुलाएवढी एक बाहुली आहे, ती बाहुलीतली मिस्किल मुलगी तिरक्या डोळ्यान हळूच त्या मुलाकडे पहात आहे आणि जणू त्याला फ्रेंच आणि फ्लेमिश दोन्ही भाषांत विचारीत आहे, "अय्या ! हे रे काय ? तुला लाजबीज कशी वाटत नाही ?"

तीनशेसाठ वर्षांपूर्वी राजाचा मुलगा हरवला. चोहीकडे शोधाशोध सुरू झाली. अखेरीस तो, आता ज्या पोझमध्ये त्याचा पुतळा आहे त्या पोझमध्ये



३६० वर्षे अव्याहत 'कार्य' चालू ठेवणारे
ब्रुसेलसचे 'मॅनिकिन पीस' नामक बाळ !

रस्त्याच्या कडेला उभा असलेला आढळला राजान त्या जागी मुलाचा पुतळा उभारला काही वर्षांपूर्वी फ्रेंच सैनिकानी तो पुतळा चोरून पॅरिसला नेला सारा बेल्जम खवळून उठला राष्ट्राच्या प्रतिष्ठेचा प्रश्न होता तो ! फ्रेंच सरकारन बेल्जन लोकाच्या भावना ओळखल्या आणि मोठ्या इतमामान, मुद्दाम त्याच्यासाठी रत्नजडित पोषाख शिवून तो पुतळा ब्रुसेल्सला रवाना केला या चिमुकल्याचे दोनशेहून अधिक युनिफॉर्म आहेत (मॉरीस शेव्हॅलियर या सुप्रसिद्ध नटान त्याच्यासाठी शिवलेला युनिफॉर्म प्रेक्षणीय आहे म्हणे !) विशेष समारंभाच्या वेळी चिमुकल्याच्या अंगावर उंची पोषाख चढवला जातो पण बेल्जन लोकांना तो मूळच्या अवस्थेत अधिक प्रिय आहे '

ब्रुसेल्समधील एक प्रेक्षणीय वास्तू म्हणजे चिनी पद्धतीच पव्हिलियन दुसऱ्या लिओपोल्ड राजान १९०० साली इटलीच्या 'ट्रेड फेअर'मध्ये ते विकत घेतल, इमारतीचा संपूर्ण भाग वेगवेगळा करून ब्रुसेल्सला आणवला आणि पुन्हा उभा



'चेटकिणीच्या' मिरवणुकीत सजलेली एक चेटकीण

केला. या पव्हिलियनमध्ये चित्रविचित्र वस्तूंच कायमचं प्रदर्शन आहे पव्हिलियन-समोर जपानी पद्धतीचा टॉवर आहे पायऱ्यांच्या दोन्ही बाजूंना चिनी ड्रॅगन, टोकदार छपर, खांबावरचं चिनी पद्धतीचं विशिष्ट डिझाईन -- यामुळे हे पव्हिलियन मोठं आकर्षक दिसतं

ब्रुसेल्स आणखी एका कारणासाठी स्मरणात राहिलं बायरनचा मृत्यू १८८० मध्ये या शहरात झाला 'ब्रिज ऑफ साइज' मला पुढं व्हेनिसला पहायला मिळाला तेव्हा पुन्हा एकदा त्या महान पण दुर्दैवी कवीची आठवण झाली

मी ज्या हॉटेलात राहिलो होतो त्यापासून जवळच दोनतीन मिनी थिएटर होती त्यात 'इरॉटिक फिल्म्स्' दाखवण्यात येत होत्या. या सेक्स फिल्म्स्बद्दल मला कुतूहल होतं युरोपमधे फिरताना पुढं मी सर्व देशांत हे चित्रपट पाहिले पॅरिसला 'पिगाल' भागात मी संध्याकाळी जो चित्रपट पाहिला तो केवळ एकमेवाद्वितीयच म्हटला पाहिजे ! पश्चिम-युरोपमधल्या सहा देशांचा प्रवास संपवून मी लंडनला



'राजाच्या जत्रे'त आनंदोत्साहाने सामील झालेली बेल्जन तरुण-तरुणी


परतलो तिथं 'लास्ट टँगो इन पॅरिस' हा चित्रपट आणि 'ओ कॅलकटा' हे नाटक पाहिलं, आणि या एक्सायटिंग कार्यक्रमाची सांगता केली!

ब्रुसेल्समध्ये मी जो चित्रपट पाहिला तो फ्रेंचमध्ये होता. इंग्रजीत चित्रपटाचं नाव 'एक्साइटमेंट्स' असं होतं. हे चित्रपट शंभर-दीडशे प्रेक्षक बसू शकतील अशा छोट्या मिनी थिएटरमध्ये दाखवले जातात. अठरा वर्षांवरच्या तरुणतरुणींना थिएटरमध्ये प्रवेश असतो. थिएटरच्या प्रवेशद्वारापाशी पोस्टर्स लावलेली होती. आणि चित्रपटातल्या प्रसंगाची छायाचित्रं होती. या छायाचित्रांत व पोस्टर्सवर स्त्रीपुरुषांच्या संभोगाची, समलिंगी संभोगाची जी चित्रं होती त्यांत विशिष्ट भागांवर लाल फुल्या केलेल्या होत्या! त्या पाहून मौज वाटली!

लष्करातला एक सैनिक अचानक घरी परततो तेव्हा त्याला आपली पत्नी परपुरुषाशी संभोग घेत असल्याचं दिसतं. तिरीमिरीत तो बाहेर पडतो, बारमध्ये येतो आणि तिथं नाचणाऱ्या कॅबेरेट मुलीशी सधान बांधतो. तो त्या मुलीच्या घरी येतो आणि तिच्याकडून शरीरसुख ओरबाडून घेतो. कॅबेरेट मुलीची दुसऱ्या एका पुरुषाशी मैत्री असते. आपली मैत्रीण परपुरुषाशी रत झालेली पाहून तो मत्सरग्रस्त होतो आणि अखेरीस तुफान हाणामारी झाल्यावर सैनिकाचा खून होतो. अशी ती भरळसाधी कथा होती. शरीरसंबंधाचा भाग तपशीलवार दाखवलेला होता एवढंच. अर्थात तेच अशा प्रकारच्या 'इरॉटिक फिल्म'चं प्रमुख आकर्षण!

मागे मी एका इंग्रजी पुस्तकात एक मोठं मार्मिक विधान वाचल्याचं आठवतं. 'Obscenity is such a tiny kingdom that a single tour covers it completely.' असं ते वचन आहे. एकदोन चित्रपट पाहिल्यावर सेक्स फिल्म-मधे तोचतोपणा जाणवू लागतो. अनेक पुरुष व एक स्त्री, अनेक स्त्रिया व एक पुरुष, समलिंगी शरीरसंबंध अशा प्रकारे सर्व प्रकारची 'परम्युटेशन्स' आणि 'कॉंबिनेशन्स' दाखवून झाली की मग काही शिल्लक उरत नाही! पॅरिसला मी जी सेक्स फिल्म पाहिली तीत लैंगिक विकृतीचे जे काही प्रकार संभवतात त्यांपैकी बहुतेक प्रकार तपशीलवार, जवळून दाखवण्यात आले होते! अशा चित्रपटाच्या सुरुवातीस श्रेयनामावली दाखवण्यात येते हे विशेष!

सेक्सच्या या चिमुकल्या साम्राज्यात दोन रत्नं हाताला लागली — 'सेक्स लाइफ इन अ कॉन्व्हेंट' हा चित्रपट, आणि तारुण्यात पदार्पण करणाऱ्या मुला-मुलींना लैंगिक ज्ञान व्हावं म्हणून एका स्वीडिश निर्मात्यानं काढलेला शैक्षणिक चित्रपट. कॉन्व्हेंटमध्ये शिकणाऱ्या मुलींच्या वाट्याला येणारे लैंगिक अनुभव पहिल्या चित्रपटात मोठ्या हृद्य, प्रत्ययकारी पद्धतीनं चित्रित केलेले होते. विवाह-संस्था मोडकळीस आल्यानं निर्माण झालेले तणाव आणि त्यांचा अजाण मुलांवर होणारा परिणाम याचं विदारक चित्रण 'सेक्स लाइफ इन अ कॉन्व्हेंट'मध्ये होतं



ब्रुसेल्स येथील 'ॲटोमियम' नामक कलात्मक वास्तू
वरच्या वर्तुळात हॉटेल आहे

घटस्फोटित आई मध्यरात्री एका अनोळखी पुरुषाच्या मिठीत विवस्त्रावस्थेत पड-लेली पाहून सहासात वर्षांची क्लारा घाबरून बाहेर जाऊन पोलिसाना घेऊन येते. दार सताड उघड ठेवून रतिक्रीडा करणाऱ्या क्लाराच्या आईकडे पोलिस शातपणे पहातात व दार बद करून क्लाराची समजूत घालून निघून जातात क्लाराला शिक्षणासाठी कॉन्व्हेंटमध्ये ठेवण्यात येत. पण मध्यरात्री पाहिलेला तो प्रसग क्लारा विसरू शकत नाही ती रात्रीबेरात्री दचकून उठून बसते ! वासनेन पिसाट बनलेला सावत्र बाप वयात आलेल्या कोवळ्या ग्लोरियावर झडप घालतो, आणि सुट्टीत घरी गेलेली ग्लोरिया कॉन्व्हेंटकडे परतल्यावर अशी भ्रमिष्ट का झाली आहे याचा उलगडा नन्सना व मदर सुपिरियरना होत नाही ! सोळा वर्षांची गोड, आनंदी पोरगी जेनिफर आजारी पडते तेव्हा तिची शुश्रूषा करणारी पस्तिशीतली नर्स तिच्या प्रकृतीला आराम पडल्यावर एक दिवस तिला विवस्त्र करून आपली विकृत वासना शमवू पहाते आणि जेनिफरच्या चेहऱ्यावरल निरागस हास्य कायमच निख-ळून पडतं ! आपल्या छोटचाशा राज्यात 'सेक्स' नामक सैतान किती तऱ्हेतऱ्हेची अक्राळविक्राळ रूपं धारण करतो हे पाहिलं की मन सुन्न होऊन जात !

स्वीडिश भाषेतला 'लँग्वेज ऑफ लव्ह' माहितीपूर्ण आहे. पण ती माहिती अनुबोधपटात सांगतात तशी कटाळवाण्या पद्धतीन न सांगता मोठ्या कलात्मक पद्धतीन चित्रित केली आहे स्वीडनमध्ये माध्यमिक शाळात 'लैंगिक शास्त्र' हा

सक्तीचा विषय आहे. मुलामुलींना योग्य वयात लैंगिक ज्ञान दिलं म्हणजे पुढ विकृती निर्माण होण्याची शक्यता कमी होते यावर स्वीडिश सरकारचा विश्वास आहे कामजीवनाविषयीच शास्त्रशुद्ध चित्रण अतिशय तटस्थपणे 'लँग्वेज ऑफ लव्ह' मध्ये केलेल आहे आपल्याकडे पैसे उकळण्यासाठी 'गुप्त ज्ञान' सारखे जे चित्रपट निर्माण करण्यात येतात त्यापेक्षा सर्वतोपरी सरस असलेले 'लँग्वेज ऑफ लव्ह' सारखे चित्रपट जरूर तर आयात करून, महाविद्यालयात दाखवले गेले पाहिजेत.

मार्लन ब्रँडोच्या 'लास्ट टँगो इन पॅरिस'ची 'दि मोस्ट इरॉटिक मुव्ही एव्हर मेड' अशी सर्वत्र जाहिरात करण्यात येत होती, पण तो निव्वळ 'पोर्नो-ग्राफिक फिल्म'च्या पगतीत बसण्यासारखा नाही आदिम वासनेची शिकार बनलेला, पन्नाशीतला पॉल आणि त्याच्या जाळ्यात नकळत ओढली गेलेली, तारुण्यान मुस-मुसणारी जिनी याच्या जगावेळ्या कामजीवनाची, वासनेच्या पिसाट थैमानाची ती अविस्मरणीय कथा आहे पॅरिसच्या जुनाट अपार्टमेंटमध्ये दोघाची पहिली भेट होते तेव्हाच दोन झपाटलेली शरीर एकमेकाच्या जवळ येतात 'लास्ट टँगो' मधल विकृत शरीरसबधाच चित्रण अगावर काटा उभा करणार आहे ब्रँडोसारख्या कसलेल्या नटापुढ न बुजता, सर्व चित्रपटावर आपल्या समर्थ, धीट अभिनयाचा ठसा उमटवणारी मारिया श्नाइडर कायमची लक्षात रहाते दुःख एवढच की हा चित्रपट भारतात येण शक्यच नाही !

'ओ कॅलकता' नाटक लडनला 'इडिया हाउस' समोरच्या थिएटरात गेली नऊ वर्ष सतत चालू आहे (अॅगाथा ख्रिस्तीच माऊस ट्रॅप' गेली सव्वीस वर्ष सतत चालू आहे !) हे नाटक सरळसरळ 'पोर्नोग्राफिक' आहे नग्न स्त्री-पुरुषांची दोन आकर्षक बॅले नृत्य सोडल्यास अथपासून इतिपर्यंत सारा चावटपणा ! 'रेव्ह्यू' पद्धतीचे छोटे छोटे विनोदी प्रसग सर्व सेक्सवर बेतलेले स्त्रियांच्या अतर्वस्त्राचा प्रात्यक्षिकासह इतिहास (व्हिक्टोरियाच्या काळात स्त्रिया अतर्वस्त्र घालीत नसत या उपोद्घातासह !), कॅलिफोर्निया विद्यापीठात 'सेक्सॉलॉजी' डिपार्टमेंटमध्ये चालणारे विविध प्रयोग —— या प्रकारचे 'रेव्ह्यू'चे विषय अगावरचा ओव्हरकोट जितक्या सहजपणे काढावा तितक्या सहजपणे पात्र अगावरली सपूर्ण वस्त्र उतरवतात ! हे नाटक ज्या थिएटरात चाललेलं होतं त्याच्या समोरच्या थिएटरात 'नो सेक्स प्लीज ! वुई आर ब्रिटिश !' ही कॉमेडी चालू होती, हा एक गमतीचा योगायोग !

ब्रुसेल्समध्ये ज्या थिएटरात 'इरॉटिक फिल्म' दाखवण्यात येत होती त्या थिएटरजवळ दोनतीन 'सेक्स शॉप्स्' दिसली पॅरिसच्या पिगाल भागात तीसचाळीस सेक्स शॉप्स होती युरोपमध्ये प्रत्येक शहरात ही दुकान असतात आणि ती एकाच प्रकारची असतात आत शिरल की समोरच्या टेबलावर शेकडो पोर्नोग्राफिक मासिकं आणि पुस्तक चारी बाजूच्या काचेच्या कपाटांत स्त्रीपुरुषांच्या लिंगाची

मॉडेल्स -- काही साधी, काही बॅटरीवर चालणारी विविध प्रकारची कामोत्तेजक साधनं हारीनं मांडलेली. प्रत्येक दुकानाच्या मागच्या भागात दोघांना बसता येईल अशी छोटी कॅबिन्स. नाणं टाकलं की समोरच्या छोट्या पडद्यावर 'ब्ल्यू फिल्म' उलगडते. मूकपटाला कमी दर. बोलपट हवा असल्यास अधिक जड नाणं टाकावं लागतं. पाचदहा मिनिटं चालणाऱ्या फिल्म्स. सध्याकाळी ही 'सेक्स शॉप्स' माणसांनी फुलून गेलेली असतात. खिदळणाऱ्या तरुणतरुणींच्या बरोबरीनं टकलाचा चांदवा खाजवीत अनेक वृद्ध मंडळी मासिक चाळीत उभी असलेली दिसतात!

गावगन्ना दिसणारी 'इरॉटिक फिल्म'ची थिएटरं आणि 'सेक्स शॉप्स' ही युरोपमधल्या उघड्या-नागड्या लैंगिक जीवनाची प्रतीकं आहेत असं म्हणायला



'नजरवेधक' बिनिस्कर्टचा एक चावट नमुना

हरकत नाही। कसलीही आडकाठी नसलेलं, प्रकट लैंगिक जीवन हे अतिसपन्न जीवनाचा अपरिहार्य परिपाक म्हटलं पाहिजे. स्त्रीशरीराचा 'व्हल्गर डिस्प्ले' युरोपात फिरताना रस्त्यारस्त्यावर दिसतो वर्तमानपत्र, जाहिराती, नाइटक्लब्ज यातून स्त्रियांच्या उघड्या शरीरांचं दर्शन एकसारखं घडत असतं स्त्रियांच्या शरीरांची माप, त्यावरील चुरचुरीत शेरेबाजी, बलात्काराची; व्यभिचाराची चविष्ट वर्णनं या मजकुरानी वर्तमानपत्राचे रकाने दुथडी वहात असतात। स्त्री ही शोभेची, पुरुषाच्या मनोरजनासाठी, देहसुखासाठी निर्माण केलेली वस्तू आहे, हा युरोपीय दृष्टिकोन तिथल्या 'विमेन्स लिब'वाल्यांनाही मान्य असावा. कारण 'सत्यम् शिवम् सुदरम्' विरुद्ध पुण्यात जस (केविलवाण) निदर्शन झाल तशी निदर्शनं युरोपात झालेली ऐकिवात नाहीत।

बारा ते पन्नास वर्ष वयाचा समस्त महिलावर्ग आपापल्या परीनं या 'व्हल्गर डिस्प्ले'त उत्साहानं भाग घेत असतो। कमीत कमी लांबीचा मिनीस्कर्ट आणि उरोजाचा तीन चतुर्थांश भाग उघडा टाकणारा टी-शर्ट हा स्त्रियाचा आवडता पोशाख टी-शर्टवर अचकटविचकट चित्र आणि वाक्य व्हिएन्नात तरुणी-प्रिय असलेल्या टी-शर्टवर पुढल्या बाजूस दोन पुरुषी हाताचे ठसे होते लांबून पाहिल तर मागून कुणी पुरुष आपले कणखर पजे वक्षःस्थळावर दाबून धरतोय अस वाटाव। रस्त्यातून जाताना समोरच प्रणयी युगुल मधेच एकदम कधी उभ राहून 'जिव्हा-चुबना'ला सुरुवात करील याचा नेम नसतो। रस्त्याच्या कडेला असलेल्या मोटारीकडे पहाण्याची सोय नसते — आत कोणत दृश्य दिसेल हे सांगता यायच नाही। विमानतळ वर मित्रमैत्रिणीला निरोप देताना जे प्रकार चालू असतात ते हिंदी चित्रपटात नुसते सूचित केले तरी सेन्सॉर बोर्ड कात्रीला धार लावून पुढ सरसावील। मॅटर्निटी हॉस्पिटलमधे येणाऱ्या तीस ते चाळीस टक्के केसिस कौमार्यावस्थेतल्या मुलींच्या 'प्रेग्नन्सी टर्मिनेशन'च्या असतात, अस युरोपमधल्या हॉस्पिटलमधे डॉक्टर असलेल्या माझ्या मेहुणीन सांगितल तेव्हा मला फारस आश्चर्य वाटल नाही।

वसत ऋतू आला की युरोपभर फिरायला हवा अनुकूल असते पैसे नसले म्हणून मुलीच काही अडत नाही भरपूर पैसे खिशात बाळगून प्रवासाला निघालेल्या मुलांना गाठायच, त्याच्या खर्चानं हिंडाफिरायच, खायच-प्यायच आणि त्या मोबदल्यात त्याच्यापाशी 'कपॅनियन' म्हणून रहायच एका तरुणाचा कटाळा आला किंवा त्याच्या आणि आपल्या प्रवासाची दिशा बदलली की दुसरा तरुण गाठायचा, त्याच्याबरोबर पुढला देश पहायचा अशी अनेक मुलींची बिनभाडवली (।) भ्रमती चालू असते। कशाचाही विधिनिषेध बाळगायचा नाही अस एकदा ठरवल की जगातली यच्चयावत् भौतिक सुख हात जोडून पुढ उभी रहातात, हे युरोपमधल्या चतुर मुलींनी जाणल आहे।

सेक्सच साम्राज्य चिमुकल खर, पण बेल्जमसारख्या युरोपमधल्या सर्वात चिमुकल्या देशावर ते चांगलाच प्रभाव गाजवतय हे निःसशय।

६

# राखेतून जन्मलेला फीनिक्स पक्षी

बेल्जममधून पश्चिम-जर्मनीत शिरलो तेव्हा सवयीप्रमाण पासपोर्ट खिशातून बाहेर काढला आके हे सरहद्दीवरच्या टुमदार गावाच नाव सरळ नाकाचा, निळ्या डोळ्यांचा लालबुद जर्मन पोलिस पोरसवदा दिसत होता मी पासपोर्ट उघडून व्हिसाचा शिक्का शोधू लागलो, तेव्हा त्याच्या गभीर चेहेऱ्यावर स्मितरेषा उमटली जर्मन हेल काढून तो इंग्रजीत म्हणाला, "यू आर ॲन इंडियन! तुम्हाला पश्चिम-जर्मनीत शिरायला व्हिसा लागत नाही"

मग मला आठवल लंडनला मी पश्चिम-जर्मनी वकिलात सोडून अन्य देशांच्या वकिलातीत भरपूर पैसे देऊन व्हिसाचे शिक्के मारून घेतले होते! स्वित्झर्लंडचा व्हिसा जवळजवळ शभर रुपयाना पडला होता! भारत व पश्चिम-जर्मनी या दोन देशांनी करार करून व्हिसा-पद्धत काढून टाकली प्रथमदर्शनीच जर्मनीबद्दल माझं मत चागल झालं!

हिटलरन मोठ्या चाणाक्षपणानं बाधून काढलेल्या ऑटोबान्सवरून आमच वाहन धावू लागल, तेव्हा दोन्ही बाजूची उच झाड आपले तुरे हलवीत आम्हाला 'गार्ड ऑफ ऑनर' देत असल्याच दिसल दोहो बाजूना घनदाट अरण्य लहानपणी गोव्याला जाताना बेळगाव ते लोंढा प्रवास खूप आवडायचा धारवाड-हुबळीपर्यंत जाताना लोंढा ते धारवाड प्रवास तेवढाच प्रिय असायचा रेल्वेच्या दोन्ही बाजूना घनदाट अरण्य लागायची आणि त्यातून मार्ग काढीत गाडी सुसाट धावताना कानठळ्या बसवील असा घनघोर आवाज एकसारखा येत रहायचा देसूर-खानापूर-गुजी-देवराई-नागरगाळी, अळणावर ही चमत्कारिक नावांची गावं त्या अरण्यामुळ ध्यानात राहिली होती जर्मनीत ऑटोबान्सवरून जाताना मला खानापूर-अळणावर-कॅसल-रॉकची आठवण झाली. फर आणि पाइन वृक्षाच्या न संपणाऱ्या रागा. प्रचड उद्गारचिन्हासारखे दिसणारे फरवृक्ष आणि सरळसोट वाढून आकाशाला भिडू पहाणारे पाइनवृक्ष काश्मिरला पाइन वृक्षांच्या रांगा पाहिल्या होत्या परंतु जर्मनीच्या 'ब्लॅक फॉरेस्ट'चं घनगभीर, भीषण सौंदर्य अन्यत्र पहायला मिळालं

नाही मनात आल पेट्रोलचे साठे संपतील, खनिजाचे साठे पाचपन्नास वर्षांनी संपुष्टात येतील परंतु वनसंपत्ती ही न संपणारी संपत्ती आहे. शेवटी माणसाला पुन्हा अरण्याकडे वळाव लागेल हेच खर 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' हे सूत्र जर्मन माणसान जितक आत्मसात केल आहे, तितक तुकोबाच्या देशातल्या लोकानी केलेल नाही !

हायवेवरून जाताना शेजारच्या लेनमधून लांबलचक वाहन धीम्या गतीन धावताना दिसत होती जर्मनीत तयार होणाऱ्या 'व्होक्स वॅगन', 'बी डब्ल्यू सी ' यांसारख्या अर्धा डझन गाड्या वाहून नेणारे प्रचंड ट्रक्स आपल्या देशवासिया-साठी प्राणाच बलिदान करण्यास सिद्ध झालेले गुलाबी सोंडेचे, तुस्त शरीरयष्टीचे पांढरे गुबगुबीत डुक्कर घेऊन जाणाऱ्या स्टेशनवॅगन्स लाकडी खोक्यात बंदिस्त झालेल्या, जगाच्या कानाकोपऱ्यात पोचणाऱ्या यंत्रसामग्रीची ने-आण करणाऱ्या छोट्यामोठ्या गाड्या जर्मनीच्या भरभराटीची ती प्रसादचिन्ह ! वाटेत ठिकठिकाणी कारखाने दिसत होते डोळ्यात मावणार नाही असा त्याचा प्रचंड विस्तार आवारात पार्क केलेल्या विविध आकाराच्या, विविध रंगाच्या शेकडो कार्स 'पिन ते पियानो' विकणारी प्रशस्त डिपार्टमेंटल स्टोअर्स

जर्मनीच एक वैशिष्ट्य लक्षात राहिल प्रत्येक गावाच्या वेशीपाशी त्या गावाचा वेगळेपणा, वैशिष्ट्य दाखवणारा एक मोठा सुबक फलक उंच खांबावर लावलेला असतो लांबून पाहूनच लक्षात याव म्हणून बोर्डावर चित्रं असतात, अक्षर नसतात एखाद्या गावात मोठ हॉस्पिटल, म्युझियम, तळ या गोष्टी असतील, त्याच गावातल्या रहिवाशाचा प्रमुख धंदा मेंढ्यांवरील लोकर काढण्याचा असेल तर त्या बोर्डावर ही पाच वैशिष्ट्य आकर्षक रंगात चित्रांकित केलेली असतात आम्ही अनेक ठिकाणी मुद्दाम थांबून कुतूहलान हे फलक न्याहाळले

आम्ही कोलोन, बॉन, आणि न्युरेंबर्ग या तीन ठिकाणी मुक्काम करणार होतो न्युरेंबर्गच नाव कानावर आलं आणि अंगावर सरसरून काटा आला नात्सी अत्याचाराला जबाबदार असलेल्या अनेक जर्मन अधिकाऱ्यावर न्युरेंबर्ग न्यायालयात खटले भरण्यात आले. 'जज्मेंट अॅट न्युरेंबर्ग' हा त्यावरला सुरेख चित्रपट आणि मी लंडनला टी व्ही वर पाहिलेले जेरल्ड ग्रीनच्या कादंबरीवर आधारलेले 'हॉलकॉस्ट'चे पाच भाग

जर्मनीत फिरत असताना एकसारख मनात येत होत वनसंपत्ती आणि प्रचंड उद्योगधंदे यानी गजबजलेल्या याच भूमीवर पंचवीस वर्षांपूर्वी अनन्वित अत्याचार झाले ? खाली मान घालून तासन् तास कामात गढलेल्या कामसू जर्मन तरुणाच्या काका-मामान, वडिलान, भावानं, साठ लक्ष निष्पाप ज्यूंच्या रक्ताचे पाट वाहिलेले पाहिले असतील ? गॅस चेंबरच्या भयानक कथा त्याच्या कानावरून



युरोपमधील खिसा जोखून चालणारे मेनूवाचन !

गेल्या असतील ? पृथ्वी नि:क्षत्रिय करू पहाणाऱ्या परशुरामाप्रमाणं किंवा वडिलांच्या मृत्यूला एक सर्प कारणीभूत झाल्यामुळे चिडून सर्पसत्र आरंभणाऱ्या जनमेजयाप्रमाणं साऱ्या पृथ्वीतलावरून ज्यू-वंश समूळ नष्ट करण्याच्या आकांक्षेनं पेटलेल्या हिटलरबद्दल सर्वसामान्य जर्मन माणसाला काय वाटत असेल ? अभिमान की घृणा ?

वास्तविक हिटलरची तुलना परशुराम आणि जनमेजय यांच्याशी करणं तितकंसं बरोबर नाही ! त्या दोघांच्या संतापाला काही कारणं होती, काही समर्थन होतं. कुठंतरी वाचलं होतं. हिटलरनं एका हॉस्पिटलात जर्मन आणि ज्यू माणसांच्या कवट्या पाहिल्या. आर्य शुद्ध उच्च वंशाचे, आणि ज्यू कमअस्सल अवलाद, असं त्यानं मनानं घेतलं. काही कारण नसताना निष्पाप ज्यूंचा संहार त्यानं आरंभला. एकदोन नव्हे, साठ लाख ज्यूंची त्यानं हत्या घडवून आणली !

लंडनमधे 'हॉलकॉस्ट' पहात असताना सारखं जाणवत होतं माणूस कितीही सुसंस्कृत झाला, पुढारला, तरी मूलतः तो एक जनावरच आहे! निर्घृण, निर्दय जनावर! 'हॉलकॉस्ट' ही दोन कुटुंबांची कथा एरिक डॉर्फ हा महत्त्वाकांक्षी जर्मन अधिकारी आणि रूडी वाइस हा तरुण ज्यू डॉर्फ आणि वाइस या दोन कुटुंबांची दोन वेगळ्या पातळ्यांवरची ही अविस्मरणीय कहाणी नात्सी राजवटीत एरिक डॉर्फचं कोटकल्याण होतं, तर रूडी वाइसच्या कुटुंबाची वाताहत होते दररोज बारा हजार ज्यूना गॅस चेंबरमधे लोटण्याची [illegible] त्याच्या सहकाऱ्यावर सोपवलेली असते बायको आणि मुलांवर प्रेम करणारा कुटुंबवत्सल डॉर्फ म्हाताऱ्या आर्यांची न् कोवळ्या अश्राप मुलांची मस्तकं लीलया छिन्नविच्छिन्न करत असतोच! बारा वर्षांची मुलगी विचारत असते, "आज रात्री मला होमवर्क करता येईल का हो?" — आणि दुसऱ्याच क्षणी बंदुकीतून सुटलेली गोळी तिच्या इवल्याशा डोक्यातून आरपार जाते! लक्षावधी ज्यूंच 'रीसेटलमेंट', 'रीलोकेशन' 'स्पेशल हँडलिंग'! माणसाच्या शरीरातल्या चरबीचा जाहीर लिलाव आणि त्यात अनेक जर्मन कंपन्या सामील झालेल्या मृत ज्यूंच्या दातांवरलं सोनं विकून हजारो लोकांनी पैसे मिळवले. एका कॉन्सेंट्रेशन कँपजवळ सापडलेल्या पोत्यांत मेलेल्या ज्यूंचे केस होते आणि त्या पोत्याचं वजन सात टन होतं!

"दे हॅव् ना अदर पपज [illegible]

ज्यू जन्माला आले ते केवळ मरण्यासाठी!

हिटलर, हिमलर, आइशमन आणि त्यांना मदत करणारे हजारो जर्मन सभ्य, सच्छील, कुटुंबवत्सल जर्मन!

जर्मनीत फिरताना काही केल्या तो प्रचंड संहार डोळ्यापुढून हलत नव्हता!

मानवतेला काळिमा लावणाऱ्या त्या संहाराबद्दल सर्वसामान्य जर्मन माणसाला काय वाटतं? हिटलरबद्दल त्याला अभिमान वाटतो की शरम?

मी हे प्रश्न एका जर्मन प्राध्यापकाला विचारले मुंबईत तो काही दिवस राहिला होता आपल्या संशोधनासाठी भारतभर तो फिरून आला होता पन्नास-पचावन्न वयाचा होता तो म्हणजे हिटलरची शंभर पापं भरली तेव्हा पंधरावीस वर्षांचा असेल

"खरं सांगू का तुम्हाला?" तो उत्तरला, "एवढ्या मोठ्या प्रमाणावर अत्याचार चालले आहेत याची आम्हाला मुळीच कल्पना नव्हती! माझ्या गावापासून चाळीस मैलांवर कॉन्सेंट्रेशन कँप होता, आणि तिथं नव्वद हजार ज्यूंची हत्या झाली पण ते आम्हाला कितीतरी वर्षांनी कळलं!"

"ज्यांना ठाऊक होतं त्यांनी काय केलं?"

कोलोनला एका पेट्रोलपपाजवळच्या हॉटेलमध्ये आम्ही बसलो होतो माझा प्रश्न त्याला अपेक्षित असावा त्यान खादे उडवले आणि तो म्हणाला, "नुकतीच तुमच्याकडे इमर्जन्सी होती त्या वेळी मिसेस गांधीविरुद्ध ब्र काढायच कितीजणानी धाडस केल ? हिटलर तर मिसेस गांधींपेक्षा "

गोष्ट खरी होती. व्यक्तिस्वातन्त्र्य, लोकशाही आदीचा डागोरा पिटणारे बुद्धिमत त्या वेळी वाळूत तोंड खुपसून मुकाट बसले होते इतराची तर वातच सोडा !

"इट मस्ट नेव्हर हॅपन अगेन !" तो म्हणाला, "हिटलरची कारकीर्द आमच्या इतिहासातल एक काळकुट्ट प्रकरण आहे आम्हाला ते विसरून जायच आहे शक्य तितक्या लवकर !"

'उद्या तिसर महायुद्ध झाल तर ?"

"तिसर महायुद्ध ? अॅट लीस्ट, आय् अॅम् नॉट गोइग टु जॉइन इट् !" मग तो पुढ झुकला आणि एखादी गुप्त बातमी सागावी तसा आविर्भाव करून म्हणाला, "तिसर महायुद्ध झालं ना, तर जगातल कुणीच वाचणार नाही ! आता होईल ते अणुयुद्ध आणि त्यात सगळ्याच संस्कृतींचा नि:पात होईल ! जर्मन काय, ज्यू काय आणि इडियन्स काय — सगळे रसातळाला जातील ! विज्ञानान तेवढी झेप जर्मनीसारख्या देशात गेल्या वीस वर्षांत घेतली आहे !"

दुसऱ्या महायुद्धानतर जर्मनीचे अनेक तुकडे झाले बर्लिन शहर दुभगल. १९४५ ची जर्मनी म्हणजे अनेक अवयव तुटलेल, छिन्नविच्छिन्न झालेल कलेवर ! पण राखेतून जन्म घेणाऱ्या फीनिक्स पक्ष्याप्रमाण सहा कोटींचा पश्चिम-जर्मनी पुन्हा उभा राहिला आणि पचवीस वर्षांत औद्योगिक दृष्ट्या जगातला चौथ्या क्रमाकाचा बलाढ्य देश बनला विश्वास बसणार नाही असा हा अद्भुत आर्थिक चमत्कार ! इकॉनॉमिक मिरॅकल ! आज जर्मन डॉइच्-मार्क पौंडाशी आणि डॉलरशी टक्कर देतो आहे ! आतरराष्ट्रीय व्यवहाराच्या गदारोळात पौंड कधीच हरवला आहे आज अमेरिकेला कम्युनिझम आणि कॅन्सर या खालोखाल कशाची भीती वाटत असेल तर जपानी येनची आणि जर्मनीच्या डॉइच्मार्कची !

युरोपमधे एक अनुभव आला देश जितका समृद्ध, तितकी महागाई अधिक ! इग्लडमधे भारताच्या मानान बरीच महागाई आहे अस वाटल होत पण बेल्जम इग्लडहून महाग, आणि जर्मनीतल्या किमती इग्लडहून कितीतरी पटीन अधिक बऱ्यापैकी हॉटेलमधे चहा आणि सँडविच घेतल की चाळीसपन्नास रुपये बिल ! युरोपमधे सर्वत्र एक गोष्ट आवडली ती म्हणजे प्रत्येक हॉटेलच्या दारावर मेनूकार्ड चिकटवलेलं असतं सर्व पदार्थांच्या किमती स्पष्टपणे लिहिलेल्या


दारात उभं राहून किमती न्याहाळाव्यात परवडण्यासारख्या वाटल्या तर आत शिरावं नाहीतर पुढच्या, कमी थाटमाट असलेल्या हॉटेलच्या दारात उभं रहावं आत जायचं, खुर्चीवर बसायचं, मेनूकार्ड मागवायचं आणि मग किमती फार वाटल्या म्हणून ओशाळवाणा चेहेरा करून बाहेर पडायचं, यापेक्षा ही पद्धत उत्तम ! दुपारी आणि संध्याकाळी अनेक प्रवासी दारावरचं मेनूकार्ड न्याहाळीत उभे असतात माझ्यासारख्या प्रवाशांना ही पद्धत सोयीची वाटते जर्मन माणसाचा पगार तिथल्या किमतींच्या चौकटीत बसवलेला पगार मिळवायचा भारतात, आणि खर्चायचा जर्मनीत ! तेव्हा खरी पंचाईत होते ! तेव्हा खिसा पाहून हॉटेल निवडणं उत्तम !

जर्मन माणूस जात्याच गंभीर वाटला इटालियन माणसासारखा तो खळ-खळून हसणार नाही की मोकळेपणानं बोलणार नाही खाली मान घालून काम करत राहील त्याला विनोदबुद्धी कमी चेष्टा केली की तो चटकन संतापतो आधुनिक तंत्रज्ञानात तो पारंगत यंत्रनिर्मितीत त्याचा हात धरणारा युरोपात कुणी नसेल ! फ्रँकफुर्ट, स्टुटगार्ट, हॅम्बुर्ग येथील प्रचंड कारखाने जर्मन माणसाच्या दीर्घोद्योगाची आणि तंत्रज्ञानाची ग्वाही देतात अशा माणसाचा स्वभाव घुमा, गंभीर असेल तर नवल वाटायला नको !

आठवड्यात पाच दिवस मान मोडून काम करणारा जर्मन माणूस अन्य युरोपीयांप्रमाणे 'वीकएण्डस्'च्या वेळी थोडाफार मनमोकळा होतो मी जर्मनीत होतो तेव्हा म्युनिचला 'बीअर फेस्टिव्हल' होतं आणि ते चांगलं महिनाभर चाल-णार होतं स्वित्झर्लंडला स्थायिक झालेला माझा मेहुणा मंगेश म्युनिचला जाण्याचा आग्रह करीत होता पण वेळेअभावी तो मोह टाळला (मात्र जर्मनीत तयार होणारी सर्व प्रकारची बीअर मनसोक्त प्यालो आणि क्षणोक्षणी बदलणारे जर्मनीचे रंग पाहिले !) या म्युनिचच्या उत्सवात तरुणतरुणी बीअरची पिंपं पोटात रिचव-तात, आणि दिवसरात्र मनःपूत धुमाकूळ घालतात ! म्युनिच फेस्टिव्हलनंतर आठनऊ महिन्यांनी जर्मनीतलं जननप्रमाण एकदम वर जातं ! पण त्यामुळं जर्मनीचं काही बिघडत नाही ! लोकसंख्यावाढीचा मंद वेग ही जर्मनीसारख्या पुढारलेल्या देशाची डोकेदुखी आहे म्युनिचप्रमाणं गावगन्ना अशा प्रकारचे 'बीअरोत्सव' साजरे झाले तर सरकारला ते हवेच आहेत ! जर्मनीसारख्या कल्याणकारी देशात मुलं कुटुंबावर आर्थिक भार होऊन बसत नाहीत मुलांचं प्राथमिक शाळेपासून महाविद्यालयापर्यंतचं सर्व शिक्षण मोफत आणि सक्तीचं पाळण्यापासून दफनापर्यंत माणसाच्या आरोग्याची काळजी सरकार घेतं एवढी प्रोत्साहनं दिली तरी मानवी श्रम गरजेच्या मानानं अपुरे पडतात श्रमिकांची कमतरता भासते दुर्मिळ मानवी श्रमाचा कमीत कमी वापर सर्व प्रकारच्या उत्पा-दनांत करणं भाग पडतं.

कोलोनकडून बॉनकडे जाताना वाटेत आम्ही ऱ्हाइन नदीच्या किनाऱ्यावर थांबलो (त्याआधी ऱ्हाइन नदीवर बांधलेल्या लांबलचक पुलावरून आमची गाडी गेली होती आणि सवयीनं मी नकळत एक मार्कचं नाणं नदीत फेकलं होतं ! एक मार्कचं रुपयात रूपान्तर केलं आणि मी दचकलो ! पुढं मला डॅन्यूब, सीन, पो नद्या दिसल्या खऱ्या, पण मी त्या नद्यांना नुसता नमस्कार केला !) जर्मनीत (व मला वाटतं साऱ्या युरोपभर) नदीला 'फादर रिव्हर' म्हणतात (आपल्याकडे नदीला आई समजलं जातं निदान माई तरी ! उदा० कृष्णामाई, गंगामैय्या)

ऱ्हाइन नदीच्या खोल पात्रावरून डौलात जाणाऱ्या स्टीमरमधून आम्ही तीन तासांचा फेरफटका मारला नदीच्या दोन्ही बाजूंना द्राक्षांच्या बागा दिसत



बॉनमधील गॉडेसबर्ग कासल

होत्या डोंगरावरच्या उतरणीवर ह्या हिरव्यागार बागा कोवळं उन्ह खात आरामात पहुडल्या होत्या बागावर पाण्याचा फवारा पडत होता जागच्या जागी गिरकी घेणार चक्र हळदुव्या पानांवर पाण्याचा हलका शिडकावा करत होत. डोंगराच्या वरच्या टोकाला जुने किल्ले दिसत होते या किल्ल्यात पूर्वी लुटारूंचे राजे रहात ऱ्हाइन नदीच्या खोऱ्यातून ये-जा करणाऱ्या नावाकडून ते कर गोळा करत आता त्या लुटारूंच्या राजांचे वंशज कुठं गेले आहेत कोण जाणे ! (कदाचित व्यापारी, उद्योगपती, मंत्री अशी नाव घेऊन ते जुना व्यवसाय नव्या स्वरूपात करीत असतील ) या द्राक्षांच्या मळ्यात मनुष्यप्राणी कुठंच दिसत नव्हता पाखरांनी द्राक्षांचा नाश करू नये म्हणून बहुतेक बागा निळसर नायलॉनच्या जाळ्यानी झाकून टाकलेल्या होत्या

आमच्या छोट्या स्टीमरमध्ये छोटा बार होता ऱ्हाइन नदीच्या खोऱ्यात मिळणाऱ्या द्राक्षापासून काढलेली 'व्हाइट वाइन' तिथ मिळत होती. ती वाइन सुरईतून आमच्या पेल्यांत ओतणाऱ्या तरुण, नाजुक 'साकी'शी आम्ही थोडा वेळ गप्पा मारल्या शेतीची सर्व काम मनुष्यबळाशिवाय करावी लागतात अस ती म्हणाली गुराना चरायला नेण्यासाठी गुराखी मिळण मुष्किल असत मग गुर कुरणात तशीच सोडली जातात कुरणाभोवती विजेच्या तारा लावलेल्या असतात आणि त्या तारांमधून सौम्य वीजप्रवाह खेळवलेला असतो गुरं कुरणापासून दूर जाऊ लागली की गुराना सौम्य धक्का मिळतो त्यामुळ ती ठराविक क्षेत्रातच चरत असतात 'गरज ही शोधकतेची आई असते' या विषयावर हायस्कूलमध्ये असताना लिहिलेले निबंध आठवले !

"मला तुमच्या इंडियात यायच आहे " ती मधेच म्हणाली

"जरूर ! पण तुम्हाला इंडियात का यावस वाटतं ?"

तिन ओळीन ठेवलेल्या बाटल्यांच्या माग हात घालून एक जर्मन वृत्तपत्र बाहेर काढल त्यातल एक पान माझ्यापुढ करून ती म्हणाली, "मला ह्यांना भेटायच आहे "


मी कुतूहलान वृत्तपत्र हातात घेतल भाषा जर्मन होती. पण फोटो चटकन ओळखता आला 'संभोगातून समाधीकडे' प्रवास करणारे पुण्याचे भगवान रजनीश ! ऱ्हाइन नदीच्या खोऱ्यातल्या एका तरुण 'बारटेंडर' मुलीपर्यंत भगवानाची कीर्ती पोचली होती तर !

"मला ह्यांच्या आश्रमात महिनाभर रहायच आहे "

"रहा. जरूर रहा !"

"तुम्ही कधी राहिलाय ?"

"छे बुवा ! मी त्याना कधी पाहिलसुद्धा नाही !"



ऱ्हाइनच्या खोऱ्यातली रमणीय जलयान-सफर

"तुम्ही इंडियात असून त्यांना पाहिलं नाही ?" पॅरिसला राहून आयफेल टॉवर न पहाणाऱ्याकडे पहावं तसं तिनं माझ्याकडे पाहिलं.

"आता तुम्ही एवढं म्हणताहात तर इंडियाला गेल्यावर त्यांच्या आश्रमात गेलंच पाहिजे !" मी तिला दिलासा दिला

गंमत म्हणजे दुसऱ्या दिवशी 'ऑस्टेरहोफेन' नामक गावी आम्ही 'लेमन टी' घेतला, तेव्हा हॉटेलच्या गलेलठ्ठ मालकिणीनं आम्हाला पाहून आतून तोच अंक आणला आणि 'भगवान रजनीश' या विषयावर तीच प्रश्नोत्तरं झाली !

आर्यवंश, स्वस्तिकचिन्ह आणि संस्कृत भाषा याबद्दल अपार प्रेम हे भारत आणि जर्मनी ह्या दोन देशांना एकत्र जोडणारे दुवे (जर्मन महाकवी गटेशी जवळीक निर्माण झाली ती तो 'शाकुंतल' डोक्यावर घेऊन नाचला होता हे समजलं तेव्हा!) भगवान रजनीश हा आणखी एक दुवा निर्माण झालाय की काय, असं मनात आलं. (तसं असेल तर ती फारशी अभिमानास्पद गोष्ट नव्हे, हा मुद्दा अलाहिदा!)

✤

जर्मनीत 'कसिनो' ही संस्था पहायचं मनात होतं माँटो कार्लो अगर शिकॅगो येथे जुगाराचे प्रचंड अड्डे असतात आणि रात्रीचा दिवस करून हजारो लोक जुगार खेळत असतात, कोटयवधी रुपये उधळत असतात हे जुगाराचं जग जवळून पहायची इच्छा होती कोलोनच्या रेल्वेस्टेशनसमोर मी एक माणूस एका नव्या-कोऱ्या मोटारीजवळ बसून लॉटरी विकत असलेला पाहिला होता पहिलं बक्षिस म्हणजे ते मोटारीचं नवं मॉडेल नशिबाची परीक्षा पहाण्याची, त्यातलं 'थ्रिल' अनुभवण्याची साऱ्यांनाच इच्छा असते मटका असो अगर 'रौलट' चक्र असो! 'कसिनो' म्हणजे जुगारगृह तिथं शिरलेला राव रंक झाल्याशिवाय बाहेर पडत नाही हे स्वतः राव जाणून असतो पण 'ग्लोरियस अन्सर्टन्टी'शिवाय आयुष्याला चव नाही!

दिवसभर हायवेवरून ताशी एकशे साठ किलोमीटर वेगानं रपेट केल्यावर आणि रात्री हॉटेलमध्ये भरपेट जेवल्यावर माझा मेहुणा विचारू लागला, "रात्री कुठं जाऊ या?"

तूच सांग"

सेक्स फिल्म? नाइट क्लब? लाइव्ह शोज?"

निदान प्रत्यक्ष बायकोच्या भावाबरोबर बसून या गोष्टी पहायची माझी तयारी नव्हती मी म्हटलं, "एखादा कसिनो दाखव मला"

जरूर"

मंगेश अनेक वर्षं जर्मनीत राहिलेला तिथल्या सगळ्या वेडयावाकडया वाटा त्यानं तुडवलेल्या

बादन नावाच्या शहराकडे आम्ही निघालो. तिथला कसिनो युरोपभर प्रसिद्ध अन्य देशांतले लोक तिथल्या कसिनोला नियमितपणं भेट देतात कसिनोच्या प्रवेशद्वारापाशी पासपोर्ट, ओळखपत्र तपासलं जातं कसिनोचा एक नियम गमतीदार वाटला. बादनच्या कसिनोत खुद्द बादनवासियांना खेळायची परवानगी नाही! तसा नियम नसता तर बादनमधले सर्व रहिवासी कधीच रंक झाले असते!



**बादनच्या कसिनोचे एक गरगरते दर्शन**

कसिनोत शिरलो आणि 'माय फेअर लेडी' किंवा 'अॅना कॅरेनिना'मधला पार्टीचा प्रसग डोळ्यापुढ आला जर्मनीमधल्या 'उच्चभ्रू' समाजाचा तो मेळावाच होता ! कसिनोच्या अंतर्भागाची सजावट नेत्रसुखद होती. प्रशस्त दिवाणखान्यात प्रचड झुबर लावलेली होती. आणि भिंतींवर निवडक पेंटिंग्ज कसिनोची अतर्बाह्य बांधणी म्हणजे वास्तुकलेचा सुदर नमुना

वेगवेगळ्या दिवाणखान्यात वीसपंचवीस 'रौलट' चक्रं होती. एक ते छत्तीस-पर्यंतचे आकडे असलेला पट. छोटा चेंडू फिरत्या चक्राच्या मधोमध सोडायचा. चक्र थांबलं की चेंडू ज्या आकड्यावर असेल त्या आकड्यावर ज्यानं पैसे लावले असतील त्याला लावलेल्या पैशाच्या छत्तीसपट पैसे मिळतात. दोन आकड्यामधे रक्कम लावली आणि दोन्हींपैकी एक आकडा लागला तर अठरापट पैसे. काही ठिकाणी कमीत कमी पाच मार्क काही ठिकाणी कमीत कमी शंभर किंवा एक हजार मार्क 'रौलट' चक्राजवळ बसलेला कसिनोचा माणूस हातात लाकडाचं खोरं घेऊन बसला होता. त्याच्या चपळ हालचाली पहात रहाव्यात अशा. चेंडू चिमटीत घेऊन तो भोवऱ्यासारखा फिरवीत तो चक्रामधोमध टाकत होता आणि अक्षरश खोऱ्यानं पैसे ओढत होता. पत्त्यांचे विविध जुगार दुसऱ्या दिवाणखान्यात चाललेले होते पण प्रेक्षणीय जुगार वाटला 'रौलट'

"तू इंडियातून आलायस इंडिया रोप ट्रिक्स, मॅजिक यासाठी प्रसिद्ध आहे असा एखादा मॅजिकल आकडा सांग. बघू छत्तीसपट पैसे मिळतात का !" माझा मेहुणा मला म्हणाला

मी एक आकडा सांगितला. मग आणखी एक. तिसऱ्यादाही आकडा लागला नाही, तेव्हा इंडियाचा आणि जादूचा फारसा संबंध उरलेला नाही हे माझ्याप्रमाणं त्यालाही पटलं !

मग त्यानं एकतीस आणि बत्तीस यादरम्यान दहा मार्क लावले बत्तीस आकडा लागला एकशे ऐंशी मार्क खिशात टाकून मंगेश म्हणाला, "बस्स ! आता इथं रहायचं नाही आता नुसतं फिरू, बीअर घेऊ, गप्पा मारू"

त्याच्या संयमाचं कौतुक करीत आम्ही बीअर बारमधे आलो.

उंची कपडे घातलेले अनेक स्त्रीपुरुष मद्याचे घुटके घेत सभोवती बसले होते सेंटचा संमिश्र दरवळ वातावरणात हेलकावत होता पिंगट केसांची, निळ्या डोळ्यांची मुलं आसपास बागडत होती. बाजूच्या दिवाणखान्यात लक्षावधी डॉइच्-मार्क्स 'रौलट' चक्राभोवती भिरकावले जात होते पोर्चमधे विविध रंगाच्या, आकाराच्या शेकडो गाड्या मालकांची वाट पहात सुस्तावल्या होत्या

समृद्ध जर्मनीचं सपन्न, छोटं जग. प्रचंड संहार, राखरांगोळी आणि त्यातून जन्मलेला फीनिक्स पक्षी पंख फलकारीत उंच उंच झेप घेणारा फॉर हिम, स्काय इज द लिमिट !

७

# युरोपच्या मागीलदारी पहुडलेला हत्ती

जर्मनीतलं न्युरेबर्ग माग टाकून डॅन्युब खोऱ्यात शिरलो आणि पासॉव नावाच्या जर्मनी-ऑस्ट्रिया-सरहद्दीवरल्या गावापाशी पोचलो, तेव्हा जर्मनीचं नम्र आतिथ्य आणि ऑस्ट्रियाचा तुटक कुरेबाजपणा यांतला फरक लक्षात आला पासपोर्ट तपासण्यासाठी आमची गाडी थांबवण्यात आली (प्रवासात एक वेळ प्राण गेला तरी चालेल, पण पासपोर्ट जाता कामा नये ! तुमचे हाल मग कुत्रा खात नाही !) अगापेरान मजबूत असा एक अधिकारी आमच्या जवळ आला उग्र मिश्यांचा पाचुदा ओठावर मिरवणाऱ्या त्या धटिंगण अधिकाऱ्याच्या चेहेऱ्यावर गुर्मी होती आणि भाषेत जरब होती पासपोर्टवरलं अशोकस्तंभाचं चित्र पाहून त्यानं तो उघडला आणि डोळ्यांचं सूक्ष्मदर्शकयंत्र करून पुन्हापुन्हा न्याहाळला (मात्र अमेरिकन आणि अन्य युरोपीय प्रवाशांचे पासपोर्ट न पहाताच त्यानं परत दिले !) ज्या देशाच्या लोकसंख्येपेक्षा दर वर्षी बाहेरून येणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक आहे त्या देशाच्या अधिकाऱ्याला न शोभेल असा अविश्वास त्याच्या वागण्यात दिसला !

पौडाचे ऑस्ट्रियन फ्रँक करून घेतले आणि शेजारच्या 'टॉयलेट'मध्ये गेलो 'टॉयलेट' आतून आरशाप्रमाणं लखलखीत, पण दार उघडून आत घ्यावं म्हणून दोनचार ऑस्ट्रियन नाण्याची लाच द्यावी लागली ! भिंतीवरल्या ऑटोमॅटिक यंत्रात वेगवेगळ्या ब्रँडचे ऑस्ट्रियन 'निरोध' ! नाणं टाकावं आणि हवा तो ब्रँड हस्तगत करावा ! ऑस्ट्रियामधलं वास्तव्य सुखद व रोमांचकारी व्हावं म्हणून खास प्रवाशांसाठी केलेली ही सोय ! (प्रवाशांनी सुखद आठवणी बरोबर न्याव्यात, पण आपली आठवण म्हणून माग काही ठेवू नये यासाठीही ही सावधगिरी असावी !)

पासॉव सोडलं आणि दुपारच्या जेवणासाठी लिंझ या गावी थांबलो, तेव्हा सरहद्दीवरला तो उर्मट अधिकारी नियम नसून अपवाद आहे हे ध्यानात येऊन बरं वाटलं हॉटेल, दुकान, बँक --- सर्वांच्या बोलण्यात आर्जवी अगत्य ऑस्ट्रिया म्हणजे भाषेच्या बाबतीत जर्मनीचं भावंड लांबलचक, चमत्कारिक स्पेलिंगचे जर्मन

शब्द आम्हाला 'ग्रीक आणि लॅटिन' सारखे अगम्य ! हॉटेलमधे मेनूकार्ड मागवलं आणि डोळे मिटून एका पदार्थावर बोट ठेवलं 'Burenwurst Mit Senf' नावाचा हा पदार्थ होता. कोण जिवानिशी गेलं होतं कोण जाणे, पण पदार्थ चांगला लागला ! कोणत्या प्राणीविशेषानं आमच्या उदरभरणासाठी आपल्या प्राणाची कुरवंडी केली हे कळायला मार्ग नव्हता. 'एखादा शाकाहारी पदार्थ आहे का ?' हे मी अनेक चित्रविचित्र खुणा करून काउंटरवरल्या सोनेरी केसांच्या, लांबलचक नाकाच्या, गुबगुबीत मुलीला विचारलं. पण मी कशाबद्दल चौकशी करतोय हे काही केल्या तिच्या ध्यानात येईना ! तेव्हा भलताच गैरसमज होऊन प्रथम ग्रासे अनर्थ घडू नये म्हणून मी पुन्हा एकदा मेनूकार्ड न्याहाळलं आणि 'Wurstsemm-l' हा त्यातल्या त्यात निरुपद्रवी दिसणारा पदार्थ मागवला. हे प्रकरण मात्र चविष्ट होतं. जेवणाची चव बिघडू नये म्हणून बिलावरल्या ऑस्ट्रियन फ्रँकचा रुपयात हिशेब करण्याचा मोह आवरला आणि 'बनारसी पान —— कतरी सुपारी —— कत्था —— किमाम' हे स्तोत्र चघळीत व्हिएन्नाच्या दिशेकडे कूच केलं.

लिंझपासून व्हिएन्नापर्यंतचा हमरस्ता डोंगराळ भागातून जातो. एका बाजूला डोंगर आणि दुसऱ्या बाजूला डॅन्युब नदी यांच्या मध्ये ऑस्ट्रिया विसावलेला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना टुमदार खेडी दिसत होती. ही खेडी म्हणजे छोटया आकाराची शहरं. शहरात उपलब्ध असतात त्या सर्व सुखसोयी खेडयात मिळतात, फक्त वस्ती कमी. प्रत्येक घराभोवती प्रशस्त बाग. तीत गुलाबाचे ताटवे आणि सफरचंद किंवा पेअर यांसारख्या फळांची ठेंगणी झाडं. पावसाचं पाणी वाहून जावं म्हणून प्रत्येक घराला पन्हळ होती. इंग्लंड-जर्मनी देशांत अशी पन्हळ कुठं दिसली नव्हती. आपल्याकडे प्रत्येक खेडयात मारुतीचं देऊळ असतं तसं इथं प्रत्येक खेडयात कॅथेड्रल होतं. गाव जवळ आलं की पिवळसर सूर्यकिरणांत न्हाऊन निघालेलं कॅथेड्रलचं निमुळतं गॉथिक शिखर चमकू लागे. बहुतेक कॅथेड्रल्स अकराव्या-बाराव्या शतकात बांधलेली. मेल्क या गावचं कॅथेड्रल बरोक पद्धतीचं, सतराव्या शतकातलं होतं.

ऑस्ट्रियातले बहुतेक लोक रोमन कॅथलिक धर्माचे. पूर्वी या छोटयाशा देशात अडीचशे-तीनशे मठ होते. धर्मगुरू आणि जोगिणी यांची त्यांत गर्दी असायची. देशाची भौतिक समृद्धी होत गेली आणि आध्यात्मिक जीवनावरली निष्ठा कमी झाली. ऐहिक सुखाकडे पाठ फिरवून मठाच्या चार भिंतीत स्वत:ला का म्हणून कोंडून घ्यायचं ? 'फादर विदौट चिल्ड्रन' हे बिरूद का म्हणून मिरवायचं ? मठ ओस पडू लागले. त्यांची संख्या हाताच्या बोटावर मोजता येईल इतकी झाली.

ऐहिक सुखाच्या विविध वाटा खुल्या केल्या ऑस्ट्रियामधल्या एका जगप्रसिद्ध शहरानं —— व्हिएन्नानं ! ऑस्ट्रियातून व्हिएन्ना वजा करणं म्हणजे सत्तावीस

नक्षत्रातून पावसाची नऊ नक्षत्र वजा करणं ! व्हिएन्ना हे राजधानीचं शहर म्हणजे ऑस्ट्रियाचा प्राण ऑस्ट्रियाचा मानबिंदू व्हिएन्ना पाहिलं की ऑस्ट्रिया पाहिल्या-सारखं ऑस्ट्रियाच्या पंचाहत्तर लाख लोकसंख्येपैकी पचवीस टक्के लोकसंख्या व्हिएन्नात रहाते, आणि एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचा तीस टक्के भाग व्हिएन्ना निर्माण करतो ठेंगू, किडकिडीत शरीर आणि त्यावर भलमोठं डोकं, असा हा प्रकार आहे ! ऑस्ट्रिया देशाचा पसारा असेल महाराष्ट्रातल्या रत्नागिरी जिल्ह्याएवढा पच पंच उषःकाली एक व्हिएन्नानिवासी दुसऱ्याला म्हणाला म्हणे, ' चल, जरा व्यायाम करू. ऑस्ट्रियाभोवती एक फेरी मारून येऊ." त्यावर दुसरा उत्तरला, "नको बाबा. मला लंचपूर्वी व्हिएन्नाला परतायच नाही !"



डोळे मिटून केलेली पदार्थाची मागणी

व्हिएन्ना म्हणजे प्रचंड राजवाडे आणि राजेशाही बागा यांचं शहर. पूर्व आणि पश्चिम-युरोप यामधलं प्रवेशद्वार म्हणून व्हिएन्नाची दोन हजार वर्षांपासून ख्याती एके काळी रोमन साम्राज्याचा कारभार इथून चालत असे एकोणिसाव्या शतकात लंडन आणि पॅरिस यामागोमाग युरोपमधील तिसरं मोठं शहर म्हणून व्हिएन्ना ओळखलं जात होतं १८१५ मध्ये नेपोलियनचा वॉटर्लू येथे पराभव झाला तेव्हा जेतेमंडळी एकत्र जमली ती व्हिएन्नातच पहिल्या महायुद्धाची ठिणगी पडली ती ऑस्ट्रियाचा राजपुत्र आर्चड्यूक फर्डिनांड याचा खून झाल्यामुळं दोन्ही महायुद्धांत या चिमुकल्या देशानं व चिमुकल्या देशाच्या अवाढव्य राजधानीनं महत्त्वाचा भाग घेतला. चर्चिल एकदा त्याच्या विशिष्ट शैलीत म्हणाला होता, ' व्हिएन्ना इज लाइक अॅन एलिफंट इन बॅकयार्ड ! "

दूरवरच्या आल्प्स पर्वताच्या रांगांकडे किलकिल्या डोळ्यांनी पहात बसलेलं, डॅन्युब नदीच्या तीरावर अस्ताव्यस्त पहुडून आळोखेपिळोखे देणारं व्हिएन्ना शहर जगातलं फार महत्त्वाचं सांस्कृतिक केंद्र आहे फ्रॉइड, अॅडलर हे व्हिएन्नाचे स्टीफन झ्वाइग हा ख्यातकीर्त साहित्यकार इथलाच मोत्सार्ट, बेट्होव्हन, शूबर्ट, स्ट्रॉस हे पाश्चात्य संगीतक्षेत्रातले रथीमहारथी इथंच जन्मले आणि वाढले मोत्सार्टनं मॅजिक फ्ल्यूट'चा पहिला कार्यक्रम इथं केला बेट्होव्हनच्या श्रुतिमधुर सिम्फनीज्'मुळं पहिला थरार उठला तो व्हिएन्नाच्या नाजुक, लावण्यमय शरीरावर ! व्हिएन्नामधल्या दोन सामान्य, कळाहीन खोल्यांत राहून बेट्होव्हननं आपलं चिरंजीवी संगीत निर्माण केलं, हा एक अपूर्व चमत्कारच !

संगीताचा दरवळ व्हिएन्नाच्या कानाकोपऱ्यात पसरलेला जाणवतो संगीतक्षेत्रातल्या त्या जादूगाराचे ठिकठिकाणी पुतळे आहेत ते पाहून मनाला बरं वाटतं बेरकी चेहेऱ्याच्या तुंदिलतनू पुढाऱ्यांचे पुतळे पाहून वीट आलेला ( आपल्याकडले पुढारी इतके निर्लज्ज, की आपल्या पुतळ्याचं अनावरण आपणच करतात आणि धोतराचा सोगा सभाळीत आपणच टाळ्या पिटतात ! ) कलावंतांची कदर करणाऱ्या देशाचा भूतकाळ दिव्य आणि भविष्यकाळ रम्य असतो. 'ऑपेरा', 'बर्ग' यासारखी प्रचंड थिएटरं रात्री तुडुंब भरलेली असतात मावळतीच्या सूर्याला साक्षी ठेवून सुरू झालेली पाश्चात्य संगीताची मैफल पहाटेची चाहूल लागेपर्यंत चालू रहाते 'बर्ग' थिएटरमधला एखादा कार्यक्रम बेसूर झाला की उभं शहर खट्टू होतं !

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस —— १९४५ मध्ये —— जर्मन सैन्यानं व्हिएन्ना शहर उध्वस्त केलं 'सेंट स्टीफन्स', 'ऑपेरा' आणि 'बर्ग' ही थिएटरं बेचिराख झाली सत्तावीस लाख व्हिएन्नानिवासी बेघर झाले पण माथ्यावरचं छत्र गेलं म्हणून व्हिएन्नातला नागरिक हवालदिल झाला नाही. थिएटरं कोसळली म्हणून तो व्याकुळ

झाला ती लगोलग पुन्हा उभी राहिली, आणि अंगावरले फाटकेतुटके कपडे सावरीत, अर्धपोटी अवस्थेतले नागरिक सारं दुःख विसरून, साऱ्या वेदना बाजूला ठेवून पूर्वीच्या उत्साहानं कार्यक्रमांना गर्दी करू लागले संगीताचं आकंठ पान करताना वैयक्तिक दुःखाचं गाठोडं लक्षावधी निर्वासित नागरिकांनी डॅन्यूब नदीत भिरकावून दिलं !

संगीतानं झपाटलेल्या आबालवृद्ध स्त्रीपुरुषांमुळं केवळ थिएटरच गजबजतात असं नाही, व्हिएन्नाच्या गल्लीबोळांत ठाण मांडून बसलेल्या अनेक 'ताव्हेर्नां'मधे रात्रभर संगीताचा जल्लोष चालू असतो ! डॅन्यूब खोऱ्यातल्या द्राक्षांपासून तयार केलेल्या 'व्हाइट वाइन'चे पेले सथपणं एकामागोमाग एक संपवावेत, बोगद्यासारख्या दिसणाऱ्या 'ताव्हेर्न'मध्ये धूसर प्रकाशात तासन् तास बसावं, संगीताच्या लयीवर पावलं टाकीत येणाऱ्या उंच सडपातळ 'बारटेंडर' मुलीच्या कटाक्षाला 'तशीच' दाद देऊन मद्याची धुंदी अधिक गहिरी करावी आणि गिटाराच्या वा व्हायोलिनच्या साथीवर मुक्त कंठानं गाणाऱ्या तरुण गायकाचं मोकळेपणानं कौतुक करावं व्हिएन्नामधल्या वास्तव्यात 'सॉफिस्टिकेटेड' थिएटरपेक्षा 'ताव्हेर्न'चं मुक्त संगीत वृत्तीला अधिक मानवण्यासारखं होतं हा अनुभव पुन्हापुन्हा घेतला, आणि तरीही अतृप्त राहिलो

फर्डं इंग्रजी बोलणारी तिशीतली ऑस्ट्रियन टुरिस्ट गाइड उंचीनं सहा फूट आणि चांगली सशक्त होती आम्हा तीसेक प्रवाशांपुढं ती उभी राहिली तेव्हा आमच्यातले बरेचजण मनातल्या मनात लाजले ! दुसऱ्या महायुद्धाच्या खाईत होरपळून गेलेला आपला देश हळूहळू पुन्हा कसा भरभराटीला आला हे ती तपशीलवार सांगत होती आमच्या प्रश्नांना अस्खलित उत्तरं देत होती "जर्मनी-तली युद्धोत्तर आर्थिक पुनर्रचना दीर्घोद्योग आणि दृढ निश्चय याचं फळ आहे " ती सांगत होती, "बट् इन ऑस्ट्रिया, द मिरॅकल वॉज रिअली अ मिरॅकल !"

डाव्या विचारसरणीकडे झुकलेल्या ऑस्ट्रियात गेल्या सतरा-अठरा वर्षांत झपाट्यानं प्रगती झाली व्यापार व उद्योगधंदे ऑस्ट्रियाच्या अर्थकारणाचे प्रमुख आधारस्तंभ. कागद, कापड, यांत्रिक उपकरणी, वीजसामान यांचं उत्पादन करणारे अनेक उद्योग व्हिएन्नात व व्हिएन्नाबाहेर पसरलेले आहेत. तेल, लोखंड व मँगेनीज ही खनिजं भरपूर प्रमाणात मिळतात युद्ध संपल्यावर ऑस्ट्रियावर अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स आणि रशिया या चार देशांचा अमल होता दहा वर्षांनंतर या चारी राष्ट्रांनी एक करार करून ऑस्ट्रियावरला ताबा मागं घेतला ईडन, डलेस, मोलो-टोव्ह यांनी या करारावर सह्या केल्या २६ ऑक्टोबर १९५५ रोजी ऑस्ट्रियानं 'तटस्थ राष्ट्र' असल्याची आणि यापुढं कोणत्याही लष्करी करारात सामील न होण्याची घोषणा केली. आपली प्रतिज्ञा ऑस्ट्रियानं आजपर्यंत तंतोतंत पाळली आहे असं दिसतं

राजकीय आघाडीवर सामसूम झाल्यावर ऑस्ट्रियान सर्व लक्ष आर्थिक विकासावर केंद्रित केलं. प्रागतिक समाजवादी धोरणाचा अवलंब केला (सर्व सामान्य ऑस्ट्रियन, नात्सी आणि कम्युनिस्ट यांना एकाच मापान मोजतो, हे नमूद केलं पाहिजे !) अर्थकारणावर सरकारचा प्रभाव आहे व्हिएन्नामधले बहुतेक चाकरमान्ये सरकारी नोकरीत आहेत सरकारी थिएटरांत दोन हजारांहून अधिक लोकाना रोजगारी मिळते सर्व राजकीय पक्ष गुण्यागोविंदान नांदतात आणि सत्ता-स्थानापेक्षा जनकल्याण अधिक महत्त्वाच मानतात (अहो आश्चर्यम् !) सामाजिक सुरक्षेच्या तरतुदी विपुल प्रमाणात आहेत व्हिएन्नात ५२ हॉस्पिटलं आहेत, आणि डॉक्टर तर इतके की तीनशे रोग्यामागं एक डॉक्टर अस प्रमाण पडत. "तुम्हाला आजारी पडायचच असेल तर व्हिएन्नाला पडा !" आमची सहा-फुटी गाइड आपले भलेरुद खांदे उडवीत हसत म्हणाली

ऑस्ट्रियन लोकांना रशियाविषयी किती द्वेष वाटतो याच प्रत्यतर आल आम्ही आमच्या गाइडसह व्हिएन्ना शहराची सफर करीत होतो रस्त्याच्या मध्य-भागी एक युद्धस्मारक होत एक ऑस्ट्रियन सैनिक रशियन सैनिकाच्या गळ्यात गळा घालून पुढ पाऊल टाकत आहे, अस ते शिल्प होत

' वुई हेट रशियन्स !" ती तिरस्कारान पुन्हापुन्हा म्हणत होती, त्यांनी आम्हाला पुरेपूर लुटल !"

"मग हे युद्धस्मारक तुम्ही शाबूत का ठेवलय ?" मी तिला विचारल

बरोबर आहे तुमचा प्रश्न ! १९५५ मधे इथून निघून जाताना मोलो-टोव्हन आम्हाला अट घातली की हे स्मारक तसच राहू दिल पाहिजे ! आम्हाला ते मनाविरुद्ध मान्य कराव लागल !"

स्मारकाभोवती झाडझुडुप होती आणि शिल्पाखालचा चबुतरा त्यामुळ पूर्ण झाकून गेला होता त्या झाडांकडे बोट दाखवून ती छद्मी आवाजात म्हणाली, "ही झाडं झपाट्यान वाढतील अशी आम्हाला आशा आहे !"

क्रुश्चेव्हन १९६० साली व्हिएन्नाला भेट दिली होती त्या वेळची एक कथा तिन सांगितली व्हिएन्नाच्या 'टाउन हॉल'मधे पार्टी होती पार्टीला जर्मन चॅन्सेलर, व्हिएन्नाचा मेयर आणि अनेक 'व्ही आय पी' होते. जेवताना चॅन्सेलरनं आपल घड्याळ काढून दाखवलं त्यामागं 'जर्मनीच्या नागरिकांकडून भेट' असा मजकूर होता व्हिएन्नाच्या मेयरनही आपल घड्याळ उपस्थितांना दाखवल 'व्हिएन्नाच्या नागरिकांकडून कृतज्ञतापूर्वक भेट' अस त्यावर कोरलेलं होतं. आता क्रुश्चेव्हची पाळी आली क्रुश्चेव्ह काही हातातल घड्याळ काढून दाखवायला तयार होईना शेवटी बर दिसणार नाही म्हणून नाइलाजान त्यान ते काढल सर्व मंडळींनी उत्सुकतेन मागचा मजकूर वाचला 'ऑस्ट्रियन नागरिकांकडून ऑस्ट्रियाच्या



शोनब्रुन राजवाड्याचा नजरेत न मावणारा परिसर

अध्यक्षाला प्रेमपूर्वक भेट' असं त्यावर कोरलेलं होतं! "रशियानं ऑस्ट्रियाला किती आणि कसं लुटलं हे तुमच्या लक्षात आलं असेल!" आमची गाइड मिस्किलपणे उद्गारली.

ताजमहाल पाहिल्यावाचून आग्रा-सफर पूर्ण होत नाही, त्याप्रमाणं शोनब्रुन राजवाडा पाहिल्याशिवाय व्हिएन्ना-सफर पूर्ण होत नाही. ऑस्ट्रियात विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत राजेशाही होती आणि हॅप्सबर्ग घराण्याचा अमल होता. पिढ्यान् पिढ्या ऑस्ट्रिया-हंगेरी या दोन देशांवर राज्य करणाऱ्या हॅप्सबर्ग घराण्याचा ऑटो हा शेवटचा वारसदार. लोकाग्रहास्तव त्याला गादीचा हक्क सोडून हद्दपार व्हावं लागलं. ऑस्ट्रियाच्या सरहद्दीपासून जवळच बव्हेरिया येथे राजघराण्याचा निवास आहे. लोकशाही समाजवादी सरकारच्या राज्यात सुखानं नांदणारी ऑस्ट्रियन जनता राजघराण्याला पूर्णपणे विसरू शकत नाही ती केवळ शोनब्रुन या भव्य प्रासादामुळे. चौदाशे खोल्यांच्या ह्या राजप्रासादाला दर वर्षी नव्वद लाख प्रवासी भेट देतात.

'शोनब्रुन' याचा अर्थ 'सुरेख कारंजं.' डॅन्युबच्या खोऱ्यात पिकणाऱ्या द्राक्षापासून तयार होणाऱ्या मद्याशिवाय अन्य द्रवपदार्थ पिण्याची हॅप्सबर्ग राजांना सवय नव्हती. एका राजाला दुपारी खूप तहान लागली. मद्य मिळालं नाही, तेव्हा नाइलाजानं तो राजवाड्यासमोरच्या कारंज्यातून पडणारं थंडगार पाणी प्याला. हे पाणी त्याला अतिशय चवदार लागलं. व्हिएन्नापासून साठ मैलांवर असलेल्या स्टिरियन आल्प्समधील सेमरिंगकडून येणारं पाणी बर्फासारखं थंडगार असतं हे त्याला प्रथमच कळलं. त्यानं राजवाड्याचं नाव 'शोनब्रुन' ठेवलं.

या राजवाड्यातली मुख्य दालन फिरून पहाताना युरोपच्या इतिहासातल्या अनक महत्त्वाच्या घटना डोळ्यांसमोर उभ्या राहिल्या अठराव्या शतकात ऑस्ट्रियावर राज्य करणारी सम्राज्ञी मारिया थेरेसा ही बुद्धिमान, कर्तृत्वसपन्न तर होतीच, परतु कलेची कदर करणारी रसिकही होती अनेक देशातून उत्तमोत्तम पेंटिंग्ज तिन गोळा केली शिल्पकलेचे उत्कृष्ट नमुने तिन जगाच्या कानाकोपऱ्यांतून आणवले राजवाड्यातले प्रशस्त दिवाणखाने मारिया थेरेसान गोळा केलेल्या उत्तमोत्तम, निवडक कलाकृतींनी गजबजलेले आहेत प्रत्येक देशातील निवडक चित्राच एकेक, क्वचित एकाहून अधिक दालन आहेत सतराव्या, अठराव्या शतकातल्या प्रातिनिधिक चित्रकलेच मनोहारी दर्शन या दिवाणखान्यात घडत भारतीय दालनात राजपुताना शैलीतली चित्र पहायला मिळाली

मारिया थेरेसाला एकूण सोळा मुल झाली या सर्व मुलाची पोर्ट्रेटस् राजवाड्यात आहेत फ्रान्सची शेवटची राणी मारी अन्त्वायनेत ही मारियाची मुलगी 'लोकाना ब्रेड खायला मिळत नाहीत, तर ते केक का खात नाहीत ?' असा निरागस प्रश्न विचारणारी हीच ती मारी अन्त्वायनेत फ्रान्सच्या सोळाव्या लुईशी वयाच्या चौदाव्या वर्षी विवाहबद्ध झालेली, अठराव्या शतकातल्या वैभवशाली, विलासप्रिय फ्रेंच सरजामशाहीच सौंदर्यखनी प्रतीक अशी ही मारी फ्रेंच राज्यक्रातीच्या वेळी अत्यत बदनाम होऊन क्रातिकारकाकडून गिलोटिनखाली मारली गेली शोनब्रुन राजवाड्यातल्या एका दालनात मारीच पूर्णाकृती तैलचित्र आहे ते पाहून स्टीफन झ्वाइगन लिहिलेली तिची रोमहर्षक पण करुण कहाणी आठवली ऑस्ट्रिया व फ्रान्स निकट यावेत म्हणून मारिया थेरेसान मोठ्या मुत्सद्देगिरीन टाकलेला डाव सुफळ, सपूर्ण झाला नाही वैभवात नि विलासात लोळलेल्या मुलीपुढ नियतीन कोणत पान वाढून ठेवल होत हे पहायला सुदैवान मारिया थेरेसा जिवत राहिली नाही परतु राज्ञीपदाचा काटेरी मुकुट सहजपण पेलण्याइतकी आपली मुलगी चाणाक्ष नाही हे त्या मुत्सद्दी आईनं जाणलं होत थेरेसाला भवितव्याची चाहूल लागली होती आपल्या लाडक्या मुलीची काळजी करीतच थेरेसा देवाघरी गेली

पॅरिसला गेलो तेव्हा व्हेर्सायचा राजवाडा पहात असताना मायलेकींचा जीवनपट पुन्हा एकदा डोळ्यापुढून सरकत गेला

शोनब्रुन राजवाड्यात नेपोलियनन दोनदा तळ ठोकला होता — १८०६ आणि १८०९ साली नेपोलियन ज्या मचकावर झोपायचा तो मचक एका दालनात आहे नेपोलियन ठेंगूत जमा होणारा त्यामुळं मचकाची लांबी सहा फुटापेक्षा कमीच आहे (तो मंचक पहात असताना वाईजवळ मेणवली या गावी पाहिलेल्या नाना फडणीसाच्या लांबरुद मचकाची उगाचच आठवण झाली ! उचीन नाना नेपोलियनइतकेच होते, पण मचकासबधीच नानाच कर्तृत्व तर ते असो !)

नेपोलियनला फ्रान्सच्या गादीसाठी वारस हवा होता, आणि तोही राजघराण्यात जन्माला आलेल्या स्त्रीपासून झालेला ऑस्ट्रियन राजकन्या मारी लुई हिच्याशी त्यान लग्न केलं ते याच हेतून मेरी वालावास्का, डिझायरी, जोसेफाइन याच्या तुलनेनं मारी लुई रूपानं, बुद्धीन सामान्य होती, पण 'मी गर्भाशयाशी लग्न करतोय' अस दस्तुरखुद्द नेपोलियनचच म्हणण होत ! २० मार्च, १८११ रोजी नेपोलियनचा एकुलता एक औरस पुत्र जन्मला पुत्रप्राप्तीमुळं नेपोलियनला हर्षवायू व्हायची वेळ आली ! मुलाला तो 'किंग ऑफ रोम' म्हणे त्या नाजुक मुलाला सभाळणाऱ्या दाईला तो पुन्हापुन्हा सागे, "लक्षात ठेव ! उद्या साऱ्या जगावर जो राज्य करणार आहे तो तुझ्या हाती मी सोपवतोय ! त्याची नीट काळजी घे !"

पण या 'किंग ऑफ रोम'ची दशा-दशा झाली नेपोलियनला वाईट दिवस आले बदफैली मारी लुई एका सरदाराची रखेली म्हणून राहू लागली, आणि नेपोलियनपुत्र फ्रान्सिस या शोनब्रुन राजवाड्यात अडकून पडला जग पादाक्रांत करू पहाणारा नेपोलियन—शोनब्रुन राजवाड्याच्या प्रवेशद्वारावर गरुडाची शिल्पं उभारणारा नेपोलियन—लिओनार्दो दा विंचीच्या 'लास्ट सपर' या जगविख्यात चित्राची मोझाइक प्रतिकृती राजवाड्याच्या एका भिंतीवर लावणारा कलासक्त नेपोलियन ! त्याच्या औरस पुत्राचे हालहाल झाले जणू गरुडाचं पिल्लू कोंबडीच्या खुराड्यात अडकलं ! वयाच्या अवघ्या एकविसाव्या वर्षी त्याला क्षयरोग झाला ऑस्टरलिम व वॅग्रॅम येथील रणसग्रामात विजयी होऊन नेपोलियन ज्या महालात विसावला होता, त्याच महालात फ्रान्सिस ऊर्फ रेचस्टॅड याला ठेवण्यात आल कळायला लागल्यापासून वडिलांची भेट नाही, आणि मुलाला तोंड दाखवायला शरमणाऱ्या, प्रियकराच्या अनौरस पोरांना जन्म देण्यात कृतकृत्यता मानणाऱ्या कुलटा आईच वर्षानुवर्षं दर्शन नाही, अशा अवस्थेत नेपोलियनचा हा 'किंग ऑफ रोम' याच राजवाड्यात कोवळ्या वयात मरण पावला त्याला पॅरिसला येऊन रहायच होत, ते त्याच स्वप्न मृत्यूनंतर एकशे आठ वर्षांनी साकार झाल ! दुसऱ्या महायुद्धानतर फ्रेंच सरकारन त्याची शवपेटिका समारभानं पॅरिसला आणली, आणि नेपोलियनच्या थडग्याजवळ बाळराजांच थडग बाधण्यात आल

शोनब्रुन राजवाड्यात नेपोलियनच्या शयनगृहाजवळ फ्रान्सिसच शयनगृह आहे, तिथ त्याचा छोटा पलंग आहे आणि एका सोनेरी पिंजऱ्यात पेढा भरून ठेवलेला त्याचा लाडका पक्षी आहे 'या प्रचड राजवाड्यातला माझा एकुलता एक मित्र' असं फ्रान्सिस त्याच्याबद्दल म्हणत असे दोघा समानशीलात एवढ सख्य होत, त्यात नवल ते कोणत ?

+

व्हिएन्नामधल नाइट लाइफ प्रेक्षणीय असत ह्यात शकाच नाही. पण

# पाण्यावर हिंदकळणारी अद्‌भुत नगरी

ऑस्ट्रियाची सरहद्द ओलांडून इटलीत शिरलो तेव्हा आठवलं इटलीशी परिचय नसला तरी इटालियनच्या बिलंदरपणाशी आपला चांगला परिचय आहे !

लंडनमधल्या ऑस्ट्रियन वकिलातीत जाऊन आम्ही व्हिसा घेतला, आणि व्हिक्टोरिया स्टेशनच्या दिशेनं जाऊ लागलो, तोच एक ऐटबाज 'फियाट' कचकन ब्रेक लावून आमच्यापुढं उभी राहिली मी आणि वर्टी चमकलोच. टोकदार मिश्यांचा, रुंद कपाळाचा एक गुबगुबीत माणूस कार चालवीत होता पोषाखावरून लष्करी अधिकारी दिसत होता.

" डू यू वॉन्त स्वेद ओव्हरकोट ? मेड इन इतली ! व्हेरी फाइन ! व्हेरी सुपिरियर ! " त्यानं नीट पॅक केलेला एक ओव्हरकोट भराभर सोडला आणि आमच्यापुढं उलगडून दाखवला.

आम्ही तो उलटसुलट करून पाहिला. स्वेदचा स्पर्श मऊ, मखमली होता वस्तू चांगली, नवीकोरी होती

" तुम्ही का विकताय हा ? " — माझा सावध प्रश्न.

" खरं म्हणता ओव्हरकोट विकणं हा माझा व्यवसाय नाही. मी मिलिटरी ऑफिसर आहे इटलीहून इंग्लंडला सहज भटकत आलो पैशाचं पाकिट कुठंतरी हरवलं हा ओव्हरकोट येताना नवा खरेदी केला होता, पण जरुरी नाही पडली. आता पुन्हा इटलीला चाललोय पोचेपर्यंत पैसे खिशात हवेत — नाही का ? तिथं गेल्यानंतर दुसरा ओव्हरकोट घेईन. "

वर्टी ओव्हरकोटच्या मोहात पडले " किती किंमत ? "

" मी पंचवीस पौंडांना घेतला होता. तेवढे मिळाले तरी — "

" वीस पौंड देईन " वर्टी म्हणाले

" त्वेंती पौंद ? " तो विचारात पडला. मग म्हणाला, " ओके. आय ॲम इन हरी. "

वर्टीनी ओव्हरकोट घालून पाहिला वीस पौंड दिले. ज्या वेगानं तो आला त्याच वेगान भर्रदिशी निघून गेला

आम्ही इल्‌फर्डला आलो ओव्हरकोटच पॅकेट बाहेर ठेवलं आत किचनमधे गेलो वर्टीची मुलगी नीला विचारू लागली, "आज कुठ गेला होता ?"

"व्हिक्टोरियाला ऑस्ट्रियन एम्बसीकडे"

"मग एक इटालियन मिलिटरी ऑफिसर भेटला की नाही ? भर्रदिशी कार-मधनं येतो टुरिस्टना बरोबर हेरतो. महागडी वस्तू त्यांच्या गळचात घालतो"

"हो भेटला होता" वर्टी क्षीण आवाजात म्हणाले, "त्यानं एक ओव्हरकोट माझ्या गळ्यात घातला खरा !"

नीलानं ओव्हरकोट पाहिला "याची किंमत सातआठ पौंड असेल ! बाबा, तुम्ही किती दिले ?"

वर्टी ओव्हरकोट काखोटीला मारून वरच्या मजल्यावरच्या खोलीकडे कधीच पसार झाले होते !



इटलीतील ओव्हरकोट-खरेदी

इटलीच्या सरहद्दीवर पोचल्यावर आमचा एस्कॉर्ट जिनो बजावीत होता "इटलीत असेपर्यंत खिसे सभाळा ! तुम्ही रस्त्यावरून चालताना स्कूटरवरून खिसेकापू येतात आणि अलगद पाकिट मारतात ! पाकिट बॅगेत ठेवा. जरुरीपुरते पैसे बरोबर घ्या ! इटालियन लोकाना शिस्त नाही लाल सिग्नल असला तरी पादचारी रस्ता ओलांडतात. इथले मोटार चालवणारे लोक ट्रॅफिक रुलसची पर्वा करीत नाहीत. आपणच जीव मुठीत धरून फिराव लागतं ! "

आपण चुकून पुन्हा आपल्या देशात तर आलो नाही ना, अशी शंका आली !

गमत म्हणजे इटलीबद्दल धोक्याचे इशारे देणारा जिनो स्वत इटालियन होता !

व्हेनिसच्या दिशेनं आम्ही आगेकूच करीत होतो वाटेत एका गावात चहा घेण्यासाठी थाबलो हॉटेलात चहा नव्हता दूध न घातलेली 'कापुचिनो' नावाची कडक कॉफी हे इटालियन लोकांच आवडत पेय भातुकलीत शोभेल अशा छोट्या कपात मोजून दोन घोट भरेल इतकी कॉफी तीनशे लिरांना ! हे लिरा नामक नाण फार त्रासदायक ! एक लिरा म्हणजे आपला एक पैसा शभर लिरा म्हणजे एक रुपया साडेबाराशे लिरा, तेवीसशे लिरा असा हिशेब ध्यानात यायला कठिण जात इटलीत नाण्याची टचाई दिसली ऑटोमॅटिक टेलिफोनमधे वापरण्यासाठी हलकी-फुलकी 'टेलिफोन कॉइन्स' मिळतात ही नाणी लिराच्या बरोबरीन प्रचारात असतात 'कापुचिनो' घेतल्यावर काउटरवरल्या मुलीन मोड देताना बरीच टेलिफोन-नाणी हातावर ठेवली "मी इटलीत फोन करणार कुणाला ? " मी कुरकुरलो, " एवढी टेलिफोन कॉइन्स घेऊन करू काय मी ? '


' नोन् कापिस्को इग्लिश ! ' अस म्हणून ती खोडसाळपण हसली

माझी तक्रार तिच्या लक्षात आली होती, पण इग्रजी कळत नसल्याची सबब पुढं करून ती वेळ मारून नेत होती हे तिच्या खोडसाळ हास्यातून स्पष्ट दिसत होत

बसमधे बसून मी इटलीचा नकाशा उलगडून पाहिला उच टाचा असलेल्या लांबलचक बुटाच्या आकाराचा हा देश आहे बुटाच पुढच निमुळत टोक सिसिली बेटाला जणू हलकीशी ठोकर मारतंय

जिनो सागत होता, "सोफिया लॉरेन, जिना लोलोब्रिजिडा या इटालियन ! गॅलिलीयो, मार्कोनी इटलीचे सुपुत्र मार्को पोलो, कोलबस आमचा स्कूटर प्रथम कुणी शोधून काढली ?——आम्ही ! 'रोमन हॉलिडे' पाहिलाय ना तुम्ही ? इतकच काय, तुम्ही लोक जीन्स घालता आजकाल, तीदेखील इटलीचीच देणगी !"

बाहेर लख्ख उन्हं पडली होती वर निळ्याभोर आभाळाचा चकचकीत घुमट दिसत होता इतक लख्ख उन्ह आणि इतक निळंभोर आकाश युरोपमधे आणखी कुठं सहसा पहायला मिळत नाही ! मुंबईला ऑक्टोबरमधे असतो तसा



स्पॅगेटी-भक्षणाचा सोहळा

उकाडा असल्या उकाड्यात इटालियन माणूस काम कसं करतो याचा इंग्रज, फ्रेंच, जर्मन माणसाला अचंबा वाटत असतो पण इटालियन माणस या बाबतीत 'सुशेगाद' गोंयकरांना जवळ दुपारी तासभर सावकाशीनं जेवल्यावर तास-दीड तास वामकुक्षी केल्याशिवाय इटालियन माणूस काम करूच शकत नाही। त्यात युनियननं 'गो स्लो' संप पुकारला म्हणजे तो एक्झॅक्टली काय करतो कोण जाणे !

ब्रिटिश माणूस पहाताक्षणी सभ्य वाटतो जर्मन शिस्तप्रिय आणि कामसू वाटतो पण कुठलाही इटालियन पाहिला की बेरकी वाटतो इंग्रज जर्मन माणसं मितभाषी मोठ्यानं न हसणारी इटालियन माणूस मनमोकळेपणानं हसतो प्रसंगी हास्याचा गडगडाट करतो व्हेनिसला जाताना वाटेत एका हॉटेलात आम्ही लंच घेतलं आम्हाला वाढणारा वेटर, काउंटरवर बसणारा मॅनेजर, वाइनची ट्रॉली घेऊन येणारी 'साकी'—सारी मंडळी एकजात बेरकी दिसत होती

त्या 'साकी'नं गमतच केली. 'अपने बगीचेमें पैदा हुआ माल'— रेड वाइन, व्हाइट वाइन बाटल्यांनी भरलेली ट्रॉली ओढत घेऊन ती आली. ट्रॉलीवर बीअरच्या

बाटल्या होत्या आणि बीअरपेक्षा महाग बेचव 'मिनरल वॉटर'ही होत

आमच्या टेबलावर डिशेस, काटे-चमचे, नॅपकिन, रिकामे ग्लास होते ट्रॉली घेऊन येणारी ती मुलगी विचारू लागली, ' काय हव ? वाइन, बीअर की मिनरल वॉटर ? "

मला त्यापैकी काहीच नको होत मला शुद्ध, निर्मळ पाणी पोटभर प्यायच होत

" आय वॉन्ट प्लेन वॉटर "

" प्लेन वॉटर ? इट विल रस्ट युवर बॉडी फ्रॉम इनसाइड ! " ती डोळा मारून म्हणाली (खर म्हणता डोळा मारायच काही कारण नव्हत ) आणि अस म्हणून तिन पुढ काय कराव ? चक्क माझ्या पुढ्यातला ग्लास उचलून ट्रॉलीत पालथा ठवला आणि ती शांतपण पुढ निघून गेली

काउटरवरला टक्कल पडलेला गुबगुबीत म्हातारा स्पॅगेटी खाताना होणारी आमची धादल मिस्किलपणे न्याहाळत होता आणि आम्हाला 'सर्व्ह' करणारा बेअरा 'गिळा एकदाचे आणि टळा' हा ध्वन्यर्थ आपल्या लगबगीतून व्यक्त करीत होता इटालियन लोकाचा आइस्क्रीम, जेली, पुडिंग आदी ससस्थांवर विश्वास नसावा आम्ही 'थ्री कोर्स मील 'मधल्या शेवटच्या कोर्सची वाट पहात होतो या वरकी बेअरान खारीच्या शेपटासारख्या दिसणाऱ्या आपल्या भुऱ्या मिश्यांवरून हात फिरवीत पेअरची दोन फळ माझ्या डिशमधे आपटली ! एवढ करून वर 'पेर फाव्होर' म्हणत, कमरेत चारचारदा वाकत टिप मागायला गडी तयार !

मी तीनशे लिरा टिप दिली तेव्हा त्यान डोळे मिचकावले एकदरीत डोळा मारण वा मिचकावण ही इटलीची राष्ट्रीय सवय असावी !


मी जिनोला विचारल, " सध्या इटलीत कोणता पक्ष सत्तेवर आहे ? "

त्यान खांदे उडवले आणि तो म्हणाला, " देव जाणे ! "

' पतप्रधान कोण आहे ? "

" नाव आठवत नाही "

आपल्या देशाची थोर परपरा अभिमानान सागणाऱ्या जिनोला चालू राजकारणात मुळीच रस नव्हता इटलीमधे मी आठदहा दिवस राहिलो तेव्हा मला आढळून आल सर्वसामान्य इटालियन माणूस राजकारणाबद्दल उदासीन आहे ! गेल्या पचवीस वर्षांत इटलीच राजकारण अस्थिर बनल आहे युरोप-मधल्या या गरीब देशात अनेक समस्या आहेत, आणि त्या सोडवण्यासाठी स्थिर व समर्थ सरकारची देशाला अत्यत निकड आहे परतु द गॉल गादीवर येण्यापूर्वी फ्रान्समधे मत्रिमडळ जशी महिन्या–दोन महिन्यांत कोसळत असत, त्याप्रमाण इटलीचं झालेल आहे सत्ताधाऱ्यांबद्दल बोलताना इटालियन माणसाच्या जिभेवर कडवट चव रेंगाळत असते ती याचमुळं !



व्हेनिसमधील एका बोळातून गेलेला चिंचोळा जलमार्ग


पाश्चात्य देशाच्या सांस्कृतिक ठेव्याचं जतन केलं ते या देशानं पाश्चात्य देशाच्या संस्कृतीचा मूलस्रोत टायबर नदीच्या प्रवाहात शोधावा लागतो दीड हजार वर्षांपूर्वी मोठ्या दिमाखानं उभं राहिलेलं चिरेबंद रोमन साम्राज्य रानटी टोळ्यांच्या आक्रमणामुळं खिळखिळं झालं, आणि एकसंध इटली निर्माण व्हायला १८६१ साल उजाडावं लागलं काव्हूर, मॅझिनी आणि गॅरीबाल्डी या तीन सुपुत्रानी देशाचे इतस्तत पडलेले तुकडे एकत्र केले, आणि त्यातून एकसंध इटली जन्माला आला पण इटलीची दुर्दशा संपली नाही ! दोन महायुद्धाच्या खाईत इटली भाजून–पोळून निघाला मुसोलिनीच्या काळ्याकुट्ट कारकीर्दीत अदाधुंदीला पारावार राहिला नाही दुसरं महायुद्ध संपलं तेव्हा अंगावरल्या असंख्य जखमां- मुळे विव्हळणाऱ्या मरणोन्मुख माणसासारखी इटलीची अवस्था झाली होती १९४६ मध्ये इटलीनं नालायक राजेशाही झुगारून दिली, लोकशाही प्रजासत्ता- काच्या बाजूनं कौल दिला अंगावरल्या जखमा बऱ्या करणारा धन्वंतरी प्रजासत्ता- कात जन्म घेईल, असं इटालियन लोकांना वाटलं पण तसं घडलं नाही अजून इटली त्या धन्वंतरीची वाट पहात आहे !

दरम्यान सर्वसामान्य इटालियन अस्वस्थ झाला आहे मी पाहिलेल्या सर्व युरोपियन देशांत साडेपाच कोटी लोकसंख्येचा इटली हा एकच देश असा आहे की तिथं कम्युनिझम रुजायला आवश्यक अशी सुपीक भूमी आहे दारिद्र्य, बेकारी अन राजकीय अस्थिरता कम्युनिझमचा वेलू गगनावरी जाण्यासाठी एवढी खत पुरेशी आहेत। आज इटलीमधे भारताप्रमाण राजकीय पक्षांचा सुळसुळाट झाला आहे सामान्य माणसाचे प्रश्न सोडवण्यापेक्षा एकमेकाना तोंडघशी पाडण्यात हे पक्ष मश्गुल झाले आहेत मी इटलीत होतो तेव्हा पन्नासएक पक्षापैकी दहाबारा पक्ष एकत्र येऊन राज्यकारभार चालवत होते.

अन्य युरोपीय देशाच्या तुलनेन हा देश दरिद्री आहे असं मी म्हटलं खर, पण भारतातल्या दारिद्र्याशी इटलीच्या दारिद्र्याची तुलना होऊ शकत नाही सामाजिक सुरक्षा-उपाययोजनांमुळ इटलीतला सर्वसामान्य माणूस उपाशी वा अर्धपोटी रहात नाही कामगाराना तेरा महिन्यांचा पगार देण्याची शक्कल मुसोलिनीन शोधून काढली ख्रिसमसच्या वेळी आणखी एका महिन्याचा पगार (बोनस) कामगाराना मिळावा अस त्यान सुचवल मुसोलिनीचं लहान मुलांवर फार लक्ष होत देशाचे ते भावी नागरिक ते सुदृढ झाले पाहिजेत, सामर्थ्यशाली झाले पाहिजेत हे त्यान ओळखल होत इटलीतल्या शाळा-कॉलेजातल्या मुलाना सुट्टीत महिनाभर सरकारी खर्चान समुद्रकिनाऱ्यापाशी वा हिलस्टेशनवर आरामात रहात येत अशा जागी सरकारन 'हॉलिडे होम्स' बांधली आहेत मुलांच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी या प्रकारच सामूहिक जीवन उपकारक ठरत हे चतुर मुसोलिनीन जाणल होत

इटलीमधल कौटुंबिक जीवन विस्कळीत झालेल नाही या बाबतीत इटलीचं भारताशी साम्य आहे आजोबा-मुलगा-नातू अशा तीन पिढ्या सुखासमाधानान एकत्र नांदताना दिसतात इटलीमधे निवृत्तिवेतन शेवटच्या पगाराइतक (क्वचित ऐंशी टक्के) मिळतं वृद्ध माणस त्यामुळ कुटुंबावर भार होऊन बसत नाहीत त्याच पेन्शन एकूण मिळकतीत लक्षणीय भर टाकत असत

इटलीत वाहतूकखर्च फार कमी असतो खर्चाचा बराचसा भाग सरकार सोसत रोमला मी बसमधे बसलो तेव्हा स्वयंचलित यन्त्रात शभर लिरा (एक रुपया) टाकून तिकिट घेतलं कुठंही जा--शभर लिरा। इटलीत विविध व्यवसायांत मिळणाऱ्या वेतनात फार तफावत नसते बँकांत मात्र चांगले पगार मिळतात चार महिन्यांचा बोनसही मिळतो. इटलीत प्राप्तिकराचे दर फार कमी आहेत पेट्रोलसारख्या वस्तूवर व चैनीच्या चिजावर भरपूर कर असतात. सरकारी महसुलात अप्रत्यक्ष कराचा वाटा सर्वाधिक.



व्हेनिसमधील सेंट मार्क स्क्वेअर, रस्त्यावरील उपाहारगृह आणि कबुतरे

व्हेनिस शहराजवळील तार्व्हिसियो गावात एका टुमदार हॉटेलमधे आमचा मुक्काम होता हॉटेलमधे 'चेक इन' करताना प्रारंभी पासपोर्ट काळजीपूर्वक तपासण्यात आले मग खोल्यांच्या किल्ल्या मिळाल्या हॉटेलमधे सर्वांना जागा नव्हती शेवटी एका खोलीत तिघानी रहायच ठरवल मी, वर्टी व एक ऑस्ट्रेलियन

खोली सुरेख होती टेलिव्हिजन, टेलिफोन, अतर्भागात एका कोपऱ्यात नायलॉनच्या पडद्याच्या आडोशान तयार केलेल छोटं बाथरूम —— जेमतेम एका माणसाला उभ राहून शॉवर घेता येईल एवढ रूममधे एक छोट कपाट होत त्यात व्हिस्की, जीन, रम, बीअर —— सर्व काही होत किमतींचा चार्ट कपाटाच्या दारावर आतल्या बाजूला चिकटवलेला. खाली एक महत्त्वाची सूचना 'हव तेवढं ड्रिंक घ्या हॉटेल सोडताना प्यायलेल्या ड्रिंकच बिल भरा तुम्ही दिल नाही तर तुमच्या खोलीची व्यवस्था पहाणाऱ्या मेडच्या पगारातून तेवढे पैसे कापून घेतले जातील' इटालियन माणूस बिलदर खरा ! धमक्याबिमक्या देण्यापेक्षा माणसाच्या सद-सद्‌विवेकबुद्धीला आवाहन करण त्याला अधिक प्रशस्त वाटत

कपाटातल महागड मद्य घेण्याची आमची तयारी नव्हती 'डोव्हर-ऑस्टेंड' बोटीत अडाच पौंडाना मी जॉनी वॉकर' घेतली होती, आणि वर्टींनी 'बीफईटर' जिन आमच्या खोलीतला तिसरा ऑस्ट्रेलियन पाहुणा व्हेंट हा सिडनेचा. तिथ त्याची स्वत ची टॅक्सी होती पन्नासपचावन्न वयाचा, लालबुंद चेहेऱ्याचा. न्यायाधीशाच्या डोक्यावर विग असतो तशा प्रकारचे केस त्याच्या मस्तकावर होते. त्याची एकुलती एक मुलगी लडनला डॉक्टर होती "एकटेच आलात युरोप टूर-वर ?" या माझ्या प्रश्नाला त्यान "आय ॲम अ डिव्होर्सी" असं उत्तर दिल

व्हेंट दिलखुलास गप्पा मारत होता क्रिकेटबद्दल त्याला मनस्वी प्रेम ! सिडनेला होणारी एकही टेस्टमॅच त्यानं चुकवली नाही मॅचच्या पाच दिवसात तो पहाटे टॅक्सी चालवायचा मग सबंध दिवस मॅच पहायला मोकळा ! 'गवास्कर', 'गुप्ते', 'चद्रा' ही नाव त्यान बऱ्यापैकी उच्चारली 'वेंकटराघवन्' या नावाची त्यान अशी काही मोडतोड केली, की स्वत वेकट तिथ हजर असता तर त्यानं आपल नाव तत्काळ बदलायचा निर्णय घेतला असता !

मी आणि व्हेंटन व्हिस्की घेतली वर्टी 'बीफईटर' जिन पीत होते तीन पेग झाल्यावर आम्ही डिनरला जायच ठरवलं अजून पधरावीस मिनिट सवड होती व्हेंट म्हणाला, "मी शॉवर घेतो मग जाऊ."

व्हेंट कपाटामाग गेला टॉवेल-साबण हातावर घेऊन आमच्या समोरून दिगबरावस्थेत बाथरूमकडे गेला

वर्टींनी एकदोनदा डोळे चोळले. मग मला म्हटलं, "ही 'बीफईटर' फार कडक दिसते."



व्हेनिसमधील रंगीबेरंगी आकर्षक काचकलाकृतींनी नटलेले एक दुकान. अर्थात दुकानदाराचे 'आकर्षण' काही वेगळेच दिसते आहे!

" का बर ? "

" आत्ता हा ऑस्ट्रेलियन आपल्यासमोरून गेला ना, त्याच्या अंगावर मला एकही कपडा दिसला नाही ! "

" तो तसाच गेला—संपूर्ण नग्नावस्थेत ! "

" शक्य नाही ! "

" आल्यावर विचारू आपण "

पण विचाराव लागलंच नाही ! शॉवर घेऊन तो त्याच अवस्थेत बाहेर आला ! इतकंच नव्हे तर आमच्या समोरच्या खुर्चीवर बसला आणि भारत-ऑस्ट्रेलिया या दोन देशांदरम्यान किती जवळचे संबध आहेत यावर त्यानं दहा मिनिट आमचं बौद्धिक घेतल

वर्टी अस्वस्थ होते मला त्यात नवीन काही वाटल नाही. इल्फर्डला असताना आरोराबरोबर मी 'फोर्ड मोटार कंपनी'च्या क्लबमधे अनेकदा गेलो होतो हॉकी–फुटबॉल झाल्यावर सर्व खेळाडू दिगबरावस्थेत सामूहिक शॉवर घेतात हे मी पाहिल होतं. 'क्लब'मधे स्त्रियांसाठी वेगळी व्यवस्था होती त्याही तसच करतात अस ऐकलं होतं (पण पाहिल नव्हतं.) समलिंगी मनुष्यप्राण्यांत एवढा मोकळेपणा असायला काय हरकत आहे ? मात्र भारतीय मनाला ते सहजपण मानवेल अशी आज परिस्थिती नाही हेही खर !

नग्न माणूस पाहिला की जेवण मिळत नाही अस मी लहानपणापासून ऐकत आलो होतो हे मात्र खरं नाही ! व्हेंटचं बौद्धिक झाल्यावर आम्ही तिघे खाली गेलो आणि भरपूर जेवलो !

*

सकाळी ब्रेकफास्ट घेऊन व्हेनिसकडे निघालो लहानपणापासून या ना त्या कारणान व्हेनिसच नाव एकसारख कानावर यडकत असत 'पाण्यात उगवलेल जगातलं एकुलत एक शहर' ही व्हेनिसची ख्याती शेक्सपीयरनं आपल्या अनेक नाटकासाठी व्हेनिसची पार्श्वभूमी निवडली बायरनन 'ब्रिज ऑफ द साइज'ला आपल्या काव्यातून अमर केलं

जन्मात एकदा तरी व्हेनिस शहर पहाव !

खरच आहे ते व्हेनिस — द क्वीन ऑफ द सीज !

'ग्रँड कॅनाल'च्या दोन्ही बाजूना शंभरसव्वाशे बेटाच्या पुजक्यावर हलकंच तरगणारं अद्भुत शहर चारशे पूल अस्ताव्यस्त पसरलेल्या नगरीला एकत्र साधत आहेत

'व्हेपोरेट्टो' ह्या पाण्यावरल्या बसन चौथ्या स्टेशनावर उतरा. पियाझले रोमा हे त्या स्टेशनाच नाव. रियाल्तो ब्रिजवरून सेंट मार्क स्क्वेअरकडे वाकडा-

तिकडा रस्ता जातो तिथ पाचदहा मिनिटांत पोचाल. मी पुन्हापुन्हा हे मनाशी घोकतो आहे इटालियन उच्चार काय असतील ते असोत, मी स्पेलिंगप्रमाण उच्चार पाठ केले आहेत ! माझे उच्चार इटालियन माणसाला मुळीच समजणार नाहीत याची मला जाणीव आहे म्हणून तर सार लक्षात ठेवायची अधिकच जबाबदारी

'सेंट मार्क स्क्वेअर'कडे जाताना अरुंद नागमोडी वळणाचे अनेक बोळ पार करतोय बनारसला काशी-विश्वेश्वर देवळाकडे जाताना असल्याच बोळातून अंग चोरून चालाव लागत दोन्ही बाजूना ओळीन दुकान- शेक्सपीयरचा शायलॉक इथलाच माझ दुकानाकडे फारस लक्ष नाही मी स्क्वेअरकडे पोचतो प्रचंड चौक माणसांइतकीच कबुतरांची गर्दी. चौकाच्या तीन बाजूना हॉटेल बाहेरच्या बाजूला असंख्य खुर्च्या ठेवलेल्या 'कापुचिनो' पीत बसलेल्या गिऱ्हाइकाच्या मनोरंजनार्थ ऑर्केस्ट्राचे सूर

'दी मोस्ट ब्यूटीफुल रूम इन युरोप ! '

ज्या प्रवेशद्वारातून मी चौकात शिरलो त्यावर 'क्लॉक टॉवर' आहे ब्रॉंझच्या प्रचंड घंटवर टोले देण्याच्या पवित्र्यात दोन मूर उभे वरच्या बाजूला एक तरुणी व एक छोटा मुलगा यांच्या आकर्षक मूर्ती

चौकाच्या चौथ्या बाजूला 'बायझंटाइन' पद्धतीच भव्य चर्च आहे सेंट मार्क तिथ चिरनिद्रा घेत आहे नवव्या शतकातल छोटया आकाराच हे चर्च आज प्रचंड व प्रेक्षणीय दिसतं आहे व्हेनिसची समृद्धी, कलात्मकता आणि सौंदर्यप्रियता या चर्चमधे एकवटलेली आहे इथले खांब ग्रीसहून आणलेले आहेत, ब्रॉंझ रोमहून आणि सुवर्णाच नक्षीकाम पौर्वात्य देशाकडून चर्चच्या प्रवेशद्वारावरल्या कमानीवर ब्रॉंझचे चार उमदे, तेजपुंज घोडे माना किंचित कलत्या करून चौकातली रहदारी न्याहाळीत आहेत नेपोलियनन एके काळी ते पॅरिसला नेले होते पण संधी मिळताच ते पुन्हा व्हेनिसला परतले आणि आपल्या जागी विराजमान झाले त्याचे ब्रॉंझ धातूचे देह पिवळ्या सूर्यकिरणांत चकाकत आहेत चर्चच्या अंतर्भागामधल्या घुमटांवरल मोझाइक सूर्याच्या तेजाळत्या कवडशांमुळे झळाळत आहे निळ्या-तांबड्या काचतुकड्यानी बनवलेल्या आकृती जिवंत होऊन पुढ झेपावत आहेत

कितीही वेळ पाहिलं तरी समाधान होण्यासारख नाही ! मनोऱ्यावरले ते रोमनकालीन गुलाम इमानेइतबारे घंटचे टोल देतात म्हणून काळाचा हिशेब कळतो तरी ! एरवी त्या विस्तीर्ण पण सुबक चौकात काळ कायमचा थिजून गेलाय असं वाटत राहिलं असत

मी भानावर येतो चौकातल्या कॅफेसमोरची एक खुर्ची पकडतो 'कापुचिनो'चे कडवट घुटके घेत कबुतराचे, माणसांचे थवे न्याहाळत रहातो

"तुम्हाला काचसामानाचा कारखाना पहायचा आहे ? शोकेस पहायची आहे ?" कुणीतरी विचारतो

मी श्रीनगरला गेलो होतो तेव्हा 'तुम्हाला शालींचा कारखाना पहायचाय ?' असा प्रश्न विचारीत अनेकजण मागं यायचे, त्याची मला आठवण होते

मी यांत्रिकपणं त्याच्या मागून चालत रहातो पावलं रेंगाळतील म्हणून मागं वळून पहाण्याचं टाळतो

एक अरुंद जिना जिन्याच्या उजव्या बाजूला मोठा हॉल तिथं प्रात्यक्षिक पहाण्यासाठी बरीच माणसं बसलेली काचेचा उकळणारा रस किंचित थंड झालेला काचेचा उभट तुकडा चिमट्यात घेऊन भरघोस मिश्यांचा पन्नाशीतला इटालियन समोर बसलेल्या चिमुरडीला विचारतो, "काय हवं तुला ? कोणता प्राणी ?"

"आय वॉन्त होर्स !" त्या चिमुरडीनं कमानीवरले ऐटबाज घोडे पाहिले असतील बहुधा !

पहातापहाता काचेचा तुकडा रूप बदलतो चार पाय, निमुळती मान, टवकारलेले कान, भरघोस शेपूट चिमुरडीकडे रोखून पहाणारा सुबक होर्स ! मिनिट-दीड मिनिटाची सारी किमया !

"ओ !"

"मामा मिया !"

"लोव्हली !"

केवलप्रयोगी चीत्कारांनी हॉल भरून जातो ! अंतर्भागात शोरूम आहे काचेचे सुबक चषक अनेक तऱ्हांच्या मूर्ती जनावर, पक्षी, रक्षापात्र, फुलदाण्या एकमेकात मिसळलेल्या रंगछटा वस्तूला आणखी एक 'डायमेन्शन' प्राप्त करून देतात

"किंमत किती या टी-सेटची ?" सहा कपबश्या, किटली, मिल्कपॉट, शुगरपॉट असा संपूर्ण सरंजाम मनात येतं, किंमत परवडण्यासारखी असली तरी मुंबईपर्यंत संभाळून नेणं कठिणच

"ऐंशी हजार लिरा !"

बाप रे ! आठशे रुपये ?

"डोण्ट वरी ! तुम्ही ट्रॅव्हलर्स चेक द्या पत्ता द्या आम्ही आमच्या खर्चानं घरपोच पाठवू दोनअडीच महिन्यानी वस्तू घरी पोचेल ! ओके ?"

मी पत्ता न देता हळूच पुढे सटकतो

काचेचं सुबक मांजर—वीस हजार लिरा ! रंगीबेरंगी मासा—तीस हजार लिरा ! अंगावर लडिवाळ वळणं असलेली नग्न स्त्री 'अंगडाई' देत पहुडली

आहे आणि तिच्या शरीराच्या विशिष्ट भागाचा उपयोग सिगरेटची राख टाक-ण्यासाठी केला आहे—— किंमत फक्त पन्नास हजार लिरा !

मी पळ काढतो गोंडोलाच्या दिशेने जाऊ लागतो वाटेत एक पुस्तकाचं दुकान आहे "तुमच्याकडे नेपोलियनची डिक्शनरी आहे ?" मी विचारतो

' नेपोलियनची डिक्शनरी ? वॉत दू यू मीन ? '

" 'इंपॉसिबल' शब्द नसलेली डिक्शनरी म्हणजे नेपोलियनची डिक्शनरी ' आमचे उमाकांत ठोमरे नामक परममित्र आहेत, त्यांनी आणायला सांगितलीय "

मी डोळे मिचकावतो आणि 'आदिव्' म्हणत पुढे सटकतो

गोंडोला म्हणजे काश्मिरच्या शिकाऱ्यासारखा मी एका गोंडोल्यात बसतो. माझ्याबरोबर दिल्लीच्या दोन मुली आहेत सविता जैन आणि नंदिनी जैन एक जोडप आहे तो न्यूझीलंडहून आला आहे आणि ती कॅनडाहून ती त्याची लग्ना-पूर्वीची प्रेयसी आता दोघांची लग्नं झाली आहेत——त्याचं दुसऱ्या तरुणीशी, तिचं दुसऱ्या तरुणाशी आपापल्या जोडीदाराला थापा मारून दोघंही युरोप-प्रवासातला आनंद ओंजळी भरभरून पिताहेत ! आणखी एक अमेरिकन मुलगी निळ्याभोर डोळ्यांची चेहेरा इतका निष्पाप, की पाहिल्यावर गालगुच्चे घ्यावेत असं वाटत !

गोंडोलामधून प्रवास करणारे सहप्रवासी असायला हवेत तसे आहेत ! लाल आडव्या पट्ट्यांचा टी-शर्ट, निळी ढगळ पँट आणि पनामा हॅट घालून गोंडोलियर एका काठीने गोंडोला पुढे नेतो आहे

आमच्या जवळून आणखी पाच गोंडोला बदकाप्रमाणे पुढे सरकत आहेत मधोमध एका गोंडोलात सूट–टाय घातलेला पन्नाशीतला गायक इटालियन प्रेम-गीत म्हणतो आहे त्याच्या जवळ उभा असलेला त्याच्याच वयाचा इटालियन ॲकॉर्डियन वाजवीत आहे

पहातापहाता मावळत्या सूर्यकिरणांवरून डुचमळत आमचा गोंडोला बोळात शिरतो पुण्याच्या बोळांना लाजवतील अशा नागमोडी बोळकंड्या दोन्ही बाजूंना घर पाण्यावरल्या भिंतीवर शेवाळ साचलेलं जेहलमची आठवण करून देणार घाणेरड पाणी "व्हेनिस इज अ सिंकिंग सिटी " गोंडोलियर आम्ही न विचारता आम्हाला माहिती पुरवतो

" सिंकिंग सिटी ? " मी दचकतो

' डोन्ट वरी ! " तो मिस्किलपणे म्हणतो, "आमचं गाव अकराव्या शतका-पासून आजपर्यंत एक मीटर खाली गेलय ! "

" हां हां ! मग हरकत नाही ! " मी सुटकेचा निःश्वास सोडतो

"हा हा – हु हु – हा हा – हु हु·    " ॲकॉर्डियनच्या हृदयद्रावक सुरात आपल 'हृदय–पिळवटक' गीत गुफून तो सुटालला गायक गातच आहे! गोंडोला हिंदकळतो तेव्हा त्याचा आवाज अधिकच कापरा होतो

आम्ही किनाऱ्यावर पोचतो दूर राजवाड्यातले दिवे झगमगू लागतात व्हेनिस शहर हळूहळू रात्रीचा महोत्सव साजरा करण्यासाठी तयार होऊ लागतं आपल्या नवऱ्याला चुकवून आलेली 'ती' आणि आपल्या बायकोला चुकवून आलेला 'तो' एकमेकांच्या मिठीत देहभान विसरून गेली आहेत. आम्ही चौघं खाली उतरतो ती दोघ हपापल्याप्रमाणं एकमेकाची चुबनं घेत आहेत दोघांचे डोळे मिटलेले आहेत. .

गोंडोलियर आमच्याकडे पहात डोळे मिचकावतो आणि गोंडोला वल्हवीत त्या दोघांना घेऊन दूर दूर निघून जातो

इटालियन प्रेमगीताचे सूर वातावरणात हिंदकळत रहातात

ग्रंथालय


# १

## ‘रोम कोसळेल तेव्हा सगळं जग कोसळेल !’

जगातले समस्त रस्ते रोमकडे वळतात, हे खरं असलं तरी कलेविषयी अस्सल जाण असलेल्या, अभिजात अभिरुचीच्या माणसाचं मन वळत असतं फ्लोरेन्सकडे ! कुठल्याही इटालियन माणसाला विचारलंत, “ तुला कोणतं शहर प्रिय आहे ? ” तर तो क्षणाचाही विचार न करता उत्तर देईल “ अर्थात फ्लोरेन्स ! ”

पुनरुत्थानाच्या काळात युरोपच्या प्रकृतीत आणि संस्कृतीत मोलाची भर घालणाऱ्या या शहराविषयी इटालियनला विशेष प्रेम वाटतं. १९६६ च्या महापुरात हे अख्खं शहर पाण्याखाली गेलं तेव्हा इटलीला जबरदस्त धक्का बसला. दोन्ही महायुद्धातसुद्धा इटली तेवढी हादरून गेली नसेल ! लोकांनी पुढाकार घेऊन स्वप्रयत्नानं फ्लोरेन्सचं पुनर्वसन केलं. व्हेनिसहून मी फ्लोरेन्सला निघालो तेव्हा फ्लोरेन्सविषयी जे जे वाचलं होतं ते ते आठवू लागलं.

व्हेनिस ते फ्लोरेन्स हा प्रवास अतिशय सुखद आहे. ‘पो’ नदीकाठची सुपीक जमीन सतत दिसत रहाते. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना प्रचंड उद्‌गारचिन्हां-सारखी दिसणारी सायप्रसची झाडं आहेत. शिवाय फर, चेस्टनट, ओक आदी वृक्ष हारीनं उगवलेले. पो दरीत ठाण मांडून बसलेले. हा सबंध प्रदेश ‘ब्रेडबॉक्स ऑफ इटली’ म्हणून ओळखला जातो. इटालियनची रोजची भाकरी या प्रदेशातल्या सुपीक जमिनीवर अवलंबून आहे. मिलान आणि तुरिन या भागांत उद्योगधंदे भरभराटीला आले, आणि पो दरीत शेती करणारे हजारो शेतकरी काळी आई सोडून धुराड्याकडे धावले. पूर्वी जमीनमालक कुळाला पिकाचा पन्नास टक्के भाग देई. सरकारनं ऐंशीपचाऐंशी टक्के भाग देण्याची तयारी दाखवली. पण कारखान्याचा गजबजाट सोडून निसर्गाच्या सान्निध्यात परतायला शेतकरी तयार झाले नाहीत. डोंगर-माथ्यावर बांधलेली चिमुकली घरं उजाड झाली. गावच्या गावं ओस पडली. सुपीक जमिनीचे पट्टे नाहीसे होऊन पर्वतराजी दिसू लागतात तेव्हा शेतकऱ्यांचं हे स्थलान्तर विशेषत्वानं लक्षात येतं. छोट्यामोठ्या पर्वतांना वळसा घालून मोटार जाऊ लागली की दरीत उभी राहिलेली घरं खेळण्यांसारखी दिसू लागतात.



मेहेनतीचे गोड फळ ! इटलीमधील द्राक्ष-वाहतुकीचे एक दृश्य

बोगद्यातून गाडी बाहेर येते, आणि ती खेळणी अदृश्य होऊन चकाकत्या सूर्यप्रकाशात पर्वताच्या माथ्यावर वसलेली छोटी खेडी लक्ष वेधून घेतात. चर्चच्या लाल इमारतीभोवती घरांचे पुजके रात्री किर्रर्र जंगलातून असंख्य दिव्यांचे थव लुकलुकत असत. आता हे दृश्य दुर्मिळ झालं आहे ! ओबडधोबड डोंगराच्या अणकुचीदार टोकांना लोंबकळणारी खेडी पाहून 'लोक तिथं गेले कसे, आणि त्यांनी तिथं घरं बांधली कशी' असं वाटत रहातं. परंतु सुबक रस्ते न् घरं बांधण्याचा वारसा इटालियन लोकांना प्राचीनकालीन रोमकडून मिळालेला. सोसाट्याचा वारा आला तर खेडी पाचोळ्यासारखी भिरभिरत खाली येतील असं वाटत असलं, तरी शेकडो वर्षं ही खेडी न् त्यांतली घरं जागच्या जागी आहेत याचं आश्चर्य वाटतं. पूर्वी म्हणे मुलं गडगडून खाली पडू नयेत म्हणून त्यांना टेबलाच्या खुंटांना बांधून ठेवण्यात येई ! अंडं घरंगळत खाली येऊ नये म्हणून कोंबड्यांच्या मागल्या बाजूस छोटी करंडी कायमची बांधण्यात येई ! धुवांधार पाऊस पडू लागला की डोंगरमाथ्यावरून दरीकडे कोसळणाऱ्या धबधब्यामुळे उघडेबोडके खडक स्थानभ्रष्ट झाले पण ही खेडी आईच्या कुशीत रिघणाऱ्या पोरासारखी पर्वतांना चिकटून राहिली. पण एकाएकी 'गिरणोदय' झाला यंत्र-युगाची चाहूल येताच कृतघ्न मानव निसर्गाच्या लडिवाळ हाकेकडे दुर्लक्ष करून वाट फुटेल तिकडे चालता झाला. घरांचे हे पुजके अगतिकपणे धन्याच्या वाटेकडे डोळे लावून बसले आहेत. धन्यांनी कारखान्यांच्या आसपास सिमेंटच्या कठोर, टणक घरांत वसती केली आहे. मात्र अनाथ झालेली ही घरं पाडायला सरकारची परवानगी नाही !

शिकार हा इटालियन लोकांचा 'वीक पॉइंट' बंदुकीच्या उपयोगावर, शिकारीवर काही निर्बंध नाहीत. त्यामुळे दरीत, घाटमाथ्यावर किंवा नुसत्याच

पठारावर पशुपक्षी औषधाला मिळत नाहीत! उडणाऱ्यांत पतंग आणि चार पायांच्यांत पलंग सोडून इटालियन कशाचीही शिकार करतात, आणि मिळालेली शिकार भक्षण करतात! कधी कधी नेम चुकतो आणि दोन पायांचा माणूस मृत्युमुखी पडतो! 'डेली अमेरिकन' ह्या रोमहून प्रसिद्ध होणाऱ्या एकुलत्या एका इंग्रजी वृत्तपत्रात शिकारीच्या गोळ्यांमुळे चुकून झालेल्या अपघातांच्या अनेक वार्ता वाचायला मिळाल्या.

फ्लोरेन्सला पोचेपर्यंत इटलीमधल्या ग्रामीण जीवनाचं ओझरतं दर्शन घेता आलं. खेड्यातली घरं उतरत्या छपराची -- भारतातल्या घरांसारखीच -- होती. खिडक्यांवर पाखे, धान्य ठेवण्यासाठी कुणगे, कोंबड्यांसाठी खुराडी सर्वत्र आढ-ळली. काही घरात ब्रेड बनवण्यासाठी विटांच्या अव्हन्स होत्या. आठवड्यातून दोनतीन वेळा ब्रेडचा खरपूस वास घरात दरवळत असतो. रोज जेवताना लाग-णारी दारू घरच्या घरी तयार करण्यावर खेडुताचा कटाक्ष असतो. जर्मनीत ऱ्हाइन नदीच्या काठावर द्राक्षाचे मळे पाहिले होते. तसेच मैलन् मैल पसरलेले मळे इटलीत आहेत. द्राक्ष काढून ती पायानं तुडवून पूर्वी दारू तयार केली जाई. आता यंत्रं ते काम करतात. ग्रामीण भागातला इटालियन वीज वापरतो. काही शेतकरी कार स्कूटर वापरतात. पण अनेकदा आळसावलेला बैल सथगतीनं शेतात नांगर ओढताना दिसतो. बैलगाड्या किंवा एखादं हट्टी खेचर माल वाहून नेताना दिसतं. एखाद्या तळ्याकाठी दगडावर आपटून कपडे धुण्याची बायकांची पद्धत भारतीय पद्धतीची आठवण करून देणारी! किंबहुना स्वच्छ-नितळ सूर्यप्रकाश, नांगर ओढणारा बैल,



चिरतारुण्याने सळसळणाऱ्या रोममधील एक रस्ता

कपडे धुणाऱ्या बायका, खिडकीबाहेर लोंबणारे कपडे, वाहतुकीचे नियम न पाळणारा नागरिक, 'सुशेगाद' काम करणारे कामकरी, सार्वजनिक ठिकाणी खो खो हसणारे आणि अस्खलित बडबडणारे इटालियन -- हे सर्व पाहून युरोपात भारताशी सर्वाधिक साम्य असलेला देश म्हणजे इटली, याची खात्री पटते

फ्लोरेन्स हे दोन हजार वर्षांपूर्वी वसलेलं शहर कलाकाराच्या आणि बुद्धिमताच्या प्रतिभेचे सूर्यकिरण चौदाव्या शतकानंतर उणीपुरी दोनशे वर्षं उजळत राहिले ते याच ऐतिहासिक नगरीतून मध्ययुगीन अंधकार विरघळू लागला तो दान्ते, लिओनार्दो–द–विंची, मायकेल अँजेलो, गॅलिलियो आणि मॅकियावेली यांच्या प्रखर बुद्धिमत्तेच्या तेजामुळं आर्नो नदीच्या तीरावर ओठंगलेलं हे सुबक शहर 'सिटी ऑफ द लिली' म्हणून ओळखलं जातं अनेक प्रतिभाशाली कवींचा काव्य-विषय झालेलं हे शहर प्रौढ, परिपक्व न् समजुतदार वाटतं युरोपीय संस्कृती पुन्हा कधीकाळी अंधारयुगात ढकलली गेली तर चार युक्तीच्या गोष्टी सांगण्यासाठी पुन्हा फ्लोरेन्स पुढं येईल, पुनरुत्थानाच्या प्रक्रियेत सिंहाचा वाटा उचलेल, असं आजही वाटत रहातं

फ्लोरेन्स रेल्वेस्टेशन चकचकीत सगमरवरी दगडांनी बांधलेलं आहे स्टेशन-जवळच एका हॉटेलात आम्ही उतरलो शहर पहाण्यासाठी हॉटेलजवळून बस सुटत होती ती प्रत्येक प्रवाशाकडून सात हजार पाचशे लिरा घेते असं चौकशीअंती कळलं माझ्याबरोबरचे सर्व प्रवासी बसमध्ये बसले बसमधून शहर पहाण्यात काही मजा नाही, सवड असली तर रमतगमत ते पहावं, असं माझं मत आहे कुठंही थांबता येतं चार लोकांशी खुणांनी का होईना, बोलता येतं हॉटेलात जाऊन चवीनं काहीबाही खाता येतं (पुन्हा सात हजार पाचशे लिरा वाचणार होते ते निराळेच !) बसमधून दोन प्रमुख स्थळं दाखवणार होते सांता क्रोचेच चर्च आणि पोन्ते व्हेक्यो पूल ही दोन्ही ठिकाणं पायी चालत पहायचं मी ठरवलं

बसमधल्या मित्रांना 'टा–टा' करून मी स्टेशनसमोरच्या वृत्तपत्राच्या स्टॉलवर गेलो बरेच दिवस इंग्रजी वर्तमानपत्र वाचलं नव्हतं 'डेली अमेरिकन' हे रोमहून प्रसिद्ध होणारं इंग्रजी पत्र पाहून मी त्यावर झडप घातली. स्टॉलवर नग्न स्त्रियांची मुखपृष्ठं असलेली अनेक मासिकं दृश्यभागी ठेवलेली होती अनेक आंबटशौकी म्हातारे इटालियन्स उभ्याउभ्या ती चाळत स्त्रीसौंदर्याचा (डोळ्यांनी) आस्वाद घेत होते ! मी 'डेली अमेरिकन' उघडला भारतातल्या बातम्या दिसतात का ते पाहिलं पश्चिम-बंगालमध्ये महापुरामुळे झालेल्या हानीची वार्ता ठळक अक्षरात होती अग्रलेखाजवळ ग्रॅनव्हिल वॅट्स नामक वार्ताहरानं घेतलेली इंदिरा गांधींची मुलाखत, आणि उजवीकडे भांगाजवळचा पांढऱ्या केसांचा झुबका स्पष्टपणं दाखवणारा त्यांचा मोठा फोटो 'आणीबाणी आवश्यक



स्टॉलवरील स्त्रीसौंदर्याचा आस्वाद घेणारे इटालियन म्हातारे

होती, भारताच्या प्रगतीसाठी व स्थैर्यासाठी तोच एक मार्ग होता ' असं इंदिराबाईंचं नेहेमीप्रमाणं निर्लज्ज समर्थन !

वृत्तपत्र मिटून मी स्टेशनसमोरच्या हॉटेलात शिरलो तिथं 'एस्प्रेसो' कॉफी घेतली लिरा मोजून देताना मॅनेजरला विचारलं, साता क्रोचेचं चर्च इथून किती मैल आहे ? "

" पाचसात मिनिटांच्या अंतरावर '

' कारनं की चालत ?"

' कारनं दोन मिनिटं चालत पाचसात मिनिटं समोरच्या अंडरग्राउंड मार्गानं गेलात तर तीनचार मिनिटं पुरेत ! '

आणि पोन्ते व्हेक्यो पूल ? "

" चर्चपासून अर्धाएक मैल असेल "


मला आचार्य अत्र्यांच्या पुणेरी टांगेवाल्याची आठवण झाली. स्टेशनसमोरच्या घरी पोचवण्यासाठी तो बरंच भाडं मागतो आणि प्रवाशाला दोनचार मैल फिरवून आणतो इटालियन माणूस हा पुणेरी टांगेवाल्याइतकाच बिलंदर आहे अर्ध्याएक

मैलावरली दोन ठिकाणं दाखवायला साडेसात हजार लिरा भाडं म्हणजे टू मच् । अमेरिका, कॅनडा देशांतले प्रवासी पटापटा ट्रॅव्हलर्स चेक्स फाडत होते त्यांच ठीक आहे भारतीय पातळीच वेतन घेऊन इटालियन पातळीवरला खर्च मला पामराला कसा झेपणार ? तर ते असो ।

रमतगमत, रस्त्याच्या दोन्हीकडल्या दुकानांतल्या वस्तू पहात, किंमतीची चौकशी करत चर्चजवळ आलो, आणि समोर दत्त म्हणून उभ्या राहिलेल्या संगमरवरी इमारतीकडे पाहून जागच्या जागी थबकलो चर्चच्या वास्तूची सुबक सिमिट्री पहाताक्षणी डोळ्यांत भरते. तेराव्या शतकात फ्रान्सिस्कन धर्मगुरूसाठी बांधण्यात आलेल्या या चर्चची वास्तू चौकोनी संगमरवरी डिझाइनमुळे आजही नवीकोरी, नुकतीच बांधल्यासारखी वाटते ऐटबाजपणे उभा असलेला कॅथेड्रलचा लालभडक घुमट दूरवरून स्पष्ट दिसतो चर्चचा प्रचंड दरवाजा ब्रॉंझचा आहे आणि त्यावर ख्रिस्ताच्या पौराणिक कथा नीटसपणे कोरलेल्या आहेत चर्चच्या भिंतीआड गॅलिलिओ, रोझिनी, मॅकियावेली यासारखे इटलीचे अनेक सुपुत्र चिरनिद्रा घेत आहेत मायकेल अँजेलो रोमला ख्रिस्तवासी झाला, पण त्याचा देह 'स्मगल' करून इथं आणण्यात आला या जगविख्यात कलाकाराचा देह याच चर्चमधे विसावा घेत आहे 'हे चर्च म्हणजे इटलीच वेस्टमिन्स्टर ॲबी,' असं बायरन म्हणाला ते उगाच नव्हे । 'डिव्हाइन कॉमिडी' चा लेखक आणि अर्वाचीन इटालियन भाषेचा जनक दान्ते त्याच्या राजकीय हालचालीमुळे फ्लोरेन्सहून हद्दपार झाला म्हणून, नाहीतर त्याची समाधी या चर्चमधेच बांधली जायची पण कृतज्ञ फ्लोरेन्स-निवासी त्याला विसरलेला नाही चर्चसमोरच्या चौकात त्याचा पुतळा दिमाखानं उभा आहे हा सारा चौकच 'ओपन एयर म्युझियम म्हणता येईल इतका अनेक कलात्मक कलाकृतींनी विनटलेला आहे

इटलीमधल्या (व तसं पहाता साऱ्या युरोपमधल्या) चर्चमधे एक चांगली व्यवस्था असते चर्चच्या अंतर्भागात स्वयंचलित यंत्र असतात आपल्याला जी भाषा येते, त्या भाषेच्या यंत्रात नाणी घालायची आणि समोरच्या पडद्याकडे डोळा लावायचा चर्चच्या अंतर्भागातल्या चित्रांचे, विविध कलाकृतींचे क्लोजप्स पडद्या-वर उमटतात आणि त्याबरोबर मृदू, नम्र शब्दांत केलेली कॉमेंट्रीही पडद्यावर दिसणारा भाग मान वर करून न्याहाळण्याइतका मधे वेळ ठेवलेला असतो गाइडच्या आगाऊ बडबडीपेक्षा हा मार्ग उत्तम ।

चर्चभोवती अनेक दुकानं उघड्यावर मांडलेली होती आपल्याकडे जत्रेत असतात, तशी तयार कपडे, पादत्राणं, विविध डिझाइनच्या पिशव्या, काचसामान आदींची असंख्य दुकानं होती एका दुकानापाशी मी थांबलो वर लटकवलेली दोऱ्याची पिशवी आकर्षक होती विणकाम नावीन्यपूर्ण वाटलं मी किंमत विचारली



फ्लोरेन्स येथील ब्रुनेलेश्चो चर्चचा सौंदर्यसंपन्न भव्य घुमट

त्यान इटालियन भाषेत आकडा सांगितला मला इटालियन भाषा कळत नाही हे लक्षात येताच बराच वेळ विचार करून तो म्हणाला, "फोर्तिन हृद्रेद लिरा" चौदा रुपयाना पिशवी वाईट नव्हती तरी पण तो मागेल ती किमत देण गिऱ्हाइकाच्या भूमिकेला शोभल नसत! म्हणून मी 'टवेल्व्ह हड्रेड लिरा' देण्याची तयारी दाखवली

सि–सि!" तो म्हणाला, "ओके"

एका कागदाच्या पिशवीत त्यान ती बॅग बाधून दिली मी शभर लिराच्या बारा नोटा त्याच्या हातात ठेवल्या अगावर पाल पडल्याप्रमाण तो दचकला क्षणभर माझ्याकडे पहात राहिला मग म्हणाला, "त्वेल्व्ह थाउजद लिरा धिस इज त्वेल्व्ह हृद्रेद!'

'पण तू मला बाराशे लिरा मांगितलेस ना?'

"नो नो थाउजद — नॉत हृद्रेद!"

विणलेल्या दोरीची पिशवी एकशेवीस रुपयाना? 'फ्लोरेन्समे बनाया माल असला म्हणून काय झाल?

मी पिशवी त्याला परत दिली माझे पैसे परत घेतले

बाराशे लिराच्या नोटा माझ्या हातात अक्षरशः कोंबून तो खांदे उडवीत उद्‌गारला, " बाराशे लिरात ही कागदाची पिशवी मिळेल तुला ! "

इटलीचं भारताशी साम्य आहे असं मी म्हणतो ते उगाच नव्हे ! दुकाना-तल्या किंमती माळीकडे बोट दाखवलं म्हणजे 'ती फार महागडी आहे, तुम्हाला परवडायची नाही' असं खवचटपणे म्हणणाऱ्या पुण्या–मुंबईतल्या मत्सरी दुकान-दाराचं या फ्लोरेन्सच्या दुकानदाराशी फार जवळचं नातं आहे !

पोन्ते व्हेक्यो पुलावरून एक फेरफटका मारला. 'पोन्ते व्हेक्यो' म्हणजे 'जुना पूल'. दोन म्युझियम्सना जोडणाऱ्या दगडी कमानीच्या या टणक पुलाच्या दोन्ही बाजूंना छोटीछोटी दुकानं आहेत. सोळाव्या शतकापर्यंत या चिमुकल्या दुकानांत गायीच्या, डुकराच्या मांसाचे ढीग पुढ्यात घेऊन खाटिक बसत असत. फ्लोरेन्सचा ड्यूक मेदिची याच्या अभिजात कलादृष्टीला ते खटकलं. त्यानं या खाटकांना पुलावरून हाकललं आणि सोन्यामोत्याचं जडजवाहीर विकणाऱ्यांना ही दुकानं देऊन टाकली. आजही ही दुकानं पुलावर गुण्यागोविंदानं नांदताहेत.

मी त्या दागिन्यांचं दुरूनच दर्शन घेतलं ! त्यांच्या किंमती विचारण्याची हिंमत मला झाली नाही !

\+

आमचा रस्ता रोमला जाऊन मिळाला. पण त्यापूर्वी मी रोम दोनदा पाहिलं होतं. शाळेत असताना व्हिट्टोरियो डि-सिकाच्या 'बायसिकल थिफ'मधल्या बेकार तरुणाबरोबर मी रोमची सायकलवरून सफर केली होती. कॉलेजमधे असताना ग्रेगरी पेक आणि ऑड्री हेपबर्न याच्याबरोबर स्कूटरवरून 'रोमन हॉलिडे' साजरा केला होता.


आता मी तिसऱ्यांदा रोम पहात होतो ! तेही नेहेमीच्या माझ्या पद्धती-प्रमाणं –– चालत !

पण नाही ! रोमचं दर्शन तर मी लहानपणापासून पुन्हापुन्हा घेत आलो आहे ! हे शहर किती प्रकारे मुखवटे चढवून आपल्याला एकसारखं भेटत रहातं याची गणतीच करता येणार नाही !

टायबर नदीच्या प्रवाहात डोकावून पहाणाऱ्या रोमनं जगाला कायकाय दिलं याचा हिशेब करणं अशक्य ! कलेचे, तत्त्वज्ञानाचे, मानवी संस्कृतीच्या समृद्धीचे रस्ते रोमकडून फुटले, आणि जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोचले. प्राचीन ग्रीक संस्कृती रोमनं जतन केली, आणि त्या संस्कृतीत अनुस्यूत असलेला कलेचा नि तत्त्वज्ञानाचा महान वारसा जगाला दिला. पॅरिस शहरात उभ्या असलेल्या आयफेल टॉवरप्रमाणं रोमन संस्कृती साऱ्या जगाकडे पहात दिमाखानं उभी होती. शेकडो वर्षं उभी होती !

रोम पुन्हापुन्हा मला भेटलं आहे. शेक्सपीयर वाचताना रोमचं अनेकदा दर्शन घडलं आहे. 'डेंजर नोज फुल वेल दॅट सीझर इज मोअर डेंजरस दॅन शी ' असं गुर्मीनं म्हणणाऱ्या ज्युलियस सीझरला ब्रूटसचा 'दि मोस्ट अनकाइंडेस्ट कट ' लागला तो इथंच ! 'यू टू ब्रूटस ? देन फॉल सीझर ! ' परममित्राच्या विश्वासघातामुळे व्यथित होऊन बलाढ्य सीझर मरून पडला तो इथंच ! 'एज कॅनॉट विदर हर, नॉर कस्टम्स स्टेल हर इन्फिनिट व्हरायटी ' असं क्लिओपात्राचं यथार्थ वर्णन करणारा शेक्सपीयरचा अँटनी — साऱ्या जगावर अधिराज्य गाजवणारा अँटनी — रोममधे भेटला. स्त्रीसौंदर्यापायी त्याचं अधःपतन झालं ते इथंच !

पोपनं जगातल्या सर्वांत चिमुकल्या राज्याची स्थापना केली रोममधे. मायकेल अँजेलोच्या छिन्नीला नवा अर्थ लाभला तो इथंच. आपल्या मुलानं 'रोमचा राजा ' बनावं अशी नेपोलियनची इच्छा होती. नेपोलियनच्या चरित्रात रोमचं दर्शन घडलं होतं. 'ब्यूटी लाइज इन बिहोल्डर्स आय ' म्हणणारा तरुण कवी कीटस कोवळ्या वयात निधन पावला तो इथंच. पौगंडावस्थेत मोराव्हियाचं 'वुमन ऑफ रोम ' वाचलं होतं. स्त्री-पुरुष-संभोगाचं इतकं स्पष्ट वर्णन त्यापूर्वी कधी



१९०० वर्षांपूर्वीची भग्न पुराणवास्तू : कॉलसियम्


वाचली नव्हती म्हणूनच की काय, मनाच्या गाभाऱ्यात रोम 'जिप्सी 'सारख दडून राहिल !

दोन हजार वर्षांपूर्वीच्या इतिहासाचे भग्न अवशेष निरखत असताना एक-सारख वाटत होत हे तर आपण कुठतरी पाहिल आहे ! एका बाजूला कॉलसि-यमच चिरेबंदी घाटाच अजस्र धूड, दुसऱ्या बाजूला छिन्नविच्छिन्न होऊन पडलेल्या बलाढ्य योद्ध्यासारख दिसणार 'फोरम'च कलेवर मदांध रोमन सम्राटाच्या व त्याच्या उन्मत्त प्रजाजनाच्या पाशवी करमणुकीसाठी कॉलसियममधे ग्लॅडिएटर हिंस्र पशूशी झुज घेत अनेक दिवस उपाशी असलेले हिंस्र पशू जिवाच्या आकान्तान ग्लॅडिएटर्सवर झडप झालीत, त्याचा चेंदामेंदा करीत त्यांच्या रक्ताच शिंपण खालच्या वाळूत करीत एखाद्या शूर ग्लॅडिएटरन हिंस्र पशूशी यशस्वी झुज दिली तरी पुढच्या कुठल्यातरी झुजीमधे त्याला वाघ–सिंहाची भूक भागवावी लागे ! कधी दोन ग्लॅडिएटर घोड्यावर बसून विरुद्ध दिशांनी दौडत येत हातात तलवार किंवा भाले सम्राटासमोर क्षणभर थाबून ते पुकारा करीत, " हेल सीझर ! वुई हू आर अबौट टु डाय सॅल्युट यू ! "

कधी कोंडून ठेवलेल्या असख्य कैद्याना उघड्या मैदानात ढकलण्यात येई नव्यान स्थापन झालेल्या ख्रिश्चन धर्मात ते गेले, हाच त्या बिचाऱ्या कैद्यांचा अपराध ! पन्नास हजार रक्तपिपासू रोमन नागरिक त्या ख्रिस्ताच्या अनुयायांच्या आर्त किंकाळ्या आणि वाघसिंहांच्या तृप्त डरकाळ्या ऐकत आनदान बेहोष होत !

पूर्वी रोममधे एक म्हण प्रचलित होती 'जोपर्यंत कॉलसियम उभा आहे तोपर्यंत रोम उभ आहे कॉलसियम जेव्हा कोसळेल तेव्हा रोम कोसळेल आणि रोम कोसळल तर सर्व जग कोसळून पडेल ! ' एकोणीसशे वर्षांपूर्वी बांधलेली कॉलसियमची अतिभव्य वास्तू आजही जखमी अवस्थेत उभी आहे सापळ्यात अडकलेल्या सिंहाच्या शेपटीचे केस उदरान कुरतडावेत त्याप्रमाण कॉलसियमचे दगड, लोखडी बार नागरिकांनी पळवून नेले पण आजही ही वास्तू आपली शान संभाळून आहे कॉलसियमच्या अतर्भागात फिरताना, ज्या मैदानात भीषण झुजी होत असत ते मैदान पहाताना, ख्रिस्ती कैद्यांच्या उद्ध्वस्त कोठड्या न्याहाळताना क्षणोक्षणी रोमन साम्राज्याचा गर्वोद्धत दिमाख दृष्टीसमोर उभा रहात होता

पलिकडची फोरमची वास्तू रोमन नागरिकांच्या सुसंस्कृत जीवनाचा आविष्कार दर्शवणारी कॉलसियमपाशी ती उभी आहे हाही एक योगायोग इथ पूर्वी बाजारपेठ होती मग शनीच मंदिर, सीनेटची इमारत बांधण्यात आली ख्रिस्तपूर्व आठव्या शतकात टायबर नदीच्या किनाऱ्यावर दोन अनाथ जुळे मुलगे कुणीतरी टाकून दिलेले होते त्यांच्या असहाय रडण्यामुळे व्यथित झालेल्या एका लांडगीला पान्हा फुटला तिन दूध पाजून या दोन पोरांना वाढवल रोम्युलस आणि रेमस ही



सेंट अँजेलो कॅसलच्या दर्शनी भागाचे कलात्मक स्वरूप

त्याची नाव रोम्युलस हा महत्त्वाकांक्षी मुलगा त्यान नागर घेऊन फोरमभोवतीची जमीन नागरून काढली, आणि आपल्या नव्या राज्याच्या सीमा निश्चित केल्या ' रोम ' नाव पडलं ते या रोम्युलसवरून

शनीच्या देवळाच्या भव्य कमानी आजही तटस्थपणे उभ्या आहेत युद्ध चालू असताना राज्याचा खजिना देवळात ठेवला जाई देवळातला खजिना लुटण्याच धैर्य कुणी करणार नाही हे चाणाक्ष सीनेटर्स ओळखून होते । बाजारपेठेचे, सीनेटचे भग्न अवशेष रोम शहराच्या मध्यभागी आहेत बाजारपेठेच्या चिरेबंदी रस्त्यावर हिरवगार गवत उगवलं आहे त्यावरून पावल टाकताना, प्रचंड कमानीवरून नजर फिरवताना, समोरच उभारलेला सीझरचा पुतळा पहाताना वाटत रहात रोमच्या समृद्ध संस्कृतीच्या या पाउलखुणा ते कॉलसियम आणि हा फोरम । ती विकृती, आणि ही प्रकृती । एकाच मानवाची ही परस्परविरोधी अगं ।

सीनेट उभारून लोकशाही पद्धतीची मुहूर्तमेढ रोवणारी, न्यायव्यवस्थेला आकार देणारी रोमन संस्कृती. सीनेटच्या चौथऱ्यामागे नव्या रोममधली अर्वाचीन

वास्तू उभी आहे. या इमारतीच्या गच्चीत उभा राहून मुसोलिनी हुकूमशाहीचा उदोउदो करी. आपल्या राक्षसी महत्त्वाकांक्षेला उद्‌गार देई. ते सीनेट आणि मुसोलिनीची ही गच्ची. ती प्रकृती, आणि ही विकृती. मानवानं स्थापलेल्या राज्य-पद्धतीची दोन परस्परविरोधी अंग !

संस्कृतीच्या बऱ्यावाईट खुणा प्राणपणानं जपणार रोम अमर आहे .. चिरंतन आहे.

' व्हेन रोम फॉल्स -- द वर्ल्ड शॅल फॉल ! '

खरच आहे हे !

# बी अ रोमन व्हेन यू आर इन रोम

माझ्या ध्यानात राहिलेला एक चमत्कारिक योगायोग असा की, माझ्या युरोपच्या दोन महिन्यांच्या वास्तव्यात दोन पोप ख्रिस्तवासी झाले पोप पॉल व त्यानतर आलेला २६३ वा पोप (केवळ पस्तीस दिवस पोप म्हणून राहिलेला) अशा दोन धर्मगुरूच्या उत्तरयात्रा मी लडनला टी व्ही वर पाहिल्या गोव्याच्या माझ्या एका श्रद्धाळू किरिस्ताव मित्राला मी हे सांगितल, तेव्हा तो गभीरपणे म्हणाला, " बर झाल, तू युरोपहून दोन महिन्यांत परतलास ! "

मी रोमला होतो तेव्हा ' सिस्टीन चॅपेल'च्या धुराड्यातून पांढरा धूर बाहेर पडून तीन आठवडे झाले होते व्हॅटिकनच्या प्रवेशद्वारापाशी पोप पॉलच्या ' फ्युन-रल'ची निवडक छायाचित्र लावलेली होती ती पहात मी उभा होतो तेव्हा एक बुटका, लठ्ठ आणि रुद चेहेऱ्याचा इटालियन मला विचारू लागला, " इंदियन ? "

" हो मी इडियन आहे. "

" बॅद न्यूज फॉर यू "

" अस ? काय झाल ? "

" काल तुमचे कार्डिनल ग्रेसियस ख्रिस्तवासी झाले — मुबईला "

" ओ', आय् सी ! " नव्या पोपच्या निवडीच्या वेळी कार्डिनल ग्रेसियस आजारपणामुळ उपस्थित राहू शकले नव्हते हे मी वाचल होत त्यांच्या निधनाची वार्ता त्या गृहस्थान दिली

माझ्याशी तो गप्पा मारत उभा राहिला मी न विचारता व्हॅटिकनविषयी माहिती देऊ लागला पोपच्या शयनगृहाकडे बोट दाखवून तो उद्‌गारला, " दॅत इज हिज बेदरूम " मग मान जोरजोरान हलवून, नाक उडवून तो पुटपुटला, " न्यू पोप नो गुड "

एवढ म्हणून तो सेंट पीटर्स चर्चकडे जाणाऱ्या प्रवाशाच्या अखड प्रवाहात मिसळून गेला

दस्तुरखुद्द पोपसाहेबांच्या व्हॅटिकन सिटीसमोर उभा राहून एक इटालियन माणूस ' न्यू पोप नो गुड ' म्हणू शकतो ? मला गमत वाटली कडक सूट घालून लुटूलुटू चालणाऱ्या त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात मी ' व्हॅटिकन सिटी ' कडे वळलो

जगातल हे सर्वात चिमुकल राज्य विस्तार अर्ध्या स्क्वेअर किलोमीटरहून कमी लोकवस्ती जमतेम सातशे त्यापैकी साडेतीनशे लोकानी व्हॅटिकनच नागरिकत्व पत्करल आहे पोपचा लवाजमा, धर्मगुरू, जोगिणी, मूठभर सैनिक हे या लिलिपुटियन साम्राज्याचे नागरिक १९२९ मध्ये इटली सरकार आणि चर्च याच्यात करारनामा झाला आणि व्हॅटिकननगरीला सार्वभौमत्व बहाल करण्यात आल रोमच्या मध्यभागी असलेल्या या नगरीभोवती प्रचड भित आहे त्या भिंतीआड पोपच निवासस्थान, त्याच्या सातशे नागरिकांची रहाती घर, व्हॅटिकन म्युझियम आणि सिस्टीन चॅपेल ---- एवढ्या वास्तू आहेत ह्या 'सिटी ऑफ द सोल'मधून पोप पृथ्वीवरल्या चाळीस कोटीहून अधिक आत्म्यावर अधिराज्य गाजवतो !

व्हॅटिकन सिटीमधे तीन बाजूनी प्रवेश करता येतो आमच्या इटालियन मित्राचा निरोप घेऊन मी एका प्रवेशद्वारातून आत शिरलो तेव्हा दोन गार्डस्नी मला हटकल ' व्हिसा ? '

मी इटलीमधे प्रवेश करण्याचा व्हिसा दाखवला

' हा नव्हे व्हॅटिकन सिटीमध्ये प्रवेश करण्याचा व्हिसा "

" तो माझ्याकडे नाही "


" मग तुम्हाला आत जाता येणार नाही "

" पण मला सिस्टीन चॅपेल पहायची आहे ना '

" म्युझियमच दार मागच्या बाजूला आहे पधराशे लिरा देऊन म्युझियममधे जायच आत सिस्टीन चॅपेल आहे "

गार्डसच्या अगावरला पोषाख लाल, निळ्या न् पिवळ्या उभ्या पट्ट्याचा हा युनिफॉर्म मायकेलअँजेलोन तयार केला तिन्ही प्रवेशद्वारापाशी असले युनिफॉर्म पेहरून स्विस गार्डस् उभे असतात माग एका पोप क्लेमटला वाचवण्यासाठी स्विस शरीररक्षकानी आपले प्राण गमावले होते तेव्हापासून गार्डसच्या जागा भरण्यासाठी स्वित्झर्लंडहून येणाऱ्या जवानाची नेमणूक केली जाते झगमगीत युनिफॉर्ममधले, टोकदार भाले घेऊन उभे असलेले हे स्विस गार्डस् एखाद्या ऑपेरातल्या नटासारखे दिसतात

चार पावलांवर सेंट पीटर्स स्क्वेअर होता तिथ जाऊन मग व्हॅटिकन म्युझियममधे शिरायच असं ठरवल



सेंट पीटर्स स्क्वअरचं चैतन्यमय दर्शन

'सेंट पीटर्स' चौकात मध्यभागी उभं राहून भोवताली नजर फिरवली. दीड हजार वर्षांमागं कुणीतरी फेकून दिल्यासारखं वाटलं रोमन संस्कृतीची भव्यता न् दिव्यता दृष्टीसमोर पुन्हा उलगडत गेली दूरवर, एका बाजूला धन्याची वाट पहात तिष्ठणाऱ्या रंगीबेरंगी मोटारी ह्याच काय त्या विसाव्या शतकाची आठवण करून देणाऱ्या चर्चची प्रचंड वास्तू, तिला फुटलेले भव्य कमानींचे दोन हात; चर्चच्या मस्तकावर मुकुटासारखा दिसणारा लंबवर्तुळाकार घुमट सारा चौक कवळू पहाणाऱ्या कमानीत आणि बॅसिलिकाच्या वास्तूत शतकानुशतकं मूकपणे उभे असलेले प्रचंड स्तंभ, त्यावरली घाटदार न् शोभिवंत मूर्तींची रांग क्षणभर आपण स्वतःला हरवून बसतो कालाची गती निमिषमात्र कुंठित होते आणि कालचक्र उलटं फिरत रहातं सोळावं शतक चौथं शतक पहिलं शतक

ख्रिस्ताचे असंख्य अनुयायी चुन्याच्या, संगमरवरी दगडाच्या उद्ध्वस्त खाणीत, अंधेऱ्या बोळकंडीत जमा होत गुडघे टेकून प्रभू येशूची करुणा भाकत रोमन सम्राटाचे आज्ञाधारक सरदार या 'पाखंडी' कोकरांना शोधून काढीत मेंढ्या हाकाव्यात त्याप्रमाणं त्यांना हाकीत कॉलसियमकडे नेत जंगली श्वापदांना त्यांच्या मांसाचा नैवेद्य दाखवीत ! सेंट पीटर हा असाच एकदा श्वापदाच्या भक्ष्यस्थानी

पडला त्याच्या अनुयायानी त्याचे अवशेष पुरातन चर्चजवळ पुरून टाकले. चौथ्या शतकात सेट पीटरच्या थडग्यावर बांधलेल चर्च छोट होत सोळाव्या शतकात पोपन आज दिसणारी ही भव्य, विशाल वास्तू उभी केली. शभर वर्षं अनेक कारागीर खपत होते बर्निनी, मायकेलअँजलो, फमेल या नामवंतांचे अनुभवी कसबी हात त्यांवरून फिरत होते

लपतछपत खाणीत जाऊन, तिथल्या बोळकडीत धुळीत गुडघे टेकून बसणाऱ्या खिरस्ताच्या हजारो अनुयायाच्या स्वप्नातही नसेल की, कधीकाळी त्या जागी डोळे दिपवणारी, आकाशाला गवसणी घालू पहाणारी वास्तू उभी रहाणार आहे, क्रूर, उर्मट पंज्याखाली आपल्याला चिरडून टाकणार रोमन साम्राज्य नामशेष होणार आहे, आणि रोमन कॅथॉलिक चर्चचा घटानाद जगाच्या कानाकोपऱ्यात घुमत रहाणार आहे !

मायकेलअँजेलोन बांधलेल्या घुमटाखाली वॅसिलिकाच छप्पर आहे तिथ चर्च न् व्हॅटिकन सिटीची छायाचित्र विकणारी छोटी दुकान आहेत भेटवस्तूची, स्मृतिचिन्हाची दुकान आहेत आणि 'सानपिट्रिनी' कुटुंबियांची चिमुकली घरं आहेत चर्चची, घुमटाची डागडुजी करण हे या सानपिट्रिनीच काम कितीही उंच जाऊन



मायकेलअँजेलोची एक जगप्रसिद्ध कलाकृती 'मोसेस'



**येशूच्या अचेतन देहाकडे विश्रब्धपणे पहाणारी मेरी**
**मायकेलअँजेलोच्या छिन्नीतून निर्माण झालेली अमर कलाकृती**

हे लोक सफाईने काम करू शकतात असा त्यांचा लौकिक आहे या मंडळींना आणखी एक काम करावं लागतं पंचवीस वर्षांतून एकदा चर्चच्या उजव्या बाजूला एक दार आहे त्या दारासमोर दगडी भिंत आहे पंचवीस वर्षांनी एकदा नाताळाच्या प्रारंभी पोपसाहेब सोन्याचा हातोडा भिंतीवर मारतात आणि तीनदा म्हणतात, ' ओपन टु मी दि गेटस् ऑफ जस्टिस मग सानपिट्रिनी ती दगडी भिंत पाडून टाकतात या ' ज्युबिली गेट ' मधून चर्चमधे प्रवेश करणाऱ्यांची रीघ लागते साधंसुधं पुण्य नव्हे, महापुण्य मिळवण्यासाठी वर्ष संपत आलं की पोपसाहेब पुन्हा गेटपाशी येतात दारावर कृपावर्षाव करतात सानपिट्रिनी पुन्हा दगडी भिंत उभी करतात ' ज्युबिली गेट ' पंचवीस वर्षांसाठी बंद होतं

याशिवाय महापुण्य मिळवण्याचा आणखी एक मार्ग भाविकाना उपलब्ध आहे एका विशिष्ट दिवशी जो कॅथलिक गुडघ्यावर बसून चर्चच्या पायऱ्या चढून जातो त्याची स्वर्गात एक सीट रिझर्व होते

आपल्याकडे नाही का पंढरपूरचे माळकरी लोळतलोळत विठोबाकडे जात ? तिरुपतीला लोळत प्रदक्षिणा घातली तर ईप्सित साध्य होतं म्हणे ! धर्मातीत राज्याचा जयघोष करणारे आमचे नेते आणि नेत्या निवडणुकीचा नारळ फोडण्यापूर्वी तिरुपतीला लोळतलोळत प्रदक्षिणा नाही का घालत ?

मूर्तिपूजा, कर्मकांड, चमत्कार यांची रेवडी उडवणारे ख्रिस्तधर्मीय आपल्यासारखेच अंधश्रद्ध, धर्मवेडे आहेत ! चर्चमधील सेंट पीटरच्या ब्राँझ पुतळ्याचा उजवा पाय लक्षावधी भक्ताच्या चुंबनामुळे गुळगुळीत झालाय ! सेंट पीटर्स स्क्वेअरमधे उभं राहून भोवताली नजर फिरवताना, चर्चच्या अंतर्भागात फिरताना साक्षात्कार होतो तो हा !

✦

सेंट पीटर्स चर्च आणि व्हॅटिकन सिटी या वास्तूना युरोपमधल्या सांस्कृतिक पुनरुत्थानकाळात वावरणाऱ्या अनेक कलाकाराचा परिसस्पर्श झाला आहे परंतु दशांगुळं व्यापून उरतो तो मायकेलअँजेलो प्राचीन ग्रीस आणि रोमन संस्कृती रानटी टोळ्यांच्या आक्रमणामुळे नामशेष होऊ लागली, तेव्हा ती पानगळ थांबवणारा पुनरुत्थानाचा वसंतऋतू प्रथम बहरला तो इटलीमधे मायकेलअँजेलो हे त्या वसंतकाळात उमललेलं टपोरं पुष्प व्यक्तिमत्त्वाला विविध पैलू असलेलं, असख्य पाकळ्याचं, उत्फुल्ल पुष्प मायकेलअँजेलो शिल्पकार, वास्तुविशारद, चित्रकार आणि कवी होता शिल्पकार मायकेलअँजलोनं आपल्या छिन्नीतून निर्माण केलेल्या मोझेस, डेव्हिड आणि येशूचं मृत शरीर मांडीवर घेऊन बसलेली मेरी या मूर्ती सहजासहजी विसरण्यासारख्या नाहीत पीळदार व्यक्तिमत्त्वाचा अनुभवी मोझस, ओबडधोबड संगमरवरी पाषाणातून घडवलेला देखणा, नग्न डेव्हिड, आणि मांडीवरल्या येशूच्या अचेतन देहाकडे विश्रब्धपणे पहाणारी मेरी .. एका छिन्नीतून उमललेली किती वेगळी व्यक्तिचित्र !

'सिस्टीन चॅपेल'चं छत भित्तिलेपचित्रांनी सजवलेलं आहे मायकेलअँजेलोनं मानवी शरीराकृतीचा ध्यासच घेतला होता जसा काही ! तीनशे-साडेतीनशे व्यक्तिचित्राचा भव्य समुदाय चॅपेलच्या छतावर पहायला मिळतो. विश्वनिर्मिती, प्रलय आणि अध पतन या ख्रिस्ती पुराणकथा त्यान चित्रित केल्या आहेत मानवी शरीराच्या सर्व अवस्थाच चित्रण मायकेलअँजेलोन विलक्षण कौशल्यान केलं आहे. जमिनीपासून सत्तर फुटांवर बांधलेल्या प्लॅटफॉर्मवर उताणा पडून तो सतत चार वर्षं ही चित्र रंगवीत होता म्हणे ! 'लास्ट जजमेंट' हे भित्तिचित्र साकार करा-

यला त्याला तब्बल सात वर्षं लागली ! मग त्यान स्थापत्यकाराची भूमिका स्वीकारून सेंट पीटर्सचा घुमट बनवला आयुष्याच्या उत्तरकाळात तो स्थापत्यकार म्हणून वावरला

मायकेलअँजेलो ही एकच व्यक्ती नव्हती अनेक व्यक्तींच ते कलात्मक, युगायुगातून क्वचित जन्माला येणारं भव्य व्यक्तिमत्त्व होत तसाच तो पुनरुत्थान-काळातला त्याचा प्रतिस्पर्धी लिओनार्दो-द-विंची निसर्गातल्या अनेक रहस्यांपैकी मानव हे एक कुतूहलजनक कोड मानणारा 'मोना लिसा', 'लास्ट सपर' ही अमर चित्र काढणारा तो नुसताच चित्रकार नव्हता वास्तुविशारद, भूगर्भशास्त्रज्ञ, सशोधक, सगीतकार जगाच्या रगभूमीवर अनेक भूमिका एकाच वेळी बजाव-णारा तो कसबी नट होता शास्त्रज्ञ, सगीतकार, कवी आणि चित्रकार असलेला तो गॅलिलिओ

असली प्रचड, समर्थ आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्व चारी अगानी फुलत राहिली म्हणून शेकडो वर्ष घोरत पडलेला युरोप रिप् व्हॅन विंकलप्रमाण खडबडून जागा झाला आणि सास्कृतिक पुनरुत्थान सुफळ, सपूर्ण झाल

व्हॅटिकन म्युझियममधली भित्तिचित्र पहाताना भिंतींवर लावलेल्या, डोळ्यांत मावणार नाहीत एवढ्या टॅपिस्ट्रीज न्याहाळताना आणि रग उडाले असूनही आज-सुद्धा झपाटून टाकणाऱ्या सिस्टीन चॅपेलच्या छतावरल्या चित्रांच मान वाकडी



अर्थात हाही रस्ता रोमकडेच जातो !

करून दर्शन घेताना व्यावहारिक जगाशी असलेला आपला संबंध सुटतो इतिहासाचा प्रचंड कालखंड डोळ्यांपुढून सरकत रहातो. विशुद्ध न् कालातीत कलेच्या दर्शनान आपण अवाक् होऊन जातो

रोम शहराच्या एका टोकाला पँथिऑन ही सर्वांत पुरातन वास्तू आहे. चर्चच्या आकाराची गॉथिक, बरोक पद्धतीच्या चर्चेस पुनरुत्थानकाळानंतर बांधण्यात येऊ लागल्या त्यापूर्वी एक हजार एक वर्षांपूर्वीची ही टणक 'वास्तू आजही दिमाखानं उभी आहे या इमारतीच वैशिष्टच म्हणजे तिला छतच नाही त्या जागी आहे केवळ वर्तुळाकार पोकळी ! आत प्रवेश करून वर नजर टाकली की निळाभोर आकाशाचा गोल घुमट दिसतो पावसाच पाणी त्या उघड्या पोकळी-तून खाली कोसळल की त्याचा निचरा व्हावा याची पुरेपूर व्यवस्था करण्यात आली आहे

पँथिऑन ' आणखी एका कारणासाठी ध्यानात राहिल मॅडोनाच्या चित्रा-साठी विख्यात असलेला रॅफेअल हा मायकेलअँजेलोचा समकालीन चित्रकार वयाच्या अवघ्या सदतिसाव्या वर्षी मरण पावला त्याच थडग त्या वास्तूत आहे तो एका कोवळ्या वयाच्या सुंदर मुलीवर प्रेम करीत होता प्रीतीची परिणती विवाहात होणार होती तेवढ्यात त्याच अकाली निधन झाल त्याच्या थडग्याशेजारी त्या नियोजित वधूच्या थडग्यासाठी रिकामी जागा ठेवण्यात आलेली आहे आजही ती जागा रिकामीच आहे ! त्या मुलीच पुढ काय झाल कोण जाणे !

म्हैसूरच्या वृंदावन गार्डनची आठवण करून देणारी तिवोलीची शेकडो कारंजी, संगमरवरी दगडाच्या मोठमोठ्या खाणी पाहून संध्याकाळी हॉटेलमधे परतलो, तेव्हा मुंबईचे श्री नेतरवाला सपत्नीक भेटले सौ नेतरवाला पार्शी असून गुजराथी पद्धतीच मराठी सुरेख बोलत होत्या रोमच्या हॉटेलात त्यांच्याशी मराठीत गप्पा मारण्यात वेगळीच गमत होती युरोपमधे फिरण्याच त्यांना वेडच होत रोमला ही त्यांची दहावी भेट ! श्री नेतरवाला हे ख्यातनाम भूगर्भशास्त्रज्ञ बनारस हिंदू विद्यापीठात ते प्राध्यापक होते मग भारत–सरकारतर्फे इजिप्तला सल्लागार म्हणून त्यांनी बरीच वर्षं काम केल पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधे ते होते साहजिकच जिऑलॉजी विषयाचे तिथले प्राध्यापक कै क बा केळकर, प्रा प्रभाकर सोवनी ह्यांच्या आठवणी निघाल्या मराठी विश्वकोशाची त्यांनी बारकाईन चौकशी केली मी गोव्याचा हे कळल्यावर त्यांनी म्हटल, " तुमच गोवा फारच सुंदर आहे ! युरोपमधल कुठलही रमणीय ठिकाण घ्या, —– गोवा त्या तोडीच आहे ! "

मी ओव्हरकोटची कॉलर ताठ केली

सौ नेतरवाला संत्रस्त दिसल्या मी त्याच कारण विचारल

"काय सांगू ! आमची चांगलीच फटफजिती झालीय ! "

"काय झालं ? "

"ॲम्स्टरडॅमला आम्ही पार्कमधे ड्राय लच घेत बसलो होतो आमच पैशाच पाकिट कुणीतरी मारल ! त्यात पासपोर्ट होते ! प्रवासात जीव गेला तरी चालेल, पण पासपोर्ट जाता कामा नये ! तुमचे हाल कुत्रा खात नाही ! "

'मग काय केल ? "

'भारतीय वकिलातीत गेलो तिथ मोठा क्यू ! त्याचेही पासपोर्ट कुणीतरी चोरलेले ! माझ्या पर्समधे थोडे पैसे होते पासपोर्टबरोबर चेक्सही गेले ! कसेबसे आम्ही पैसे गोळा केले पासपोर्ट मिळवला इथूनच मुबईला परत जाणार आहोत पुढ जाण्याचा मूड नाही ! '

त्याचा मुबईचा पत्ता घेऊन मी त्यांचा निरोप घेतला

हॉटेलच्या अतर्भागात, डायनिंग हॉलमधे गेलो तेव्हा तरुण-तरुणींचा मोठा घोळका एका टेबलापाशी खिदळत बसला होता ही मडळी माझ्याबरोबरच प्रवास



बर्थ-डे किसचे प्रात्यक्षिक

करीत होती त्यामुळे तसा थोडा परिचय होता मडळी अमेरिका-कॅनडाहून युरोप-प्रवासाला आलेली इटलीवर बेहद्द खूष होती तिथल निसर्गसौंदर्य, पुरातन वास्तू पाहून स्तभित झालेली 'हौ ब्यूटीफुल !' 'ओ लोव्हली !' — अशा केवल-प्रयोगी अव्ययांत चीत्कारणारी

त्यांच हसणंखिदळण पहात मी एका बाजूच्या खुर्चीवर बसलो. इटलीची 'चिआन्ती' ही प्रसिद्ध रेड वाइन मागवून घुटके घेऊ लागलो मनात आल इग्रज तरुण-तरुणी पबमधे गोंधळ घालतील, पण अशा पॉश हॉटेलामधे तोंडात मिठाची गुळणी घेतल्याप्रमाण गप्प बसतील ! पण ही अमेरिकन मुलंमुली भलता-सलता शिष्टाचार पाळणार नाहीत ठिगळं लावलेली जीन्स घालून कुठही मुक्तपणे गाणी म्हणतील, दिलखुलास' खिदळतील जीवनरस भरभरून पिण्याची कला त्याच्याइतकी दुसऱ्या कुणाला साध्य झालेली नाही ! ती मडळी मला बोलवत होती आपल्या घोळक्यात सामील करू पहात होती मी उठून त्याच्या ग्रूपमधे बसलो विचारल, "काय चाललय तुमच ?"

"या मार्थाचा बर्थडे आहे आज तो सेलेब्रेट करतोय "

थोराड अगाची, पण विशीतली मार्था निळेभोर डोळे, मक्याच्या कणसात शेडी असते त्या रगाचे भुरे केस, दोन्ही कानाच्या पाळचांवर रक्ताचे थेब पडावेत त्याप्रमाण दिसणारी लालभडक कर्णभूषण, निमुळती न् पातळ जिवणी आणि चेहऱ्यावर एक आकर्षक असा भोळाभाबडा भाव तिच्या भोवतीची मुल तिची फिरकी' घेत होती, आणि ती स्मित करीत, शातपणे ते सहन करीत होती

ट्रॉलीवरून बीअर, वाइन, मिनरल वॉटर घेऊन वीसबावीस वर्षांचा एक इटालियन वेटर आला घोळक्यातला एक तरुण त्याला म्हणाला, "हे बघ, ह्या मुलीचा बर्थडे आहे तिचा बर्थडे-किस घे "

त्याला इग्रजी कळल नाही तो गोंधळून भरघोस मिश्यावरून हात फिरवीत मार्थाकडे नि त्या तरुणाकडे आळीपाळीन पहात राहिला

तो तरुण उठला त्यान मार्थाच्या गालाच चुबन घेतलं आणि खुणेन वेटरला तस करायला सांगितल


तो वेटर चक्क लाजला ! लालबुद होऊन ट्रॉली सरकवीत पळून गेला !

घोळका खिदळू लागला मीही हसू लागलो

"तो वेटर तुमच्यासारखा आहे." अमेरिकन तरुण मला म्हणाला.

' माझ्यासारखा ? म्हणजे कसा ?" मी गोंधळून विचारल

"लाजराबुजरा ! इटालियन्स आणि इंडियन्स फार ऑर्थॉडॉक्स ! फ्री सोसायटी त्याना ठाऊकच नाही ! बॅकवर्ड !'



'आर्किटेक्चरल ज्योक' पीझाचा झुलता मनोरा

'इटालियन्सच मला ठाऊक नाही पण इंडियन्स एवढे मागासलेले नाहीत!" आमच्या अस्मितेला हा अमेरिकन तरुण धक्का लावतो म्हणजे काय? मला ते सहन झालं नाही.

"असं? देन गिव्ह मार्था अ बर्थडे-किस!"

"ओ, शुअर!" मी त्याचं आव्हान स्वीकारलं. यशस्वीपणे तडीला नेलं! प्रश्न माझा नव्हता, समस्त भारतीयांच्या अस्मितेचा होता ना!

सर्वांनी टाळ्या वाजवल्या. ड्रिंकचा आणखी एक राउंड झाला.

मनात म्हटलं 'बी रोमन व्हेन यू आर इन रोम!'

*

बहुतेक इटालियन्स कॉक्टेल–पार्टीच्या वेळी तीन गोष्टींविषयी चर्चा करत असतात — फूटबॉल, सतत बदलणारं सरकार आणि पीझाचा झुकता मनोरा!

आठशे वर्षांपूर्वी बांधलेला हा मनोरा आज सतरा फूट कललेला आहे आर्नो नदीच्या बाजूला झुकलेल्या मनोऱ्यान चक्क जमिनीला लघुकोन केला आहे बोन्नानो पिसानो ह्या वास्तुशास्त्रज्ञान हा मनोरा ११७३ मध्ये बाधायला घेतला कुठ काय चुकल कोण जाणे, तीन मजल्यापर्यंत बांधकाम पूर्ण झालं आणि मनोऱ्याचा पाया आर्नो नदीच्या वाळूत खचू लागला तोही एका बाजून ! पिसानोन पुढले दोन मजले बांधताना ते उलटया बाजून झुकू दिले काम अपूर्ण राहिल पुढल्या शतकात सायमॉन नावाच्या वास्तुशास्त्रज्ञान पायाजवळच्या भिंतींना तेरा फूट जाडी दिली, आणि वरचे मजले सहा ते आठ फूट जाडीचे बाधले रॉबर्ट ब्राउनिंगन १८४६ मधे एलिझाबेथ बॅरटला पळवून आणल ते पीझाला त्या वेळी मनोरा १३ फूट कललेला होता त्यापूर्वी सतत पाचशे वर्षं मनोऱ्याच्या घटा रात्री वाजत असत ब्राउनिंग पीझाला असतानाच घटा वाजवण बद झालं घंटेच्या कपामुळे मनोरा आणखी वाकायला नको म्हणून ही खबरदारी घेण्यात आली

त्यानतर अनेक वादळ आली, भूकपाचे छोटे धक्के बसले, दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी जर्मन सैनिकानी टाकलेल्या बॉबमुळ आसपासचे आर्नो नदीवरचे पूल उद्ध्वस्त झाले पण पीझाचा मनोरा शरीर किंचित झुकवून शांतपणे हे पहात होता ! दीड लाख प्रवासी तो आजही दर वर्षी अगाखाद्यावर खेळवीत असतो !

१९७३ ते १९७८ या काळात हा मनोरा दर वर्षी एक-सोळांश इच झुकत होता इटली-सरकार चितातुर झाल यावर उपाय काय ? सहा लक्ष चाळीस हजार रुपयाच बक्षिस लावण्यात आल तीन हजार पत्र आली मनोऱ्याखालच पाणी गोठवाव, शेजारी स्वातंत्र्यदेवते'सारखा पुतळा बांधून त्याचा आधार मनोऱ्याला द्यावा, येथपासून मनोरा पाडून टाकावा आणि पुन्हा बाधावा, येथपर्यंत अनेक उपाययोजना सुचवण्यात आल्या

साडेसहा लक्ष रुपयाचा प्रश्न अनुत्तरित राहिला ! एकही सूचना सरकारन स्वीकारली नाही

आमची बस आर्नो नदीच्या पुलावरून चालली होती, तेव्हा एकापाठोपाठ पाच अॅम्ब्युलन्स गाड्या हॉर्न वाजवीत सुसाट पळत असलेल्या दिसल्या

म्हणजे ? पीझाचा मनोरा जागेवर आहे ना ? आपली खेप फुकट जाणार ? जगातल हे महान आश्चर्य पहाण्याची सधी थोडक्यात हुकणार ? आठशे वर्षांचा हा पुरातन वृद्ध खाली कोसळला की काय ? त्याखाली प्रवासी चिरडलेबिरडले की काय ?

बसन वळण घेतल, आणि पाढराशुभ्र मनोरा उभा असलेला -- नव्हे, वाकलेला दिसला मी सुटकेचा निःश्वास सोडला रिकाम्या अँब्युलन्स नजीकच्या हॉस्पिटलकडे रोजच्या ड्यूटीवर निघालेल्या होत्या ! मी उगाच घाबरलो होतो !

पाचशे लिरा देऊन मी २९३ संगमरवरी पायऱ्या चढून वर गेलो बेल टॉवरपर्यंत चढलो खवळलेल्या समुद्रात कलडलेल्या बोटीच्या पायऱ्या चढत असल्यासारख वाटत होत ! दूरवर कॉर्सिका सामुद्रधुनी दिसत होती कॅरारा इथल्या संगमरवरी दगडाच्या खाणी दुपारच्या उन्हात तळपत होत्या या खाणीतून दीड लाख टन दगड आणून हा जगप्रसिद्ध 'आर्किटेक्चरल ज्योक' उभारण्यात आला होता मागच्या बाजूला हिरवळ होती चोचीत चोच घालून बसलेल्या पक्ष्याप्रमाणे अनेक तरुणतरुणी तोंडात तोंड घालून हिरवळीवर पहुडली होती देहभान विसरून बेहोष झालेली जोडपी मनोऱ्याच्या सान्निध्यात प्रणयाचे रग उधळत होती कधीकाळी रॉबर्ट ब्राउनिंग एलिझाबेथला घेऊन इथच आला असेल का ? 'गॉड इज इन हिज हेवन अँड ऑल इज राइट विथ् द वर्ल्ड' असा दिलासा त्यानं इथच एलिझाबेथला दिला असेल का ?

आणि तो गॅलिलीओ ? मी उभा होतो तिथच तो यायचा वरून वेगवेगळ्या वजनाच्या वस्तू खाली टाकायचा गुरुत्वाकर्षणामुळे वस्तू जमिनीकडे आकर्षित होतात आणि वस्तूची वजन वेगवेगळी असली तरी त्या सारख्याच गतीन खाली पडतात हे तो लोकांना पटवून द्यायचा आपला सिद्धान्त त्यान पीझाच्या झुकत्या मनोऱ्याच्या टोकावर उभ राहून माडला, सिद्ध केला न्यूटनच्या सफरचंदाला एवढी नाट्यपूर्ण पार्श्वभूमी लाभलेली नव्हती !

आमची गाडी स्वित्झर्लंडच्या रोखान धावत होती, आणि दुरून पीझाचा शुभ्र मनोरा अधिकच झुकल्यासारखा वाटत होता

# शांतता ! हे स्वित्झर्लंड आहे !

इटलीमधला आठवड्याभराचा मुक्काम आटोपून स्वित्झर्लंडकडे निघालो, आणि एकदम 'ट्रान्स्फर सीन' झाला माणसांनी आणि धुरकट इमारतींनी गजबजलेलं मिलान मागे पडलं आल्प्स पर्वताची बर्फाच्छादित शिखरं आणि निर्जन रस्ते दिसू लागले

स्विस सरहद्द चिआसो गावाजवळ ओलांडून लुगानो शहरात आलो सकाळी अकराचा सुमार कोवळ्या सूर्यकिरणांत चमचमणाऱ्या विलोभनीय तळ्याच्या काठावर आमची बस थांबली सवयीप्रमाणे आम्ही आमची हॅंडबॅग घेऊन कॉफी-पानासाठी खाली उतरू लागलो

" डोण्ट वरी ! हॅंडबॅग्ज बसमधेच असू द्या ! यू आर इन स्वित्झर्लंड नाऊ — नॉट इन इटली ! " आमचा 'एस्कॉर्ट' जिनो म्हणाला (जिनो स्वत इटालियन ! ) " बॅगा चोवीस तास बसमधे असल्या आणि बसचं दार सताड उघडं असलं तरी कुणीही तुमच्या वस्तूला हात लावणार नाही ! बिकॉज यू आर इन स्वित्झर्लंड नाऊ ! "

देशाची संपन्नता आणि गुन्हेगारी प्रवृत्ती यांमधील परस्परसंबंध हा अभ्यासाचा विषय व्हायला हरकत नाही !

लुगानो शहरात बॅंकेत जाऊन पौंडाचे स्विस फ्रॅंक्स करून घेतले फ्रॅंकचा आंतरराष्ट्रीय बाजारातला दर सतत वाढत असतो सातआठ वर्षांपूर्वी एका फ्रॅंकला दोन रुपये असा विनिमय-दर होता आता एका फ्रॅंकला पाच रुपये असा दर आहे ! फ्रॅंकचं अधोमूलन हा स्विस लोकांचा चिंतेचा विषय झाला आहे प्रामुख्यानं निर्यातीवर आणि देशोदेशीहून सतत येणाऱ्याजाणाऱ्यांवर अवलंबून असणारी स्विस अर्थव्यवस्था फ्रॅंकच्या अधोमूलनामुळे धोक्यात येईल अशी स्विस लोकांना भीती वाटते

ते काही असो, मी मात्र फ्रॅंकची प्रथमपासूनच धास्ती घेतली !

कॉफी पिण्यापूर्वी मी सहज तोंडात टाकण्यासाठी बटाटावेफर्सचा पुडा खरेदी करण्यासाठी एका दुकानात गेलो मुंबईला सिनेमा थिएटरबाहेर वेफर्सचा पुडा

आठदहा आण्यांना मिळतो. त्याच आकाराचा पुडा मी खरेदी केला आणि हसतमुख सेल्सगर्लने लाडिकपणे सांगितलेली किंमत मोठ्या बेफिकीरपणे तिच्या हाती सुपूर्त केली वेफर्सचा पुडा उघडताना सहज फ्रँकचं रुपयात रूपान्तर केलं आणि तोंडात टाकलेला वेफर घशापाशी अडकून राहिला पुड्याची किंमत आठ रुपयाहून अधिक ! बंद्या रुपयाच्या आकाराच्या एकेका वेफरची किंमत एकेक रुपया !

कॉफी पिण्याचा बेत रद्द केला, आणि ते बहुमोल वेफर्स खाऊन त्यावर घटाघटा पाणी पिऊन तृप्तीचा ढेकर दिला

पण घटाघटा प्यायला पाणी होतं कुठं ? "वॉटर ? प्लेन वॉटर ? — सॉरी, नो वॉटर !" समोरच्या तळ्यात पाणी भरलेलं 'समुद्री चहूकडे पाणी — पिण्याला थेंबही नाही' अशी अवस्था झाली !



निसर्गाचे एक लडिवाळ रूप

लुगानो मागे टाकून आम्ही सात हजार फूट उंचीवर असलेल्या 'सेंट गोठार्ड' खिंडीकडे प्रस्थान ठेवलं. एकाद्या कोट्याधीशानं तिजोरी खोलून मौल्यवान जडजवाहिर उघडं करावं त्याप्रमाणं पृथ्वीच्या पाठीवरल्या या अत्यंत सुरेख देशानं आपलं वैभव आमच्यासमोर मांडायला सुरुवात केली. निसर्गानं या चिमुकल्या देशावर किती खूष व्हावं याला काय हिशेब ? आपल्या हजारो हातांनी निसर्गानं आपलं भांडार मुक्तपणं या देशावर उधळलं आहे. आल्प्सच्या नेत्रसुखद बर्फाच्छादित रांगा, नयनमनोहर सरोवरं, दऱ्याखोऱ्यांतली हिरवी वनराजी, नद्यांचे खळाळते नागमोडी प्रवाह, ठिपक्यांएवढी दिसणारी दगडी छपरांची चिमुकली घरं... दोन्ही डोळ्यांत मावणार नाही अशी निसर्गाची लडिवाळ रूपं.


गोठार्ड खिंडीकडे नागमोडी नितळ रस्त्यावरून जाताना जम्मूकडून श्रीनगरकडे जाणारा मार्ग आठवत होता. काश्मिर निसर्गसौंदर्याच्या बाबतीत स्वित्झर्लंडच्या जवळपास येणार. परंतु स्वित्झर्लंडमधली समृद्धी, संपन्नता काश्मिरमध्ये नाही. स्वित्झर्लंडची ही संपन्नता अनेक रूपांनी दृष्टीसमोर येत असते. डोंगरमाथ्यावरली टुमदार उपाहारगृहं, दुधिया प्रकाशानं उजळणारे स्वच्छ चकचकीत बोगदे, दऱ्याखोऱ्यांना लोटणारे वळणदार लोहमार्ग, हिमशिखराकडे अलगद घेऊन जाणाऱ्या विजेवर चालणाऱ्या केबलकार्स... निसर्गाची व मानवाची समृद्धी यांचा इतका मनोहारी संगम स्वित्झर्लंडमधेच आढळून येत असेल. स्विस माणसानं आपला सुपीक मेंदू वापरून निसर्गाला जणू आपल्या कह्यात आणलं आहे. काश्मिरमधली सृष्टी म्हणजे गरीबाच्या घरी लावण्यवती मुलगी जन्माला यावी. तशी कडाक्याच्या थंडीपासून रक्षण व्हावं म्हणून आपल्या डगल्याखाली कांगडी घेऊन मुकाट बसणाऱ्या सत्तरीच्या सुरकुतलेल्या म्हाताऱ्याच्या चेहेऱ्यावरलं उदास कारुण्य काश्मिरच्या दऱ्याखोऱ्यांवर पसरल्यासारखं वाटत रहातं. भरजरी वस्त्रं पेहेनलेल्या, अंगाखांद्यावर निवडक आभूषणं माळलेल्या राजघराण्यातल्या लावण्यमयीच्या हालचालीतला मोहक उद्दामपणा स्वित्झर्लंडच्या चेहऱ्यामोहऱ्यातून प्रकट होत असतो.

माझ्या मेव्हण्याबरोबर जिनेव्हाला जाताना मी त्याला गाडी थांबवायला सांगितलं. बाहेर आलो आणि चोहीकडे वेड्यासारखा पहात राहिलो.

माझ्या आसमन्तावर हिरव्या रंगानं चेटूक केलं होतं. दूरवरचा डोंगरमाथ्यावरला गडद हिरवा रंग वेगळा, दरीत डोकावणाऱ्या वृक्षराजीचा हिरवट रंग वेगळा, शेतात डोलणाऱ्या पिकांचा हळदुवा हिरवा रंग वेगळा, पठारावरल्या वनफुलांच्या पानांचा फिकट हिरवा रंग वेगळा आणि... छे ! एकाच वेळी एकाच जागी हिरव्या रंगाच्या इतक्या शेडस् मी कधीच पाहिल्या नव्हत्या.

बाझेलला माझा मेहुणा मंगेश वागळे रहातो. बाझेलपासून चार किलोमीटर अंतरावर पश्चिम-जर्मनीची सरहद्द आणि दोन किलोमीटरवर फ्रान्सची सरहद्द

अवघ्या सोळा हजार चौरस मैलाच्या या चिमुकल्या देशाची लोकवस्ती आहे साठ लाख —- म्हणजे मुंबई शहराच्या लोकसंख्येहून कमी ! एवढ्याशा देशातल्या साठ लाखांना जोडणारी एक समान भा . नाही बहात्तर टक्के लोक जर्मन बोलतात, आणि एकवीस टक्के लोक फ्रेंच उरलेल्या सात टक्क्यांपैकी सहा टक्के इटालियनभाषिक अवघे एक टक्का लोक प्राचीन लॅटिनची बोली रोमांश भाषा बोलतात इंग्रजी फारशी कुणाला येत नाही मगेशबरोबर स्वित्झर्लंडचा कानाकोपरा पाहिला हायवेवरून ताशी एकशेसाठ किलोमीटर वेगानं तो गाडी हाकत होता माझ्यासाठी त्यानं हिंदी गाण्याच्या टेप्स गाडीत लावल्या होत्या 'आवारा न् चारसो बीस' मधल्या एकीकडे त्या ऐकत मी आपला जीव मुठीत धरून नंदनवनाची सफर करत होतो ' आमची कार अनेक गाव पार करून जायची पण मैलन् मैल, गावच्या गाव रस्ते निर्मनुष्य ! माणस दिसायची ती फक्त कार-मधून जाणारीयेणारी रस्त्यातून जाणारे पादचारी ही स्वित्झर्लंडमधे दुर्मिळ वस्तू ! वाटेवरची बैठी, टुमदार घरं मोठी आकर्षक दिसायची घरासमोर रंगीबेरंगी फुलं



कल्पक खिडक्यांमुळे सुशोभित झालेले स्वित्झर्लंडमधील एक नमुनेदार घर

फुललेली. घराला समोरून असंख्य खिडक्या आणि प्रत्येक खिडकीत उमललेल्या गुलाबाच्या ताटव्यांनी भरलेल्या कुंड्या.

रात्री आम्ही फिरून परतलो आणि कारमधून उतरताना मी मंगेशशी सवयीनं मोठ्या आवाजात गप्पा मारू लागलो. मंगेश हलक्या आवाजात म्हणाला, " दहा वाजले आहेत आता. "

" मग काय झालं ? "


" उंहु ! शांतता ! हे स्वित्झर्लंड आहे ! इथं मोठ्यानं बोलायचं नसतं. रात्री मोठ्यानं हसायचं नसतं. इथले लोक अत्यंत शांतताप्रिय आहेत. कारण हे स्वित्झर्लंड आहे ! "

स्वित्झर्लंड शांतताप्रिय आहे हे खरंच आहे ! एवढी दोन महायुद्धं झाली, मानवजातीचा एवढा प्रचंड संहार झाला, शहरंच्या शहरं उद्‌ध्वस्त झाली, पण निसर्गसौंदर्यानं विनटलेल्या या देशावर एक बारीकसा ओरखडा उमटला नाही. फ्रान्स, इटली, जर्मनी, ऑस्ट्रिया हे चतुःसीमेवरले देश युद्धाच्या खाईत होरपळून निघत होते तेव्हा स्वित्झर्लंड शांत होतं. रोम जळत असताना फिड्‌ल वाजवत बसलेल्या नीरोप्रमाणं ! स्वित्झर्लंडला मदांध सत्ताधीशांच्या राजकीय डावात बिलकुल रस नव्हता. मुसोलिनी असो, हिटलर असो की नेपोलियन -- स्वित्झर्लंडला कुणाचीच बाजू घ्यायची नव्हती.

मात्र युद्धामुळे निर्वासित झालेल्यांचं स्वित्झर्लंडनं स्वागत केलं. राजकीय कारणांमुळं हद्दपार झालेल्यांसाठी आपले दरवाजे त्यानं उघडे ठेवले. शांतता-तहासाठी जिनेव्हासारखी शहरं वापरू दिली. 'लीग ऑफ नेशन्स' च्या बैठकींसाठी जमलेल्या मुत्सद्द्यांचा मनापासून पाहुणचार केला. युद्धात जखमी झालेल्यांची काळजी घेण्यासाठी, युद्धकैद्यांची देखभाल करण्यासाठी आंतरराष्ट्रीय 'रेड क्रॉस' संस्था स्थापन झाली ती स्वित्झर्लंड देशातच.

राजकारणाचे चार डाव टाकून थकलेभागलेले मुत्सद्दी आजही विश्रांतीसाठी स्वित्झर्लंडला येतात आणि इथल्या शांत, निःस्तब्ध वातावरणात निसर्गाच्या सान्निध्यात ताजेतवाने होऊन आपापल्या देशात परत जातात. राजकारणातली पुढली खेळी खेळण्यासाठी आवश्यक तो जोम आणि उत्साह स्वित्झर्लंड त्यांना देत असतं.

या लावण्यवतीकडे अनेकांची वक्रदृष्टी वळली. केल्टिक, जर्मेनिक, बर्गंडी या टोळ्यांनी तिच्याकडे पापी नजरेनं पाहिलं. दस्तुरखुद्द ज्युलियस सीझरनं तिच्याशी लगट केली. पण सभोवतालच्या पर्वतराजींनी तिचं शीलरक्षण केलं. तिचं कौमार्य अक्षत राहिलं.



स्वित्झर्लंडमधील पर्वतशिखरावरचं एक अद्ययावत उपाहारगृह

पण सत्तेच्या राजकारणापासून चार हात दूर रहायला शिकवणारी स्वित्झर्लंडची शांतताप्रिय मनोवृत्ती दुर्बलतेतून निर्माण झालेली नाही ! ती सबलाची, सामर्थ्यवानांची शांतता आहे इथल्या पर्वतांतून, दऱ्याखोऱ्यांतून सोनं पिकवणाऱ्या माणसांची जिद्द लहानसहान म्हणता येणार नाही खडबडीत प्रदेशात रहाणारा, बर्फाच्या वादळांना हसतहसत तोंड देऊन समृद्धीच नंदनवन निर्माण करणारा माणूस कच्च्या दिलाचा असून कसं चालेल ? स्वित्झर्लंड हा विल्यम टेलचा देश आहे ऑस्ट्रियन हुकुमशहाच्या सांगण्यावरून पोटच्या मुलाच्या मस्तकावर ठेवलेलं सफरचंद नेम धरून छेदणाऱ्या, आणि दुसऱ्या बाणान त्या हुकुमशहाचा शिरच्छेद करणाऱ्या धाडसी तिरंदाजाचा हा देश आहे विल्यम टेलच्या पराक्रमाच्या कथा आजही स्वित्झर्लंडच्या बावीस जिल्ह्यांतून सांगितल्या जातात त्याच्या प्रेरणेन स्वित्झच्या जंगलात रहाणाऱ्या तेराशे शूर वीरांनी चौदाव्या शतकात वीस हजार ऑस्ट्रियन सैनिकाचा गनिमी काव्यान पराभव केला त्या वेळची अद्ययावत शस्त्र घेऊन या चिमुकल्या देशावर चाल करून आलेल्या वीस हजाराच्या पथकाचा कडेकपाऱ्यात राहून, झाडाच्या फांद्या आणि मोठमोठे दगड ही गावठी आयुधं उपयोजून स्वित्झच्या मावळ्यानी बीमोड केला, म्हणून तर मोठं परचक्र टळलं. स्वित्झ परगण्याचं नाव देशाला मिळालं.

आज स्वित्झलंडमधे वीस ते साठ वयाचा प्रत्येक पुरुष नागरिकही असतो आणि एक उत्तम सैनिकही असतो विसाव वर्ष लागल की प्रत्येक तरुणाला सतरा आठवडे लष्करी शिक्षण घ्याव लागत (एखाद्याला काही शारीरिक वैगुण्यामुळ ते अशक्य असेल तर त्याला अठ्ठेचाळीस वर्षांचा होईपर्यंत जादा कर भरावा लागतो) लष्करी शिक्षण संपलं की प्रत्येकाला एक रायफल, दारूगोळा घरी न्यायला मिळतो प्रत्येकाला नित्यनेमानं ही रायफल घासूनपुसून ठेवावी लागते. नेमबाजी हा राष्ट्रीय खेळ आहे प्रत्येक शनिवारी नेमबाजीच्या स्पर्धा होतात वयाच्या अठ्ठेचाळिसाव्या वर्षापर्यंत लष्करी शिक्षणाचे 'रिफ्रेश' कोर्स पुरुषाना पार पाडावे लागनात मात्र देशाच्या सरक्षणासाठी साठाव्या वर्षापर्यंत धावून जायची त्याची तयारी असावी लागते नागरिकांना रायफली आणि दारूगोळा घरात बाळगू देणारा स्वित्झलंड हा एकुलता एक देश असावा

गरज पडल्यास तीन दिवसात सहा लाख सशस्त्र सैनिकाची जमवाजमव करण्याची या देशाची सिद्धता आहे परकीयानी आकस्मिक हल्ला केल्यास देशातले सर्व पूल उद्ध्वस्त करणारी, खिंडी बुजवणारी यत्रणा स्वित्झलंडमधे सदैव तयार असते

मगेश म्हणाला, "स्वित्झलंडमधे लष्कर नाही. स्वित्झलंड म्हणजेच एक प्रचड लष्करी पथक!"

गांधीजींना सबलांची अहिंसा हवी होती स्वित्झलंडमधे ती आहे! अखंड शांतीचा जप करण्याची पात्रता स्वित्झलंडमधे निश्चित आहे!

व्हॅटिकन राज्यात पोपसाहेबांचे रक्षक आजही स्विस पहारेकरी असतात फ्रान्सच्या राजांनी आपल्या सरक्षणासाठी स्विस सैनिकाची नेमणूक केली होती फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी सोळाव्या लुईला पॅरिसच्या प्रचड जमावानं घेरल तेव्हा राजकुटुबाचं रक्षण करताना आठशे स्विस सैनिक मृत्युमुखी पडले त्यांच्या निष्ठेचं प्रतीक म्हणून पॅरिस शहरात 'वुडेड लायन ऑफ लूसर्न' हा पुतळा उभारण्यात आला पॅरिसच ते एक प्रेक्षणीय ठिकाण आहे

✦

बाझेलहून मगेशबरोबर जिनेव्हाला जात होतो. लुझाने शहरात औद्योगिक प्रदर्शन चालू होत आणि प्रदर्शनाचा शेवटचा दिवस होता हे प्रदर्शन म्हणजे आयुष्यातला अविस्मरणीय अनुभव! स्वित्झलंडमधे जे जे पिकत ते ते तिथ विकायला आलं होतं स्वित्झलंडमधे जे पिकतं ते पाहिल आणि अक्षरशः हतबुद्ध झालो! प्रदर्शन इतकं प्रचड होतं, की प्रत्येक स्टॉलपाशी थाबलो असतो तर अख्खा दिवस पुरला नसता!



स्वित्झर्लंडमधील अशी चित्रमय सरोवरे शहरवासी-
यांची व प्रवाशांची मने आकृष्ट करीत असतात.

प्रदर्शनात काय नव्हतं ? तऱ्हेतऱ्हेची यंत्रं — केर काढणारी, बश्या धुणारी, मांस कापणारी, बटाट्याच्या चकत्या करणारी, केक्स न् बिस्किटं बनवणारी अनेक स्वयंचलित यंत्रं एका बाजूला नाणं टाकायचं आणि चहा, कॉफी किंवा कोका कोला यांच्यावर काटा फिरवायचा टप्दिशी प्लॅस्टिकचा ग्लास खाली पडतो, गरमगरम कॉफी, चहा किंवा थंडगार कोक यानं तो काठोकाठ भरतो पेय प्यायचं आणि ग्लास फेकून द्यायचा ! ( प्लॅस्टिकचा सुरेख ग्लास केराच्या टोपलीत फेकताना हात थरथरले ! ) तुम्ही दमला आहात काय ? मग आरामखुर्चीसारख्या दिसणाऱ्या मसाज–यंत्रावर बसा नि कळ दाबा — तुमचं सारं शरीर कुणीतरी हळुवार हातांनी रगडत असल्यासारखं तुम्हाला वाटेल ! ( तोकडे कपडे घालून आरामखुर्चीवर पहुडलेली सुंदरी आग्रह करते आहे 'या ना ! अनुभव तरी घ्या ! ' ) यंत्राच्या

एका बाजूला कच्चा माल पुरवा — दुसऱ्या बाजूला गरमगरम डोनट तयार!

नव्हत ते एकच यंत्र एका बाजूला माणूस, तांदूळ, डाळ, मसाला, चिरलेली भाजी — दुसऱ्या बाजूला माणूस जेवण करून ढेकर देत बाहेर पडतोय ! पुढल्या खेपेस मी स्वित्झर्लंडला येईन तेव्हा तसल यंत्र दाखवण्याच मगेशन मला आश्वासन दिलं, तेव्हाच मी यंत्रविभागातून नाखुषीन बाहेर पडलो !

स्वित्झर्लंड घड्याळासाठी जगप्रसिद्ध ! 'आम्ही जेव्हा रणांगणावर लढत होतो तेव्हा तुम्ही, लेको, कक्कू-क्लॉक्स तयार करीत होतात' अशी अन्य युरोपीय देशांनी स्वित्झर्लंडविरुद्ध तक्रार ! सतराव्या शतकात ज्युरा नावाच्या फ्रान्स-सरहद्दीवरच्या छोट्या खेड्यात रहाणाऱ्या एका लोहारान एका प्रवाशाच घड्याळ दुरुस्त करून दिल ते दुरुस्त करताना घड्याळाची आतली यंत्रं त्यान बारकाईन न्याहाळली, आणि स्वत घड्याळ बनवायला सुरुवात केली आज स्वित्झर्लंडमधले पन्नास हजार लोक दर वर्षी अडीच कोटींहून अधिक घड्याळ बनवतात पन्नाससाठ रुपयापासून पन्नाससाठ हजार रुपयापर्यंतची तऱ्हेतऱ्हेची घड्याळ प्रदर्शनात पहायला मिळाली.

अवाढव्य यंत्रं, घड्याळं, शे-दोनशे प्रकारची चॉकलेटस् आणि विविध प्रकारचं चीज इथली भूमी जितकी सुपीक तितका इथल्या माणसाचा मेंदूही सुपीक ! प्रदर्शनात ते पदोपदी प्रत्ययाला येत होतं जगातला दुसऱ्या क्रमांकाचा श्रीमंत देश हा मान स्वित्झर्लंडला उगाच मिळालेला नाही.

प्रदर्शनात एकदोन भारतीय स्टॉल होते तिथ यंत्रावर दोसे लाटून तव्यावर परतून विकले जात होते भारतीय मसाले-लोणची होती 'लिज्जत' पापडाच स्टॉल पाहिला आणि मगेश पा( प )डगावकरांची आठवण आली मग मी आमच्य मगेशला त्या लुझाने प्रदर्शनात पु लं ची 'पापडू श्रावणू लिज्जतू' कविता आठवेल तशी म्हणून दाखवली

जिनेव्हाला जाताना बर्नला काही वेळ थांबलो. बर्न ही स्वित्झर्लंडची राजधानी बर्न म्हणजे अस्वल. बाराव्या शतकातल्या एका ड्यूकन हे नाव ठेवल एकदा तो शिकारीला निघाला, आणि पहिली जी शिकार मिळेल तिच नाव शहराला ठेवायच त्यान ठरवल त्याला प्रथम सामोर आलं ते एक अस्वल ( तरी बर, ससा सामोरा आला नाही ! ) अस्वल हा राष्ट्रीय प्राणी आहे बर्नला 'बेअर पिट' आहे. मुद्दाम बांधून काढलेल्या या खड्ड्यात सहासात अस्वलं आहेत दुधाच्या बाटल्या तोंडाला लावणं, उड्या मारण, पुढले दोन पाय वर करून नृत्य करण, असल्या त्याच्या गमती पहाण्यासाठी प्रवासीमंडळी गर्दी करतात

बर्न शहर सुरेख आहे. काळजीपूर्वक जतन करून ठेवलेल्या पुरातन इमारती

आणि अद्ययावत फॅशनच्या आधुनिक इमारती असा नव्याजुन्याचा तिथ संगम आहे मध्यभागी पार्लमेंट बिल्डिंग आहे लोकानी निवडून दिलेली 'एक्झिक्युटिव्ह बॉडी' तिथून साऱ्या देशाचा कारभार चालवते पक्षीय राजकारणापासून स्वित्झर्लंड अलिप्त आहे कोणत्याही बारीकसारीक प्रश्नावर सार्वमत घेतलं जात. देशाचा आकार व लोकसंख्या आटोपशीर त्यामुळे ऊठसूट सार्वमत घेण सोपं असत गमत म्हणजे स्त्रियाना मताधिकार नाही आणि त्याबद्दल त्यांची तक्रारही नाही ! महिलामडळं स्त्रियानी राजकारणात भाग घ्यावा की नाही यावर परिसंवाद घडवून आणतात, व 'बिलकुल घेऊ नये' या निर्णयाप्रत येतात ! 'स्विस विमेन्स युनियन अगेन्स्ट व्होट्स फॉर विमेन' नावाची तिथ संघटनाही आहे

पार्लमेंटजवळ शहराचं जुनं प्रवेशद्वार आहे आणि त्यावर साडेचारशे वर्षांच जुन प्रचड घड्याळ आहे. तासातासागणिक हे घड्याळ गमतीदार खेळ करून



शिकारलाभामुळे हर्षभरित झालेला
स्वित्झलंडमधील एक शिकारी

दाखवतं. कोंबडा आरवतो, अस्वल उड्या मारत, विदूषक घड्याळाच्या काट्या-कडे पाहून मुठी वळवतो. हे १५३० सालापासून चाललं आहे! तेव्हापासून हे घड्याळ एकदासुद्धा बंद पडलेलं नाही!

बर्न अत्यंत स्वच्छ शहर आहे. रस्त्यावर दूध सांडलं तर ओंजळीनं पुन्हा भरून घ्याव! तसं पहाता सारं स्वित्झर्लंडच लखलखीत आहे औषध म्हणून धूळ हवी असेल तर ती आयात करावी लागेल!

लुझानेला मंगेशचा एक स्विस मित्र आहे, टोनी नावाचा पन्नाशीतला गृहस्थ. त्याची बायको नर्स आहे टोनीच्या मित्राची तरुण मुलगी फ्लोरा आमच्या-बरोबर जिनेव्हाला यायला निघाली. सारखी बडबडत होती स्वित्झर्लंडची वैगुण्य सांगून मी तिला मुद्दाम डिवचत होतो तिला इंग्रजी उत्तम येत होत "तुमच्या देशात गटे, व्हिक्टर ह्युगो, अलेक्झांडर ड्युमा, मोझार्ट — अनेक साहित्यिक नि कलाकार येऊन गेले पण या भूमीत जन्माला आलेल्या एखाद्या लेखकाचं नाव सांग!" मीतिला आव्हान दिलं

ती बराच वेळ आठवत होती 'व्हिजिट' या प्रसिद्ध नाटकाचा लेखक फ्रेड-रिक ड्युरेनमॅट एवढं एकच नाव तिला आठवलं।

"पण तुम्हाला ठाऊक आहे? रिल्के, थॉमस मान, हर्मान हेस्से या 'नोबेल' पारितोषिकविजेत्या लेखकांनी स्वित्झर्लंडलाच आपली कर्मभूमी मानली, आणि इथच त्यांनी देह ठेवला!" ती अभिमानानं म्हणाली

"ठीक आहे. पण या नितांतसुंदर देशात एखादा महान चित्रकार, संगीत-कार का नाही निर्माण झाला?"

फ्लोरा मोठी चतुर! ती म्हणाली, "आम्हाला वेगळं साहित्य, वेगळी कला हवीच कशाला? इथली एकएक टेकडी म्हणजे कविता अन एकएक पर्वत म्हणजे महाकाव्य आहे! इथल्या कारंज्यातून आणि धबधब्यातून सारखं संगीत बरसत असतं इथलं प्रत्येक लँडस्केप म्हणजे एक भव्य चित्र एखाद्या बड्या कलाकाराला कुंचल्यात पकडता येणार नाही असं आकर्षक चित्र!"

मंगेश म्हणाला, "स्विस माणूस पक्का व्यवहारी! कविताबिविता करण्यात तो वेळ नाही दवडत! स्वित्झर्लंडमधले पाच हजार पूल आणि सहाशे बोगदे ही स्विस तंत्रज्ञांची करामत!"

"हो ना! न्यूयॉर्कमधला 'जॉर्ज वॉशिंग्टन ब्रिज' आणि 'लिंकन टनेल' आमच्याच इंजिनियर्सनी बांधलं आहे!" फ्लोरा अभिमानानं म्हणाली.

मला आठवलं चंदीगड शहर वसवणारा ला कार्बुझियर स्वित्झर्लंडचाच

" या एवढ्याशा देशाच्या मानानं इथं आत्महत्येचं प्रमाण फार आहे, " असं मंगेश म्हणाला आत्यंतिक समृद्धीमुळे निर्माण झालेले प्रश्न आपल्याला पगार पाच हजार फ्रँक, शेजाऱ्याला सहा हजार त्यातून येणारी निराशा ! आपण केवळ एक लाख फ्रँकचा फ्लॅट घेऊ शकतो, तो हा पहा कसा पाच लाखाच्या फ्लॅटमधे आरामात रहातो — करा आत्महत्या ! आपण ज्याच्यावर वा जिच्यावर जिवापाड प्रेम करतोय त्या मित्रान वा मैत्रिणीन आपल्याशी प्रतारणा केली— घ्या चौथ्या मजल्यावरून उडी ! तर या जगात एकूण वाझ बाई रडते आणि सातपुतीही रडते ! फ्लोराला हे मान्य कराव लागलं !

आम्ही जिनेव्हात फेरफटका मारत होतो तेव्हा तिला आणखी चिडवायच नाही असं मी ठरवलं.

✦

जिनेव्हा सुरेख शहर आहे ज्युलियस सीझर दोन हजार वर्षांपूर्वी इथ आला होता. त्यानंतर आजपर्यंत कोटयवधी प्रवाशांनी जिनेव्हात पायधूळ झाडली आहे.



बर्न येथील 'बेअर पिट'मधील एक माता अस्वल आपल्या बछड्याशी कोडलाप करीत आहे.

( अर्थात तिचा एक कणही कुठं दिसत नाही ही गोष्ट निराळी ! ) तहाची कलमं ठरवायची आहेत ?——चला जिनेव्हाला ! शिखर-परिषद घ्यायची आहे ?——चला जिनेव्हाला ! घड्याळाची दुकानं आणि बँकांच्या कचेऱ्या पावलापावलावर. तसं पहाता स्वित्झर्लंड घड्याळं, प्रिसिजन इन्स्ट्रुमेंट्स, चीज–चॉकलेट आणि औषधं यांसाठी जेवढं प्रसिद्ध आहे, तेवढंच बँकांसाठी तेराशे स्विस नागरिकांमागे एक बँक नागरिकांच्या संख्येपेक्षा बचतखाती कितीतरी पटीनं जास्त पुन्हा कोड नंबर दिलेली गुप्त खाती आमच्या किती पुढाऱ्यांची अन् कामगार–नेत्यांची जिनेव्हात खाती असतील, स्विस बँकर्सच जाणोत !

जिनेव्हाला मधोमध छेद देऊन ऱ्हीन नदी फ्रान्सकडे वळते. जिनेव्हाचं सरोवर पाहून डोळे निवतात सरोवरात ठायीठायी थुईथुई नाचणारी कारंजी सरोवराच्या पाण्यात पडलेली निऑन साइन्सची झगमगती प्रतिबिंब. सरोवरात हेलकावणारी विविध आकारांची उपाहारगृहं त्यातून बाहेर पडणारे, सरोवराच्या पाण्यामुळं ओलसर झालेले संगीताचे मदमधुर सूर

सरोवराच्या काठावरच्या एका हॉटेलात आम्ही बसलो दूरवर होड्यांचे दोन ठिपके दिसत होते त्यांपैकी एक ठिपका स्विसमधे व दुसरा ठिपका फ्रान्समधे असल्याचं फ्लोरा सांगत होती मी 'रेड वाइन'चे घुटके घेत आणि चविष्ट 'पिझ्झा'चा लचका तोंडीत समोरचं दृश्य अनिमिष नजरेनं पहात होतो मंगेश त्या सुरांत हरवला होता

आम्ही उठलो पुन्हा सरोवराजवळ भटकलो होडीतून दूरवर जाऊन आलो पुन्हा दुसऱ्या एका उपाहारगृहात बसलो बिअरचे फेसाळते चषक तोंडाला लावले पुन्हा उठलो पुन्हा भटकलो.

फ्लोरा तक्रार करत होती " मँगेश, तू मला बिअर उगाच दिलीस ! मला ती लगेच चढते ! "

मला तर ती सौंदर्यमयी नगरीच चढली होती !

कधी तरी आम्ही कारकडे गेलो लुझानेमार्गे बाझेलला निघालो

मी फ्लोराला विचारलं, " तुला घरी पोचायला खूप रात्र होईल, नाही ? "

" हो ना ! "

" पप्पा–मम्मी रागावतील ? " माझ्या खोल मनात दडून बसलेला भारतीय माणूस पुढं सरसावला.

" छे. ! त्यात काय ? मँगेश, हव तर तू डायरेक्ट बाझेलला घे गाडी तुझ्या घरीच झोपेन. उद्या येईन सावकाश परत घरी ! "

मगेश गडबडीन म्हणाला, " तर कशाला ? पोचवतो ना लुझानेला तुला ! "

बिअर लगेच चढते म्हणणारी, सारख्या सिगरेट्स ओढणारी, रात्री बाहेर झोपायला तयार असणारी फ्लोरा !

उगाच नाही स्वित्झलँडमधे आत्महत्येच प्रमाण फार आहे !

*

सध्याकाळी मगेशन जर्मनीतल्या बादन शहरी कॅसिनो पहायला जायचा बेत केला

डिनर घेऊन आम्ही निघालो जर्मन सरहद्द बाझेलपासून चार किलोमीटर अंतरावर. तिथल्या स्विस अधिकाऱ्यान माझा पासपोर्ट बारकाईन न्याहाळला हा तरुण अधिकारी भारताला भेट देऊन आला होता उंच, देखणा आणि हसतमुख चेहेऱ्याचा तो अधिकारी इग्रजी गमतीदार पद्धतीन बोलत होता.

आम्ही हायवेवरून जर्मनीकडे निघालो गाडीच मागच दार नीट लागल नव्हत म्हणून मगेशन गाडी उजव्या बाजूला घेऊन पाचसहा सेकद थांबवली, दार लावून घेतल आणि आम्ही पुढे निघालो. तेवढ्यात आमच्यावर सर्चलाइट टाकत पोलिसाची गाडी आमच्या डाव्या बाजून गेली व पुढ थाबून तिन आम्हालाही थांबण्याचा इशारा केला

मगेशन जर्मन भाषेत पोलिसाना विचारल, " काय झालं ? "

" हायवेवर तुम्ही गाडी कशी काय थांबवलीत ? हायवेवर मधल्या लेनमधे गाडी असताना गाडी थाबवायची नसते हे तुम्हाला ठाऊक नाही ? "

खर म्हणता एक क्षणभर गाडी थावली होती ( अर्थात ते चुकीच होतच ) स्विस पोलिसाच्या कार्यक्षमतेच कौतुक वाटल्यावाचून राहिल नाही

मगेशन क्षमा मागितल्यावर व आम्हा दोघाचे पासपोर्ट पाहिल्यावर पोलिसानी आम्हाला जाऊ दिल.

" कॅसिनो पाहून पहाटे चार वाजता आम्ही परतलो. जर्मन सरहद्दीजवळ आलो.

रात्री भेटलेला तो तरुण, हसतमुख अधिकारी हातात झाडू घेऊन ऑफिस-समोरची जागा स्वच्छ करीत होता झाडू काखोटीला मारून त्यान आमचे पासपोर्ट पाहिले 'बॉम्बे – इडिया' म्हणून तो हसला आम्ही पुढ निघालो

मी मागे वळून पाहिलं

तो बडा अधिकारी तल्लीन होऊन झाडू मारत होता !

मला वाटत असलेल आश्चर्य मगेशच्या ध्यानात आलं. तो हसला आणि म्हणाला, " धिस इज नॉट इडिया, यू आर इन स्वित्झलँड ! ... हे स्वित्झलँड आहे बाबा ! हा भारतदेश नाही ! "

१२

# सेनच्या काठावरची रम्य नगरी

जगप्रवास करून आलेल्या कोणत्याही सुसंस्कृत माणसाला प्रश्न विचारा 'तुला कोणते दोन देश आवडतात ? ' वेळ न दवडता तो उत्तर देईल माझा देश आणि अर्थातच फ्रान्स ! '

आणि ते खरच आहे

पॅरिसमधे असताना मला माझ्याबरोबरच्या एका अमेरिकन प्रवाशान एक सूत्र सांगितलं " जर्मनी म्हणजे वश, इटली म्हणजे भाषा, इंग्लड म्हणजे एक बेट, तर फ्रान्स म्हणजे परपरा एक महान, तेजस्वी परपरा ! "

चादणीच्या आकाराचा हा देश एकसंध, एकजिनसी आहे युरोपच्या नकाशावर, पैलू पाडलेल्या चमकदार हिऱ्यासारखा हा देश चमचमतो आहे युरोपीय सस्कृतीचा केंद्रबिंदू म्हणून अनेक शतक फ्रान्सन महत्त्वाची कामगिरी बजावली आहे

बर्फाच्छादित आल्प्स, सूर्यप्रकाशात न्हाऊन निघणारा समुद्रकिनारा, गलबतांच्या शिडानी झाकून गेलेल्या नद्या, औद्योगिक शहर, सुपीक शेत आणि द्राक्षांच्या प्रचड बागा हे या चिमुकल्या देशाच वैभव आहे मद्य, सुगंधी अत्तर आणि अनेक चैनीच्या वस्तू फ्रान्स जगाला पुरवतो पण स्वित्झर्लंडप्रमाण केवळ ऐहिक सुखात धन्यता मानण्यात फ्रान्सला कमीपणा वाटतो डेकार्ट, रूसो, व्होल्तेर, फ्लॉबेअर आणि प्रूस्ट यांचे विचार फ्रान्सच्या सीमा ओलांडून जगभर पसरले लुई पॅस्तर आणि मादाम क्युरी यानी विज्ञानाच्या जगात अलौकिक यश संपादन केल, तर व्हिक्टर ह्युगो, मोलियर याच्यासारख्यांनी साहित्यक्षेत्र गाजवून सोडल

मात्र आधुनिक फ्रान्सवर खोल ठसा उमटवला आहे दोघा व्यक्तींनी : नेपोलियन बोनापार्ट आणि चार्ल्स द गॉल.

स्वित्झर्लंडहून पॅरिसकडे निघालो तेव्हा दूर अंतरावरून एक प्रचंड कुत

आकाशाच्या दिशेनं झेपावत असलेला दिसला कुतूहलान मी चौकशी केली, "हे काय आहे ? "

आमच्या बसमधल्या एस्कॉर्टन माहिती पुरवली, "हे द गॉलच जन्मठिकाण . कॉलांबे ले दझेग्लीझ.' "

हे या चिमुकल्या खेड्याचं लांबलचक नाव वस्ती जेमतेम पाचशे द गॉलची एकुलती एक मुलगी कोवळ्या वयात गेली तिच थडग याच खेड्यात आहे मुलीच्या थडग्याजवळ आपलं थडग बाधाव, अशी द गॉलची इच्छा होती तो १९७० मधे मरण पावला. त्याच शव शाही इतमामानं पॅरिसहून इथं आणण्यात आल. इथं पुरण्यात आलं हा प्रचड क्रूस त्या थडग्यावरचाच

द गॉलची वृद्ध पत्नी या खेड्यात अजून रहाते आयुष्याचा उर्वरित काळ ती पराक्रमी नवऱ्याच्या व लाडक्या मुलीच्या आठवणीत व्यतीत करते आहे




टेबलावर जाण्यापूर्वी एका चवदार डुकराची कलात्मक कापछाट होत आहे.



फूटपाथवरच्या साइड वॉक कॅफेचे दृश्य

त्या खेड्यावरून आमची बस जाऊ लागली तेव्हा आम्ही बस थाबवून खाली उतरलो तीसचाळीस उबऱ्याच छोट खेड ( घराना उबरे असतात की नाही कोण जाणे । ) झाडांच्या हिरव्या गर्दीत बिचार लपून बसल होत दोन जख्ख म्हाताऱ्या दूरवर लुटुलुटू चालल्या होत्या सगळीकडे शुकशुकाट अशा खेड्यात तरुण मुल दिसण मुष्किलच. फ्रान्समधल्या अन्य खेड्यासारख एक खेड,



पण द गॉलच्या वास्तव्यानं इतिहासात चिरंतन स्थान मिळवणार दुसऱ्या महायुद्धात १९४० साली जनरल द गॉल फ्रान्सला हिटलरच्या घशातून वाचवण्यासाठी धावून आला. युद्ध संपल्यावर पक्षीय राजकारणाच्या धकाधकीत आपला निभाव लागत नाही हे सुज्ञपण जाणून तो या खेड्याकडे परतला —— वानप्रस्थाश्रम स्वीकारण्यासाठी लेखणी खड्गापेक्षा अधिक सामर्थ्यशाली असते यावर द गॉलची अपार निष्ठा कॉलांबे खेड्यात राहून द गॉलन आपल सुरेख आत्मचरित्र लिहून काढल १९५८ मधे अल्जिरियात लष्करी उठाव झाला फ्रान्स यादवी युद्धाच्या उंबरठ्यावर उभा राहिला आणि मग अड्डुसष्ट वर्षांच्या द गॉलला देशाच रक्षण करण्यासाठी देशबांधवानी पुन्हा हाक दिली आपल्या देशाला विनाशाच्या खाईतून लिंकन, चर्चिल या मुत्सद्यानी वाचवल्याचा इतिहासाचा दाखला आहे द गॉलच कर्तृत्व याहून काकणभर सरसच त्यान आपल्या देशाला दोनदा वाचवल फ्रान्सच्या राजकारणाची धुरा त्यान आपल्या रुंद खांद्यावर यशस्वीपणे पेलली अध्यक्षपदाच्या निवडणुकीत अवघ एक मत द गॉलच्या विरुद्ध पडल आणि तेही त्याच्या कॉलांबे खेड्यातून ! त्याच्या घरच्या स्वैंपाकिणीन मालकाविरुद्ध मत दिल होत ! सत्तरीला पोचलेल्या आपल्या मालकान पॅरिसला जाऊन राज्यकारभाराची दगदग सोसावी हे तिला बिलकुल मान्य नव्हत !

गॉलचा अर्थच आहे मुळी फ्रान्स ! फ्रान्सला दोन हजार वर्षांपूर्वी 'गॉल' म्हणत असत ज्युलियस सीझरन ख्रिस्तपूर्व ५३ मधे फ्रान्सचा 'गॉल' असा उल्लेख केला आहे (तिथल्या लोकांना सीझर 'पारिझी' म्हणतो ) द गॉलला स्वत बद्दल, स्वत'च्या नावाबद्दल कोण अभिमान ! आपण म्हणजेच फ्रान्स, असं तो म्हणे "तुला एकमतानं अध्यक्ष बनवणाऱ्या फ्रेंच लोकाचे तू आभार मानले पाहिजेस" अस एक मित्र त्याला सहज म्हणाला, तेव्हा तो उत्तरला, " फ्रान्स फ्रान्सचे आभार कसा मानील बरं ? "

"तुमच्या मागून देशाच भवितव्य काय ? " अस त्याला 'नॅशनल असेंब्ली'त विचारण्यात आल, तेव्हा तो शांतपणे म्हणाला, "तुम्हाला दुसरा द गॉल शोधावा लागेल ! "

लंडनमधे बेकर स्ट्रीटला मादाम टचुसॉच्या प्रदर्शनात जनरल द गॉलची मेणाची प्रतिकृती पाहिली होती सहा फूट उंची, भरदार शरीरयष्टी, पाणीदार डोळे, सरळ नाक, ऐटबाज लष्करी पोषाख, पाहिल्याबरोबर छाप पाडील, मनात धाक उत्पन्न करील अस प्रचंड व्यक्तिमत्त्व ! अध्यक्षपद संभाळताना आपल्या

गावाकडे निघाला असताना त्याला ठार मारण्याचा कट फसला, तेव्हा तो हसत म्हणाला म्हणे, " छान विनोद केला कुणीतरी. हलक्या पातळीवरचा होता, एवढच काय ते ! " हे धैर्य अंगी यायला द गॉलसारख व्यक्तिमत्त्व हव !

पॅरिस जवळ आल तेव्हा प्रचड विमानतळ दिसला. विमानतळाच नाव —– द गॉल एअरपोर्ट !

*

पॅरिस ! सेन नदीच्या दोन्ही बाजूना वसलेली सौंदर्यनगरी ! फ्रान्समधली वरकड शहर बिनमहत्त्वाची फ्रान्स म्हणजे पॅरिस ! पाचवा चार्ल्स म्हणाला होता म्हणे, " अदर सिटीज् आर टाउन्स पॅरिस इज अ वर्ल्ड ! "

' मॅक्झिम गॉर्की रोड'वरल्या एका टोलेजग हॉटेलात मुक्काम केला हा भाग पॅरिस शहराबाहेरचा फ्रेंच लोकांना आपल्या भाषेबद्दल विलक्षण गर्व खाडी ओलाडली की इग्लड लागत पण इग्रजी भाषा म्हणजे सातासमुद्रापलीकडची असल्याप्रमाण त्या भाषेबद्दल परकेपणा. साधासुधा नव्हे, तुच्छतेच्या सीमारेषेवर घोटाळणारा ! माझ्या नित्याच्या सवयीप्रमाण ' कंडक्टेड सिटी टूर'मधून न जाता एकटयाच्या हिमतीवर शहरात भटकायच ठरवल ' पार्ले व्हू आंग्ले ? ', ' सील व्हू प्लॅ ', 'उई–नॉ ' असे दोनचार शब्द पाठ केले (कॉलेजमधे फ्रेंचऐवजी सस्कृत घेतल्याचा क्षणभर पश्चात्ताप झाला ! ) आणि ' ऑपेरा'च तिकिट काढून टयूब रेल्वे ऊर्फ ' मेट्रो ' पकडली

गाडीत खूप गर्दी होती बरेच लोक उभे होते आणि आपापसात मोठ-मोठ्यान बोलत होते फ्रेंच माणूस इग्रज माणसासारखा घुमा नाही लंडनच्या टयूब रेल्वेत बसणारा इग्रज नुकतीच एरडेल तेलाची वाटी संपवून आल्यासारखा, एखाद्या मराठी टीकाकारासारखा दिसतो फ्रेंच माणूस कितीतरी मनमोकळा ! बूच उघडलेल्या सोड्याच्या बाटलीसारखा फसफसणारा ! आपल्याला बुवा असली माणसं आवडतात.

' ऑपेरा स्टेशनवर उतरलो आणि पायऱ्या चढून वर आलो. आजूबाजूला गजबजलेल पॅरिस. फूटपाथवर अनेक छोटीछोटी दुकान सोज्वळ-चावट (बहुतांशी चावटच ! ) मासिक, कातडी बॅगा, परफ्यूम्स, सॉसेजिस विकणारी समोरून टॅक्सीज, खाजगी गाड्या सुसाट धावत होत्या फ्रेंच माणसाप्रमाण प्रचड उत्साह त्या वाहनांच्या अगोपांगातून उतू जात होता ! पॅरिस शहरात म्हणे पन्नास हजार टॅक्सीज आहेत आणि त्यामुळे साहजिकच पार्किंगची जटिल की काय म्हणतात ती समस्या तिथ निर्माण झाली आहे वाहतुकीचे नियम इतके कडक आहेत, की ते पाळण्यापेक्षा शहाणा माणूस गाडी गॅरेजमधे ठेवून फूटपाथवरून चालण पसत करील ! चुकीच्या ठिकाणी वा चुकीच्या अँगलन गाडी पार्क केली की जबरदस्त दड भरावा लागतो



नॉत्र दाम ' चर्चवरील खडा पहारा देणारा विद्रूप
प्राणी आणि समोर दिसणारी सुस्वरूप नगरी

अशा गाडीवर तिकिट लावून पोलिस गाडीचं टायर काढून नेतो पण धूर्त गाडीवाला पोलिसस्टेशनवर जाऊन दंड भरण्यापेक्षा नवा टायर खरेदी करून पळ काढतो !

फ्रेंच माणसाची हमरस्त्यावरची ही धावपळ सोडली आणि फूटपाथवरच्या ' साइड वॉक कॅफे'कडे नजर वळवली, की एकदम ' ट्रान्सफर सीन ' होतो कडवट कॉफीचे किंवा ' अपने बगीचेमे बनाया हुआ माल ' अशा लालसर मद्याचे स्थ घुटके घेत असस्थ तरुण व वृद्ध प्रेमीजन खुर्च्यांवर विसावलेले असतात बशीत पेय ओतून ' फुर्रर्र फुर्रर्र ' करीत ते पिणाऱ्या व ' कधी एकदा हॉटेलातून बाहेर जातो'चे वेध लागलेल्या कर्मचाऱ्याची घाई त्यांच्या हालचालीत शोधूनही सापडणार नाही दिवसाचा कोणताही प्रहर असो, फूटपाथवरला ' कॅफे ' माणसानी फुलून गेलेला असतो खुर्च्यांच्या अनेक रांगा रस्त्यावरली वाहनाची धावपळ पहात सामोऱ्या बसलेल्या असतात. अनेक कलंदर एकटेच बसलेले असतात. मैत्रिणीचा सुखद



द्राक्षसंस्कृतीचा आस्वाद घेतांना फ्रेंच मुले

सहवास त्याच्या भाग्यात नसतो. गप्पा मारायला मित्रही नसतात तरी पण सार्त्र-सारखा गंभीर चेहेरा करून हे कलंदर बीअर पीत अस्तित्ववादाविषयी विचार करीत तासन् तास बसून असतात आजूबाजूचं जग चषकातल्या मद्याप्रमाणं हिंदकळत असत पण आपण त्या गावचेच नाही असा मख्ख चेहेरा करून हे एकाकी जन द्राक्षसंस्कृतीत विरघळत रहातात

आणखी एका बाबतीत फ्रेंच माणसाला घाईगडबड मुळीसुद्धा रुचत नाही ! दुपारचं जेवण हा त्याच्या जीवनातला अनिर्वचनीय आनंदाचा प्रसंग इंग्रज माणसा-सारखा फ्रेंच माणूस सकाळच्या न्याहरीत रमत नाही पाइनॅपल ज्यूस, जॅम लावलेला टोस्ट, उकडलेलं अंड, हॅमचा वाटोळा तुकडा, दुधात भिजलेले कॉर्नफ्लेक्स असल्या 'फालतू' गोष्टीत त्याला रस नसतो पावाचे एकदोन तुकडे, चीजचा एखादा चौकोनी तुकडा, कडक कॉफी — बस्स ! न्याहरी एखाद्या आन्हिकासारखी उरकली जाते

कारण सकाळपासून वेध लागलेले असतात ते दुपारच्या जेवणाचे ! दिवसभर राबायच ते दुपारचे दोन तास मजेत जावेत म्हणून ! घरातल्या गृहिणी दुपारी नवऱ्याला काय खायला घालाव या काळजीत तिन्हीत्रिकाळ पडलेल्या ! पुरुष माणसान तृप्तीचा ढेकर दिला की गृहिणी ( किंवा तिच्या जागी कोण असेल ती ! ) संतुष्ट ! 'अन्नपूर्णा सुखी भव'च्या ( फ्रेंचभाषिक ) आशीर्वादासाठी सदोदित



रात्रीच्या झगमगाटात आपले अस्तित्व
उजळवीत असताना आयफेल टॉवर

थासुसलेल्या गृहिणीचा जीव, दुपार सुखान गेली की भाड्यात पडतो !

फ्रेंच माणूस खवैया तर आहेच, पण विलक्षण सौंदर्यप्रेमी असल्यामुळं जेवणाची डिशसुद्धा त्याला सौंदर्यान ओतप्रोत भरलेली लागते जेवण म्हणजे केवळ 'उदरभरण' नव्हे समोरची डिश दिसायला चांगली हवी गरम अन्नातून येणाऱ्या वाफा भूक चाळवणाऱ्या हव्यात पुढ्यात ठेवलेल्या अन्नाची मांडणी नेत्रसुखद हवी. आणि हे सगळं यडपणे, चव घेत, पचनेंद्रियांना आनद देत हळूहळू हातीपायी पसरायला हवं लॉब्स्टर, मासा, प्रॉन -- सर्व काही ताजं हव आणि प्रत्येक खाद्यविशेषा-बरोबर त्या खाद्यविशेषाचा मान राखणारा पेयविशेष ज्याना दुपारी घरी जाण शक्य नसतं ते हॉटेलात बसून आपल खाद्यजीवन समृद्ध करत असतात. 'वचावचा' खाणं ?-- फ्रेंच माणूस म्हणेल, "मग त्यापेक्षा उपाशी राहिलेलं काय वाईट ? "

✦

'ऑपेरा 'कडून फिरतफिरत मी 'नॉत्र दाम' चर्चपाशी आलो व्हिक्टर ह्यूगोच्या 'हचबॅक ऑफ नॉत्र दाम'ची आठवण झाली या चर्चच्या टोकावर चढून त्या कुबड्यान निराशेन आत्महत्या केली होती. बाराव्या शतकात बांधलेल्या या चर्चची शभर वर्षांपूर्वी जेव्हा डागडुजी करण्यात आली तेव्हा चर्चच्या शिखरावर दोन शिंग व दाढी असलेल्या एका चमत्कारिक प्राण्याचा पुतळा उभारण्यात आला पॅरिस शहरावर खडा पहारा देत हा विद्रूप प्राणी उभा आहे त्याच्या अस्तित्वामुळ चर्चच्या आसपास भुतखेत फिरकत नाहीत, हा त्याचा आध्यात्मिक फायदा; तर पावसाळ्यात छपरावर साठणाऱ्या पाण्याचा निचरा त्याच्या उघडलेल्या तोंडावाटे होतो, हा व्यावहारिक फायदा

तीनशे सत्याऐंशी पायऱ्या चढून चर्चच्या शिखरावर गेल की पॅरिस शहराचा दिमाख नजरेत भरतो शहराला उभा छेद देऊन वाहणारी सेन नदी, दोन्ही किनाऱ्यांना जोडणारे सुबक पण टणक पूल, चौदाव्या लुईन वृद्ध सैनिकासाठी बांधलेली पण आता नेपोलियनचं थडग उराशी जपणारी सोनेरी घुमटाची 'ओतॅल दे अॅव्हालीद' इमारत, आणि दूरवर निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर उद्गार-चिन्हासारखा दिसणारा 'आयफेल टॉवर' -- पॅरिसचा मानबिंदू जगातलं एक महान आश्चर्य

मला कुणीतरी सांगितलेली आयफेल टॉवरची कथा आठवली एक माणूस आयफेल टॉवरच्या टोकावर जाऊन बसला. काही केल्या तो खाली उतरेना फायरब्रिगेडचे लोक आले, पोलिस आले, पण ढिम्म नाही ! शेवटी कसाबसा एक पोलिस त्याच्यापाशी पोचला.

" तुला खाली उतरायचंय की नाही ? " त्या पोलिसानं दरडावून विचारलं

" नाही "

" पण इथं बसून रहायच कारण काय ? "

" पॅरिसमधे ही एकच जागा अशी आहे, की जिथून आयफेल टॉवर दिसत नाही ! " तो माणूस शांतपणे म्हणाला.

गोष्ट खरी आहे पॅरिसमधे कुठही जा -- टॉवर दिसतोच पॅरिस व्यापून तो दशांगुळ उरतो ! 'नॉत्र दाम चर्च' म्हणजे गॉथिक स्थापत्यकलेचा आदर्श नमुना चर्चच्या भिंती इतक्या जाड आहेत, की त्यांतल्या खिडक्यातून झिरपणारा प्रकाश आतल्या घनदाट काळोखाला बाजूला हटवू शकत नाही काळोखातून मार्ग काढीत मी खाली आलो आणि त्या सुप्रसिद्ध आयफेल टॉवरकडे कूच केलं

टॉवरखाली जत्रा भरली होती पहिल्या मजल्यावर जायला कमी तिकिट; दुसऱ्या मजल्यावर जायला जादा तिकिट अगदी टोकाला जायला पंधरावीस रुपये पडतात वर जायला रेल्वेच्या डब्याएवढी प्रशस्त लिफ्ट आहे व अती उत्साही लोकासाठी पायऱ्यासुद्धा आहेत. प्रत्येक मजल्यावर हॉटेल, मिल्क-बूथ्स, खाद्य-पदार्थांचे स्टॉल्स आहेत टॉवरच्या टोकावर टी व्ही अँटिना आहे जगातला सर्वांत उंच अँटिना !

तीनशे मीटर उंची असलेला हा टॉवर १८८९ मध्ये गुस्ताव्ह आयफेल या स्थापत्यशास्त्रज्ञान पॅरिसमधे भरलेल्या एका प्रदर्शनात एक प्रदर्शनीय चीज म्हणून बांधला सात हजार टन वजनाच्या पोलादाचा त्यान वापर केला 'एक प्रचंड कुरूप सांगाडा', 'निरुपयोगी राक्षसी मनोरा' -- अशी टॉवरची संभावना करण्यात आली मोपासाँ, अलेक्झांडर ड्यूमा या साहित्यिकांनी 'हे कुरूप बांधकाम' पाडून टाकण्याची सरकारला विनंती केली

प्रदर्शन संपलं, पण टॉवर जागच्या जागी राहिला जगातल्या प्रवाशांचं ते एक प्रमुख आकर्षण ठरलं 'शेफर्डस ऑफ द क्लाउडस्', 'स्टेअरकेस ऑफ द फ्यूचर' अशी स्तुतिसुमनं त्यावर उधळण्यात आली

एका काळी विद्रूप ठरवण्यात आलेली ही बुलंद वास्तू 'नॉत्र दाम चर्च'-वरल्या विद्रूप प्राण्याकडे पहात स्तब्ध उभी आहे

आयफेल टॉवरकडून पॅरिसच्या मध्यवर्ती ठिकाणाकडे जाऊ लागलं, की फ्रान्सचा इतिहास डोळ्यापुढे उलगडत जातो 'आर्क द त्रियाँफ'ची भव्य कमान नेपोलियनच्या पराक्रमाची विजयपताका मिरवीत उभी आहे 'प्लास द ला कॉंकॉर्द' या चौकात सोळाव्या लुईचा आणि त्याची बायको मारी अन्त्वानेत यांचा शिरच्छेद करण्यात आला, आणि हजारो पॅरिसनिवासींनी राजाराणीची रक्ताळलेली मुंडकी

पाहून आनंदानं जयघोष केला. कॉंकॉर्दजवळचा रस्ता बांधण्यासाठी बॅस्तील तुरुगाचे दगड वापरण्यात आले. फ्रेंच क्रांतीचं पर्व या चौकातल्या दगडगोट्यांवर लिहिलं गेलं आहे. लंडनला टेम्स नदीच्या काठावर पाहिलेल्या 'क्लिओपात्रा नीडल'सारखा इजिप्तहून आणलेला एक स्तंभ इथही आहे, आणि व्हॅटिकन सिटीमधे सेंट पीटर्स चौकात दिसलं तसं प्रचंड कारंजही इथं आहे. कारंज्याभोवतीच्या मानवी आकृती इतक्या रसरशीत आहेत, की त्यांच्या पीळदार बाहूंतल्या रेषान् रेषा मोजून घ्याव्यात !

लुव्हर म्युझियम, तिथली 'मोना लिसा', सेन नदीच्या डाव्या किनाऱ्यावर उभं असलेलं विद्यापीठ, उजव्या किनाऱ्यावरलं व्यापारी जग — हे सगळं पहात, रमतगमत मी हॉटेलकडे परतलो. तोपर्यंत रात्र झाली होती. निऑन साइन्सच्या झगमगाटात पॅरिस एक अद्भुतनगरी भासत होती. डोळे मिचकावीत खुणावत होती.

हॉटेलच्या डायनिंग हॉल'मधे जगाच्या वेगवेगळ्या भागांतून आलेले प्रवासी फ्रेंच पाककौशल्याचा आस्वाद घेत होते. त्यांतल्या काही प्रवाशांशी माझी ओळख झाली होती. पॅरिसचं नाइट लाइफ न पहाता जेवून आरामात झोपायला जाणं म्हणजे करंटेपणा आहे हे सर्वांना पटलं होतं. पटलं नव्हतं ते जैन भगिनींना. दिल्लीहून युरोपप्रवासावर आलेल्या, बटाट्याचे तुकडे व फार तर ऑम्लेट–पावावर जगणाऱ्या या शाकाहारी मुली आजही उकडलेले वाटाणे व बटाटे खाऊन ढेकर देत झोपी जाणार होत्या. केन्याला नोकरी करणारा पाकिस्तानी तरुण माझ्या कानात हिंदीत कुजबुजला, "बेगम सोडत नाही ! आज आपण जिथं जाणार आहात, ती ठिकाणं उद्या दुपारी मला दाखवाल का ?"

"पण उद्या दुपारी बेगम सोडील ?"

"दुपारी काहीतरी थाप देता येईल. पण रात्री ? — ते शक्य नाही !"

मलेशियाला चहाच्या मळ्यात मोठ्या हुद्द्यावर काम करून निवृत्त झालेला सुब्रह्मण्यम नावाचा एक तामिळ माणूस सपत्नीक आला होता. (त्याच्या नावाचा उच्चार करणं जमत नाही म्हणून बाकीचे प्रवासी त्याला सफाईनं टाळत !) मला तो म्हणाला, "आम्ही नाइटक्लबमधे येणार आहोत."

"या ना ! जरूर !" दोन्ही नाकपुड्यात चमक्या चालणाऱ्या, कपाळावर भलंथोरलं कुंकू लावणाऱ्या, लालभडक साडी नेसून सर्वांचं लक्ष वेधून घेणाऱ्या त्याच्या चेंचुलक्ष्मीकडे मी हळूच पाहून घेतलं.

"तिथं नाचणाऱ्या मुलींना पैसे द्यावे लागतात का ?"

"छे !"

"त्या मुली कॅबेरे गर्लप्रमाणं मांडीवर बसतात का ?"



पॅरिसमधील नाइटक्लबमधल्या मदमस्त तरुणींचे दर्शन

" दुर्दैवान — नाही. "

" मग ठीक आहे तर ! " त्यानं सुटकेचा निःश्वास सोडला.

" पंधरावीस फ्रँकच्या तिकिटात तुम्हाला शँपेनचा एक ग्लास फुकट मिळतो, तो मात्र तुम्हाला प्यावा लागेल "

" तुम्ही आम्हाला कंपनी द्या — आम्ही आमचे दोन्ही ग्लास तुम्हाला देऊ! आपण एका टेबलावर बसू "

शँपेनच्या दोन ग्लासाच्या मोबदल्यात नाइटक्लबमधे सुब्रह्मण्यम पतिपत्नीची सोबत ?—सौदा तसा महाग होता !

" इथून एकत्र निघू या आपण तिथं गेल्यावर जस जमत तस करू. "

आणि हजारो दिव्यांच्या प्रकाशात उजळलेल्या काँकाँर्दला पुन्हा एकदा वळसा घालून आम्ही सातआठजण ' पिगाल'कडे निघालो.

आग्र्याला जाऊन एक वेळ ताजमहाल पाहिला नाही तरी चालेल, पण पॅरिसला गेल्यावर नाइटक्लब पहायचा नाही म्हणजे अक्षम्य गुन्हाच !

'पिगाल' भागात 'लिडो' नावाच्या नाइटक्लबमधे आम्ही शिरलो दीडशे रुपये तिकिट. 'मूला रूज'मधे दुप्पट तिकिट असत अस कळल्यावर बाहेरच्या पवनचक्कीकडे पाहून समाधान मानल

'शॅंपेन'चे तीन ग्लास ( माझा एक, आणि सुब्रह्मण्यम पतिपत्नींचे दोन ! ) घेत अडीच–तीन तास पाहिलेला कार्यक्रम अनेक दृष्टींनी प्रेक्षणीय व श्रवणीय होता अगावर येणारा नुसताच भडक चावटपणा त्यात नव्हता कर्णेंद्रियं तृप्त करणारा वाद्यवृंद, कमनीय देहाच्या जवळजवळ नग्न तरुणी, त्यांच्या अगावरले सुरेख रगसगती साधणारे भरजरी (झवलेझवले) पोषाख, नृत्याचे नाजुक पदन्यास, नृत्यांगनाच्या रेशमी शरीरावर हलकासा शिडकावा करणारे रगीबेरगी प्रकाशाचे आल्हाददायक फवारे शॅंपेनचे घुटके घेताना या धुद वातावरणाचा तवग हॉलमधे पसरत चालल्याच जाणवू लागतं चित्तवृत्ती फुलारून येतात कधीही न पाहिलेल एक रोमांचकारी विश्व पहातापहाता दृष्टीसमोर आकार घेऊ लागत

स्त्रीपुरुषाची समूहनृत्यं होत रहातात एखादी लावण्यलतिका पुरुषाच्या शरीराभोवती विळखा घालत रहाते. तलम जमिनीवर विसावलेल्या मदिराक्षीला बळकट बाहू असलेला तरुण, पारिजातकाच फूल उचलाव तसा उचलून तिला अगाभोवती फिरवीत रहातो मग मधेच चावट विनोद

साडेतीन फूट उचीच्या म्हाताऱ्याला कमरेभोवती बोटभर चिंधी धातलेली एक तरुणी बाबागाडीतून घेऊन येते म्हाताऱ्याच्या डोक्यावर टोपडं 'बाळ' हातपाय झाकून 'उ–उ' रडू लागत ती तरुणी बाळाच्या तोंडात दुधाची बाटली देते

बाळ थोडा वेळ बाटलीची बोंथी चोखत रहातं मग उ... उ' करून बाटली बाजूला फेकतं.

'अरेच्चा ! तुला हवय तरी काय" — हे अर्थात फ्रेंचमधे !

"उं .उ ! मला ते दूध पाहिजे !" बाळ तरुणीच्या अनावृत वक्षःस्थळाकडे बोट दाखवून म्हणत —आणि हास्याचा एकच स्फोट होतो

एक तरुणी दुसऱ्या तरुणीशी गप्पा मारीत रस्त्याच्या कडेला उभी

तो साडेतीन फूट म्हातारा येतो आणि पाठमोऱ्या तरुणीच्या नितंबावर चापट्या मारतो.

गप्पात रंगून गेलेली तरुणी दचकून मागे वळते—



सुब्रह्मण्यमची जादूई 'स्थान'बद्धता

तेवढ्यात चाणाक्षपणे म्हातारा दोन्ही डोळे झाकून घेतो, आपण आंधळे असल्याची बतावणी करतो आणि आपण जणू अडखळत चाललोय हे दर्शवण्यासाठी पुन्हा तिचे नितंब चाचपडत रहातो "बिचारा आंधळा आहे!" असं पुटपुटून ती तरुणी मैत्रिणीशी गप्पा मारण्यात गढून जाते !

बाजूच्या टेबलावर बसलेला सुब्रह्मण्यम माझ्या कानापाशी वाकून हळूच पुटपुटतो, "फसवणूक ... शुद्ध फसवणूक!"

"ते कसं काय बुवा ? "

" मला कुणीतरी सांगितलं होतं, या मुली पूर्ण नग्न असतात ! पण ह्याच्या अंगावर तर वस्त्र आहे ! "

" जाऊ दे ! इवलस तर आहे ते वस्त्र ! तुम्ही कशाला ते मनावर घेता ? "

' नो नो ! बट इट हर्टस् माय आइज ! "

स्टेजवर जादूचे खेळ चालू आहेत थ्री-पीस सूट घातलेला एक पन्नाशीतला माणूस आमच्या डोळ्यांदेखत वर्तमानपत्राच्या फाडूनफाडून चिंध्या करतो, आणि पुन्हा ते वर्तमानपत्र सलग संपूर्ण उलगडून दाखवतो ! एका तरुणीला प्रेक्षकांकडे पाठ करून उभी रहायला सांगतो तिच्या पाठीवरून छडी फिरवून तिला पुन्हा सामोरी करतो तिच्या गच्च उरोजामधे दबून बसलेलं एक कबूतर चिमटीत घट्ट धरून ठेवलेली वस्तू ओढून काढावी तस मोठ्या कष्टान बाहेर काढतो

तेवढ्यात माझ्याशी गप्पा मारणाऱ्या सुब्रह्मण्यमकडे त्याच लक्ष जात आपल्या कौशल्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अरसिकाचा त्याला कृतकसंताप येतो स्टेज-वरून तो खाली उतरतो आणि सुब्रह्मण्यमला स्टेजवर येण्याचा आग्रह करतो

" नो नो ! " — सुब्रह्मण्यम् सहकुटुंब भेदरलेला !

" मेस्मॅरिझम् नॉट डेंजरस कमॉन . सील व्हू प्लॅ प्लीज सर "

" तो बोलावतोय तर जायला हरकत नाही. तेवढीच गमत ! " मी आग्रह करतो.

कसाबसा, मनाविरुद्ध सुब्रह्मण्यम स्टेजवर जातो. जवळजवळ अनावृत अस-लेल्या चार सुंदरींच्या मधोमध भांबावलेला सुब्रह्मण्यम उभा ! एक तरुणी हसत-हसत आपल्या उरोजाचे भाले त्याच्या पाठीत खुपसते

सौ. सुब्रह्मण्यम अस्फुट किंचाळतात. त्यांच्या नाकातल्या चमक्या टेबलाला टेकतात

" युवर गुड नेम ? "

" सुब्रह्मण्यम. "

" पार्डन ? "

" सुब्रह्मण्यम "

" इंदियन ? "

यस नो. मलेशियन "

प्रेक्षकांना उद्देशून तो फ्रेंचमधे काहीतरी सांगतो सुब्रह्मण्यमला एका खुर्ची-वर बसवतो प्रेक्षकांकडे पहात डोळे मिचकावत टाळी वाजवतो

आणि सुब्रह्मण्यम खुर्चीवरून ताडदिशी उठतो पार्श्वभागावर दोन्ही हात चोळतो जळक्या ओंडक्यावर चुकून बसल्याचा आविर्भाव

हिप्नॉटिस्ट पुन्हा त्याला खुर्चीवर नेऊन बसवतो पुन्हा टाळी वाजवतो.

सुब्रह्मण्यम उशी घेऊन टुण्णदिशी उभा ! पार्श्वभागावर जोरजोरान चोळण चालूच.

प्रेक्षक खो खो करून हसतात चेंचुलक्ष्मी लाजेन अर्धमेली झालेली

हिप्नॉटिस्ट एका तरुणीला बोलावून घेतो सुब्रह्मण्यमचे दोन्ही हात तिच्या उरोजांवर ठेवतो

मग खिशातली हातोडी काढून दोन्ही हातांवर काल्पनिक खिळे ठोकतो दूर जाऊन "मिस्टर सुबरोम, कम अलाँग" म्हणतो पण सुब्रह्मण्यम कसचा हलतो ? त्याचे दोन्ही हाताचे पजे त्या सुदरीच्या स्तनाना घट्ट चिकटलेले ! हिप्नॉटिस्ट सुब्रह्मण्यमला ओढू लागतो पण तो ढिम्म हलत नाही !

प्रेक्षकाकडून टाळ्याचा कडकडाट !

आधीच लाजून अर्धमेल्या झालेल्या चेंचुलक्ष्मीला आता काय कराव ते कळेनासं होत !

स्वत हिप्नॉटिस्ट सुब्रह्मण्यमला स्टेजवरून खाली घेऊन येतो. त्याला शँपेनचा एक ग्लास देतो सुब्रह्मण्यम तो ग्लास घटाघटा रिकामा करतो

पुढच्या बॅलेनृत्याचा कार्यक्रम सुरू होतो

मी सुब्रह्मण्यमला म्हणतो, "तुम्ही सर्वांपेक्षा अधिक मजा केलीत !"

"ती कशी काय ?"

मी त्याला घडलेला प्रकार सागतो तरुणीच्या उरोजाचा स्पर्श कसा काय वाटला याची चौकशी करतो

तो कपाळावर हात मारून घेतो ! ' वेंकटेश्वराची शपथ, मला काहीच आठवत नाही ! "

चेंचुलक्ष्मीच्या चमकीतले हिरे आनदान चमकू लागतात !

✦

दुसऱ्या दिवशीची दुपार

आपल्या बेगमला घाबरणारा, केन्याला नोकरी करणारा पाकिस्तानी तरुण माझ्याबरोबर आहे बीबीला काय थाप देऊन तो बाहेर पडलाय, खुदा जाने पण बेटा खुषीत आहे रात्री आम्ही 'नाइटक्लब'मधे कायकाय पाहिलं याची बारकाईन चौकशी करतो आहे !

रात्रभर गिऱ्हाइकांचं मनरंजन करून आळसावून सुस्त पडलेल्या एखाद्या वारांगनेप्रमाण ' पिगाल ' दिसतो आहे ' मूलां रूज'ची पवनचक्की निस्तेज झाली

आहे रात्री माणसांनी फुलून गेलेले रस्ते मरगळून पडलेले आहेत. आमच्यासारखे काही चुकलेमाकलेले प्रवासी रस्त्याच्या कडेन रमतगमत निघाले आहेत दोन्ही बाजूना एक दुकानाआड एक 'सेक्स शॉप'. प्रत्येक दुकानात त्याच त्या वस्तू स्त्रीपुरुषाचे विशिष्ट अवयव, विविध प्रकारची कामोत्तेजक साधन, आर्टपेपरवर छापलेली सुबक पोर्नोग्राफिक मासिक आणि पुस्तकं मागच्या बाजूला 'ब्ल्यू फिल्म' पहाण्यासाठी केवळ दोघानाच बसता येईल अशी छोटी केबिन्स कुणीही आत शिराव आणि मासिक चाळीत उभं रहाव, नाणं टाकून 'ब्ल्यू फिल्म' पहावी ! एकदोन दुकानांत शिरलो आणि आम्ही कटाळलो ! तेच–ते पहाण्यात कसली आलीय गमत ? सुरुवातीला कुतूहल, मग बोअर !

दोन 'सेक्स शॉप्स'च्या मधे मिनीथिएटर्स "आत चला लाइव्ह शो ! फक्त पस्तीस फ्रँक शँपेनचा ग्लास मोफत ! " –– अशी आर्जव करत थिएटरबाहेर माणसं उभी 'नवा शो हाँगकाँग गर्ल्स लेस्बियन्स जपानी मुली – निग्रो मुल वेगवेगळ्या पोझिस पहा पंचवीस फ्रँक्स ! ' –– अशी जाहिरात करून जवळजवळ आम्हाला ओढत ते लोक दारापर्यंत नेतात खुर्च्यांवर शँपेन पीत बसलेले लोक आणि मधोमध वर्तुळाकार मचकावर चाललेले खेळ ! मलुल प्रकाशात वातावरण गूढ, अद्भुत वाटत एका थिएटरच्या दाराशी एक पन्नाशीतली प्रौढा आमच्या पाक मित्राला करकचून मिठी मारते व ओढत आत नेऊ लागते. तो कासावीस होतो कशीबशी सुटका करून घेतो परक्या ठिकाणी असले 'शोज्' पहाण्यासाठी आत जायच नाही अस आम्ही आधीच ठरवलेल असत. त्यापेक्षा एखाद्या मिनीथिएटरमधे 'इरॉटिक फिल्म' पहावी आणि रमतगमत हॉटेलकडे परताव हे सोयीच नि सुरक्षित शिवाय स्वस्तदेखील

फिल्म बारापासून सतत चालू असते तिकिट काढून केव्हाही आत जाव. कटाळा आला की बाहेर निघाव आम्ही तिकिट काढून आत जातो. 'डोअरकीपर' एक उच, सडपातळ मुलगी आम्हाला ती खुर्च्यांवर बसवते आणि आपल्या डाव्या मुठीतल्या नाण्यांवर बॅटरीचा झोत टाकते आम्ही मुकाट्यान दोनदोन फ्रँक्स 'टिप' देतो

पडद्यावर चालू असलेली फिल्म भलतीच 'एक्सायटिंग' निघते ! स्त्री-पुरुषसबधात जे जे काही शक्य आहे ते ते सर्व तपशीलवार दाखवण्यात येत आहे ! "धिस इज द लिमिट ! काही शिल्लक राहिलेल नाही ! " मी माझ्या पाक मित्राच्या कानात कुजबुजतो तास–दीड तासान आम्ही बाहेर पडतो

आम्ही वेगान 'पिगालबाहेर पळ काढतो ! 'सेक्स'च्या चिमुकल्या साम्राज्यातला आमचा फेरफटका सपुष्टात येतो

रात्री जेवण झाल्यावर मी लिफ्टन वर खोलीकडे येतो जाभई देत लिफ्ट-बाहेर येतो

लिफ्ट चालवणारा वीस वर्षांचा तरुण आश्चर्यानं विचारतो, " तुमचा झोपायचा बेत आहे की काय ? "

" हो. मस्त झोप काढायची ! "

" पॅरिसमध्ये येऊन इतक्या लवकर झोपणार ? आत्ता तर पॅरिसला जाग आलीय ! "

दुपारच्या फेरफटक्यामुळ पुरेशी दमछाक झालीय हे त्या फ्रेंचमिश्रित इंग्रजी बोलणाऱ्या लिफ्टमनला सांगायच कसं ?

खांदे उडवून तो लिफ्टमधे अदृश्य होतो

मनात येत या ' पिगाल'मुळ, तिथल्या नाइट–लाइफमुळं पॅरिसची व्यर्थं बदनामी होत्येय या नितांतसुंदर शहराची, विद्येच्या त्या माहेरघराची, नेपोलियन, जोन ऑफ आर्क, द गॉलसारख्याच्या कर्मभूमीची एक बाजू तेवढी प्रकर्षानं लोकांच्या डोळ्यासमोर येत्येय ! पॅरिस केवळ ' पिगाल'मधे नाही. प्लास द ला कांकॉर्दमधे आहे, लुव्हर म्युझियममधे आहे आणि व्हेर्सायच्या राजवाड्यातही आहे ! किंबहुना 'पिगाल'मधे थोड आहे इतरत्र अधिक आहे !

*

पॅरिसचा निरोप घेऊन ऑस्टेंडला आलो तिथून ब्रिटिश चॅनेल पार करून डोव्हरला परतायच दोन दिवस लंडनमधे मुक्काम आणि मग बगदादमार्गे मायदेशी परत

बोटीत श्री ऋषी हे भारतीय भेटले 'साऱ्या जगभर पसरलेले जिप्सी लोक मूळ भारतीय आहेत, पंजाबचे आहेत,' अस त्यांचं म्हणणं आहे या जिप्सी लोकांची एक परिषद सुप्रसिद्ध नट युल ब्रायनर याच्या अध्यक्षतेखाली जिनेव्हाला भरली होती. त्या परिषदेला हजर राहून श्री ऋषी स्वदेशी परतत होते. जिप्सी लोकांविषयी त्यानी केलेल संशोधन ते मला मोठ्या उत्साहान सांगत होते माझ्या युरोपप्रवासाचा वृत्तात त्यांनी ऐकून घेतला मग त्यांनी विचारल, " स्वीडन–डेन्मार्क पाहिलत ? "

" नाही ! "

" पोर्तुगाल, स्पेन ? "

" उंहू. "

" अरेच्चा ! मग तुमचा युरोप–दौरा पूर्ण झालाय कुठ ? "

" तसं खूप पहायचं राहिलय. ग्रीस आहे, रशिया आहे, हॉलंड–पोलंड .. हे जग एवढं प्रचंड आहे ! आपण जमेल तसं, जमेल तितक पहायचं ! पण युरोपमधे बाकीच्या देशांत गेलो तरी दोन गोष्टी सर्वत्र आढळतील अशी मला खात्री आहे "

" कोणत्या दोन गोष्टी ? "

" फेसाळते चषक आणि उमलते गुलाब ! "

## विश्वमोहिनी
## ललित

चिवारीची फुले / प्रभाकर पाध्ये / रु २०

मुद्रा / पु भा भावे / रु १५

कलावंतांचे आनंदपर्यटन /
ग दि. माडगूळकर / रु १०

सुखाचे दिवस / रमेश मंत्री / रु. २५

स्मरणी / पु भा. भावे / रु १५

हिमफुलांच्या देशात / प्रभाकर तामणे / रु ३०

तीळ आणि तांदुळ / ग दि माडगूळकर / रु ३०

स्वरांच्या बनात / अरविंद गजेंद्रगडकर / रु. १५

नवरंग / रमेश मंत्री / रु. २५

हास्य मोगलाई / सिनिक / रु १०

क्रिकेट-वेध / शिरीष कणेकर / रु ३०

जत्रा / वसुंधरा पटवर्धन / रु २५

REFBK-0023201

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६९९
२००९
५५५८
२३२२९

व्हिएन्नामधली संध्याकाळ कमी रम्य नसते सहा वाजले की रस्त्यावर अनेक हॉटेल उगवतात रस्त्याच्या कडेला खुर्च्या टाकून, समुद्रकिनाऱ्यावर असतात तसल्या कापडी छत्र्या उभारून तात्पुरती हॉटेल तयार होतात आणि ती अर्ध्याएक तासात माणसांनी फुलून जातात ! 'कॉफी हाउस' ही व्हिएन्नानं जगाला बहाल केलेली एक चिरस्थायी संस्था हॉट डॉग्ज किंवा डोनट खात, कडवट बीअरचे घुटके घेत शरीरानं किंवा मनान तरुण असलेले स्त्रीपुरुष मोकळेपणान गप्पा मारत, हसतखिदळत बसलेले असतात व्हिएन्नाचा सुप्रसिद्ध क्रीमकेक खाल्ल्याशिवाय आणि 'व्हाइट वाइन' पोटभर प्यायल्याशिवाय व्हिएन्ना सोडून जायचं नाही, असं आमच्या त्या सहा-फुटी टरिस्ट गाइडन बजावलं होतं रस्त्याकडेच्या एका सुरेख 'कॉफी हाउस'मध्ये बसून मी त्या पदार्थांची मनसोक्त चव घेतली आणि रेंगाळत, रमतगमत भुयारी ट्राममध्ये बसून हॉटेलकडे परतलो टाउन हॉलजवळच्या प्रचंड इमारती शहराच्या मध्यभागी असलेली नक्षीदार कारंजी, त्यांभोवतीचे स्तिमित करणारे भव्य आकाराचे पुतळे यांमुळ व्हिएन्ना कायमचं लक्षात राहिलं इथल्या 'फाइन आर्टस् अकादमी'मध्ये हिटलर एक सामान्य नोकर म्हणून काम करीत होता, असं हॉटेलच्या मॅनेजरनं मोडक्यातोडक्या इंग्रजीत सांगितलं नियतीच्या लहरीपणाची ही आणखी एक चुणूक !

व्हिएन्नाकडून इटलीकडे निघालो आणि वाटेत एका गावात जेवण घेण्यासाठी थांबलो तिथं घडलेला प्रसंग हॉटेलमध्ये शिरलो आणि सुप् मागवून हॉटेलचा अंतर्भाग न्याहाळत असता एक गुबगुबीत ऑस्ट्रियन माझ्यासमोर येऊन बसला.

"इंडियन ?" त्यान विचारलं.

"हो."

माझं उत्तर ऐकून त्याला खूप आनंद झालेला दिसला.

"मी दिल्लीला होतो एका हॉटेलात मॅनेजर होतो तिथं एका महाराष्ट्रीयन मुलीवर माझं प्रेम बसलं"

"मराठी मुलगी ?"

"हो, मराठी मुलगी"

"मीही मराठी आहे — मुंबईचा"

"माय गॉद् !" त्यान माझे दोन्ही हात आपल्या रुंद पंज्यांत आवळून धरले. "सो ग्लॅद् तु मीत् यू ! सो ग्लॅद् तु मीत् यू !"

त्याची ती प्रेयसी आईवडिलांबरोबर हॉटेलात यायची तिचंही त्याच्यावर प्रेम होतं ( असं त्याचं म्हणणं ! ) या कहाणीचा शेवट हिंदी सिनेमात शोभेल असा हृदयद्रावक झाला तिचं परपुरुषाशी लग्न झालं ! सध्या ती नाशिकला आहे आपल्या वाट्याला आलेलं जिणं जगते आहे.

" पुढल्या वर्षी मी इंडियाला येणार आहे दिल्लीला येणार आहे. तिथून मी नाशिकला जाणार आहे. "

" नाशिकला ? कशासाठी ? " मी दचकलोच

" आय वॉन्त तु मीत् हर आय वॉन्त तु मीत् हर हजबंड. "

ऑस्ट्रियाच्या एका खेड्यातला एक गुबगुबीत माणूस एका मराठी मुलीच्या आठवणीन गहिवरला होता ! त्या मुलीच या माणसावर खरोखरी प्रेम होतं का ? की या माणसानं ते सगळ गृहीत धरल आहे ? खरोखरी हा नाशिकला जाऊन तिला नि तिच्या नवऱ्याला भेटला तर ?

तो हॉटेलबाहेर मला निरोप द्यायला आला, तेव्हा त्याच्या नाकाचा शेंडा लालबुद झालेला दिसला कापऱ्या आवाजात तो उद्गारला, " गुद्बाय् ! सी यू अगेन इन् इंदिया ! "

*

इटलीची सरहद्द जवळ आली आणि कुणीतरी म्हटल, " अरेच्चा ! फ्रॉइडच घर पहायच राहूयलंच की ! "

" काही पहाण्यासारख नाही त्यात ! " कुणीतरी म्हणाल, " रिकाम्या खोल्या आणि चार छायाचित्र. पन्नासएक वर्षं फ्रॉइड त्या वास्तूत राहिला होता हे खरच वाटत नाही "

" छायाचित्र कसली आहेत ? " मी विचारल

" त्याच्या कन्सल्टिंग रूमचा एक फोटो आहे शिवाय सिगार ओढणारा, बायकोच्या दडाबर रेललेला, नातवाला खेळवणारा अशी फ्रॉइडची विविध रूप आहेत त्याचा मेडिकल डिप्लोमा फ्रेम करून ठेवलेला आहे. झालच तर त्याचं मिलिटरी रेकॉर्ड, असिस्टंट प्रोफेसरशिपसाठी त्यान केलेला अर्ज, एका प्रकाशकाशी केलेला करार "

काही का असेना, फ्रॉइडचं घर पहाण्यासाठी पुन्हा व्हिएन्नाला आल पाहिजे.

व्हिएन्ना — फ्रॉइडचं, बीथोव्हनचं, मारिया थेरेसाच, नेपोलियनच्या त्या कोवळ्या पोराचं, मराठी मुलीवर प्रेम करणाऱ्या गुबगुबीत हॉटेल–मॅनेजरच !